९८२२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८५५८

स्वराज्यांतील

# निवडक निबंध.

वर्ष दुसरें.

किंमत १ रु.

REFBK-0002041

ग्रंथ-संग्रहालय
नि. सं.
ना. ३७९

# स्वराज्यांतील

# निवडक निबंध

वर्ष दुसरें

प्रथमावृत्ति.

प्रकाशक व मुद्रक :—
कृष्णाजी शिवराम परांजपे.
गोवर्धन प्रेस, पुणें.

REFBK-0002041

किंमत १ रुपया.

# अनुक्रमणिका.


१ नवाळांच्या प्रयत्नांना निराळें वळण. ... ... १
२ नाकाशीं क्लोरोफॉर्म आणि पायावर ऑपरेशन. ... १०
३ गुलामगिरीमधून स्वराज्यामध्यें पतितपरावर्तन. १९
४ गुलामगिरीच्या महोत्सवाचा तिरस्कार कीं अंगीकार! २६
५ एक जुना प्रधान—आर्य-चाणक्य आणि हल्लींचे नवे प्रधान. ... ... ... ३२
६ कमकुवतपणा कीं प्रजाद्रोह. ३९
७ मराठी वॉर मेमोरियल. ४३
८ इंग्लिश अधिकारी, नेटिव राजे आणि इंडियन रयत. ४९
९ चाफळचे स्वामी. ... ५४
१० संस्कृत आशीर्वाद. ... ५७
११ एका पहारेकऱ्याची गोष्ट. ५९
१२ स्वातंत्र्याच्या भटी. ... ६७
१३ एका पाठभेदाची चर्चा. ६९
१४ भलें व लभ्यांचरें ही जोडी जमते काय! ... ... ७०
१५ टीचभर संस्थानची शांतता कीं बगळ्या जगाची शांतता! ७३
१६ अर्धनाशे समुत्पन्ने सर्वे त्यजति पंडितः! ... ... ७९
१७ गरिबांचे गुप्त कट. ... ८३
१८ पेणची परिषद. ... ९०
१९ शिपाडी आनंद. ... ९७
२० पेणच्या परिषदेंतील दोन उपसूचना. ... ... ९९
२१ कौन्सिलांवरील बहिष्काराचा पूर्व आणि पूर्ण इतिहास! १०७
२२ महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी. ... ... ११५
२३ हृदयाविष्करण. ... १२३
२४ महात्मा गांधी, तुम्ही सुखांत! ... ... १२६
२५ एक देशभक्त विद्यार्थी. १३३
२६ एका चिनीबाईची गोष्ट. १४४
२७ राष्ट्रीय कामगिरी. ... १४६
२८ यशाचें शिंग. ... १४८
२९ भयंकर स्वप्न. ... १५२

सं. नि. ४०३.

# 'स्वराज्यां'तील निवडक निबंध.

## वर्ष दुसरें.

### मवाळांच्या प्रयत्नांना निराळें वळण.

पुष्कळांना असें वाटतें कीं, मवाळ होणें ही एक अगदीं साधी आणि सोपी गोष्ट आहे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. अट्टल मवाळ होण्याच्या वाटेंत किती अवघड अडचणी असतात, याची इतर लोकांना कल्पनाही येणें शक्य नाहीं. मवाळांचीं दुःखें मवाळच काढूं जाणोत. त्यांना सरकारची मर्जी संभाळतां संभाळतां पुरे वाट होत असली पाहिजे! ते बहुतेक आपल्या-कडून सरकारची मर्जी संभाळण्याकरितां आपल्या प्रयत्नांची शिकस्त करतात; परंतु तरी देखील आपण कसेंही झालें तरी इंडियन आहों, ही बुद्धि एखादे वेळीं चुकून त्यांच्या मनांत येऊन त्यांच्या हातून एखादें कांहीं स्वदेशाच्या हिताचें किंवा स्वदेशबांधवांच्या हिताचें कृत्य झालें कीं, लगेच त्यांच्यावर कोणाची तरी खप्पा मर्जी होते! थोड्या दिवसांपूर्वीं मुंबईच्या कौन्सिलमध्यें धारवाडच्या गोळीबाराबद्दल चौकशी करण्याकरितां एक स्वतंत्र कमिशन नेमावें म्हणून रा. ब. चितळे यांच्याकडून एक ताबड-तोबीची मागणी करण्यांत आली होती. ती जी फेटाळून लावावयाला पाहिजे होती, ती कशी तरी आणि कोणाकडून तरी फेटाळून लावण्यांत आलीच. पण मवाळ पक्षांतील अप्रबुद्ध लोकांकडून अशा चुका फिरून होणें इष्ट नाहीं, म्हणून गेल्या गुरुवारच्या टाइम्स ऑफ इंडियाच्या अंकामध्यें मवाळांच्या कर्तव्यांबद्दल मवाळांना वस्तुपाठाच्या उपदेशाचे धडे शिकविण्यांत आलेले आहेत. मवाळ लोकांनीं असल्या धारवाडच्या प्रक-

रणासारख्या कामांत फारसें लक्ष घालून सरकारला मदत करण्याचा अव्या॰ पारेपु व्यापार करणें योग्य नाहीं. रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावीत असतो, हें जरी खरें असलें, तरी त्यानें आपल्या रिकामपणीं कोणत्या कुडाला तुंबड्या लावावयाच्या आणि कोणत्या कुडाला लावावयाच्या नाहींत, इकडे काळजीपूर्वक लक्ष दिलें पाहिजे. सरकारला मदत करण्याचीच मवाळांची कदाचित् इच्छा असेल; पण तसें करतांना त्यापासून पुढें काय परिणाम होतात, हें फारच थोड्या मवाळांच्या लक्षांत येत असेल. शिवाय या मवाळांना असें वाटत असतें कीं, कौन्सिलमध्यें आल्यानंतर कांहीं थोडेसे इकडचे तिकडचे प्रश्न विचारले आणि एखादें दुसरें भाषण केलें, म्हणजे आपण आपल्या पोशिंद्यांचें काम केलें ! आणि एवढें केलें म्हणजे आपलें कर्तव्य कर्म संपलें ! पण असें मुळींच नाहीं. त्यांनीं कांहीं तरी प्रश्न विचारणें आणि कांहीं तरी भाषणें करणें, यांत कांहीं एक अर्थ नाहीं. हें काम कोणीही करील. यापासून सरकारला खरी मदत होत नाहीं. सरकारला मदत करण्याच्या बाबतींत मवाळांचें हल्लींचें कर्तव्यकर्म याच्यापेक्षां फार भिन्न आहे. त्यांनीं कौन्सिलांतल्यापेक्षां कौन्सिलच्या बाहेरच हल्लीं जास्त काम करावयाला पाहिजे आहे. सरकारला मदत करण्याची जर मवाळांची मनापासून इच्छा आहे, तर त्यांनीं कौन्सिलांतील प्रश्न विचारण्याचें वगैरे क्षुल्लक काम केलें म्हणजे आपलें कर्तव्यकर्म झालें आणि आपण सरकारला मदत केली, असें न समजतां सगळ्या मवाळांनीं कौन्सिलच्या बाहेरील बहुजनसमाजामध्यें जाऊन मिसळलें पाहिजे आणि त्यांनीं आपला स्वतःचा पक्ष फैलावून बळकट करून घेऊन सरकारकरितांही लोकप्रीति मिळवून आणून दिली पाहिजे. हें ध्येय आणि हें कर्तव्य मवाळांच्या पुढें टाइम्सकडून हल्लीं मांडण्यांत आलेलें आहे. परंतु हें साध्य साधून आणावयाचें कसें, हा एक मोठा कठिण प्रश्न आहे. मांजराच्या गळ्यांत जर एकदा घाट बांधली गेली, तर मग मात्र पुढें त्यापासून पुष्कळ फायदे होऊं लागणार, याबद्दल वाद नाहीं. पण आधीं ही घाट बांधली जावी कशी, हाच अडचणीचा प्रश्न आहे. हा प्रश्न मवाळांना सोडवून दाखविण्याकरितां आणि त्यांच्या अडचणींतून त्यांनीं आपला मार्ग काढतां येण्याला समर्थ होण्याकरितां टाइम्सनें त्याच गुरुवारच्या अंकामध्यें दुसरीकडे

एक निराळें पत्र म्हणून छापलें आहे. मूळ टाइम्सचें लिहिणें आणि हें पत्र हे दोन लेख दिसण्यांत दोन अगदीं निरनिराळे लेख दिसतात, हें खरें. एक मुख्य आर्टिकलचा लेख आहे, व दुसरा पत्रव्यवहारांतील लेख आहे. एक एका पानावर व दुसरा दुसऱ्या कोठल्या तरी पानावर छापलेला आहे. फरक काय तो एवढाच! पण बाकी विचारसरणीच्या मानानें पाहिलें असतां सदर दोन्ही लेख मिळून एकच लेख केला गेला असता, तरी शोभण्यासारखें होतें! परंतु दोन निरनिराळे लेख छापण्यांत असा एक फायदा असतो कीं, एकाच्या म्हणण्याला दुसऱ्या कोणाच्या तरी म्हणण्याची पुष्टि मिळत आहे, असें त्या योगानें भासवितां येतें. त्या दृष्टीनें पाहतां टाइम्सच्या अग्रलेखामध्यें मवाळांच्याकरितां जें साध्य पुढें ठेवण्यांत आलें आहे, तें कसें घडवून आणावें, याच्याबद्दलचीं नानाविध साधनें एका बातमीदाराच्या पत्रव्यवहाराच्या द्वारानें म्हणून सुचविण्यांत आलेलीं आहेत.

या पत्रव्यवहाराच्या लेखांत मवाळांना असें सांगण्यांत आलें आहे कीं, "बाबांनों, तुम्ही हल्लीं कौन्सिलमध्यें आलां आहां खरे, आणि तुमच्या पक्षाला विजयश्रीनें हल्लीं क्षणभर चुकून माळ घातली आहे खरी; पण हें विजयश्रीचें मंगळसूत्र तुमच्या गळ्यांतून केव्हां तुटून जाईल, याचा कांहीं नेम नाहीं! लक्ष्मीप्रमाणेंच विजयश्री ही सुद्धां फार चंचळ असते; व ती टिकविण्याचा कोणी जर प्रयत्न केला नाहीं, तर ती आपल्याला सोडून जाण्याची फार भीति असते. म्हणून, अहो सर्व विजयी मवाळांनों, तुम्हांला हा जो तात्पुरता कौन्सिलमध्यें प्रवेश होण्याचा जय मिळाला आहे, तो तुमच्या पक्षाकडेच पुढेंही आणि फिरूनही कायम राहील, अशी तुम्ही कांहीं तरी तजवीज केली पाहिजे. हल्लीं तुमच्याच पक्षाचे व जातीचे सगळे लोक कौन्सिलमध्यें भरले आहेत, व प्रधानकीच्या, अध्यक्षांच्या, वगैरे सर्व उबदार जागाही तुमच्याच पक्षाला मिळाल्या आहेत; आणि अशा रीतीनें राज्यकारभार चालविण्याचें सरकारचें सगळें यंत्र सरकारनें बहुतेक तुमच्याच ताब्यांत हल्लीं दिलेलें आहे! पण ही जी लूट तुम्हांला मिळालेली आहे, ती तुम्ही संभाळणार कशी! त्यासाठीं तुम्ही हल्लीं काय यत्न करीत आहां? तुमच्यापैकीं कोणी एखाद्यानें एखादे वेळीं एखादें लहानसें चोपडें लिहिलें, किंवा एखादी सभा भरविली, किंवा एखाद्या मेजवानीच्या वेळीं एखादें

जेवण जेविलें, म्हणजे तुमचा कार्यभाग होईल, असें का तुम्हांला खरोखर वाटतें ? हल्लीं तुमचे पुढच्या स्थिरत्वासाठीं कांहींच प्रयत्न चाललेले नाहींत. तुम्ही मुंबईत किंवा पुण्यांत कौन्सिलच्या वेळीं जेव्हां एकत्र जमतां, त्या वेळीं तुम्ही एकमेकांच्या कितीही पाठी थोपटल्या किंवा कौन्सिलमध्यें तुम्ही कांहीं भाषणें केलीं, तरी त्याचा कांहीं एक उपयोग नाहीं. तुमचीं सगळीं चिमुकलीं चोपडीं आणि तुमचीं सगळीं लांबलचक निरर्थक व्याख्यानें हीं अगदीं कवडीमोल आहेत. कारण, तुम्ही आपला पक्ष बहुजनसमाजामध्यें बळकट करण्याचा वेळींच प्रयत्न केला नाहीं, तर ह्या हल्लींच्या तुमच्या सगळ्या चोपड्यांचा आणि व्याख्यानांचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं. तुमच्या मवाळ पक्षासारख्या ज्या पक्षाला लोकांचा पाठिंबा नाहीं, तो पक्ष असून नसून सारखाच होय. तेव्हां तुम्ही आपला मवाळ पक्ष वाढविण्याची कांहीं तरी खटपट करा. इंग्लंडमध्यें जे निरनिराळे पक्ष आहेत, ते आपला विस्तार कसा वाढवितात, याबद्दलच्या इतिहासांचीं पुस्तकें तरी तुम्ही कांहीं वाचा आणि त्यांमधून तरी तुम्ही कांहीं अक्कल शिका ! सारांश, धारवाडच्या चौकशीच्या प्रश्नासारखे सरकारच्या गैरसोयीचे प्रश्न सरकारला विचारून सरकारी पक्षाला मदत करण्याची वेडगळ हात बंद ठेवून तुम्ही उद्यां फिरून कौन्सिलमध्यें कसे निवडून याल, इकडे आधीं लक्ष द्या ! ”

असा कानउघाडणीचा उपदेश टाइम्सच्या दुसऱ्या एका निराळ्या लेखांत मवाळांना करण्यांत आलेला आहे, व त्याबद्दलचे मार्गही सदर पत्रामध्यें सुचविण्यांत आलेले आहेत. ते असे कीं, प्रत्येक जिल्ह्यामध्यें मवाळांनीं आपली एकेक मवाळ संस्था मवाळपणें स्थापन करावी, व त्या संस्थेच्या जाळ्यांत कोणी नवीन मवाळ मत्स्य सांपडला तर पहावा. प्रत्येक जिल्ह्यांत हल्लीं बहुतकरून लेजिस्लेटिव कौन्सिलचा एकेक मेंबर हा तरी निदान निर्भेळ मवाळ आहेच. त्यानें सूर्यमालेंतील सूर्य आपल्या भोंवती बाकीच्या ग्रहांना आकर्षून घेत असतो त्याप्रमाणें जिल्ह्यांत कोणी मवाळ आढळल्यास त्याला आपल्याकडे आकर्षण करून घेण्याचा प्रयत्न करावा. हल्लीं पुण्याच्या मुक्कामांत कौन्सिलच्या निमित्तानें जे सगळे मवाळ एके ठिकाणीं गोळा झालेले आहेत, त्यांनीं सभेंत एकत्र जमून आणि सगळ्यांचीं बुद्धिवान् डोकीं एकत्र आणून सुचल्यास कांहीं तरी विचार करावा. आणि

मुंबई इलाख्यांत सिंध, गुजराथ, दक्षिण महाराष्ट्र, कोकण आणि कर्नाटक, असे सरकारनें त्यांच्याकरितां जे आयते विभाग पाडून ठेविलेले आहेत, त्या प्रत्येक विभागामध्यें शक्य झाल्यास त्यांनीं एकेक कमिटी नेमून सगळ्या कमिट्यांचें मिळून मुख्य ऑफिस मुंबईमध्यें ठेवावें! अशी जागेची सोय सदर पत्राच्या लेखकानें दाखवून दिलेली आहे. व त्यामुळें कमिटयांच्या बैठकीकरितां आतां निदान मवाळांना जागा ठरविण्याची तरी पंचाईत पडणार नाहीं !

सदर पत्रांतील लेखकानें मवाळांच्या लोकप्रीतीच्या प्रांतांतील प्रवासाच्या शिधेरीची इतकी तयारी करून दिली, तरी एवढ्यानें त्यांचें पुरें पडणार नाहीं, अशी शंका त्या लेखकाला आली. व "तुम्ही आम्हांला लोकांमध्यें मिसळावयाला सांगतां आणि लोकांचें पाठबळ मिळवावयाला सांगतां, पण ते बहुजनसमाजांतील बहुतेक लोक आमच्या सावलीलाही उभे राहत नाहींत; तेव्हां त्याला आम्ही काय करावें !' असें रडगाणें गात आणि तोंड वेंगाडीत हे मवाळ लोक आपल्याकडे रडत येणार, तेव्हां यांच्या मदतीला आपण कोणी तरी नवीन लोक दिले पाहिजेत, असें वाटून सदर लेखकानें सदर मवाळांना दोन नवीन सोबती गांठून दिलेले आहेत ! इंडियांतील बहुतेक सगळा बहुजनसमाज या मवाळांच्या विरुद्ध असतां ह्यांना ह्या पत्रलेखकानें दोन जातीचे दोन सोबती कोण गांठून दिले असतील, अशी स्वाभाविकपणें कोणालाही जिज्ञासा उत्पन्न होईल. पण हाडच्या वर्णाला गजकर्णाशिवाय दुसरा सोबती कोण मिळणार ? सदर लेखकाची सूचना फार मार्मिकपणाची आहे. त्यानें मवाळाला या बाबतींत असें सांगितलें आहे कीं, "हे मवाळा, हल्लींचा हा इंडियन बहुजनसमाज जरी तुला अनुकूल नाहीं, तरी त्याच्यामध्यें तूं आपल्या पक्षाचे लोक जास्त जमा करण्याकरितां खुशाल संचार कर ! आणि तसें करतांना तूं बिलकूल भिऊं नकोस. कारण, या कामांत युरोपियन लोक आणि सत्यशोधक लोक हे नेहमीं तुझे पाठीराखे राहतील. यांच्यावर तूं अवलंबून रहा आणि आपलें कार्य कर !" अशा प्रकारचें मवाळांना आश्वासन दिल्यानंतर सदर लेखक इंडियांतील युरोपियन लोकांना दोन उपदेशाचे शब्द सांगण्याकडे वळला आहे. पण असें करतांना तो कोणत्याही युरोपियन अधिकाऱ्यांना हा उपदेश सुचवित आहे, असें कोणी चुकूनही म.नण्याचें कारण नाहीं! तो आपल्या सूचना

फक्त मुंबईंतील व इतर ठिकाणच्या युरोपियन व्यापाऱ्यांना करीत आहे. त्याचें असें म्हणणें आहे कीं, युरोपियन लोकांनीं आपली निराळी असोसिएशन काढून नेमस्तांपासून निराळें कां रहावें याचें कांहीं कारण दिसत नाहीं. तेव्हां आपली ही तुटक राहण्याची जुनी संवय टाकून देऊन त्यांनीं आपल्या ह्या मवाळ ह्या नांवाच्या नव्या इंडियन दोस्तांपाशीं एक होण्याला कांहीं हरकत नाहीं. कारण ते आपलेच आहेत ! म्हणून हल्लीं गांधींच्या चळवळीच्या विरुद्ध लढण्याच्या वेळीं युरोपियन लोक आणि मवाळ लोक या दोघांनीं मुंबई वगैरे सारख्या मोठ्या शहरांतून एकत्र होणें अगदीं जरूर आहे. युरोपियन व्यापाऱ्यांना आणि युरोपियन असोसिएशनलाही मवाळांशीं एक होण्याविषयीं इतक्या आत्मविश्वासानें सांगण्याचें धैर्य कोणाही इंडियन माणसाला सहसा होणें शक्य नसल्यामुळें ह्या प्रस्तुत पत्राचा लेखक बहुतकरून कोणी तरी टाइम्सच्या ज़ातीचा युरोपियनच असला पाहिजे, असें अनुमान काढण्याला पुष्कळ जागा आहे. असो; मवाळांच्या मदतीकरितां मोठमोठ्या शहरांतून युरोपियनांच्या द्वारें तजवीज करून दिल्यानंतर सदर लेखक मवाळांची खेड्यापाड्यांतून सोय लावून देण्याकडे वळलेले आहेत. खेड्यापाड्यांतून हल्लीं ब्राह्मणेतरांची चळवळ जी एवढ्या जोरानें उठविण्यांत येत आहे, ती कशाकरितां ? मवाळांनों, हें सगळें सत्यशोधनाचें ताट तुमच्या करितांच वाढून तयार करण्यांत येत आहे ! त्यांना तुमच्या मदतीकरितां हांक मारा, म्हणजे सगळे सत्यशोधक हे तुमचेच आहेत !

अशा रीतीनें सदर युरोपियन (?) लेखकाकडून मवाळांची कंबर खूप जोरानें कसून देण्यांत येत आहे. व ती जरा भक्कम झाली, म्हणजे या शूरांना इंडियन बहुजनसमाजावर सोडण्यांत येणार आहे. आणि हें मवाळांचें सैन्य एकदां सगळ्या देशभर दिग्विजय संपादन करण्याकरितां निघालें कीं, मग लोकपक्षाची काय दाणादाण उडून जाईल आणि काय वाताहत होईल, याची कल्पनाही करणें शक्य नाहीं ! प्रत्येक गांवांत लहान लहान दिवाणखान्यांतून पांच पन्नास आमंत्रित लोकांच्या प्रचंड गुलाम सभांतून यांचीं प्रचंड जाहीर व्याख्यानें एकदां होऊं लागलीं, आणि एकदां त्या व्याख्यानांतून—श्रोत्यांची काय कथा, पण त्या सभागृहांतील भिंती, खिडक्या, दारें यांचींही—मनें वळूं लागलीं, म्हणजे मग गांवांतल्या भिवाऱ्या इतर लोकांची

काय दशा होईल, कोण जाणें ! अशा सभांतून लोकांचीं मनें लोहचुंबका-प्रमाणें पकडून कैद करून आणण्याकरितां कोणकोणत्या विषयांवर मवाळांनीं बोलावें याची सुद्धां यादी सदर पत्राच्या लेखकानें मवाळांच्याकरितां लिहून काढिली आहे. सगळ्या भाषणांतून हल्लींच्या सुधारणांची स्तुति आणि ब्रिटिश सरकारच्या अस्तित्वाची अवश्यकता हे दोन विषय तर मुख्यत्वेंकरून असलेच पाहिजेत !–पण हें मवाळांना सांगावयाला पाहिजे काय ? मवाळांचें सगळें जीवित हल्लीं या दोन गोष्टींवरच अवलंबून आहे.त्यांना हें कशाला सांगावयाला पाहिजे ! ते ह्या दोन गोष्टींशिवाय अलीकडे दुसऱ्या कशाबद्दल बोलत आहेत ? कौन्सिलें आणि सरकारची खुशामत या दोन गोष्टींच्या पायीं त्यांना अलीकडे विधवाविवाहासारख्या प्रश्नांकडे सुद्धां लक्ष देण्याला फुरसत सांपडत नाहीं ! सारांश, कौन्सिलें आणि ब्रिटिश सरकार या दोन देवतांचें गणपतिपूजन मवाळ लोक आपल्या व्याख्यानांच्या निर्विघ्नपरिसमाप्तीसाठीं आधीं करतीलच ! पण त्याच्यापुढें आतां काय बोलावयाचें अशी जेव्हां मवाळांची बुद्धि कुंठित होईल, तेव्हां ब्रिटिश राज्यापासून हिंदुस्थानाला जे आश्चर्यकारक फायदे झाले आहेत, त्यांचें विष्णुसहस्रनाम वाचण्याला मवाळांनीं सुरवात करावी, असें सदर पत्रलेखकानें सुचविलें आहे. जो जसा भेटेल त्याच्यावर तसें ब्रिटिश राज्यापासून झालेल्या फायद्यांचें शस्त्र सोडून द्यावें व त्याला कोणीकडून तरी चीत करून टाकावें! व्यापारी भेटला, तर व्यापार, उद्योगधंदे, गलबतें, आगबोटी, रस्ते, रेलवे, संपत्ति, इत्यादि अनेक शब्द-जालांचा भडिमार त्याच्यावर बेलाशक करावा ! आणि शेतकरी भेटला, तर कमी शेतसारा,दुष्काळांतील सुव्यवस्था, तगाई, वगैरे गोष्टींनीं त्याची खाली करून टाकावी ! शिवाय ब्रिटिश राज्यापासून जिकडे तिकडे शांतता झाली आहे, हेंही सांगण्याला विसरतां कामा नयेच ! तसेंच नॉन–को–ऑपरेशन-च्या चळवळीमुळें किती दंगे धोपे झालेले आहेत, याच्यावरही मवाळ लोकांना पुष्कळ बोलतां येण्यासारखें आहे, व या द्वारानेंही त्यांनीं प्रतिपक्षा-वर हल्ले चढवावेच. असें सगळें साद्यंत ब्रीफ सदर पत्रलेखकानें तयार करून मवाळांच्या हातीं दिलें आहे. आतां फक्त पोपटांनीं आपल्या पोपट-पंचीला सुरवात करण्याचा अवकाश राहिला आहे कीं, झाला जिकडे तिकडे मवाळांच्या मतांचा प्रसार !

किती खोट्या कल्पना ! आणि किती चुकीचे अंदाज ! हें वरच्यासारख्या कोत्या कल्पनांनीं आणि युक्त्यांनीं भरलेलें पत्र जर खरोखरच एखाद्या युरोपियननें लिहिलेलें असेल, तर त्याला हल्लींच्या बदललेल्या परिस्थितीचें अजून काडीइतकेंही ज्ञान झालेलें नाहीं, असेंच म्हणावें लागतें. कांहीं दिवसांपूर्वीं ह्या युक्त्यांना कदाचित् यश आलें असतें; पण आतां लोकसमुदायाचा समुद्र इतका जागृत झाला आहे कीं, ह्या मवाळांच्या सारख्या टिटवीच्या मदतीला आणखीही कोणी टिटव्या दिल्या गेल्या, तरी त्यांच्यापासून हें समुद्रनिवारणाचें काम इतःपर केव्हांही होणें शक्य नाहीं. तुम्ही ह्या मवाळांना लोकांमध्यें जाऊन मिळावयाला आणि मिसळावयाला सांगतां, पण यांना हल्लीं तसें करणें शक्य नाहीं. यांच्यावर लोकांचा विश्वास नाहीं. कौन्सिलमध्यें कोणीही जाऊं नये, असें सगळे लोक म्हणत असतां त्यांच्याशीं बेइमानपणा करून जे मवाळ कौन्सिलमध्यें गेले, त्यांनीं आतां त्याच लोकपक्षापुढें येऊन त्यांच्यापासून पाठिंबा मिळविण्याकरितां त्यांना तोंड दाखविणें तरी शक्य आहे का ? धूर्त आणि शहाणे मवाळ लोक सहसा असल्या याचनेकरितां लोकपक्षाच्या पुढें येण्याचें धाडस करण्याचें हजार हिकमतींनीं टाळतातच. आपण बरे, आणि आपलीं सरकारी कौन्सिलें आणि आपले सरकारी मित्र बरे, असें मानून मवाळ लोक आपल्या संकुचित अंधकारामध्यें इतके बुडून गेलेले असतात कीं, लोकमताच्या सूर्य प्रकाशामध्यें येण्याचें त्यांच्या मोठें जिवावर येतें. चुकून कदाचित् त्यांनीं कोठें सभा केली, तरीही त्यांचें लोक कोणी ऐकून घेत नाहींत. कित्येक ठिकाणीं सरकारी प्रोत्साहनाच्या गुलाम—सभा ज्या झालेल्या आहेत, त्यांच्या हकीकती सर्वांना माहीतच आहेत. मवाळांचीं भाषणें व मतें लोकांमध्यें फैलावलीं जावीं, म्हणून कित्येक प्रसंगीं राष्ट्रीय पक्षाचें कातडें क्षणभर अंगावर घेण्याचा देखावा करण्यांत येतो; पण त्यानेंही आतांशा लोक फारसे फसेनासे झालेले आहेत. मुंबईंत नुकतेंच श्रीयुत नामदार शेट जमनादास द्वारकादास, एम्. एल. ए., यांच्या सन्मान्य आणि स्पृहणीय अध्यक्षतेखालीं बॅप्टिस्टा यांचें व्याख्यान होतें. त्या वेळीं नारळांतील खोबरें तेवढें जसें खातात त्याप्रमाणें बॅ. बॅप्टिस्टा यांचें भाषण झाल्यावर लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद असे एवढे मोठे अध्यक्ष, पण त्यांचे चार शब्दही ऐकून घेण्याला कोणी

तयार होईना ! आणि हे युरोपियन लोक मवाळांना सांगतात कीं, तुम्ही लोकांत जाऊन व्याख्यानें द्या ! नेमस्त पक्षांत पूर्वीं जे कांहीं लोक होते, ते सुद्धां तो पक्ष सोडून हल्लीं राष्ट्रीय पक्षामध्यें येऊन मिळत आहेत; आणि अशी वस्तुस्थिति असतांना हे युरोपियन लोक अशी भलतीच अपेक्षा बाळगितात कीं, मवाळांनीं मेहनत करून आपल्या पक्षाला नवीन लोक मिळवून घ्यावेत ! पण अशा स्थितींत बिचारे मवाळ लोक काय मेहनत करूं शकणार आहेत ? युरोपियन लोकांची हल्लींच्या सुधारलेल्या कौन्सिलांवर मोठी भिस्त आहे. व त्या कौन्सिलांची मवाळांनीं लोकांपुढें जाऊन तारीफ करावी, असें त्यांचें म्हणणें आहे. पण हीं कौन्सिलें अत्यंत निरुपयोगी आणि अत्यंत निराशाजनक आहेत, व म्हणून त्यांवर बहिष्कारच घातला पाहिजे, असें सगळे लोक म्हणत असतां त्यांच्यापुढें त्या निरुपयोगी कौन्सिलांचे स्तुतिपाठ गाऊन काय उपयोग ? शिवाय, ज्या कौन्सिलांवर इंग्रजांची हल्लीं इतकी भिस्त आहे, त्या कौन्सिलांबद्दल तरी त्यांना काय शाश्वती आहे ? सर्व लोकांनीं कौन्सिलांवर बहिष्कार घातल्या-मुळें सुदैवानें ह्या चालू खेपेला मवाळांना कौन्सिलांमध्यें जातां आलें आहे; पण उद्यां राष्ट्रीय पक्षांतील लोकांनीं कौन्सिलांवरचा बहिष्कार उठवून महात्मा गांधींच्या सल्यानें कौन्सिलमध्यें जाण्याचा आणि तीं कौन्सिलें हस्तगत करण्याचा निश्चय केला, तर मग हे सरकारचे आवडते मवाळ लोक सर-कारला कोठें आढळतील ? राष्ट्रीय पक्षांतील लोक निवडणुकीला उभे राहिले, तर समुद्रांत सांडलेल्या खसखशीच्या दाण्यांप्रमाणें हे मवाळ लोक अर्थां-तच सरकारला अतिशय दुर्मिळ होतील, आणि सरकारचीं सर्व कौन्सिलें राष्ट्रीय मताच्या लोकांनींच व्यापलीं जातील. तेव्हां मग कौन्सिलच्या मता-प्रमाणें आम्ही राज्यकारभार चालवीत आहोंत, ही हल्लींची सरकारी सबब त्या वेळीं सरकारला कितपतशी उपयोगांत आणतां येईल ? हल्लीं मवाळ लोक तरी बिचारे सरकारच्या बाजूला राहिलेले आहेत; पण पुढील खेपेला प्रातःकाळच्या नक्षत्रांप्रमाणें त्यांची स्थिति होऊन कौन्सिलें राष्ट्रीय लोकांनीं व्यापून टाकिलीं, म्हणजे मग सरकार कोणाच्या पाठीमागें दडणार ? आणि अशी स्थिति म. गांधी हे आपल्या चळवळीनें लवकरच आणल्यावांचून केव्हांही राहणार नाहींत. सारांश, मवाळ हे कांहीं सरकारचे

जन्माचे सोबती आहेत असें नाहीं. शिवाय मवाळांनाही त्यांचा देश, त्यांची जात, त्यांचें गोत, सर्व कांहीं आहेच. इतक्या सगळ्यांशीं नेहमींच कृतघ्न होणें त्यांना शक्य नाहीं. तेव्हां मवाळांच्या पाठीमागें आश्रय घेऊन युरोपियन असोसिएशन किंवा सत्यसमाज यांच्यासारख्या आगपेटीच्या काड्यांनीं बहुजनसमाजामध्यें फूट पाडण्याचा या उपर व्यर्थ शीण न घेतां युरोपियन लोकांनीं इंडियन लोकांना जबाबदारीच्या स्वराज्याचे सर्व हक्क तावडतोब द्यावेत, हेंच शहाणपणाचें व दूरदर्शीपणाचें कृत्य आहे.

---

# नाकाशीं क्लोरोफॉर्म आणि पायावर ऑपरेशन !

स्टेट सेक्रेटरीच्या सल्यानें हिंदुस्थान सरकार हिंदुस्थानामध्यें लवकरच येथील राजकीय चळवळ करणाऱ्या प्रमुख पुढाऱ्यांवर कांहीं तरी खटले करण्याच्या विचारांत आहे, अशा अर्थाची एक तार मूळ प्रथमतः कलकत्त्याच्या स्टेट्समन पत्रामध्यें प्रसिद्ध झाली होती. ही तार प्रसिद्ध केल्यानंतर स्टेट्समन पत्रानें त्याच्यावर एक अग्रलेखही लिहून प्रसिद्ध केला आहे. आणि या सूचक अग्रलेखामध्यें असे खटले करण्याला कांहीं हरकत नाहीं, असें मतही प्रतिपादन करण्यांत आलें आहे. लंडनच्या एखाद्या बातमीदाराकडून एखादी बातमी इकडे आली, म्हणजे तिला हिंदुस्थानामध्यें पुष्कळ वेळां वाजवीपेक्षां फाजील महत्त्व उगीच देण्यांत येत असतें. कोठल्या तरी बातमीदारानें कांहीं तरी बातमी इकडे पाठवावी आणि त्यामुळें हिंदुस्थानांत उगीच खळबळ उडून जावी, असें पुष्कळ वेळां होतें. असल्या बातम्या उठविण्यांत त्या बातम्या पसरविणारांचे कित्येक गुप्त राजकीय हेतु असतात. तिकडील धोरणी आणि राजकारणी लोक असल्या कांहीं तरी बातम्या उत्पन्न करतात, आणि त्या खोट्या बातम्यांपासूनही

कोणकोणाच्या मनावर काय काय आणि कसकसे खरे परिणाम होत असतात, हें ते कोठून तरी अडून काळजीपूर्वक पहात असतात. ह्या खोट्या बातम्यांचे सख्खे जनक कोण असतात, हें लोकांना दिसत नाहीं; पण लोकांवर अशा बातम्यांचे परिणाम काय होत आहेत हें मात्र त्यांना पूर्णपणें दिसत असतें. म्हणून असल्या बिनआधारी व बिनअधिकारी बातम्यांच्या प्रसंगीं लोकांनींही तितक्याच धोरणानें आणि धूर्तपणानें वागण्याचा प्रयत्न करणें इष्ट आहे. असल्या सहेतुक राजकीय बातम्यांच्या वृक्षाचें मूळ त्या बातम्यांचे उत्पादक जर आपल्यापासून झांकून ठेवण्याची इतकी काळजी घेतात, तर आपण तरी त्या त्यांच्या वृक्षावरील फळें त्यांना त्यांच्या फायद्याकरितां काय म्हणून स्पष्टतेनें दिसूं द्यावीं ?

स्टेट्समननें आपल्या वर सांगितलेल्या अग्रलेखामध्यें खटले करण्याच्या अवश्यकतेचें कारण म्हणून हल्लींची असहकारितेची चळवळ प्रमुखत्वानें पुढें आणिली आहे. अर्धांगवायूनें एखाद्या माणसाचे हातपाय लुले पडतात, त्याप्रमाणें ह्या असहकारितेच्या चळवळीनें हिंदुस्थान सरकारचे हातपाय लुले पाडावे, असा ह्या चळवळीच्या प्रवर्तकांचा हेतु त्यांनींच स्पष्ट सांगितलेला असल्यामुळें म. गांधी हे एकीकडे जरी शांततेचा उपदेश लोकांना करीत असेल, तरी दुसरीकडे त्यांचे अनुयायी लोक कांहीं तरी अत्याचाराचीं कृत्यें कोठें तरी करीतच असतात. आणि हल्लींचें मोपला लोकांचें बंड हें त्याचें एक स्पष्ट उदाहरण आहे. अशी स्थिति असल्यामुळें असले अनिष्ट परिणाम ज्यांच्याकडून उत्पन्न केले जातात, त्यांच्यावर खटले केले जाणें जरूर आहे, असें स्टेट्समननें आपलें मत वरील विलायती बातमीच्या पुष्टीकरणासाठीं दडपून दिलेलें आहे.

परंतु कोणीही आपलें मत ठोकून देण्याच्या कामीं वाजवीपेक्षां जास्त घाई केली, तर ती त्यांच्या पश्चात्तापाला कारणीभूत होते, हें कोणीही विसरतां कामा नये. आणि ही गोष्ट ह्या मोपल्यांच्या दंग्याच्या वेळीं चांगली निदर्शनास येत आहे. मलबारांत मोपल्यांचा दंगा तिकडे सुरू झाल्याबरोबर साऱ्या हिंदुस्थानांत कित्येक मवाळांनीं, कित्येक ॲंग्लो-इंडियन पत्रांनीं, कित्येक कौन्सिलांतील उतावळ्या सभासदांनीं आणि कित्येक अधिकाऱ्यांनींही जिकडे तिकडे दुसरा एक मोठा दंगा उसळून

दिला आहे ! त्या बिचाऱ्या मोपल्यांचा दंगा आतां आठ पंधरा दिवसांनंतर तरी थांबला आहे; पण हा वर सांगितलेला ह्या सरकारच्या सगळ्या हितचिंतकांचा दंगा अजून आणखी किती दिवस चालेल, याचा कांहीं एक अंदाज नाहीं. त्या बिचाऱ्या मोपल्यांवर गोळ्या घालून तरी त्यांचा दंगा शांत करण्यासारखा होता; पण हा जो या तोंडपुजे लोकांचा हल्लींचा उतावीळपणाच्या दुर्विचारांचा दंगा चाललेला आहे, हा मात्र सत्य विचारांच्या शांततेशिवाय दुसऱ्या कशानेंही शांत होण्यासारखा नाहीं. पण हे खरे विचार ठेंचा लागल्यावांचून आपोआप उत्पन्न व्हावेत कसे ?

पुष्कळांना असें वाटत असतें कीं, कांहीं दिलेल्या विशिष्ट प्रमाणांवरून एखादें अनुमान काढावयाचें एखादें उदाहरण एखाद्या शाळेंत तर्कशास्त्राचा नवीन अभ्यास करणाऱ्या एखाद्या अपरिपक्व बुद्धीच्या विद्यार्थ्याला घातलें, तर तोच काय तो त्यामध्यें चुका करतो ! पण असें मुळींच नाहीं. मोठेमोठे व चांगले चांगले लोकही भलत्या प्रमाणांवरून भलतींच प्रमेयें काढण्याच्या चुका पावलोपावलीं करीत असतात. आणि राजकारणांत तर असल्या चुका फारच विपुलपणानें आढळून येतात. सत्य प्रमाणें जरी बुद्धीला सत्याच्या बाजूकडे येण्याविषयींचा सल्ला सुचवीत असतात, तरी पूर्वग्रहांनीं कलुषित आणि कलंकित झालेलें मन सगळीं सत्य प्रमाणें आपल्या बगलेंत गुंडाळून ठेवून बुद्धीला कोठल्या तरी वावटळीमध्यें गुरफटून घेऊन कोणीकडे तरी वाहून नेत असतें ! आणि असाच प्रकार ह्या मोपला लोकांच्या दंग्यांच्या कारणमीमांसेच्या प्रसंगीं झालेला आपल्या दृष्टोत्पत्तीस येत आहे.

मोपला लोकांच्या दंग्याचें खापर हल्लींच्या काळीं कोणाच्या डोक्यावर फोडण्यांत येत आहे ? तर असहकारितेच्या, खिलाफतीच्या, म. गांधींच्या, त्यांच्या अनुयायांच्या, वगैरे वगैरे ! पण ही गोष्ट शांत आणि सत्य अशा शुद्ध सुविचाराला कशी पटावी ? मलबारांत असहकारितेच्या चळवळीमुळें हा दंगा झाला, असें सांगण्यांत येतें. पण मलबारांत राष्ट्रीय पक्षाकडून असहकारितेचीं जीं तत्त्वें लोकांना उपदेशिलीं जात होतीं, तीं सगळ्यांना सारख्या रीतीनें उपदेशिलीं जात होतीं. तीं मुसलमानांना जितकीं सांगितलीं जात होतीं, तितकींच तीं हिंदूंनाही पण शिकविलीं जात होतीं. मग त्या तत्त्वांमुळेंच जर हा दंगा झाला असेल, तर तो हिंदु लोकांमध्येंही व्हावयाला

पाहिजे होता. पण तसा तो मुळींच झालेला नाहीं. तेव्हां यावरून, हें ह्या असहकारितेच्या चळवळीच्या कारणाविषयींचें अनुमान खोटें ठरत नाहीं काय ? शिवाय ह्या असहकारितेच्या तत्त्वांच्या उपदेशामुळेंच जर हे दंगे झाले, असें मानावयाचें असेल, तर निदान तें शिकविलें असेल, तेंच उत्पन्न झालें पाहिजे, एवढें तरी मानणें अवश्य आहे. पण अनत्याचारी असहकारिता ही ' तुम्ही दंगे करा, ' असें कधीं शिकवीत नसून उलट ' तुम्ही दंगे करूं नका, ' असेंच नेहमीं शिकवीत असते. तेव्हां दंगे न करण्याच्या उपदेशापासूनच जर दंगे उत्पन्न होतात असें मानावयाचें असेल, तर उद्यां थंड गार पाण्यापासूनही जळजळीत निखारे उत्पन्न होतात, असें मानावयाला काय प्रत्यवाय आहे ! असहकारितेबरोबर खिलाफतीच्या चळवळीवरही शिंतोडे उडविण्यांत येत आहेत. पण या दोन्हीही चळवळींतील मुख्य रहस्य काय आहे, तर हिंदुस्थानांतील हिंदु आणि मुसलमान या दोघांनीही आपसांतील ऐक्यबुद्धि स्थिर करून स्वराज्य मिळविण्याकरितां अधिकाऱ्यांशीं असहकारिता करावी, हें होय. पण मलबारांतील दंग्यांमध्यें तर तेथील मोपला जातीचे मुसलमान लोक हिंदूंना लुटीत आहेत आणि बाटवीत आहेत, अशाही बातम्या प्रसिद्ध करण्यांत येत आहेत ! ह्या सगळ्या बातम्या खऱ्या असतील, तर असहकारितेची आणि खिलाफतीची चळवळ मुसलमानांनीं हिंदूंची संपत्ति लुटावी आणि हिंदूंचा धर्म बाटवावा असें शिकवीत असली पाहिजे ! पण ती असें कधीं तरी शिकवीत असते काय ? मौलाना महमद अल्ली किंवा मि. याकूब हसन यांनीं मलबारमध्यें आणि इरोड येथें खिलाफतीची चळवळ केली असली, तर त्यांत तुम्ही हिंदूंचीं घरें लुटा असें त्यांनीं सांगितलें असेल, असें कोणाला केव्हां तरी संभवनीय वाटेल काय ? थोड्याशा अधिकाराच्या प्राप्तीनें अतिशय मदांध झालेल्या लोकांना मात्र वाटेल तें तर्कशास्त्र, वाटतील तीं प्रमाणें आणि त्यांवरून काढलेलीं वाटतील तीं प्रमेयें चालतील, गोष्ट एवढी खरी आहे !

शिवाय म. गांधी आणि त्यांच्या चळवळी, यांच्यावर मोपल्यांच्या दंग्याचे दोषारोप करण्याचे पूर्वीं तसें करणारांनीं आणखी दुसराही एक विचार करावयाला पाहिजे होता. म. गांधींची असहकारितेची आणि खिलाफतीची चळवळ ही कांहीं नुसत्या मद्रास इलाख्यांतील नुसत्या मल-

बारांतच फक्त करण्यांत येत आहे, असें नाहीं. ह्या चळवळीनें हिंदुस्थानचा प्रत्येक कोपरान् कोपरा व्यापून टाकिलेला आहे. व मलबारांतल्याप्रमाणें हिंदुस्थानांतील इतर भागांमध्यें कडवे मुसलमान लोकही थोडेथोडके आहेत, असें नाहीं. मग असें असूनही हिंदुस्थानच्या बाकीच्या प्रांतांतून आणि कडव्या मुसलमानांच्या भागांतून महात्मा गांधींच्या असहकारितेच्या आणि खिलाफतीच्या क्रांतिकारक चळवळींना न जुमानतां शांतता कायम राहिली आहे, तर मलबारांतीलचा तेवढी शांतता या चळवळीमुळें मोडली जावी, हें तर्कशास्त्र पायाशुद्ध नसून तें हल्लींच्या कौन्सिलांतील सभासदांच्याच फक्त बुद्धीला शोभण्यासारखें आहे !

या सगळ्या विवेचनावरून हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे कीं, मोपल्यांच्या दंग्याला असहकारितेचीं वगैरे मुख्य कारणें नसून तीं कांहीं तरी निराळींच असलीं पाहिजेत. सर वुइल्यम व्हिन्सेंट यांनीं कौन्सिल ऑफ स्टेटमधील आपल्या ता. ५ च्या भाषणामध्यें मोपल्यांच्या दंग्याचीं खरीं आणि महत्त्वाचीं कांहीं कारणें आपल्या भाषणाच्या आरंभीं प्रामाणिकपणें नमूद केलीं आहेत. तीं अशीं कीं, मोपला लोक हे अगदीं अज्ञानी आहेत; आणि ते सगळे लोक धर्मवेडे असून आपल्या धर्मवेड्या धार्मिक मौलवींच्या पूर्णपणें कह्यांत सांपडलेले आहेत. आणि त्यामुळें हल्लींचें बंड हें निव्वळ त्या धर्मवेडेपणाचें फळ आहे, असें म्हणावयाला बिलकूल हरकत नाहीं. आणि त्यांतच आर्थिक दारिद्र्यानेंही आपली भर घातलेली आहे. कांहीं दिवसांपूर्वीं या मुलखामध्यें शेतकीचा धंदा करणाऱ्या मोपला लोकांचे शेतकीच्या संबंधाचेही दंगे झालेले होते. त्याचप्रमाणें म. गांधींची जी असहकारितेची चळवळ आहे, त्या चळवळीबद्दलही ह्या मोपला लोकांच्या मनांमध्यें फारशी सहानुभूति आहे, असें दिसत नाहीं. आणि अनत्याचारी असहकारितेबद्दल तर त्यांच्या मनामध्यें यत्किंचित्‌ही प्रेम नसलें पाहिजे, हें त्यांच्या हल्लींच्या ह्या बंडांतील अत्याचारांवरूनही अगदींच स्पष्ट होत आहे !

प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकारचे होम मेंबर, सर वुइल्यम व्हिन्सेंट, हे वर सांगितल्याप्रमाणें इतक्या स्पष्ट शब्दांनीं असहकारितेचा या दंग्याशीं कांहीं एक संबंध पोंचूं शकत नाहीं, असें स्पष्ट सांगत आहेत; तरीही त्यांचें भाषण ऐकल्यानंतर त्यांच्या पाठीमागून बोलणारे प्रत्येक निष्काळजी आणि बेसावध

सभासद फिरून असहकारिता वगैरे चळवळींवर आघात करण्याला बिल-कुलही डरत नाहींत, यांत त्यांच्या धैर्याची तारीफ करावी, किंवा कौन्सि-लांत होत असलेलीं महत्त्वाचीं भाषणेंही न ऐकणाऱ्या त्यांच्या त्या दुर्लक्ष-पणाच्या सद्गुणाची तारीफ करावी, हें समजणें कठिण आहे. कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें सर वुइल्यम व्हिन्सेंट यांनीं वर दिलेली जी माहिती सांगितली, तीच त्यांनीं फिरून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्येंही सांगितली. तरी पण कर्नल गिडने यांच्यासारखे जे कट्टे ॲंग्लो–इंडियन होते, त्यांनीं महात्मा गांधी, असहकारिता, वगैरे बाबतींत आपलें तोंड इतकें मोकळें सोडलें होतें कीं, अखेरीस मोपल्यांच्या दंग्यावरील भाषणांत गांधींना शिव्या देण्याचें हें चव्हाट ऑर्डरमध्यें आहे किंवा नाहीं, अशाबद्दलही एका सभ्य सभासदाला अध्यक्षांचें मत विचारणें भाग पडलें ! अशा प्रकारचे कर्नल गिडने यांच्यासारखे किंवा मि. जमनादास द्वारकादास यांच्यासारखे कांहीं लोक जरी कौन्सिलमध्यें पाहिजे तें बोलले, तरी सर वुइल्यम व्हिन्सेंट आणि खुद्द व्हाइसरॉय साहेब यांनीं मोपल्यांच्या दंग्यांच्या कारणासंबंधानें जी विचारसरणी प्रदर्शित केली, ती बरीच सत्य आणि समाधानकारक होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें जबाबदार अधिकारी अत्यंत शांततेनें आपले विचार लोकांपुढें प्रकट करीत असतां बाकीच्या कित्येक बेजबाबदार सभासदांनीं आणि मवाळ लोकांनीं असहकारितेच्या विरुद्ध विनाकारण दंगा उत्पन्न करावा, आणि उगीच कोल्हेकुई माजवावी, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे.

हे लोक ही ओरड करीत असतांना शांतता व सुव्यवस्था यांचें मोठें स्तोम माजवितात; आणि त्या शांततेसाठीं आणि सुव्यवस्थेसाठीं हें असह-कारितेचें बंड मोडून टाकलेंच पाहिजे, असा भावार्थीपणाचा मोठा आव आणितात. पण यांच्या लक्षांत हें येत नाहीं कीं, आज जर देशामध्यें अनत्याचारीपणाची चळवळ इतक्या निग्रहानें सुरू करण्यांत आलेली नसती, तर तुमच्या परप्रत्ययनेयबुद्धि अशा कौन्सिलांच्या शिफारशींनीं आणि पोलिसांच्या सगळ्या गुप्त चौकश्यांनींही येथील दंगे थांबले नसते. हिंदु-स्थानांतील इंडियन लोक स्वभावतःच शांत आहेत. व म. गांधींच्या अन-त्याचारी असहकारितेच्या चळवळीनें त्या शांततेमध्यें उलट जास्तच भर

पडलेली आहे. आणि त्या योगानें शिपायांच्या शेंकडों पलटणींनीं आणि मार्शल लॉच्या प्रकारण्यांनींही जें कार्य व्हावयाचें नाहीं, तें शांतता आणि सुव्यवस्था कायम राखण्याचे कार्य आज अनत्याचारी असहकारिता करणारे लोक घडवून आणीत आहेत. या लोकांनीं कोठें तरी एकदांचे दंगे करूं लागावें, अशी कित्येकांची तरी मनापासून प्रबळ इच्छा असली पाहिजे! परंतु असहकारितेनेंच जर आपला कार्यभाग सिद्ध होण्यासारखा आहे, तर दंगे करण्याची दगदग कोणता सुज्ञ मनुष्य पतकरूं इच्छील ?

अशी स्थिति असतांना स्टेट्समन पत्रांतील लेखक विलायतेंतील एका बातमीदाराच्या संदिग्ध तारेच्या जोरावर येथील सरकारला खुशालपणें असें सुचवीत आहे कीं, ह्या मोपल्यांच्या दंग्याबद्दल असहकारितेची, खिलाफतीची, वगैरे चळवळ करणाऱ्यांवर जरूर खटले करण्यांत आले पाहिजेत. पूर्वींच्या अंधेर नगरींतील झोटिंग बादशाहीमध्यें गरीब बिचाऱ्या संन्याश्यांना देखील सुळावर देत असत, असें सांगतात. तसेंच करावयाचें असेल, तर गोष्ट वेगळी. पण इंग्रज सरकारच्या मनांतून असें करावयाचें असतें, तर मग त्यांनीं लॉर्ड रेडिंग सारख्या पोक्त विचाराच्या न्यायाधीशाला हिंदुस्थानांत कशाला पाठविलें असतें ? कारण, निरपराधी संन्याश्यांना फाशी द्यावयाचें असतें, तर हिंदुस्थानामध्यें स्टेट्समनसारख्या अँग्लोइंडियन पत्रांचे संपादक काय थोडे होते ! परंतु सरकारच्या मनांतून असें कांहीं एक खात्रीनें करावयाचें नसलें पाहिजे. पंडित मदन मोहन मालवीय हे मुंबईस असतांना त्यांना सिमल्यास बोलाविलें आहे, अशी एक बातमी होती. व त्यानंतर व्हाइसरॉय साहेब पंडितजींना मुलाखत देत आहेत अशी एक तारही प्रसिद्ध झाली आहे. त्यांच्या प्रमाणें आणखीही कोणाची कदाचित् व्हाइसरॉय साहेब सल्लामसलत हल्लीं विचारीत असतील. अशा योग्य सल्लामसलतीनंतर त्यांना जें कांहीं हल्लींच्या खवळलेल्या परिस्थितमिध्यें शक्य दिसेल तेवढेंच ते करतील. अशा वेळीं पं. मदन मोहन यांनाच सिमल्यास बोलावण्यांत आलेलें आहे, स्टेट्समनच्या संपादकांना व्हाइसरॉयांनीं बोलाविलें नाहीं, हें त्यांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. शिवाय ज्या विलायतेच्या बातमीदाराच्या तारेवर स्टेट्समनची इतकी भिस्त आहे, त्या तारेंतील भावार्थाचाही बराचसा उलगडा सर वुइल्यम व्हिन्सेंट यांच्या लेजिस्लेटिव्ह

ॲसेंब्लीमधील भाषणावरून होण्यासारखा आहे. त्यांनीं आपल्या भाषणाच्या शेवटीं असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, मलबारांतल्या कांहीं दंग्यांच्या कारणावरून असहकारितेसंबंधानें आजपर्यंत आपलें जें धोरण होतें, तें बदलण्याची सरकारची इच्छा नाहीं. हें व्हिन्सेंट साहेबांचें आश्वासन स्पष्ट आणि विश्वासजनक असें आहे. तरी पण त्यांनीं पुढें असेंही सांगितलें आहे कीं, सरकारच्या लष्करांतल्या शिपायांची राजनिष्ठपणाची मनोवृत्ति बदलविण्याचे कित्येकांनीं गुप्त प्रयत्न केले आहेत आणि असले प्रयत्न सरकार केव्हांही चालूं देणार नाहीं. म्हणून नॉन–को–ऑपरेशनच्या संबंधींचें सरकारचें धोरण जरी बदलण्याची सरकारची इच्छा नाहीं, तरी शिपाई लोकांना फितूर करण्याच्या वगैरे वर सांगितलेल्या कृत्यांच्याकरितां सरकार जर कोणावर न्यायासनासमोर खटले करूं लागेल, तर त्या गोष्टीला या ॲसेंब्लीचा पाठिंबा असला पाहिजे. असें सर वुइल्यम व्हिन्सेंट यांनीं आपल्या भाषणाच्या शेवटीं सुचविलें आहे.

व्हिन्सेंट साहेबांच्या कौन्सिल ऑफ स्टेटमधील आणि लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमधील भाषणांतील आतांपर्यंत वर दिलेल्या-मुद्यांसारखे कांहीं कांहीं मुद्दे जर एकत्र केले, तर त्या सगळ्यांची मिळून एकत्र जुळविलेली एक लहानशी तुटक तुटक गोष्ट थोडीशी संगतवार जी जुळते, ती अशी कीं, गेल्या मे महिन्यांत इरोड या ठिकाणीं केलेल्या एका भाषणाबद्दल मद्रास सरकार त्या भाषणकर्त्यावर फिर्याद करणार होतें. परंतु इतक्यांत महात्मा गांधी आणि व्हाइसरॉय यांची मुलाखत होऊन हिंदुस्थान सरकारला असें वाटलें कीं, सदर वक्त्याला पश्चात्ताप वाटण्याला संधि देण्यांत आली, तर तिचा दुरुपयोग होणार नाहीं. अशा हेतूनें त्या वेळचा प्रसंग थांबला. तरी पण लष्करांतल्या शिपायांची राजनिष्ठा डळमळविण्याचा कोणी प्रयत्न करीत आहेत, अशी खरी–अगर खोटी–खबर सरकारच्या कानांवर गेली असावी; आणि हा अन्याय अक्षम्य असल्यामुळें सरकार या अपराधाबद्दल जे कोणी अपराधी असतील त्यांची आपल्या न्यायासनासमोर चौकशी करण्याच्या विचारांत आहे. अशा रीतीनें ह्या एकत्र जुळविलेल्या तुकड्या-ताकड्यांवरून बनल्या जाणाऱ्या गोष्टीचा कोणाकडे कटाक्ष आहे, हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येईलच.

मोपल्यांचा दंगा आतांच होण्याला काय कारणें झालीं असावींत, हें अद्यापि एक गूढ आहे. या लेखांत सदर दंग्याच्या सर्व बाजूंच्या साधक बाधक कारणांचा वर विस्तारानें विचार करण्यांत आलेला आहे. तरी पण त्यांतील कोणंत्याही बाजूच्या कारणानें सदर प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटत नाहीं, हें खास आहे. हल्लींची हिंदुस्थानांतील चळवळ हिंदूंच्या आणि मुसलमानांच्या एकीवर अवलंबून आहे, हें कोणालाही सांगितलें पाहिजे, असें नाहीं. अशा वेळीं व्हिन्सेंटसाहेब मोपल्यांच्या दंग्याबद्दलचा दोष नॉन-को-ऑपरेशनच्या कोणत्याही चळवळीवर न ठेवितां सहासात महिन्यांच्या पूर्वीं मद्रासेकडे कडक भाषणें केलेल्या कोणा इसमावर शिपायांना फितूर करण्याच्या गुन्ह्याबद्दल हल्लींच्या मोपल्यांच्या दंग्यानंतर खटला करण्याच्या विचारांत आहेत, या गोष्टींचा एकमेकांशीं कसा संबंध लागतो ? सगळ्याच झाडांचीं मुळें जमिनींत खोल गेलेलीं असतात; पण राजकारणाच्या झाडाचीं मुळें-आणि त्यांतही इंग्रजी राजकारणाच्या झाडाचीं मुळें--जमिनीच्या पोटांत किती खोलवर आणि दूरवर गेलेलीं असतील, याची उथळ आणि उथळ माणसांना कल्पनाही करितां येणें शक्य नाहीं!--शिपायांना फितूर करण्याचा आरोप आणि मोपल्यांचा दंगा यांचा काय संबंध ? या मोपल्यांच्या दंग्यांत वरील प्रयत्नांनीं फितूर झालेले कोणी दहा पांच हजार नेटिव पलटणींतील शिपाई इंग्रज सरकारच्या विरुद्ध लढण्याकरितां पुढें उभे राहिलेले कोणी पाहिले काय ? आणि असें जर नाहीं, तर त्या गुन्ह्याबद्दलचा खटला ह्या मद्रासेकडील मोपल्यांच्या दंग्यानंतरच कां उपस्थित व्हावा ? महात्मा गांधींच्या मध्यस्थीनें सहा महिन्यांच्या पूर्वींची ती खटल्याची गाडी माफीच्या आणि पश्चात्तापाच्या रुळावर साइडिंगमध्यें काढून ठेवणेंच जरूर होतें. कारण, त्या वेळीं नुसत्या भाषणाच्यापलीकडे कोणत्याही गुन्ह्याची प्रत्यक्ष क्रिया घडलेली नव्हती. म्हणून तो मागचा डाव या नवीन गुन्ह्याची वाटच पहात होता ! आतां मोपल्यांच्या कृपेनें ती संधि आणल्यामुळें त्या जुन्या खटल्यानें नवीन डोकें वर काढिलें आहे, हें उघडच आहे. म्हणून या प्रसंगीं म. गांधींच्या नॉन-को-ऑपरेशनच्या चळवळीबद्दल व्हिन्सेंट-साहेबांनीं थोडीशी मेहेरनजर दाखविली असली, तरी त्यांत फारसें हशिल आहे, असें नाहीं. मुसलमानांवर कटाक्ष ठेवितेवेळीं बाकीच्यांवर थोडीशी

कृपा दाखविणें जरूरच आहे. दोघांना एकदमच दडपून कसें चालेल ? पायावर ऑपरेशन करावयाचें असेल, तर नाकाला थोडीशी भूल द्यावयाला नको काय ? परंतु आपण मात्र हिंदु आणि मुसलमान हे फसून न जातां एकत्र टिकलों, तर त्यांतच काय तो आपल्या राष्ट्रीय स्वराज्याच्या जिवंतपणाचा जीव आहे, हें कोणीही विसरतां कामा नये.

---

# गुलामगिरीमधून स्वराज्यामध्यें पतितपरावर्तन.

मलबारांत मोपले लोकांनीं आपल्या अत्याचारांनीं जिकडे तिकडे कसा प्रळय उडवून दिला आहे, याच्याबद्दलच्या पुष्कळ बातम्या आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्या अत्याचारांचें वर्गीकरण करावयाचें झाल्यास राजकीय, धार्मिक, नैतिक, असे निरनिराळ्या प्रकारचे अत्याचार या मोपल्यांच्या कृतींमध्यें दिसून येतात. हे अशा प्रकारचे सगळे जाहीर केलेले अत्याचार खरे असतील किंवा खोटे असतील, हें बरोबर कळणें इतक्यांत शक्य नाहीं. पाणी गढूळ असतें, तोंपर्यंत त्याच्या मुळाशीं आणि तळाशीं काय आहे, हें वरून पाहणाराला दिसत नाहीं, हा नेहमींचाच अनुभव आहे. परंतु तेंच पाणी जरा शांत झालें आणि निवळलें, म्हणजे सर्व कांहीं स्वच्छ दिसूं लागतें. तसाच प्रकार ह्या दंग्यांचा असतो. असल्या दंग्यांच्या वेळीं शेंकडो लोक शेंकडो हेतूंनीं प्रेरित होऊन भिन्न भिन्न परिणाम उत्पन्न करूं पहात असतात. अशा गडबडींत सत्यासत्याची निवड करण्याचीही गडबड सुरू करून, आयत्या तापलेल्या तव्यावर आपल्याला पाहिजे असतील त्या व तितक्या पोळ्या भाजून घेणें, यांतही कित्येकांचें एक प्रकारचें धूर्तपणाचें धोरण असतें. अशा प्रकारच्या घाईघाईनें उत्थापित केलेल्या आरोपांमध्यें मोपले लोकांनीं कित्येक हिंदूंना बाटविलें आहे, हाही एक

आरोप त्यांच्यावर आणण्यांत आलेला आहे. मोपल्यांच्या राजकीय आरोपांच्या चौकश्या सुरू होऊन त्याबद्दलच्या कित्येक शिक्षाही सुनावण्यांत येऊन गेल्या आहेत. परंतु धार्मिक गुन्ह्यांच्या चौकशीची इतकी फारशी घाई आणि अवश्यकताही नसल्याकारणानें ते गुन्हे सरकारी यादींत मागें पडणें अस्वाभाविक नाहीं. परंतु या दंग्यांत मोपल्यांनीं कोणा हिंदूंना खरोखरच बाटविलें असलें, तर त्याबद्दल पुढें काय करावयाचें ह्या धार्मिक, सामाजिक, वगैरे स्वरूपाच्या प्रश्नाचा विचार करणें हें हिंदु समाजांतील विचारी लोकांचें कर्तव्यकर्म आहे. व त्याप्रमाणें कित्येक ठिकाणीं या प्रश्नाबद्दल योग्य दिशेनें चर्चा सुरूही झाली आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

मोठमोठे दंगे किंवा लढाया अलीकडच्या काळांत सुरू झाल्या, म्हणजे त्यांच्या बद्दलच्या कोणत्या बातम्या प्रसिद्ध करावयाच्या आणि कोणत्या बातम्या प्रसिद्ध करावयाच्या नाहींत, आणि ज्या प्रसिद्ध करावयाच्या असतील त्याही कशा स्वरूपाच्या बनवून प्रसिद्ध करावयाच्या, याची व्यवस्था करण्याकरितां सगळ्यांच्या आधीं एखादें खातें नेमण्यांत येतें. पूर्वींच्या काळांत पोस्ट ऑफिसें आणि तारायंत्रें मुळींच नसल्यामुळें बातम्याच येत नसत. तशी गैरसोय हल्लीं नाहीं, हें खरें. पण या टपालांतून आणि तारायंत्रांतून ज्या बातम्या येतात, त्या सेन्सॉर साहेबांच्या कंट्रोलमधून बाहेर येत असतात, हें अलीकडच्या काळांतील लोकांनीं विसरतां कामा नये. मोपल्यांनीं हिंदूंना बाटविलें आहे, हिंदूंच्या स्त्रिया भ्रष्ट केल्या आहेत, हिंदूंचीं देवळें पाडलीं आहेत, वगैरे बातम्या फार आग्रहपूर्वक रीतीनें हल्लींच्या ह्या मोपल्यांच्या दंग्यांत बाहेर पाडविण्यांत येत आहेत. त्या कितपत खऱ्या असतील किंवा खोट्या असतील, याचा विचार करून त्या वाचणें जरूर आहे. गढूळ पाणी गाळून प्यावें, हा आरोग्यशास्त्राचा नियम मोठा हितावह आहे. मालेगांवच्या दंग्यांत तेथील मुसलमानांनीं हिंदूंचें एक देऊळ जाळलें असतांही तेथील हिंदू मुसलमानांच्या विरुद्ध ह्या धार्मिक छळाबद्दल कांहींच धार्मिक ओरड करीत नाहींत, हें पाहून किती तरी सदय अंतःकरणांना वैषम्य वाटत होतें, हें आपल्या इकडील पुष्कळ वाचकांना माहीत असेलच ! त्याचप्रमाणें मोपल्यांनीं हिंदूंच्या केलेल्या धार्मिक छळाबद्दल हिंदुस्थानांतील हिंदूंना या वेळीं मुसलमानांविरुद्ध पुष्कळसा त्वेष उत्पन्न व्हावा,

अशीं तिकडे कारणें घडून आल्याचें दाखविण्यांत येत आहे. व कारणें दाखविलीं गेलीं, म्हणजे त्यांचें कांहीं तरी कार्य उत्पन्न होईल अशी अपेक्षा धरणें कांहीं गैरवाजवी नाहीं. परंतु अशा प्रसंगीं गढूळ पाणी गाळून पिणें हेंच बरें ! हिंदु–मुसलमानांची हल्लीं एकी झालेली आहे, व ती आपली एकी कायम टिकावी अशी राष्ट्रीय पक्षाच्या सर्व हिंदूंची इच्छा आहे. कांहीं कारणानें मोपले लोकांचा क्रोधाग्नि भडकून जाऊन त्यांच्या हातून इतर कृत्यांबरोबर हिंदूंच्या विरुद्धही कांहीं वाईट कृत्यें कदाचित् खरोखरच झालीं असतील. तरी पण तसें करण्यांत हिंदूंच्या विरुद्ध हिंदु या दृष्टीनें त्यांचा खरोखरच कांहीं हेतु होता किंवा काय, हा राष्ट्रीय ऐक्य टिकविण्याच्या हल्लींच्या ह्या प्रसंगीं एक मोठा महत्त्वाचा मुद्दा आहे. ‘ तुमचा हिंदु धर्म बाटविला, तुमचीं हिंदु देवळें पाडलीं, तरी तुम्ही स्वस्थ कसे बसतां ? आणि मुसलमानांशीं आपलें ऐक्य कायम कसें ठेवतां ? असल्या मुसलमानांशीं केलेलें सख्य मोडून टाकून तुम्ही त्यांच्याविरुद्ध जिहाद कां पुकारीत नाहीं ? ’ असली अप्रत्यक्ष उठावणी कोणी हिंदूंना दिली, तरी त्या जाळ्यांत आपण पडणें केव्हांही श्रेयस्कर होणार नाहीं. गढूळ पाणी गाळूनच प्यावें, हें बरें !

आपले हिंदु लोक मुसलमान लोकांनीं बाटविले, म्हणून हिंदूंनीं मुसलमानांशीं हल्लींच्या वेळीं सख्य करूं नये, असें सुचविणाऱ्या सभ्य गृहस्थांना असा एक स्वाभाविक प्रश्न आहे कीं, असेंच जर असेल,तर युरोपांतील ख्रिश्चन धर्मोपदेशकांनीं आजपर्यंत येथील किती निरपराधी हिंदूंना बाटविलें आहे ? आणि मग असल्या लोकांशींही हिंदूंनीं कशा प्रकारचें वर्तन ठेवावें ? सेंट झेव्हिअर व त्यांच्या सारखेच ख्रिस्ती धर्माचे इतर प्रख्यात उपदेशक एखाद्या गांवच्या विहिरींत आपल्या पावबिस्किटाचा उष्टा तुकडा टाकून सगळा गांवच्या गांव बाटवीत असत, किंवा नुसतें पाणी शिंडूपन हजारों लोकांना तुम्ही ख्रिस्ती झालां म्हणून फसवीत असत, हिंदूंचीं देवळें पाडून त्या ठिकाणीं आपलीं चर्चेस उभारीत असत, आणि हिंदु लोकांनीं आपल्या घरांत आपल्या देवांच्या मूर्ति बाळगल्या तर त्याही फोडून टाकण्यांत येत असत, वगैरे गोष्टी हिंदुस्थानांतील ख्रिश्चिआनिटीच्या इतिहासामध्यें सुप्रसिद्ध आहेत. मोपल्यांच्या दंग्यांतील थोड्याशा धार्मिक अत्याचारां-

बद्दल जर त्यांचें सख्य तोडावें, तर ज्या ख्रिश्चन लोकांनीं आपल्या धर्मप्रसारासाठीं हिंदूंच्यावर वर सांगितल्याप्रमाणें कहर गुजरविले, त्यांचें काय करावें ? परंतु हल्लींच्या काळांत हिंदुस्थानांतील लोकांना—मुसलमान लोकांच्या काय किंवा ख्रिश्चन लोकांच्या काय,—विरुद्ध द्वेष वाढवावयाचा नसून आपल्याला सर्वांना आपल्या राजकीय उन्नतीसाठीं एक व्हावयाचें आहे. अशा वेळीं आपल्या देशाच्या घटकावयवांपैकीं एखाद्या जातीच्या हातून कांहीं धार्मिक अत्याचार खरोखर अज्ञानामुळें झाले असले, तर एखाद्या अँग्लो—इंडियनांच्या चिथावणीनें आपण हुरळून न जातां गढूळ पाणी गाळून पिणें, हेंच बरें !

मोपल्यांच्या दंग्यांतील ह्या धर्मांतरांच्या धार्मिक प्रश्नाचा येथपर्यंत दिलेला विचार हा मुख्यत्वेंकरून राजकीय दृष्टीचा आहे. ही दृष्टि लक्षांत ठेवूनच बहुतेक लोक हल्लीं या प्रश्नाचा धार्मिकदृष्टया विचार करीत असतात, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. इंग्रजी हिंदु लॉ आणि संस्कृत धर्मशास्त्र या दोहोंमधीलही निष्णातपणाबद्दल सुप्रसिद्ध असलेले मुंबईचे हायकोर्ट वकील, मि. घारपुरे, यांनीं या विषयाच्या बाबतींत देवलाच्या स्मृतीमधून कांहीं उतारे देऊन असें दर्शविलें आहे कीं, म्लेच्छांकडून कोणी बाटविले गेले असल्यास त्या आपत्काळीं त्या आपत्तीचें कृच्छ्र प्रायश्चित्तानें निरसन होऊं शकतें. व मलबार प्रांतांतील कोणी धर्मगुरुनींही असेंच कांहीं संस्कार करून असल्या बाटविलेल्या लोकांना आपल्या धर्मांत परत जरूर घ्यावें, असें आज्ञापत्र प्रसिद्ध केलें आहे, असेंही सोशल रिफॉर्मर पत्राच्या लिहिण्यावरून समजतें! आपत्कालचा हा उपक्रम फार चांगला आहे. राजकीय दृष्टया पाहतां आधीं या बाटविण्याच्या बाबतींतील बातम्या कितपत खऱ्या असतील, याच्याबद्दलच पुष्कळ संशय आहे. आणि ज्या मोपल्यांनीं हें बाटविण्याचें कृत्य केलें असें सांगण्यांत येत आहे, त्या मोपल्यांना या बाबतींत खरें सांगण्याची संधि मिळाल्यास आम्ही कोणत्याही खऱ्या हिंदूंना मुळींच बाटविलें नाहीं, असेंच ते कदाचित् सांगतील. तरी पण ह्याही उप्पर जर कोठें कांहीं ज्ञाताज्ञात दोष घडून आला असेल, तर त्याच्या परिनिर्हरणासाठीं वरील देवल स्मृतीची तोड अत्यंत उपयुक्त आहे. उगीच एखाद्यांनीं 'अमक्यांनीं तुम्हांला बाटविलें,' 'तमक्यांनीं तुम्हांला बाटविलें !'

अशा वाटेल त्या कंड्या अनेक राजकीय कारणांसाठीं उठविल्या, किंवा 'तुमच्या गांवच्या विहिरींत आम्हीं काल उष्टें बिस्किट टाकलें होतें, म्हणून तुम्ही आज बाटलां!' असें कोणी म्हणूं लागले, तर त्यांच्या म्हणण्यानें फसून जाऊन त्यांचे राजकीय हेतु सफल करण्याला आपण मदत करावी आणि आपल्या अनाथ देशबांधवांना आणि धर्मबांधवांना विनाकारण आपल्या बाहेर काढून प्रतिपक्षाच्या मतलबी दाढेमध्यें कोंबण्याला प्रवृत्त व्हावें, हें योग्य नाहीं. 'यथा यक्षः तथा बलिः' हा न्याय आपल्या धर्माला आणि समाजाला विदित नाहीं, असें नाहीं. वसईकडे, गोव्याच्या बाजूला, व इतरही शेंकडो ठिकाणीं या ख्रिश्चन लोकांनीं असेच गांवच्या गांव आणि कित्येक गांवांतील हजारों लोक कांहीं तरी थोतांड करून बाटविले आहेत. व हल्लींही येथील दुष्काळांनीं जेव्हां येथील धान्याचीं शेतें करपून जात असतात, तेव्हां येथील ख्रिश्चिआनिटीच्या शेतांना कसें भरपूर पीक येत असतें, हेंही सगळ्यांना पूर्णपणें माहीतच आहे. असल्या आपत्तींवर कै. रा. रा. गजानन भास्कर वैद्य वगैरे सारख्या मंडळींनीं जे उपाय सुरू केलेले आहेत, ते श्रेयस्कर आहेत. आणि त्याचप्रमाणें हल्लींच्या सारख्याही प्रसगीं देवलादिक स्मृतींच्या अनुज्ञेनें आपल्यावरील धार्मिक आपत्तींचा दुसऱ्यांना राजकीय फायदा साधून देण्याचा वेडगळपणा आपण हल्लींच्या परिस्थितींत सहसा करतां कामा नये.

एका धर्मांतून दुसऱ्या धर्मांत कोणी मनुष्य फसून किंवा कांहीं आपत्तीमुळें गेला असतां त्याच्या पुनरुद्धाराचा हा प्रश्न आणि प्रसंग आहे. या प्रसंगीं अशाच प्रकारचा दुसरा एक प्रसंग कोणाच्याही स्मृतीमध्यें स्वसादृश्यामुळें उपस्थित झाल्यावांचून रहाणार नाहीं. तो प्रसंग म्हटला म्हणजे राजकीय धर्मांतराचा होय. जशीं धार्मिक धर्मांतरें होतात, तशींच राजकीय धर्मांतरेंही पुष्कळ वेळां घडून येत असतात, ही गोष्ट कदाचित् कोणाच्या लक्षांत इतक्या ठळकपणानें येत नसेल; परंतु स्वतंत्रतेच्या अवस्थेमधून परतंत्रतेच्या अवस्थेमध्यें कोणत्याही कारणानें कां होईना एखाद्या देशांतील लोकांना जाऊन पडण्याचा प्रसंग आला, तर तेंही एक तऱ्हेचें धर्मांतरच नव्हे काय? स्वराज्याच्या धर्माचा सुखोपभोग घेणारे लोक परराज्याच्या धर्मांत गेले असतां, ते गुलामगिरीच्या धर्मांतरानें बाटविले गेले, असाच त्याचा अर्थ नव्हे काय? आणि अशा दृष्टीनें पाहिलें असतां

त्या बिचाऱ्या अडाणी मोपल्यांनाच कशाला नांवें ठेवावयाला पाहिजेत? त्यांना नांवें ठेवणाऱ्या युरोपियनांनीं ह्या राजकीय धर्मांतरानें जगांतलि काय थोड्या लोकांना बाटविलें आहे? शिवाय धार्मिक धर्मांतरावर कांहीं धार्मिक उपाय तरी आहेत. पण असल्या राजकीय ह्या धर्मांतरानें बाटल्या गेलेल्या लोकांच्या पुनरुद्धारासाठीं कोठें काय राजमार्ग आहे? किंवा एखाद्या स्मृतीचें किंवा धर्मशास्त्राचें कोठें काय राजरोस वचन आहे? मोपल्यांनीं मुसलमानी धर्मानें बाटविलेल्या थोड्या हिंदु लोकांच्या पुनरुद्धाराचा प्रश्न वर सांगितल्याप्रमाणें आपल्या पुढें असतां हिंदुस्थानांतील मोपले, मुसलमान, हिंदु, वगैरे सरसकट सगळेच बाटविणारे आणि बाटलेले असे तीस कोटी लोक जे गुलामगिरीच्या धर्मांतरानें बाटविले गेलेले आहेत, त्यांचें तें अवाढव्य कष्टमय चित्र डोळ्यांपुढें उभें राहिलें, म्हणजे आपल्या मनाची काय स्थिति होते! इतक्या असंख्य लोकांना गुलामगिरींतून फिरून स्वराज्याच्या धर्मामध्यें शुद्ध करून परत घेण्याकरितां कांहीं कृच्छ्र प्रायश्चित्तें कोठें आहेत काय, असा ह्या दुःखानें विव्हळ आणि विद्ध झालेल्या कोणाच्याही करुण अंतः-करणामध्यें प्रश्न उपस्थित झाल्यावाचून रहाणार नाहीं. हिंदु धर्म हा फार कठोर आहे आणि तो पतितांना आपल्या धर्मांत परत घेण्याच्या कामीं सदयता दाखवीत नाहीं, असा कित्येक पाश्चिमात्य लोकांचा त्याच्यावर आक्षेप आहे. पण त्या कठोर म्हणून ठरविल्या गेलेल्या आर्य धर्मामध्येंही आपत्कालीं आपद्धर्म म्हणून उपयोगांत आणावयाची देवलस्मृति तरी सांपडते! पण स्वराज्याच्या आणि स्वतंत्रतेच्या जन्मसिद्ध हक्कांच्या धर्मांतून फसून किंवा दुर्दैवानें पतित झालेल्या लोकांच्या परावर्तनासाठीं पाश्चिमात्य लोकांच्या अर्वाचीन राजनीतीच्या धर्मशास्त्रामध्यें कोणतें बरें देवलस्मृतीचें औदार्य दिसून येत आहे? जसे बिस्किटांचे तुकडे एखाद्या विहिरींत टाकून गांवच्या गांव धार्मिक बाबतींत बाटविण्यांत आले, त्याचप्रमाणें एखाद्या करारांच्या तांबड्या किंवा पांढऱ्या कागदांच्या तुकड्यांनीं या पृथ्वीच्या पाठीवरील कोणाकडून ना कोणाकडून तरी थोडेथोडके लोक राजकीय बाबतींत बाटविले गेले असतील, असें नाहीं. या इतक्या असंख्य लोकांच्या पुनरुद्धाराची आणि पतितपरावर्तनाची कोणी पाश्चात्य राजकीयधर्मशास्त्रवेत्ते आजपर्यंत कधीं तरी काळजी घेत होते काय?

जर्मन लढाईच्या अखेरीच्या वेळीं प्रेसिडेंट वुइलसन यांच्यासारखा एक उदारमतवादी आणि निःस्पृह देवल ऋषि पुढें येऊन त्यांनीं आपली स्मृति अशी प्रतिपादन केली कीं,गुलामगिरीमध्यें जे लोक कोणत्याही कारणानें पतित झाले असतील, त्यांचें स्वराज्याच्या धर्मामध्यें फिरून परावर्तन जरूर करण्यांत आलें पाहिजे. पण ही त्यांची स्मृतिही बहुतेकांकडून बहुतेक बाबतींमध्यें केवळ हरताळ फासण्याकरितांच हल्लीं हातांत घेण्यांत येत आहे. एकदां जे लोक जिंकले गेले, ते गुलामगिरीमध्यें कायमचे पतित झाले; ह्या जितांना जित ह्मणूनच समजलें जाईल; आणि तसें समजलें गेलें नाहीं, तर एकंदर राजांच्या राजनीतीमध्यें मोठी क्रांति उडून जाईल; अशा प्रकारचीं तत्वें खुद्द इंग्लंडकडून आयर्लंडच्या आज मित्तीलाही सांगण्यांत येत आहेत! आणि हेच लोक आर्य धर्मातील धर्मांतराच्या बाबतींतील कडकपणाला नांवें ठेवीत असतात! धर्मासंबंधींचे प्रश्न हे पारलौकिक परिणामांमध्यें फार बिकट रीतीनें गुंतलेले असतात, अशी सगळ्यांचीच साधारणपणें समजूत झालेली असल्यामुळें त्यांत रोजच्या रोज मनुष्याच्या बुद्धीनें ढवळाढवळ करणें बरोबर नाहीं. पण ह्या ऐहिक आणि राजकीय गुलामगिरीच्या बाबतींत तशीही सबब शक्य नाहीं. पण असें असतांही स्वराज्याच्या धर्मामध्यें एखाद्या लोकांचें परत पतितपरावर्तन करून घ्यावयाचें असलें, तर त्यांत देखील जे रेसभर सुद्धां पुढें किंवा मागें सरकण्याला तयार होत नाहींत, त्यांच्या औदार्याबद्दल काय म्हणावयाचें! इंडियन लोकांच्या दृष्टीनें या प्रश्नाकडे आपण पाहूं लागलों, तर इंडियन लोकांना पूर्ण जबाबदारीच्या स्वराज्याचे हक्क आज द्यावेत किंवा दहा पंधरा वर्षांनीं द्यावेत, एवढाच काय तो मतभेदाचा क्षुल्लक प्रश्न असतां, ह्यांतही इंडियन लोकांना गुलामगिरींतून त्यांच्या स्वराज्याच्या धर्मामध्यें परत घ्यावें, असें म्हणणारे महात्मे फारच थोडे सांपडतात. सारांश, हल्लींच्या उदारमतवाद्यांच्या वल्गनांपेक्षां पूर्वींच्या देवलस्मृतींतील आपद्धर्मच तुलनेनें जास्त औदार्ययुक्त ठरतात, यांत संशय नाहीं.

अशा रीतीनें पहातां गुलामगिरींत पतन पावलेल्या लोकांना स्वराज्यामध्यें परत घेणें हें मोपल्यांनीं बाटविलेल्यांना हिंदु धर्मांत परत घेण्याइतकेंच अवश्यक आहे. या बाबतींत हिंदुस्थानांतील इंग्लिश लोकांनीं

येथील लोकांविषयीं सहानुभूति आणि औदार्य दाखविणें अतिशय जरुरीचें आहे. येथील लोक कांहीं थोडयाशा अस्पृश्य लोकांना चांगल्या रीतीनें वागवीत नाहींत असा आरोप करून आपण फिरून येथील सर्व तीस कोटि लोकांच्या बाबतींत त्याच दोषाला पात्र होणें, हें इंग्लिशांना मुळींच भूषणावह नाहीं. स्वयंनिर्णयाचें तत्त्व, स्वराज्याचे पूर्ण हक्क, आर्थिक स्वातंत्र्य, डोमीनियन होम रूल, वगैरे सारखे हक्क देऊन इंग्लिशांनीं येथील लोकांना गुलामगिरींतून वर काढलें पाहिजे. परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं, तर त्यांच्या मेहरबानीची वाट पहात न बसतां आपण आपल्या अनत्याचारी असहकारितेच्या जोरावर स्वराज्य स्थापन करून घेऊन आपले पतितोद्धाराचे प्रयत्न शांततेनें आणि कायदेशीर रीतीनें सफल करून घेतले पाहिजेत.

---

# गुलामगिरीच्या महोत्सवाचा तिरस्कार कीं अंगीकार ?

राजा—महोत्सवप्रतिषेधस्य तावत्प्रयोजनं श्रोतुमिच्छामि ।

चाणक्यः—वृषल, महोत्सवानुष्ठानस्य किं प्रयोजनमित्यहमपि श्रोतुमिच्छामि ।

युवराज हिंदुस्थानांत येणार आहेत, त्या वेळीं त्यांच्या आगमनानिमित्त येथें महोत्सव करावा, असें हल्लीं येथील एका राजपक्षाचें म्हणणें आहे. व असला महोत्सव या प्रसंगीं बिलकुल न करतां त्या महोत्सवाला प्रतिबंधच केला पाहिजे, असें येथील बहुजनसमाजाचें मत आहे. आणि अगदीं असाच वाद पूर्वीं एकदां आपल्या हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासामध्यें उपस्थित झालेला होता. पूर्वीं मगध देशांत नंद या नांवाच्या राजांचें साम्राज्य होतें. त्यांच्या जागीं चंद्रगुप्त या नांवाचा एक मौर्यवंशांतील इतिहासप्रसिद्ध राजा गादीवर आला. आणि चाणक्य हा त्याचा

प्रधान होता. चंद्रगुप्ताच्या राज्याच्या सुरवातीलाच एकदा असा प्रसंग आला कीं, आपल्या राज्यामध्यें मोठा महोत्सव करावा, अशी चंद्रगुप्तानें आपल्या राज्यांतील लोकांना आज्ञा केली. व महोत्सवाच्या ठरलेल्या दिवशीं आपल्या सगळ्या रयत लोकांनीं नगरांतील रस्ते शृंगारिलेले असतील, अशा समजुतीनें ती अपूर्व शोभा पाहण्याकरितां तो राजा चंद्रगुप्त आपल्या सुगांगनामक उच्च प्रासादाच्या गच्चीवर गेला ! पण तेथें जाऊन तेथून तो आपल्या नगराकडे पाहतो, तों नगरांत काय आहे ! कोणी निशाणें लावलेलीं नाहींत, कोणी पताका उभारलेल्या नाहींत, कोणी रांगोळ्या घातलेल्या नाहींत, कोणी दिवे लाविलेले नाहींत, आपापलीं घरें किंवा रस्ते शृंगारण्याकरितां कोणाही नागरिकांमध्यें आपसांत कोठेंही चढा-ओढ लागलेली नाहीं, किंवा उत्तम उत्तम पोषाख केलेल्या आपल्या बाय-कांना बरोबर घेऊन कोणीही नागरिक रस्त्यानें मजा पाहण्याकरितां हिंडत फिरत नाहींत, असा निराशाजनक प्रकार त्याच्या दृष्टीस पडला ! अशा तऱ्हेचा शहरच्या रस्त्यांतून त्या महोत्सवाच्या वेळीं जिकडे तिकडे शुकशुकाट नांदत असलेला पाहून राजाला मोठा राग आला. व मी पुका-रलेल्या महोत्सवावर हा बहिष्कार कोणी घातला, असा त्यानें आपल्या जवळच्या कंचुकींना प्रश्न केला. त्यांनीं आर्य चाणक्याचें नांव सांगितलें. तेव्हां आर्यचाणक्याला ताबडतोब बोलावणें गेलें. आणि चाणक्य आला. तो आल्यानंतर राजा चंद्रगुप्त आणि चाणक्य यांच्यामध्यें जो संवाद झाला, त्यापैकींच एक प्रश्नोत्तर वरील आरंभींच्या अवतरणामध्यें दिलेलें आहे. ' मी जाहीर केलेल्या महोत्सवाला असा प्रतिबंध करण्याचें कारण काय, तें मला ऐकण्याची इच्छा आहे, ' असें राजानें विचारलें. त्यावर ' आधीं महोत्सव करण्याचेंच कारण कोणतें हें मलाही पण आपल्यापासून ऐकण्याची इच्छा आहे, ' असें चाणक्यानें त्याला स्पष्ट प्रत्युत्तर दिलें. यापुढें राजानें आपलीं कारणें सांगितलीं. परंतु आर्य चाणक्यानें त्या सगळ्या कारणांचें खंडण करून या वेळीं महोत्सव करणें हें बिलकुल उचित नाहीं, असें राजाला सिद्ध करून दाखविलें. व अशा भलत्याच वेळीं कोठेंही महोत्सव होऊं न देतां खुद्द राजाची इच्छा असतांही त्या महोत्सवावर बहिष्कार घालून त्यानें तो बंद पाडला !

असा पूर्वीचा एक प्रसंग आहे. आणि तसाच प्रसंग हल्लींही पुनरपि प्राप्त झाला आहे. युवराजांच्या आगमनाच्या प्रीत्यर्थ जे उत्सव करावयाला सांगतात, त्यांनीं आपलीं कारणें प्रतिपक्षाच्या कारणांपेक्षां जास्त बलवत्तर आहेत, असें सिद्ध करून दाखविलें नाहीं, तोंपर्यंत उत्सव न करणें हेंच योग्य आहे. लोकांना इतक्या तऱ्हेनें नाखुष करून ठेवून फिरून त्यांना उत्सव करावयाला सांगणें म्हणजे खरोखर ही कोडगेपणाची परमावधि आहे. देशामध्यें असंतोष भयंकर पसरलेला आहे, ठिकठिकाणीं पावसाच्या अभावामुळें दुष्काळ डोळे वटारूं लागले आहेत, दुष्काळाच्या वेळेपेक्षांही अतिशय भयंकर अशी खाण्याच्या धान्याची महर्गता राज्यांत बारा महिनेही नांदत असल्यामुळें कायमचें दुष्काळाचें ठाणें येऊन बसल्यासारखें झालें आहे, लोकांना जे स्वराज्याचे हक्क पाहिजे आहेत ते देण्यांत येत नाहींत, आणि उलट लोकांच्या पुढाऱ्यांवर खटले करण्यांत येत आहेत, देशांत जिकडे तिकडे दडपशाहीचा अम्मल सुरू असून हजारों देशभक्त लोक कोणत्याना कोणत्या तरी कलमाखालीं तुरुंगांत अडकवून ठेवण्यांत येत आहेत, निदान मद्यपानप्रतिबंध तरी करावा असली साध्या महत्त्वाची पण विशेष नीतिमत्तेची गोष्ट करण्याविषयीं लोक प्रयत्न करीत असतां तेंही त्यांना करूं देण्यांत येत नाहीं, पंजाब प्रकरणाबद्दलचा अन्याय दूर करण्यांत येत नाहीं, खिलाफतीचें प्रकरण अजून आहे तसेंच भिजत ठेवण्यांत आलेलें आहे, धारवाडच्या सारख्या निरपराधी जनसमूहांवर निष्कारण गोळ्या झाडण्यांत येत आहेत, प्रजेंतील अज्ञान घालविण्याकरितां त्यांना सक्तीनें प्राथमिक शिक्षण देण्याचें लांबच राहून उलट त्यांच्या अज्ञानाचा अन्यायी फायदा घेऊन एका जातीला दुसऱ्या जातीच्या विरुद्ध उठवून आपल्या स्थैर्यासाठीं दुसऱ्यांच्यामध्यें दररोज नवीन नवीन कांहीं तरी कलहाग्नि पेटवून देण्यांत येत आहेत, इंडियन लोकांना साउथ आफ्रिकेसारख्या वसाहतींमधून समानत्वानें राहूंसुद्धां देण्यांत येत नाहीं, मोठ्या पगाराच्या सगळ्या मोठ्या कुरणांतून एखादें इंडियन जनावर घेऊन बाकीच्या सगळ्या जागा अजून सुद्धां युरोपियन लोकांकरितांच राखून ठेवण्यांत येत आहेत, अशा अनेक कारणांनीं दुःसह झालेली परिस्थिति सांप्रत हिंदुस्थानांत जिकडे तिकडे फैलावलेली असतांना येथील लोकांना येथील अधिकाऱ्यांनीं उत्सव

करण्याला कोणत्या तोंडानें सांगावें ? राजपुत्र हे राजांचे पुत्र असतील; पण येथील लोकांच्या मनांमध्यें तुम्ही समाधान उत्पन्न करण्यासारख्या कांहीं प्रामाणिक गोष्टी केल्याशिवाय येथील लोकांचे करपलेले हात तुम्हांला कुरवाळण्याला कोठून तयार होणार ?

लोकाची स्थिति ही अशी आहे. व हे गांजलेले इंडियन लोक युवराजांच्या आगमनावर उघड उघड बहिष्कार घालीत आहेत. अशा स्थितींत सुद्धां युवराज येथें येणार नाहींत किंवा येथें येऊन कांहीं मानपत्रें घेऊन ते जाणार नाहींत, असें नाहीं. पण त्यांत काय शोभा! येथील अधिकाऱ्यांचे हल्लींचे प्रयत्न युवराजाचें आगमन कसें तरी यशस्वी करून दाखविण्याविषयीं चाललेले आहेत. पण असल्या कृत्रिम युक्त्यांत काय अर्थ आहे? मग कांहीं तरी कृत्रिम व कमी दर्जाच्याच युक्त्या योजून लोक जमविण्यापेक्षां दुसरी एक जास्त सोपी युक्ति आहे! मोठाले कागद घ्यावेत, आणि त्यांच्यावर अतिशय गर्दी केलेल्या लोकांचीं चित्रें काढवावींत; आणि ते मोठमोठाले कागद रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनीं चिकटवून देऊन त्यांतून युवराजांची मिरवणूक नेली, तरी देखील पुष्कळ लोक जमल्याचें श्रेय येण्यासारखें होणार आहे! किंवा सिनेमामध्यें सुद्धां लोकांच्या जमलेल्या गर्दीच्या कित्येक फिल्म्स तयार असतात. त्यांचाही उपयोग करतां येण्यासारखा आहे! हल्लीं युवराजांच्या आगमनाच्या प्रसंगीं लोकांच्या गर्दी जमविण्याकरितां जे क्षुद्र प्रयोग सुरू करण्यांत आलेले आहेत, ते सगळे वरच्या इतकेच हास्यास्पद आहेत! पुण्यांत युवराजांना आणण्याचें ठरविल्यापासून दक्षिण महाराष्ट्रांतील कित्येक कारस्थानांना तर मोठाच ऊत येऊं लागला आहे! महंमदाची अशी एक गोष्ट प्रख्यात आहे कीं, महंमदानें पहिल्यानें पर्वताला आपल्या जवळ येण्याचा हुकूम केला! परंतु परमेश्वराच्या इच्छेनें आणि सृष्टीच्या नियमानें अचळ बनलेला हा पर्वत पूर्ण सत्याग्रही आणि पूर्ण असहकारितावादी असून तो आपल्या आज्ञेप्रमाणें आपल्याला भेटावयाला आपल्यापुढें कधींही सामोरा येणार नाहीं, असें पाहून तो बहिष्कारवादी पर्वत जेथें आपल्या जागेवर स्थिर होता, तेथें महंमद मुकाट्यानें गेला! आपल्या तोंडाभोंवतीं दिवा ओवाळण्याला जर कोणी तयार होत नसेल, तर दिव्याभोंवतीं आपलें तोंड ओवाळुन घेणें हाच काय तो दुसरा प्रकार अवशिष्ट राहतो, हें उघड आहे.

व तशीच या युवराजांच्या आगमनाची हल्लीं करुणास्पद स्थिति होत चाललेली आहे. युवराजांच्या स्वागतासाठीं लोकांनीं यावें, अशी अधिकाऱ्यांची पहिली इच्छा खरी; पण या बहिष्काराच्या चळवळीमुळें हल्लीं तें जर शक्य नसेल, तर लोक जेथें असतील तेथेंच युवराजांनीं जावें म्हणजे झालें, असें एक नवीन सरकारी तत्त्वज्ञान आतां शोधून काढण्यांत आलें आहे; व कोठें तरी लोकांचे जमाव जमविण्याकरितां निरनिराळ्या युक्त्या हल्लीं उपयोगांत आणल्या जात आहेत. सरकारी नोकरी बाहेरचे व निःस्पृह वृत्तीचे लक्षावधि आणि कोट्यवधि लोक हल्लीं बहिष्कारवादी बनून युवराजांच्या स्वागताला संमति देत नाहींत, असें पाहून अधिकारी लोक आपल्या स्वतःच्या ओशाळया झालेल्या व नोकरीप्रमाणेंच पेन्शनमध्येंही बद्ध राहिलेल्या लोकांकडे केविलवाण्या चित्तवृत्तीनें वळलेले आहेत. व म्हातारे कोतारे, सरकारी नोकरींत झिजून झिजून क्षीण झालेले, किंवा सरकारी लढाईत थोटे, आंधळे आणि पांगळे झालेले, असे सगळे पेन्शनर लोक, तसेंच सार्वजनिक पैशांतून फुकट इनामें खाऊन अनेक वर्षांचे मिंधे आणि ओशाळे झालेले इनामदार वगैरे लोक, असल्या अर्ध्या मुर्ध्या सरकारी लोकांना एकत्र जमविण्याचे कित्येक ठिकाणीं स्तुत्य प्रयत्न चालले आहेत. पाटील परिषदांतील पाटील, सत्यशोधकांच्या तमाशांतील तमासगीर, पलटणींतील जखमी व जायबंदी झालेले शिपाई, पेन्शन घेऊन अर्धवट उपाशीं पडलेले पेन्शनर, ह्या ज्या सगळ्यांना आजपर्यंत तुम्ही जिवंत आहांत किंवा मेलेले आहांत म्हणून सुद्धां कोणीं विचारीत नव्हतें, त्यांचें भाग्य आज उदयाला आलें आहे! व तुम्हांला जाण्यायेण्याचा भाडेखर्चही आम्ही रयतेच्या फुकटच्या पैशांतून परभारें लागेल तितका देतों; पण कसेंही करून युवराज येतील त्या वेळीं गर्दी जमवून दाखविण्याकरितां आणि आमच्या पोलिसांच्या हातांतील वडग्यांचा मार खाण्याकरितां तुम्ही अगत्य आलेंच पाहिजे, अशा ह्या लोकांच्या विनवण्या चालल्या आहेत! बिचाऱ्या युवराजांना काय माहित कीं, हे सगळे आपल्या नोकरींतीलच लंगडे पांगळे लोक जमवून हे लोकसमूहाचे पोकळ देखावे दाखविण्यांत येत आहेत!

त्याचप्रमाणें शिवाजी महाराजांच्या स्मारकाचीही एक टूम नवीनच उत्पन्न करण्यांत आली आहे! व त्या निमित्तानें--इतर लोक नाहींत तर

नाहींत,--पण निदान कांहीं सत्यप्रिय मराठे लोक तरी शिवाजीच्या नांवानें फसविले जावेत, असा एक स्तुत्य उपक्रम सुरू करण्यांत आला आहे! इंग्लिश अधिकारी हें जें शिवाजीचें स्मारक युवराजांच्या हातानें उघडें करून दाखविणार आहेत, तें कोणत्या शिवाजीचें? ज्या शिवाजीला हेच पापभीरु इंग्लिश लोक आजपर्यंत चोर, लुटारू व दरवडेखोर म्हणून म्हणत होते, त्याच लुटारू आणि दरवडेखोर अशा एका खुनी माणसाचीं चरित्रें स्मारकाच्या स्वरूपानें लोकांपुढें अनुकरणार्थ मांडण्यासाठींच युवराजांना ही तसदी देण्यांत येत आहे काय? ज्या शिवाजीला आपण इतके दिवस लुटारू म्हटलें, त्याच शिवाजीचीं स्मारकें आपल्या युवराजांकडून उघडविण्याचा आपल्यावर प्रसंग येत आहे, यांत राष्ट्रीय पक्षापुढें आपला हा एक मोठा नैतिक पराभवच होत आहे, हें या युरोपियन अधिकाऱ्यांना दिसत नाहीं काय? पण काय करणार बिचारे! नारायण अडला, म्हणजे त्याला कोणाचे पाय धरावे लागतील याचा कांहीं नेम नसतो! त्याप्रमाणें निदान कांहीं थोडेसे वेडगळ मराठे लोक तरी एकत्र गोळा व्हावेत, म्हणून त्यांच्यापुढें हा लाळ घोटण्याचा प्रयत्न चालला आहे! व त्यासाठीं त्यांना नाक मुठींत धरून आणि दातीं तृण धरून शिवाजी महाराजांची हल्लीं याचना करावी लागत आहे! पण शिवाजी महाराजांची मूर्ति--आपल्या महाराष्ट्रांतील लोकांना गुलामगिरींतून सोडवून स्वराज्याच्या गादीवर बसविणाऱ्या शिवाजी महाराजांची मूर्ति--ही स्वातंत्र्याची मूर्ति आहे. ह्या स्वातंत्र्याच्या मूर्तीचा अनावरणसमारंभ करून त्याच्या योगानें गुलामगिरीचें पीक वाढविण्याचा जर कोणी प्रयत्न करूं लागले, तर त्यांत त्यांना कितपतसें यश येईल? ठिकठिकाणीं गुलाम सभा हल्लीं जारीनें स्थापन होत आहेत, व त्या सर्व गुलाम सभांतील सगळ्या गुलामांना अगत्याचीं बोलावणीं पाठवून आग्रहपूर्वक रीतीनें हा गुलामगिरीचा महोत्सव साजरा करण्याकरितां हांकूनही आणण्यांत येईल! कोणी गुलाम हत्तीवर येतील, कोणी घोड्यावर येतील, कोणी घोड्याच्या गाडींत येतील, किंवा कोणी फाटक्या वहाणांनीं रखडत येतील; पण कसें तरी करून हे सगळे गुलाम झाडून एकत्र गोळा करण्यांत आले म्हणजे त्यांच्या समोर जर स्वातंत्र्यप्रिय अशा शिवाजीचें स्मारक उघडण्यांत आलें, तर तो मराठ्यांच्या

गुलामगिरीचा उच्छेदक शिवाजी आपल्या सभोंवतीं जमलेल्या त्या सगळ्या महाराष्ट्रीय गुलामांना पाहून काय म्हणेल आणि काय उपदेश करील, याची कोणालाच—गुलामांना आणि त्यांना एकत्र गोळा करणारांना—कांहींच भीति वाटत नाहीं काय ? दगड दगडाशीं काय बोलणार, आणि दगड दगडांना काय उपदेश करणार, अशा बेफिकीरपणानें शिवाजीच्या स्मारकाच्या दगडावर तरी इंग्लिशांनीं विश्वास ठेवून उपयोगी नाहीं !

---

# एक जुना प्रधान—आर्य चाणक्य

## आणि

# हलींचे नवे प्रधान !

कञ्चुकी--अहो राजाधिराजमन्त्रिणो विभूतिः ।

उपलशकलमेतद्भेदकं गोमयानां
बटुभिरुपहृतानां बर्हिषां स्तूपमेतत् ।
शरणमपि समिद्भिः शुष्यमाणाभिराभि-
र्विनमितपटलान्तं दृश्यते जीर्णकुड्यम् ॥

मागच्या अंकांत मौर्य वंशांतील राजा चंद्रगुप्त यानें महोत्सव करण्याविषयीं आग्रह धरिला असतां त्याचें म्हणणें खोडून काढून त्याचा प्रधान, आर्यचाणक्य, यानें तो महोत्सव कसा बंद पाडला, याचें वर्णन केलें आहे. ज्या आर्यचाणक्यानें आपल्या राजाच्या लहरीला न जुमानतां आपल्या शहाणपणाच्या आणि दूरदृष्टीच्या धोरणाप्रमाणें राजानें सांगितलेला महोत्सव बंद पाडला, त्या आर्यचाणक्याच्या चरित्रांतून प्रकृतोपयोगी अशी आणखीही एक गोष्ट घेण्यासारखी आहे.

चंद्रगुप्ताच्या हातांत आलेलें त्या वेळचें तें आर्यांचें साम्राज्य लहान-सहान होतें, असें नाहीं. हल्लींचीं नेटिव्ह संस्थानें वजा केलीं असतां हिंदुस्थानचा जेवढा भाग इंग्लिशांच्या प्रत्यक्ष अमलाखालीं आहे, तेवढ्याच जवळ जवळ क्षेत्रफळाचा भाग मौर्यवंशीय राजांच्या ताब्यांत होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पूर्वेस बंगालचा उपसागर, उत्तरेस हिमालय पर्वत, पश्चिमेस सिंधुनद व दक्षिणेस तुंगभद्रा वगैरे नद्या, इतक्या विस्तीर्ण चतुःसीमांमधील बऱ्याच ठिकाणीं हें चंद्रगुप्ताचें साम्राज्य पसरलेलें होतें. इतक्या मोठ्या साम्राज्याची त्या वेळचे ते अडाणी लोक दुसऱ्या कोणा परकीय देशांतील लोकांच्या कृपेशिवाय कशी व्यवस्था चालवीत असतील, याच्याबद्दल अलीकडच्या सुशिक्षित लोकांना अचंबा वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. त्या वेळचे लोक आपसांत भांडत नव्हते काय, त्या वेळीं एक जात दुसऱ्या जातीशीं वैर करून तिसऱ्याचा फायदा साधून देण्याला उद्युक्त होत नसे काय, आणि त्या वेळचे लोक आपल्या देशांत शांतता आणि सुव्यवस्था राखण्याकरितां दुसऱ्या कोणत्या तरी परकीय देशांतून आपल्यावर अंमल करण्याकरितां कोणत्या तरी परदेशी लोकांना बोलावीत नसत काय, व त्या वेळीं जर हे आपले हल्लींचे परोपकारी इंग्लिश लोक नसतील, तर मग त्या वेळीं हीं परोपकाराचीं कामें इतक्या कष्टानें कोण करीत असेल, असे अनेक प्रश्न साहजिकपणेंच अलीकडच्या विद्वान लोकांच्या मनांत उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहींत! पण ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे कीं, त्या वेळचे निरनिराळ्या जातींचे लोक आपसांत भांडत नसत, किंवा आपल्या अंतःकलहाच्या सबबीवर ते दुसऱ्या कोणाला आपल्या घरांत शिरूंही देत नसत आणि त्यांना धनी बनवून अखेरीस आपण त्यांची गुलामगिरी पतकरण्याला ते कधीं तयारही होत नसत! हल्लीं मोरे हें आडनांव पुष्कळ क्षत्रिय कुळांतल्या घराण्यांतून आढळतें. तें आडनांव अर्थात्च पूर्वींच्या मौर्य शब्दाचा अपभ्रंश होय, हें उघड आहे. त्या मोऱ्यांच्या किंवा मौर्यांच्या कुळांत जन्मलेला चंद्रगुप्त राजा वर सांगितलेल्या विस्तीर्ण समुद्रवलयांकित साम्राज्यावर अंमल करीत असतां त्या मोरे घराण्यांतील राज्याचा कारभार चालविण्याकरितां कोणी परदेशांतील परोपकारी लोक आणावे लागले नसून तो सगळा राज्यकारभार आर्यचाणक्य हा एकटा ब्राह्मण चालवीत होता!

आर्यचाणक्याची नीतिकुशलता इतिहासप्रसिद्ध आहे. व कौटिल्यकृत अर्थ-शास्त्र या नांवाचा त्याचा दंडनीतीवरील जो एक ग्रंथ नुकताच उपलब्ध झालेला आहे, त्यावरून पाहतां त्याची बुद्धि, त्याचें धोरण आणि त्याचे प्रयत्न हे फार अचाट असले पाहिजेत, याबद्दल कोणाचीही खात्री पटल्या-वांचून राहणार नाहीं. तो त्याचा नीतिग्रंथ आजच्याही राजांना राजनीतींतील केवळ नवीन शहाणपण शिकवील, इतक्या योग्यतेचा आहे. आपल्या राज्यांतील निरनिराळ्या खात्यांची व्यवस्था कशी लावावी, त्या खात्यांवर कोणते अधिकारी नेमावे आणि त्यांच्यावर फिरून लक्ष्य कसें ठेवावें, शत्रु कसे जिंकावे, कारस्थानें कशीं करावीं, दुसऱ्यांपासून राज्यें कशीं घ्यावीं आणि आपल्या राजांनीं स्वतंत्रतेमध्यें कसें रहावें, वगैरे बाबतींमध्यें आर्य चाणक्यानें—कौटिल्यानें—त्या मूर्तिमंत कौटिल्यानें—आपल्या त्या कौटिल्य—नीतिशास्त्रामध्यें जे अनेक प्रयोग दिलेले आहेत, तेवढे जरी आज आपल्या राजांपैकीं आणि प्रधानांपैकीं कोणी लक्षांत घेतील, तरी तेवढ्यानें सुद्धां किती तरी फायदा होण्यासारखा आहे. पण आर्य चाणक्य हा नुसता राजनीतिवरील एक केवळ ग्रंथ लिहिणाराच नसून ते सगळे राजनीतीचे प्रयोग प्रत्यक्ष उपयोगामध्यें आणून सफळ करून दाखविणारा असा एक कर्तृत्ववान मुत्सद्दी ब्राह्मण होता. त्यानें आपल्या कर्तबगारीनेंच चंद्रगुप्ताला साम्राज्याची गादी दिली; व त्यानें आपल्या कर्तबगारीनेंच ती साम्राज्याची गादी निष्कंटक करून चंद्रगुप्ताकडे कायम टिकविली. असला हा इतका धूर्त, धोरणी, मुत्सद्दी, कारस्थानी आणि महाबुद्धिमान ब्राह्मण त्या वेळच्या त्या मोऱ्यांच्या घराण्यांतील चंद्रगुप्त राजाचा राज्यकारभार इतक्या प्रामाणिकपणानें आणि इतक्या दक्षतेनें पहात असतांना त्या राजाला काळजी तर कशाची नव्हतीच; पण शिवाय त्या ब्राह्मणानें चालविलेल्या सुंदर राज्य-व्यवस्थेमुळें चंद्रगुप्त राजाच्या चरणांपुढें साम्राज्यांतील हिरे, माणकें, मोतीं, सोनें, वगैरे सर्व प्रकारच्या मौल्यवान संपत्तीचा जणूं काय पाऊसच पडत होता! इतकी ज्या राजाची संपत्ति त्याचीं प्रधानकीचीं कामें प्रामाणिकपणानें करणाऱ्या प्रधानाचीही श्रीमंती किती थोर असेल, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं, असें हल्लींच्या अनुभवावरून स्वाभाविकपणें कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं! हल्लींच्या मानानें पाहतां कोणालाही खात्रीनें

असें वाटेल कीं, आर्य चाणक्याचा वाडा चंद्रगुप्ताच्या वाड्याच्या बरोबरीचाच असेल; व त्या वाड्यांतील संपत्तिही चंद्रगुप्ताच्या संपत्तीपेक्षां फार तर थोडी खालोखाल—परंतु बहुतेक बरोबरीचीच—असली पाहिजे ! परंतु—

एके वेळीं चंद्रगुप्त राजानें आर्यचाणक्याला आपल्या समोर बोलावून आणण्याकरितां आपल्या कञ्चुकीला त्याच्याकडे जाण्याला सांगितलें. त्याप्रमाणें कञ्चुकी आर्य चाणक्याच्या घरीं गेला, तेव्हां कञ्चुकीनें आर्य चाणक्याचें घर आणि त्यांतील संपत्ति पाहून त्याच्या मनावर जो विलक्षण परिणाम झाला, तो वरील मथळ्याकरितां दिलेल्या संस्कृत अवतरणामध्यें ग्रथित करण्यांत आलेला आहे ! शूद्रककृत मृच्छकटिकनाटकांतील उज्जयिनी शहरांतील वसंतसेना नांवाच्या एका यःकश्चित् गणिकाकन्यकेच्या सातचौकी राजवाड्याचें आश्चर्यचकित झालेल्या विदूषकानें किती तरी विस्तीर्ण वर्णन केलें आहे ! त्या काळांतल्या—त्या स्वराज्याच्या काळांतल्या—यःकश्चित् वेश्यांचे देखील जर इतक्या संपत्तीच्या लक्षणांनीं आणि परिणामांनीं भरलेले एवढाले मोठे विस्तीर्ण सातसातचौकी वाडे होते, तर ज्याच्या बुद्धिबळावर चंद्रगुप्ताच्या साम्राज्यांतील हत्ती आणि घोडे नाचविले जात होते, त्या आर्यचाणक्याचा राजवाडा किती तरी विस्तीर्ण व किती तरी धनसंपन्न असला पाहिजे ! परंतु—

परंतु वस्तुस्थिति मात्र तशी नव्हती ! चंद्रगुप्तराजाच्या कञ्चुकीनें आर्य चाणक्याच्या राजवाड्याचें आणि त्यांतील दौलतीचें जें वर्णन केलें आहे, तें असें नाहीं ! अनेक मांडलिक राजांचा अधिराज जो चंद्रगुप्त त्याच्या प्रधानाचें घर फार मोठें असेल, अशी त्या कञ्चुकीचिही समजूत होती. पण त्यानें जेव्हां ती प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहिली, तेव्हां त्यालाही आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं ! त्या कञ्चुकीनें आर्य चाणक्याच्या घरांत काय काय पाहिलें ?—तुकाराम महाराजांचा एक फार उत्कृष्ट अभंग आहे ! आणि त्यांत त्यांनीं भाग्यवंतांच्या घरच्या भाग्याचें आणि वैभवाचें फार मार्मिक वर्णन केलें आहे ! तुकाराम महाराज म्हणतात कीं, 'आम्ही भाग्याचे भाग्याचे !' मग अर्थात् असे जे भाग्यवान असतील, त्यांच्या घरीं संपत्ति पाणीच भरीत असली पाहिजे ! पण तसें नाहीं ! तुकारामांनीं विरक्तांच्या भाग्याचें जें वर्णन केलें आहे तें असें कीं, 'आम्ही भाग्याचे

भाग्याचे । आम्हां तांब्ये भोपळ्याचे । ' ! या अलीकडच्या तुकारामबुवांच्या निर्लोभवृत्तीची, किंवा इंग्रजी कवि वर्ड्सवर्थ यानें एका लहानशा कवितेमध्यें वर्णिलेल्या Plain living and high thinking या उदात्त तत्त्वाची या प्रसंगीं कोणालाही आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं !—चंद्रगुप्ताच्या कञ्चुकीनें त्या राजाधिराजाच्या प्रधानाचें—आर्य चाणक्याचें—घर कसें पाहिलें ? आणि त्यानें त्यांत काय वैभव पाहिले ? आर्य चाणक्याच्या झोपडीचें कूड अगदीं जुने होऊन गेलेले होते ! त्याच्यावर जें गवताचें आच्छादन घातलेलें होतें, त्यांतील गवतही कुजून गेलेलें होतें ! व त्या छपरावर ज्या थोड्याशा समिधा वाळण्याकरितां पसरून ठेवण्यांत आल्या होत्या, त्यांच्या भारानेंही त्या झोपडीचें एक पाखें अगदीं लपून गेलें होतें ! इतकी त्या झोंपडीची वळकटी होती ! आणि अशा त्या मिनिस्टेरिअल पॅलेसमध्यें (प्रधानाच्या राजवाड्यामध्यें) संपत्ति काय भरली होती ? तर आर्य चाणक्याच्या शिष्यांनीं यज्ञयागादिकाकरितां कापून आणिलेल्या दर्भांचीं जुडकीं कोठें पडलीं होतीं ! आणि यज्ञामध्यें लागणाऱ्या गोवऱ्या फोडण्याकरितां जरूर असलेले दगडाचे तुकडे कोठें पडले होते ! हा आर्य चाणक्याचा राजवाडा ! आणि ही आर्य चाणक्याच्या राजवाड्यांतील संपत्ति ! ही स्थिति पाहून राजाच्या कंचुकीला आश्चर्य वाटलें असलें, तर त्यांत कांहीं आश्चर्य आहे, असें नाहीं !

पण आर्य चाणक्याची खरी संपत्ति त्याच्या डोक्यामध्यें सांठविलेली होती ! त्या संपत्तीच्या जोरावर तो आपल्या राजांना त्यांचीं राज्यें मिळवून देत असे ! आणि तो त्यांच्याकरितां राजवाडे बांधून देऊन आपण स्वतः एखाद्या मोडक्या तोडक्या पर्णकुटिकेमध्यें रहात असे ! स्वतःच्या हातांत हत्ती, घोडे, सेना किंवा सेनापति, यांपैकीं कांहीं एक नसतांना केवळ आपल्या बुद्धीच्या जोरावर नंद राजांना यज्ञांतील पशूंप्रमाणें ठार मारून ज्यानें चंद्रगुप्ताला त्या नंदांच्या गादीवर बसविलें आणि इतकें करूनही स्वतः फिरून जो अलिप्त राहिला, त्या आर्य चाणक्यासारखे मंत्री ज्या राजांना लाभतात, तेच राजे इहलोकीं धन्य होऊन जातात ! प्रधान असावेत तर असे असावेत ! परंतु असले प्रधान आतां कोठें आहेत !

हल्लीं ज्या प्रधानांची एक नवीन जात निर्माण करण्यांत आलेली

आहे, तिच्या लीला कांहीं विलक्षणच आहेत! हल्लींच्या या प्रधानांचे थाटमाट पाहिले, तर यांच्यापुढें तो बिचारा आर्य चाणक्य अगदीं लाजूनच जावयाचा! हल्लींच्या प्रधानांच्या एकंदर डामडौलाच्या आणि ऐषआरामाच्या मानानें पाहिलें, तर तो बिचारा चाणक्य यांचा सैपाक्या किंवा शागीर्द होण्यालाही लायक ठरणार नाहीं! हल्लींचा एकेक प्रधान पहावा, तर तो स्वदेशभक्तीच्या आणि स्वदेशकल्याणाच्या इतक्या वल्गना करीत असतो कीं, त्यांतील एखादा शब्द तरी त्या बिचाऱ्या आर्य चाणक्याला माहीत असेल किंवा नाहीं, याची शंकाच आहे! चाणक्याच्या सगळ्या मुत्सद्देगिरीच्या मित भाषणांतून स्वदेशभक्तीचा कोठें एक शब्दही न येतां त्यानें दुसऱ्यांचीं राज्यें आपल्या चंद्रगुप्त राजाच्या साम्राज्यांत जिंकून घेतलीं! आणि हल्लींचे प्रधान स्वदेशभक्तीची आणि लोककल्याणाची लांबलचक बडबड करून अखेरीस आपलें असेल नसेल तें सर्व कांहीं परकीय साम्राज्यामध्यें सामील करून देण्याला साधनीभूत होत आहेत! हल्लींच्या प्रधानांचे एकेकाचे पगार पाहिले, तर त्या वेळच्या चंद्रगुप्तराजालाही रोजची इतकी किफ़ायत नसेल, इतके यांना मोठाले पगार आहेत! चार चार आणि पांच पांच हजार रुपयांच्या पगाराशिवाय हल्लींचा लोकांचा प्रधान युरोपियनांनीं तयार करून टेबलावर ठेविलेल्या कागदावर सही करण्याला तयार होत नाहीं! त्या बिचाऱ्या चाणक्यानें चार हजार रुपये कधीं बाप जन्मींही पाहिले नसतील! कोणीकडे हल्लींचे बटलरांच्या कपबशांतून आणि डिशेसमधून पेयें पिणारे आणि जेवणें झोडणारे सुधारलेले प्रधान आणि कोणीकडे तो दगडांनीं गोंवऱ्या फोडणारा गांवठी आर्यचाणक्य! कोणीकडे हल्लींच्या प्रधानांचे ते राजवाड्यांसारखे लोकांच्याच मालकीचे परंतु तूर्तातूर्त दोन दिवस प्रधानकीच्या मुदतीपर्यंत स्वतःला रहाण्याकरितां भाड्यानें घेतलेले बंगले आणि कोणीकडे ती दर्भांच्या भारानेंही वांकणारी कुडामेढींची आर्य चाणक्याची झोंपडी! कदाचित् हें चाणक्याचें उदाहरण पाहून त्याचा तिरस्कार करीत करीत कोणी एखादा हल्लींचा प्रधान म्हणेल कीं, तो चाणक्य एखाद्या झोंपडींत एखाद्या भिकारड्या भटुरड्यासारखा रहात असला, म्हणून आम्ही विसाव्या शतकांतील प्रधानांनीं असल्या मोडक्या तोडक्या झोंपडींत रहाणें हें कधीं तरी शक्य आहे काय? चाण-

क्यापेक्षां जास्त मुत्सद्देगिरीनें प्रधानकीचें काम चालविण्याची यांच्यांत अक्कल असेल, तर हल्लींचे बंगलेच काय, पण याच्यापेक्षांही मोठाल्या राजवाड्यांतून हे प्रधान राहिले, तरीही कोणी कुरकुर करणार नाहीं. पण यांच्या हातून अकलेची कामगिरी काय होत असते, आणि यांची योग्यता काय असते ? चाणक्याची शेंडी धरून त्याला नंदराजांनीं त्याच्या आसनावरून ओढिलें, ह्या अपमानाबद्दल चाणक्यानें नंदराजांचीं पाळेंमुळें खणून काढिलीं ! पण हल्लींचे प्रधान इतके शांत आहेत कीं, त्यांची शेंडी धरून ( पण हल्लींच्या प्रधानांना शेंडी क्वचित्च असते ! ) त्यांच्या जागेवरून त्यांना कोणी अपमानानें शंभर वेळां खालीं ओढलें, तरी त्यांत त्यांना आपला अपमान झाला आहे, असें कधीं वाटतच नाहीं ! चाणक्य हा इतका निःस्पृह होता कीं, तो आपल्या राजाला नेहमीं 'वृषल' असें म्हणतअसे ! परंतु हल्लींचे प्रधान इतके सस्पृह आहेत कीं, ते रोज आपल्याला इतरांकडून 'वृषल' म्हणून म्हणवून घेत असतात ! पूर्वीं आर्य चाणक्य जसें म्हणत असे, त्याप्रमाणेंच चंद्रगुप्त राजाला वागावें लागत असे; परंतु त्याच्या उलट हल्लींच्या या बाहुलेवजा प्रधानांना त्यांचे राजे जसें म्हणतील, तशा माना डोलवाव्या लागत आहेत ! पूर्वीं चाणक्य दुसऱ्या लोकांना जिंकून आपल्या राजाच्या हवालीं करीत असे; परंतु हल्लींचे प्रधान आपल्याच लोकांना जास्त जास्त जिंकून जास्त जास्त परवश करण्यासाठीं मदत करीत असतात !

अशी ही पूर्वींची आणि हल्लींची स्थिति पाहून हल्लींच्या ह्या प्रधानांकडून आपला उत्कर्ष होत आहे किंवा आपलें अधःपतन चाललें आहे, याच्याबद्दल कोणालाही जबरदस्त शंका उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. लोकांचे हजारों रुपये पगार खाऊन लोकांचें स्वराज्य त्यांच्यापासून जितकें दूर राखवेल तितकें दूर राखण्याविषयीं अहोरात्र इमानेंइतबारें झटणारे हे हल्लींचे प्रधान पाहून कोणालाही वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं ! ज्या देशाला खऱ्या ऊर्जितावस्थेला यावयाचें आहे, त्या देशाला आर्य चाणक्यासारखेच प्रधान लाभले पाहिजेत. नाहीं तर हे दुसऱ्याच्या उपयोगीं पडणारे पगारखाऊ ओशाळे प्रधान पावसाळ्यांतल्या प्राण्यांप्रमाणें शेंकडो झाले काय आणि गेले काय, यांच्यापासून देशाचें काय कल्याण व्हावयाचें आहे ? असल्या प्रधानांच्या हातांत शंभर वर्षें देशाचीं सूत्रें असलीं, तरी त्यांत

स्वतंत्रतेकडे देशाचें एक पाऊल पुढें पडेल तर शपथ ! असल्या लोकनियुक्त प्रधानांच्या कृपेच्या तावडींतून जे लोक सुटतील, तेच धन्य होत ! आणि त्यांनाच कधीं काळीं स्वराज्य मिळालें तर मिळेल ! असल्या प्रधानांच्या टोळ्यांपासून हिंदुस्थानच्या संपत्तीचें संरक्षण करून परमेश्वर आमच्या हिंदुस्थानाला मोडक्या झोपडींत राहणारा आणि दगडाच्या तुकड्यांनीं गोवऱ्यांचे तुकडे फोडणारा एखादा आर्यचाणक्य देईल, तर आमचा सर्व कार्यभाग होईल !

---

# कमकुवतपणा कीं प्रजाद्रोह !

गेल्या आगष्ट महिन्यांत पहिल्यानें जेव्हां मोपला लोकांच्या बंडाचा अचानक रीतीनें एकदम प्रादुर्भाव झाला, त्या वेळीं आम्ही अमुक तारखेपासून मलबारमध्यें बंड सुरू करणार आहों, अशी मोपल्यांनीं मद्रास सरकारला पूर्वीं आगाऊ नोटीस दिलेली नसल्यामुळें मलबारमधील ब्रिटिश रयतेचें मद्रासमधील बिचाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना संरक्षण करतां आलें नाहीं, ही गोष्ट अगदीं साहजिक आहे ! त्या वेळीं मद्रासच्या कौन्सिलमध्यें आणि सिमल्याच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें जेव्हां ह्या मोपल्यांच्या बंडाच्या प्रादुर्भावाच्या प्रश्नावर वादविवाद झाला, त्या वेळीं सरकार तर्फे सांगण्यांत आलें कीं, सामान्य बंदोबस्ताकरितां जरूर तेवढे पोलिसचे आणि लष्करचे शिपाई ज्या त्या प्रांतांतून ठेविलेले असतात; त्याच्यापेक्षां जास्त ठेवले, तर खर्च वाढतो; म्हणून प्रारंभीं बेताचेच लोक असल्यामुळें मोपल्यांना आरंभीं आरंभीं दंगा करण्याला थोडा अवसर मिळाला; परंतु आतां मलबारांत लष्कर पाठवून आणि लष्करी अम्मल सुरू करून सरकार तेथील बंदोबस्त करीत आहे; तेव्हां या कामीं लोकांच्या प्रतिनिधींचा सरकारला पूर्ण पाठिंबा असला पाहिजे ! हें येथपर्यंतचें 'सरकारी म्हणणें

अगदीं बरोबर होतें व त्याबद्दल सरकारला कोणी दोषही देऊं शकणार नाहीं. परंतु मोपले लोक बंड करीत आहेत, हें एकदा समजल्यानंतर व त्या बंडाच्या बंदोबस्ताकरितां लष्करी पलटणी तेथें येऊन दाखल झाल्यावर मग तरी निदान आतां इंग्लिश लोक मोपल्यांच्या हातून दुसरे नवीन दंगे होऊं देणार नाहींत, असें सर्व लोकांना खात्रीनें वाटत होतें. पण ह्या बाबतींत मलबारांतील लष्करी शौर्यानें लोकांची पूर्ण निराशा केली आहे, ही मोठया दुःखाची गोष्ट आहे! मलबारांत एकदां इंग्रजांचें लष्कर गेलें आणि तेथें एकदां इंग्रजांचा लष्करी अमल सुरू झाला, म्हणजे फक्त मोपल्यांना पकडावयाचें आणि कोर्ट सांगेल त्या शिक्षा त्यांना द्यावयाच्या, एवढेंच काय तें काम आतां शिल्लक राहिलेलें असलें पाहिजे, असें लोकांना वाटत होतें! व इंग्लिशाचें तें दिगंतविजयी लष्कर तेथें गेल्यानंतर त्या शिपायांच्या डोळ्यांदेखत मोपल्यांच्या हातून नवीन बंड उपस्थित करण्यांत येईल, नवीन टोळ्या जमविण्यांत येतील, नवीन पोलिसांचे खून करण्यांत येतील, किंवा निरपराधी रयतेचे नवीन छळ करण्यांत येतील, अशी कोणाचीही कल्पना नव्हती! पण मोपले लोकांच्या अगदीं ताज्या दंग्यांच्या सुद्धां ताज्या बातम्या अजून प्रसिद्ध होत आहेत! सगळ्या जगांत विजयी ठरलेले हे लष्करी लोक मलबारांत गेल्यावर मोपल्यांनीं असले हे नवीन दंगे करावयाला नको होते! विशेषतः पुण्याच्या सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे कित्येक लोक मद्रासच्या खुद्द गव्हर्नर साहेबांना भेटून मोपल्यांना त्यांच्या दुःखनिवारणासाठीं काय पाहिजे, काय नको, याच्याबद्दलची प्रत्यक्ष चौकशी करण्याकरितां गेल्यानंतर तरी निदान आतां नवीन दंग्यांचें कांहीं कारण उरलें नव्हतें! आपल्याला मलमाच्या पट्या किती पाहिजेत; आपल्या जखमेवर औषधें किती दिवस पुरतील इतकीं पाहिजेत, वगैरे आपलीं दुःखें काय काय आहेत, तीं सर्व या दुःखनिवारण कमिटीला सांगून मोपले लोकांनीं मोकळें व्हावयाचें! म्हणजे सरकारकडून किंवा स्वतः कमिटीकडून सर्व दुःखें निवारण करण्यांत आलीं असतीं, आणि मग कांहींही प्रातव्य उरलें नसतें! पण तें सगळें टाकून देऊन हे मोपले लोक अजून दररोज नवीन नवीन दंगेच करीत आहेत! कोठें तारा तोड, कोठें आगगाडीचे रूळ उपट, कोठें पोलिसांचे खून कर, कोठें लोकांना लूट, असले प्रकार अद्यापि त्यांनीं चालविले आहेत! म. गांधी आणि

त्यांच्या ताज्या जाहीरनाम्यावर सह्या करणारे बाकीचे त्यांचे सत्तेचाळीस अनुयायी यांच्याविरुद्ध अतिशय रागावून जाऊन म. गांधींच्या दुष्कृत्यांच्या दुष्परिणामांबद्दल लिहितांना गेल्या गुरुवारच्या अंकामध्यें टाइम्स ऑफ इंडियानेंही या मोपला लोकांच्या भयंकर कृत्यांची जी अगदीं ताजी, पण खरी, हकीकत दिली आहे, त्यांतील सारांश असा आहे कीं, या बंडखोर मोपल्यांनीं एक देखील हिंदूंचें देऊळ भ्रष्ट व भग्न करावयाचें ठेविलें नाहीं ! त्या देवळांतील हिंदू देवांच्या मूर्ति फोडून बंडखोरांनीं तेथील सर्व संपत्ति लुटून नेली आहे ! जबरदस्तीचीं धर्मांतरें अद्यापिही चालूच आहेत ! आणि जे हिंदु लोक असें जबरदस्तीचें धर्मांतर करून घेण्याला तयार नसतील, त्या हिंदूंकडून स्वतःकरितां थडगीं उकरवून ठेवून नंतर बंडखोरांकडून त्यांचे खुन करण्यांत येतात ! अशा गोष्टी अजून चालू असतील, तर त्या खरोखरच फार भयंकर होत, यांत संशय नाहीं. आतां म. गांधींच्या खिलाफतीच्या आणि असहकारितेच्या चळवळीच्या विरुद्ध हा जो एक प्रकारचा पुरावा म्हणून पुढें आणण्यांत येत आहे, त्या दृष्टीनें या सगळ्या गोष्टी ठीक आहेत खऱ्या. पण टाइम्स ऑफ इंडियानें ही जी हिंदूंच्या देवाची, देवळाची, त्यांतील संपत्तीची व त्यांच्या धर्मांतील लोकांच्या खुनांची हकीकत दिली आहे, ती एखाद्या दोन धारेच्या शस्त्राप्रमाणें आहे ! ही जर एका बाजूला एका धारेनें महात्मा गांधींच्या चळवळीवर प्रहार करीत असली, तर ती दुसऱ्या बाजूला दुसऱ्या धारेनें दुसऱ्याही कोणावर तरी तितक्याच जोरानें प्रहार करीत आहे, हें टाइम्सनें विसरतां कामा नये. म. गांधींच्या चळवळी-वर हें एक अमोघ ब्रह्मास्त्र म्हणून फेंकण्यांत आलें आहे खरें; पण हें ब्रह्मास्त्र तितक्याच जोरानें उलटून तें फेंकणाराच्या मस्तकावर परत आदळणारें आहे, ही गोष्ट टाइम्सच्या लक्ष्यांत आलेली नसावी, असें दिसतें ! वेडगळ हिंदूंचीं मनें मुसलमानांच्या विरुद्ध चिथविण्याला ही टाइम्सची युक्ति वाईट आहे, असें नाहीं. पण तिचे दुसरे परिणाम मात्र टाइम्सच्या लक्ष्यांत आलेले नाहींत ! ते असेः—ही हकीकत वाचली म्हणजे स्वाभाविकपणेंच असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, हे बंडखोर मोपले हिंदूंची इतकी हानि करीत असतांना आपल्या साम्राज्य सरकारचे ते त्रिभुवनविजयी गोरे शिपाई काय करीत होते ! हिंदूंच्या मूर्ति फोडल्या जात असतां आणि त्यांचे खून पाडले जात असतां ते सरकारचे

अगदीं बरोबर होतें व त्याबद्दल सरकारला कोणी दोषही देऊं शकणार नाहीं. परंतु मोपले लोक बंड करीत आहेत, हें एकदां समजल्यानंतर व त्या बंडाच्या बंदोबस्ताकरितां लष्करी पलटणी तेथें येऊन दाखल झाल्यावर मग तरी निदान आतां इंग्लिश लोक मोपल्यांच्या हातून दुसरे नवीन दंगे होऊं देणार नाहींत, असें सर्व लोकांना खात्रीनें वाटत होतें. पण ह्या बाबतींत मलबारांतील लष्करी शौर्यानें लोकांची पूर्ण निराशा केली आहे, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे! मलबारांत एकदां इंग्रजांचें लष्कर गेलें आणि तेथें एकदां इंग्रजांचा लष्करी अंमल सुरू झाला, म्हणजे फक्त मोपल्यांना पकडावयाचें आणि कोर्ट सांगेल त्या शिक्षा त्यांना द्यावयाच्या, एवढेंच काय तें काम आतां शिल्लक राहिलेलें असलें पाहिजे, असें लोकांना वाटत होतें! व इंग्लिशांचें तें दिगंतविजयी लष्कर तेथें गेल्यानंतर त्या शिपायांच्या डोळ्यांदेखत मोपल्यांच्या हातून नवीन बंड उपस्थित करण्यांत येईल, नवीन टोळ्या जमविण्यांत येतील, नवीन पोलिसांचे खून करण्यांत येतील, किंवा निरपराधी रयतेचे नवीन छळ करण्यांत येतील, अशी कोणाचीही कल्पना नव्हती! पण मोपले लोकांच्या अगदीं ताज्या दंग्यांच्या सुद्धां ताज्या बातम्या अजून प्रसिद्ध होत आहेत! सगळ्या जगांत विजयी ठरलेले हे लष्करी लोक मलबारांत गेल्यावर मोपल्यांनीं असले हे नवीन दंगे करावयाला नको होते! विशेषतः पुण्याच्या सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे कित्येक लोक मद्रासच्या खुद्द गव्हर्नर साहेबांना भेटून मोपल्यांना त्यांच्या दुःखनिवारणासाठीं काय पाहिजे, काय नको, याच्याबद्दलची प्रत्यक्ष चौकशी करण्याकरितां गेल्यानंतर तरी निदान आतां नवीन दंग्यांचें कांहीं कारण उरलें नव्हतें! आपल्याला मलमाच्या पट्या किती पाहिजेत; आपल्या जखमेवर औषधें किती दिवस पुरतील इतकीं पाहिजेत, वगैरे आपलीं दुःखें काय काय आहेत, तीं सर्व या दुःखनिवारण कमिटीला सांगून मोपले लोकांनीं मोकळें व्हावयाचें! म्हणजे सरकारकडून किंवा स्वतः कमिटीकडून सर्व दुःखें निवारण करण्यांत आलीं असतीं, आणि मग कांहींही प्रातव्य उरलें नसतें! पण तें सगळें टाकून देऊन हे मोपले लोक अजून दररोज नवीन नवीन दंगेच करीत आहेत! कोठें तारा तोड, कोठें आगगाडीचे रूळ उपट, कोठें पोलिसांचे खून कर, कोठें लोकांना लूट, असले प्रकार अद्यापि त्यांनीं चालविले आहेत! म. गांधी आणि

त्यांच्या ताज्या जाहीरनाम्यावर सह्या करणारे बाकीचे त्यांचे सत्तेचाळीस अनुयायी यांच्याविरुद्ध अतिशय रागावून जाऊन म. गांधींच्या दुष्कृत्यांच्या दुष्परिणामांबद्दल लिहितांना गेल्या गुरुवारच्या अंकामध्यें टाइम्स ऑफ इंडियानेंही या मोपला लोकांच्या भयंकर कृत्यांची जी अगदीं ताजी, पण खरी, हकीकत दिली आहे, त्यांतील सारांश असा आहे कीं, या बंडखोर मोपल्यांनीं एक देखील हिंदूंचें देऊळ भ्रष्ट व भग्न करावयाचें ठेविलें नाहीं! त्या देवळांतील हिंदू देवांच्या मूर्ति फोडून बंडखोरांनीं तेथील सर्व संपत्ति लुटून नेली आहे ! जबरदस्तीचीं धर्मांतरें अद्यापिही चालूच आहेत ! आणि जे हिंदु लोक असें जबरदस्तीचें धर्मांतर करून घेण्याला तयार नसतील, त्या हिंदूंकडून स्वतःकरितां थडगीं उकरवून ठेवून नंतर बंडखोरांकडून त्यांचे खुन करण्यांत येतात ! अशा गोष्टी अजून चालू असतील, तर त्या खरोखरच फार भयंकर होत, यांत संशय नाहीं. आतां म. गांधींच्या खिलाफतीच्या आणि असहकारितेच्या चळवळीच्या विरुद्ध हा जो एक प्रकारचा पुरावा म्हणून पुढें आणण्यांत येत आहे, त्या दृष्टीनें या सगळ्या गोष्टी ठीक आहेत खऱ्या. पण टाइम्स ऑफ इंडियानें ही जी हिंदूंच्या देवाची, देवळाची, त्यांतील संपत्तीची व त्यांच्या धर्मातील लोकांच्या खुनांची हकीकत दिली आहे, ती एखाद्या दोन धारेच्या शस्त्राप्रमाणें आहे ! ही जर एका बाजूला एका धारेनें महात्मा गांधींच्या चळवळीवर प्रहार करीत असली, तर ती दुसऱ्या बाजूला दुसऱ्या धारेनें दुसऱ्याही कोणावर तरी तितक्याच जोरानें प्रहार करीत आहे, हें टाइम्सनें विसरतां कामा नये. म. गांधींच्या चळवळी॰वर हें एक अमोघ ब्रह्मास्त्र म्हणून फेंकण्यांत आलें आहे खरें; पण हें ब्रह्मास्त्र तितक्याच जोरानें उलटून तें फेंकणाराच्या मस्तकावर परत आदळणारें आहे, ही गोष्ट टाइम्सच्या लक्ष्यांत आलेली नसावी, असें दिसतें ! वेडगळ हिंदूंचीं मनें मुसलमानांच्या विरुद्ध चिथविण्याला ही टाइम्सची युक्ति वाईट आहे, असें नाहीं. पण तिचे दुसरे परिणाम मात्र टाइम्सच्या लक्ष्यांत आलेले नाहींत ! ते असेः—ही हकीकत वाचली म्हणजे स्वाभाविकपणेंच असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, हे बंडखोर मोपले हिंदूंची इतकी हानि करीत असतांना आपल्या साम्राज्य सरकारचे ते त्रिभुवनविजयी गोरे शिपाई काय करीत होते! हिंदूंच्या मूर्ति फोडल्या जात असतां आणि त्यांचे खून पाडले जात असतां ते सरकारचे

गोरे लष्करी अंमलदार कोठें होते? त्यांनीं या गोष्टी आपल्या देखरेखीनें आणि दहशतीनें अशक्य कां केल्या नाहींत? तुम्ही आपलीं शस्त्रें आमच्या हवालीं करून तुम्ही खुशाल निःशस्त्र व्हा, आम्ही तुमचें सर्व संकटांपासून निवारण करूं, असें आश्वासन देऊन आमचीं शस्त्रें काढून घेणारे हे गोरे लोक असेंच आमचें संरक्षण करणार काय? रयत लोक सरकारला कर देतात, तो कशासाठीं? त्या कराच्या पैशांतून पोसल्या जाणाऱ्या गोऱ्या शिपायांच्या लष्करी अमलाखालीं मलबारांत हिंदूंचे देव फोडले जावे, त्यांचीं देवळें लुटलीं जावीं, त्यांचा धर्म बाटविला जावा आणि त्यांचे खून पाडले जावे, म्हणूनच काय? ह्या गोष्टी खऱ्या असतील, तर त्या ह्या गोऱ्या शिपायांनीं बंद कां पाडल्या नाहींत? आणि हे असेंच आमचें संरक्षण करणार काय? इंग्लिश लोक नेहमीं मोठ्या प्रौढीनें म्हणत असतात कीं, आम्ही इंग्लिश लोक येथें हिंदुस्थानांत आहोंत, म्हणून अफगाण लोकांकडून तुमचा निभाव लागत आहे! पण मोपल्यांच्या उदाहरणावरून या यांच्या वल्गना देखील फुकट दिसत आहेत! यःकश्चित् थोड्याशा मोपला लोकांनीं एक लहानसें बंड केलें, तर तें यांच्याच्यानें अजून बंद होईना! व यांचे शिपाई तेथें असतांना त्यांच्या हजेरीमध्यें वरच्या सारख्या अनन्वित गोष्टी घडून येत आहेत! मग अफगाण लोक आले, तर पुढली गोष्ट लांबच आहे! पण यांच्यापाशीं इतकें सैन्य असून यांना मोपल्यांपासून हिंदूंचें संरक्षण करितां येत नाहीं, या गोष्टीपासून दोन अनुमानें निघतात; एक हे कमकुवत झालेले असले पाहिजेत, किंवा मुसलमानांच्या विरुद्ध हिंदूंचीं मनें हल्लींच्या काळीं चिथविण्याकरितां हिंदूंवर अशा प्रकारेच हे अत्याचार मुद्दाम करूं देण्यांत येत असले पाहिजेत! ही दुसरी कल्पना खरी असेल, तर याच्या मुळाशीं असलेले अधिकारी लोक आपल्या प्रजेच्या विरुद्ध एक प्रकारचा भयंकर प्रजाद्रोह करीत आहेत. पण या दोन कल्पनांपैकीं कोणतीही खरी असली, तरी ती सरकारच्या इभ्रतीला सारखीच वाईट आहे, यांत शंका नाहीं.

# मराठा वॉर मेमोरियल.

प्रिन्स ऑफ वेल्स हे मुंबईस तारीख १७ नोवेंबर रोजीं आल्यानंतर तेथून ते तारीख १९ रोजीं सकाळीं पुण्यास येणार आहेत; आणि येथें आल्यानंतर त्यांच्या हातून ज्या अनेक गोष्टी घडवून आणण्यांत देणार आहेत, त्यांपैकीं शनवारच्या वाड्यापुढें मराठा–वॉर–मेमोरियलच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ करविणें हें एक काम आहे. हा जो कार्यक्रम ठरलेला आहे, तो बरोबर रीतीनें पार पाडला जाईल; सकाळीं जी साडेदहा वाजण्याची वेळ या कृत्याकरितां ठरविण्यांत आली आहे, त्याप्रमाणें बरोबर अगदीं साडेदहा वाजतांच हा मराठा–वॉर–मेमोरियलच्या पायाचा दगड बसविण्यांत येईल; आणि पुणें शहरामध्यें युवराजांच्या सर्व स्वागतसमारंभांवर अत्यंत कडकडीत बहिष्कार घालण्याचें बहुजनसमाजानें जरी ठरविलें असलें, तरी कित्येक बावळट श्रीमंत लोक, कित्येक लब्धप्रतिष्ठित मूर्ख लोक, कित्येक नोकरीच्या पाशांत सांपडलेले गुलाम लोक, कित्येक खुशामती तट्टूंच्या दावणींत आपल्या माना नवीन अडकवून घेऊन पुढें सरसावूं पहाणारे देशद्रोही लोक, वगैरे अनेक जातींचे प्राणी तो स्मारकाचा समारंभ पहाण्याकरितांही जमतील; याबद्दल शंका नाहीं.

परंतु प्रश्न असा आहे कीं, हल्लीं हीं जीं नवीन नवीन स्मारकें हिंदुस्थानांत उभारण्यांत येत आहेत, यांचा अर्थ काय ? आणि हीं कशाला उभारण्यांत येत आहेत ? दरबारी लोकांना दरबारचीं आमंत्रणें आलीं, म्हणजे आपल्या गाडीच्या घोड्याला आणि आपल्या स्वतःला चांगल्या रीतीनें शृंगारून दरबारला जावयाचें, एवढेंच काय तें त्यांना समजतें. पण याच्यापेक्षां जास्त कांहीं तरी आपल्या देशांतील लोकांना समजावयाला नको

काय? स्मारकें हीं कशाकरितां केलीं जावींत, आणि स्मारकांची ही कल्पना मूळ कशाकरितां निघाली, हे प्रश्न खरोखर विचार करण्यासारखे आहेत. सृष्टीच्या नियमाप्रमाणें मनुष्याची स्मरणशक्ति अगदीं अल्प काळ टिकते. आणि ज्या चांगल्या गोष्टी असतात, त्याही विस्मरणाच्या पोटांत ताबडतोब गडप होऊन जातात. परंतु त्या मागलि चांगल्या गोष्टी विस्मृतीच्या काळोखामध्यें बुजून न जातां त्यांना स्मृतीच्या प्रकाशामध्यें आपल्या भावी कल्याणाकरितां आणि उत्तेजनाकरितां कायम टिकवावें, अशी ह्या विस्मरणशील मनुष्याची एक स्वाभाविक इच्छा असते. आणि या इच्छेमधूनच ही स्मारकांची कल्पना उत्पन्न झालेली आहे. या कल्पनेंतील हेतूप्रमाणें चांगल्या गोष्टींची स्मृति जागृत ठेवणें हें कल्याणकारक आहे, हें उघड आहे. परंतु असें असतांना जर कोणी वेडा आपल्या वाईट कृत्यांचींही स्मरणें आपल्या डोळ्यापुढें कायम टिकवूं लागला, तर त्याला काय म्हणावयाचें? आपले पूर्वज मोठे होते, शहाणे होते आणि पराक्रमी होते, अशीं त्यांच्या बद्दलचीं स्मरणें आपल्या डोळ्यापुढें असतील, तर तीं उदाहरणें पाहून आपणही त्यांच्यासारखे मोठे, शहाणे आणि पराक्रमी होऊं, असें कोणाला वाटलें, तर तें इष्ट आहे. पण आमचे पूर्वज क्षुद्र होते, वेडे होते, वाईट होते, असलीं चित्रें पहात बसण्यांत काय अर्थ आहे? असल्या हिडिस चित्रपटांच्या दर्शनापासून कोणत्या मनुष्याच्या मनावर कोणते सुपरिणाम व्हावयाचे आहेत? ही स्मारकांची सामान्य मीमांसा आपण आपल्या लक्षांत ठेविली असतां जुन्या गोष्टींचीं हल्लीं जीं नवीन स्मारकें होत आहेत, त्यांच्याकडे आपल्याला योग्य दृष्टीनें खात्रीनें पाहतां येईल.

हल्लींचें हें जें वर सांगितलेलें पुण्यांत शनवारच्या वाड्यासमोर नवीन व्हावयाचें मराठा वॉर मेमोरियल आहे, त्याचेंच आपण उदाहरण तूर्त घेऊं. हें मराठा वॉर मेमोरियलचें स्मारक म्हणजे काय आहे? आणि यांतील कल्पनांचें पृथक्करण करून आपण पाहूं लागलों, तर यांत आपल्याला काय दिसतें? गेल्या जर्मन महायुद्धामध्यें युरोप खंडांत आणि इतरत्र जे मराठे शिपाई कामास आले, त्यांच्या स्मरणाप्रीत्यर्थ हें मराठा वॉर मेमोरियलचें स्मारक आहे. या शूर मराठे शिपायांचें स्मारक हिंदुस्थानच्या भूमीवर उंच

उभें राहिलें, म्हणजे हिंदुस्थान या शिपायांना विचारील की, तुम्ही माझ्या-करितां काय केलें? तुम्ही युरोपांत गेलां असाल, ईस्टआफ्रिकेमध्यें लढलां असाल, आणि मेसोपोटेमियामधील निरुपद्रवी आणि निरपराधी लोकांना तुम्ही गुलामही केलें असेल; पण, अहो मराठे शिपायांनों, तुम्ही माझ्या-करितां--तुम्ही आपल्या स्वतःच्या हिंदुस्थानाकरितां--तुम्ही आपल्या स्वतःच्या जन्मभूमीकरितां--काय केलें आहे? आपल्या स्वतःची आणि आपल्या देशाची गुलामगिरी कायम ठेवून तुम्ही आणखी त्या मेसोपोटेमि-यामधल्या सारख्या दुसऱ्या गरीब बिचाऱ्या निरपराधी लोकांना नवीन गुलाम केलें, म्हणून तुमचीं स्मारकें माझ्या छातीवर उभारलीं जावीं? तुम्ही स्वतः गुलाम होऊन दुसऱ्यांना गुलाम केलें, याबद्दल तुमचीं स्मारकें? जे स्वतःला आणि दुसऱ्यांनाही स्वतंत्र करतात, त्यांचीं वास्तविकपणें स्मारकें केलीं जावींत; पण ते बिचारे कोठल्या कोनाकोपऱ्यांत जाऊन पडले आहेत, त्यांची कोणाला दादही नाहीं! आणि ज्यांनीं स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्याही पायांतील गुलामगिरीच्या बिडया आपल्या अधमपणानें घट्ट करून घेतल्या, त्यांचींच स्मारकें आकाशांत आपलीं डोकीं वर काढूं लागलीं आहेत! हें केवढें आश्चर्य आहे!

परंतु आपल्या राष्ट्राला असलीं स्मारकें आतां नको आहेत. आपल्या राष्ट्राचा दृष्टिकोण हल्लीं अगदीं बदलून गेलेला आहे. अज्ञानावस्थेंतील राष्ट्राच्या गळ्यांत कोणी एखाद्यानें गुलामगिरीची दोरी बांधली, तरीही ती दोरी नसून ती स्वतंत्रतेच्या सोन्याची सरी आहे, असें वेडगळपणानें राष्ट्राला वाटत असतें. पण ते दिवस आतां गेले आहेत. व आतां हिंदुस्थानाला व हिंदुस्थानांतील लोकांना पारतंत्र्याच्या कल्पना दिवसेंदिवस अगदीं असह्य होऊं लागलेल्या आहेत. इतके दिवस हिंदुस्थानच्या भूमीवर हिंदुस्थानच्या पैशानें कोणी कसलींही स्मारकें उभारलीं, तरी तीं चालत होतीं. पण आतां तसें चालणें शक्य नाहीं. या बाबतींत लाहोरचें उदाहरण अगदीं ताजें आहे. लॉर्ड लॉरेन्स यांचा पुतळा आणि त्याच्या खालील उपमर्दकारक लेख हे कांहीं वर्षांपूर्वी पचले. पण 'तुम्ही लेखणीच्या अंमलाखालीं मुकाट्यानें राह-ण्याला तयार आहां? किंवा तुम्हांला तरवारीचें चवदावें रत्न दाखविलें

पाहिजे ? ' असला शिलालेख जर कोणी सदोदित इंडियन लोकांच्यापुढें ठेवूं म्हणेल, तर तें चालावयाचें नाहीं. त्यापासून लोकांच्या मनाला चीड उत्पन्न होतें; व असलें वाक्य उच्चारणाऱ्या साहेबाचा पुतळा आपल्या नजरेसमोरून उचलून कोठें तरी बाजूला नेऊन टाकावा, असें इंडियन लोकांना वाटूं लागतें; हें लाहोरच्या लॉरेन्सच्या पुतळ्याच्या उदाहरणावरून स्पष्ट होत आहे. असला पुतळा उचलून बाजूला नेऊन ठेवावा, एवढा ठराव करूनच लाहोरची म्युनिसिपालिटी आज थांबली आहे. पण लोकांच्या हातांत जसजशी जास्त सत्ता येईल, तसतशी असल्या उपमर्दकारक स्मारकांची पुढें काय विल्हेवाट होईल, हें कोणी कोणाला सांगावयाला पाहिजे, असें नाहीं.

हल्लीं आपल्या देशांत जिकडे तिकडे जीं अनेक अर्वाचीन स्मारकें पसरलेलीं आहेत, तीं सारीं आपल्या उच्चाभिलाषी राष्ट्राचा आत्यंतिक तेजोभंग करणारीं स्मारकें आहेत. हा कोणाचा पुतळा ? तर ज्यानें फितुरी करून एका प्लासीच्या लढाईनें सगळें सुराजउद्दवल्याचें बंगालचें राज्य ताब्यांत घेतलें, त्या क्लाइव्ह साहेबाचा हा पुतळा ! हा कोणाचा पुतळा ? तर ज्यानें औधच्या बेगमांवर पैशाकरितां वाटेल तसे जुलुम केले, त्या वॉरन हेस्टिंग्सचा हा पुतळा ! असे एक ना दोन, मोठमोठ्या शहरांतील मैदानांवरून आणि बगीचांमधून किती तरी पुतळे पसरलेले आहेत ! आणि हे सारे पुतळे आणि हीं त्यांचीं सगळीं स्मारकें हिंदुस्थानाला काय सांगत असतात ? हीं स्मारकें हिंदुस्थानाला पदोपदीं असें स्मरण करून देतात कीं, हिंदुस्थाना तूं जिंकला गेलेला आहेस ! तूं गुलाम झालेला आहेस ! तुझें स्वातंत्र्य नष्ट झालेलें आहे ! आणि स्वतंत्र राष्ट्रांच्या सन्माननीय मालिकेंत हल्लीं तुला कोठेंही जागा नाहीं ! असलीं आपल्या गुलामगिरीचीं हीं चिन्हें ठिकठिकाणीं पाहून हिंदुस्थानांतील लोकांची कंबर खचते आणि त्यांचे हातपाय मोडतात. म्हणून असलीं हीं आपलें धैर्य खचविणारीं चित्रें इंडियन लोकांच्या डोळ्यांपुढें जितकीं कमी येतील तितकीं चांगलीं. एखादा मनुष्य एखाद्या बागेंत स्वतंत्रपणानें स्वैर संचार करीत असतो; आणि आकाशांतून स्वतंत्रपणानें वाहणाऱ्या स्वातंत्र्याच्या वाऱ्याचा तो मनमुराद उपभोग घेत असतो. अशा

वेळीं त्या बागेच्या एखाद्या कोपऱ्यांत एखादा वेलस्लीचा किंवा डलहौसीचा पुतळा त्याला दिसला, म्हणजे त्याचें सगळें मनोगत स्वातंत्र्य विरघळून जातें ! आणि तो गुलामगिरीच्या खोल खड्डयांत जाऊन पडतो ! असे ज्या स्मारकांचे लोकांच्या मनावर परिणाम होतात, तीं स्मारकें लोकांना काय करावयाचीं आहेत ? ज्या लोकांना आपलें स्वराज्य आणि स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे, त्यांच्या मनाला जेणेंकरून प्रोत्साहन मिळेल, असलेच देखावे नेहमीं त्यांच्या डोळ्यांसमोर असणें अवश्यक आहे. परंतु इंग्लिश इतिहासकार आणि इंग्लिश मुत्सद्दी ह्यांनीं हिंदुस्थानांतील लोकांच्या मनाला स्वदेशभक्तीचें प्रोत्साहन ज्यांच्या योगानें मिळेल, अशीं साधनें येथें फारच थोडीं ठेविलीं आहेत. व जित राष्ट्रांच्या बाबतींत त्यांची ही पद्धत अगदीं ठरलेलीच दिसते. इंग्लिशांनीं आयर्लंडमध्येंदेखील अशाच प्रकारचें धोरण ठेविलेलें होतें. आयरिश स्वतंत्रतेबद्दल एके वेळीं बोलतांना एक जुना आयरिश मुत्सद्दी, हेन्री ग्रॅटन, यानें आपल्या आयरिश देशबांधवांच्या स्थितीबद्दल असेच निराशेचे उद्गार काढिलेले आहेत. तो म्हणतो:—In this proceeding you had not the advantages, which were common to other great countries; no monuments, no trophies, or those outward and visible signs of greatness, such as inspire mankind and connect the ambition of the age which is coming on with the example of that going off, and forms the descent and concatenation of glory: no, you have not had any great act recorded, nor have you one public tomb to assemble the crowd, and speak to the living the language of intergrity and freedom. हेनरी ग्रॅटन आपल्या लोकांना म्हणतो कीं, ज्याच्या योगानें तुमच्या मनांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न होतील, अशीं कांहींही स्मारकें उभारण्यांत आलेलीं नाहींत, किंवा असें एक देखील थडगें आपल्याला उभारूं देण्यांत आलेलें नाहीं, कीं ज्याच्या भोंवती आपण आयरिश लोक जमूं आणि त्या थडग्यांतील मृतात्म्याच्या प्रेरणेनें आपण जिवंत लोक प्रामाणिकपणाच्या आणि स्वतंत्रपणाच्या गोष्टी एकमेकांपाशीं मोकळ्या मनानें बोलूं शकूं !

जी आयर्लंडची स्थिति होती, तीच हिंदुस्थानची स्थिति आहे. आमच्या इंडियन लोकांच्या मोठेपणाचीं सूचक अशीं स्मारकें कोठेंच नाहींत.

परंतु ही स्थिति आतां याउप्पर तरी जितकी कमी करितां येईल, तितकी कमी करणें अवश्य आहे. याच्यापुढें हिंदुस्थानाला मराठा वॉर मेमोरियल-सारखीं स्मारकें नको आहेत. हीं असलीं स्मारकें करून आतां इंडियांतील लोकांना काय शिकवावयाचें आहे ? एकांनीं दुसऱ्यांचे गळे कापावे आणि हिंदुस्थानांतील गुलाम लोकांनीं उठून मेसोपोटेमियामधील स्वतंत्र लोकांचे हातपाय गुलामगिरीच्या साखळदंडांनीं बांधून त्यांना तिसऱ्यांच्या ताब्यांत द्यावें, असले हे आत्मघातकीपणाचे धंदे आतां पुष्कळ झाले. याच्यापुढें हिंदुस्थानाला स्वराज्य कसें मिळेल याचा मार्ग चोखाळण्याच्या प्रयत्नालाच आपण सर्वांनीं मिळून लागलें पाहिजे. या मराठा वॉर मेमोरियलच्या संबंधानें मराठ्यांना असें वाटत असेल कीं, यांत आपली प्रौढि आहे; पण खरें पाहिलें, तर यांत त्यांची प्रौढि नसून त्यांच्या एकंदर राष्ट्राची त्यांत मानखंडनाच आहे. पण हें त्यांना समजलें नाहीं, तरी ' यद्यप्येते न पश्यंति लोभोपहतचेतसः । कथं न ज्ञेयमस्माभिः ' या गीतेंतील श्लोकांत म्हटल्या-प्रमाणें बाकीच्या लोकांनीं असल्या गोष्टींकडे डोळेझांक करणें केव्हांही इष्ट होणार नाहीं.

# इंग्लिश अधिकारी, नेटिव राजे आणि इंडियन रयत.

हिंदुस्थानांत हल्लीं अधिकारी आणि रयत लोक यांच्यामध्यें एक प्रकारची तेढ उत्पन्न झालेली आहे. रयतेपैकीं बहुतेक लोक आतां जागृत झालेले आहेत; व आपल्या अज्ञानाच्या रात्रींत आपल्या जवळची काय काय चीजवस्त लांबविली गेलेली आहे, याची त्यांना आतां पूर्ण माहिती झालेली आहे. व त्यामुळें आपल्या गेलेल्या सर्व जिनसा आपल्याला परत मिळाव्या, अशी नैसर्गिक इच्छा त्यांच्या मनांत प्रादुर्भूत होत आहे. त्यामुळें आमचे स्वराज्याचे हक्क आम्हांला तावडतोब मिळालेच पाहिजेत, अशी आज सर्व राष्ट्राची तिव्र आकांक्षा बनून राहिलेली आहे. व ती आकांक्षा जोंपर्यंत अधिकाऱ्यांकडून परिपूर्ण करण्यांत येणार नाहीं, तोंपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांशीं कोणीही कोणत्याही प्रकारचें सहकार्य करावयाचें नाहीं, असें लोकांनीं ठरविलें आहे.

देशांत हल्लीं हा जो लढा उत्पन्न झाला आहे, यांत मुख्य दोन पक्ष आहेत; एक अधिकाऱ्यांचा पक्ष आणि दुसरा लोकांचा पक्ष. हे दोन्ही पक्ष अगदीं स्पष्ट आहेत. आणि ते एकमेकांशीं—अगदीं उघड रीतीनें पण अतिशय कायदेशीर रीतीनेंही—शक्य तो सर्व विरोध करीत आहेत. परंतु या दोन पक्षांच्या दरम्यान चाललेल्या शांततेच्या आणि कायदेशीरपणाच्या या लढाईमध्यें अवांतर राहिलेले जे कांहीं इतर लोकांचे वर्ग आहेत, त्यांनीं कोणता पक्ष घ्यावा, हा एक मोठा अवघड प्रश्न आहे. अधिकारी आणि लोक या दोन वर्गांहून आणखी कांहीं ज्यास्त वर्ग देशामध्यें आहेत, हें खास. व त्यांपैकींच नेटिव राजांचा हा एक पक्ष आहे. आणि या तिसऱ्या पक्षानें प्रस्तुतच्या भांडणांत कोणत्या पक्षाला येऊन मिळावें, हा एक सर्वांनीं शांत-

पणें विचार करण्यासारखा प्रश्न आहे. ह्या प्रश्नाच्या चर्चेची अवश्यकता दिवसेंदिवस लोकपक्षाला जास्त जास्त भासूं लागली आहे. आणि म्हणून या बाबतींत लोकपक्ष आणि नेटिव राजांचा वर्ग यांच्या दरम्यान काय संबंध पूर्वीपासूनचा आहे, व याच्या पुढे असला पाहिजे, याच्याबद्दल कांहीं तरी दूर दृष्टीच्या धोरणावर कांहीं तरी निश्चित मतें समाजामध्यें ठरलेलीं असणें अत्यंत अवश्यक है, अशी वेळ प्राप्त झालेली आहे. व या कारणासाठीं या प्रश्नाच्या विवेचनाकडे आपण थोडेंसें लक्ष देऊं.

पूर्वी शंभर दीडशें वर्षांच्या आधीं आपल्या हिंदुस्थानांत इंग्लिश अधिकारी, नेटिव्ह राजे आणि इंडियन रयत, असे हे तीन पक्ष किंवा वर्ग मुळींच अस्तित्वांत नव्हते. इतर देशांतून राजे आणि रयत हे जसे फक्त दोनच वर्ग असतात, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतही पूर्वी सुदैवानें राजे आणि रयत हे दोनच वर्ग अस्तित्वांत होते. परंतु पुढें हिंदुस्थानांत इंग्लिश लोक येऊन त्यांनीं जेव्हां येथें हळू हळू आपले हातपाय पसरले, त्या वेळीं येथील स्थिति पालटूं लागली. प्लॅसीच्या लढाईपासून मुख्यत्वेंकरून सुरवात करून कोरेगांवच्या लढाईपर्यंत इंग्लिशांनीं येथील बराचसा प्रांत काबीज करून आपलें एक बरेंच मोठें असें राज्य प्रस्थापित केलें. अशा रीतीनें एखाद्या महासागरांतून एखादें लहानसें नवीन बेट हळूहळू आपलें डोकें वर काढून मधेंच एखादें मोठें खंड बनूं लागतें, त्याप्रमाणें हें नवीन राज्य जेव्हां येथें डोकावूं लागलें, तेव्हां येथें हा तिसरा पक्ष उद्गम पावूं लागला. या तिसऱ्या पक्षांतील नवीन अधिकारी राजे हे परकीय देशांतून आलेले असल्यामुळें आपण परकीय राजे म्हणून त्यांनीं येथील राजांना नेटिव राजे, म्हणजे स्थानिक राजे, असें म्हणण्याचा परिपाठ सुरू केला. आणि अशा रीतीनें परकीय राजे, नेटिव राजे आणि रयत लोक, असे तीन पक्ष येथें उद्भूत झाले. वास्तविक असे हे तीन पक्ष अगदीं अस्वाभाविक होत. राजा आणि रयत हे दोन पक्षच राजकारणांतील खरे पक्ष होत. तेव्हां ही गोष्ट लक्षांत आणून इंग्लिशांनीं नेटिव्ह राजांचा अजागलस्तनवत् निरुपयोगी आणि निष्कारण असा हा मधला पक्ष काढून टाकण्याबद्दल पहिल्यापहिल्यानें यथाशक्ति पुष्कळ खटपट केली. तरीही कांहीं बरेचसे नेटिव्ह राजे शिल्लक राहिलेच. आधीं एकाकडून दुसऱ्याला जिंकावें, मग त्या दुसऱ्याकडून तिस-

त्याला जिंकावें, असे सर्व मानवी उपाय उपयोगांत आणून बिचाऱ्यांनीं अगदीं शिकस्त करून पाहिली. परंतु तें कांहीं जमलें नाहीं. एक परकीय राजे, एक नेटिव्ह राजे आणि एक रयत लोक, असले हे अस्वाभाविक तीन तीन पक्ष देशांत ठेवण्यापेक्षां हीं नेटिव्ह राजांचीं मधलीं कांटेरी झाडें काढून टाकून जमीन साफ करण्याकरितां पुष्कळ खटपट करण्यांत आली. परंतु त्यांत यावें तितकें यश आलें नाहीं. तरी पण लॉर्ड डलहौसी यांनीं आपल्या प्रयत्नांची एकदां अखेरची शिकस्त केली. आणि त्यांत परमेश्वरानें त्यांना कल्पनातीत यश दिलें! तरी पणत्या महापुरांतून-सुद्धां कांहीं लव्हाळे वांचलेच. तेव्हां आतां ही चिवट जात समूळ उपटून टाकली जाणें शक्य नसल्यामुळें आपल्या मोठ्या झाडाच्या छायेखालीं कृपाळूपणाच्या आणि परोपकारबुद्धीच्या ढोंगानें आश्रयासाठीं म्हणून हीं लहान झाडें घेऊन त्यांची वाढ मोठ्या खुबीनें खुंटाविण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें! आतां आम्ही सर्वांना दत्तकाची परवानगी देऊं आणि कोणतींही संस्थानें खालसा करणार नाहीं, असे जाहीरनामे निघाले! आणि तेव्हांपासून परकीय अधिकारी, नेटिव राजे आणि रयत लोक, असे हे तीन पक्ष हिंदुस्थानांत फिरून दृढमूल झाले.

ह्या तीन पक्षांपैकीं अधिकारी आणि रयत, यांच्यांत हल्लीं जो लढा पडलेला आहे, त्यांत नेटिव राजांच्या ह्या मधल्या तिसऱ्या पक्षानें कोणत्या पक्षाला मिळावें, या गोष्टीचा निर्णय वर दिलेल्या पूर्वीच्या इतिहासाच्या अनुरोधानें करणें जरूर आहे. या नेटिव राजांनीं कोणत्या पक्षाला मिळावें? हिंदुस्थानांतील रयत लोक ज्या देशांतील आणि ज्या धर्मांतील आहेत, त्याच देशांतील आणि त्याच धर्मांतील हे नेटिव राजेही आहेत. यांचा व आमचा हजारों वर्षांचा संबंध जुळलेला आहे. यांचे पूर्वज हे आमच्या पूर्वजांवर राज्यें करीत होते आणि आमचे पूर्वज यांचीं तीं राज्यें स्थापन करण्याकरितां यांच्यासाठीं अनेक लढायांतून लढलेले आहेत. आम्हां हिंदुस्थानांतील हल्लींच्या रयत लोकांच्या पूर्वजांनीं यांच्याकरितां आपल्या स्वतःच्या अंगांतील रक्त सांडलें आहे आणि आपलीं स्वतःचीं मुलेंबाळें यांच्या लढायांच्या कार्याकरितां बळी दिलेलीं आहेत! असा यांचा आणि आमचा निसर्गनिर्मित पूर्वापार संबंध चाललेला असतां यांनीं आम्हां लो-

कांचा पक्ष सोडून द्यावा, आणि उलट लोकपक्षाच्या हिताला अपाय करण्याला उद्युक्त व्हावें, हें यांच्या जातिवंत कुळांना आणि शीलांना शोभतें काय? बरें, अशा रीतीनें लोकपक्षाची पायमल्ली करून हे नेटिव राजे हल्लीं ज्या पक्षाला मदत करीत आहेत, तो पक्ष तरी कोणता? ज्या पक्षानें पूर्वी यांचीं राज्यें बुडविण्याकरितां शक्य तितके प्रयत्न केले, व ज्या पक्षानें यांच्या बरोबरीच्या दुसऱ्या संस्थानिकांचीं अनेक राज्यें बुडवून त्यांवर हल्लीं आपला तळीराम गार करून घेतला आहे, अशा त्या अधिकारी लोकांच्या पक्षाकडे हे जाऊन मिळत आहेत! इतकी यांची स्मृति नष्ट कशी होते? आणि इतकें यांचें ह्या अधिकारी वर्गावर प्रेम तरी कोठून उसळलें आहे? ज्या अन्योन्य स्नेहसंबंधांचें हल्लीं एवढें स्तोम माजविण्यांत येत आहे, ते यांचे स्नेहसंबंध जडले तरी केव्हां? या दोन्ही पक्षांचीं मागचीं सारीं आयुष्यें एकमेकांशीं लढण्यांत तर गेलीं! आणि हे एकमेकांचे इतके जीवश्च कंठश्च स्नेही झाले तरी केव्हां? किंवा हा सगळा वरकरणी देखावा आहे? असें असेल, तर हा पाण्याचा बुडबुडा केव्हां तरी फुटल्यावांचून खास राहणार नाहीं. जे हे शिंदे, होळकर, वगैरे राजे अधिकाऱ्यांच्या गळ्यांत गळे घालण्याचा आज आविर्भाव आणीत आहेत, तेच शंभर वर्षांपूर्वीं काय करीत होते, हें जाणण्यारितां जर आपण इतिहासाकडे पाहिलें, तर हे ह्या दोन्हीही पक्षांतील लोक एकमेकांचे गळे आपल्याला कसे कापतां येतील आणि दुसऱ्यांचीं राज्यें हरण करण्याकरितां आपल्याला त्यांच्यावर फितुरीनें जय कसा मिळवितां येईल, याचा विचार करण्यांत गुंतलेले होते, असेंच दिसून येतें! आणि तेच हे पूर्वींचे अहिनकुल हल्लीं एकमेकांच्या जिवाचे कालिजे म्हणून जगापुढें मिरवत आहेत!

असा ह्या नेटिव राजांचा हा पूर्वेतिहास असल्यामुळें सयुक्तिकपणानें आणि प्रामाणिकपणानें यांना अधिकारी वर्गाच्या पक्षाकडे खऱ्या अंतःकरणानें केव्हांही जाणें शक्यच नाहीं. मग अशा स्थितींत यांनीं लोकपक्षाल मदत करणें हेंच अवशिष्ट राहतें. हल्लीं लोक पक्ष आणि अधिकारी पक्ष यांच्यांत जसा स्वराज्याचा लढा पडलेला आहे, तसा लढा पूर्वीं युरोपियन लोक आणि नेटिव राजे यांच्यामध्येंही चालू होता. त्या वेळीं इंग्लिश सेनापीत आणि मराठा कॉन्फिडरसीमधील राजे किंवा सुराजउद्दवला, हैदर,

टिपू, निजाम, रणजितसिंग, वगैरे मंडळी यांच्या दरम्यान चाललेल्या लढायांतून हिंदुस्थानांतील रयत लोकांनीं जर इंग्लिशांच्या नोकरीला कोणीही बिलकुल न राहतां सर्व लोकांनीं मिळून आपल्याच राजांना इमानें इतबारें पूर्ण मदत केली असती, तर आपल्या त्या वेळच्या राजांना खात्रीनें यश मिळालें असतें. परंतु लोकांच्या अज्ञानानें व देशाच्या दुर्दैवानें तो प्रसंग चुकला. परंतु आतां लोक सज्ञान झाले आहेत; त्या वेळच्या चुका लोकांना आतां समजूं लागल्या आहेत; आणि त्या वेळच्या आपल्या त्या देशद्रोहाच्या पातकांबद्दल लोकांना हल्लीं अतिशय पश्चात्तापही वाटूं लागला आहे. अशा रीतीनें लोकांचे चांगले डोळे उघडून ते हल्लीं स्वराज्याच्या प्राप्तीसाठीं प्रयत्न करूं लागले आहेत. पूर्वीं शिंदे, होळकर, गायकवाड, निजाम, हैदर, रणजितसिंग, वगैरे लोक जें कार्य करीत होते, परंतु जें कार्य त्यांच्या हातून दुर्दैवानें अपुरें ठेविलें, तेंच त्या शिंदे, होळकर, गायकवाड, निजाम, हैदर, रणाजितसिंग, इत्यादि अनेक देशभक्तांचें पवित्र कार्य हल्लींच्या लोकपक्षांतील पुढाऱ्यांनीं हातांत घेऊन शांततेच्या मार्गानें जोरानें पुढें चालविलें आहे. पूर्वीं, राजांनों, तुम्ही जेव्हां खटपट करीत होतां, त्या वेळीं लोकपक्ष निद्रिस्थ होता; म्हणून कार्यभंग झाला तोच लोकपक्ष आतां जागृत होऊन तुमचें अर्धवट राहिलेलें पवित्र कार्य शेवटास नेण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा वेळीं तुम्ही त्यांच्या वाटेंत आडवे आलां, तर हें देशाचें एक दुर्भाग्यच समजलें पाहिजे! लोकपक्ष आणि नेटिव्ह राजांचा पक्ष हे आपल्यांतील दोन पक्ष एकत्र झाले, तरच आपल्या संयुक्त पक्षामध्यें कांहीं सामर्थ्य उत्पन्न होईल. पण आपण एकमेकांना विरोध करूं लागलों, तर आपला प्रत्येकाचा एकेकटा पडलेला पक्ष हा नष्ट किंवा निर्बळ होण्याला मुळींच उशीर लागणार नाहीं. पूर्वींचे शिंदे, होळकर, आणि हल्लींचे गांधी किंवा टिळक, हे कांहीं भिन्न नाहींत. त्यांचे जे हेतु होते, तेच यांचेही हेतु आहेत. फक्त मार्ग मात्र भिन्न आहेत. पूर्वीं शस्त्रांनीं आणि लढायांनीं जें झालें नाहीं, तें युक्तीनें, शांततेनें आणि असहकारितेनें घडवून आणावें, असा हल्लीं राष्ट्राचा मनोदय आहे. स्वराज्याच्या हक्कांची प्राप्ति हाच पूर्वींच्या राजांचा मनोदय होता. आणि तोच हल्लींच्या लोकांचाही मनोदय आहे. त्या आपल्या पूर्वजांच्या पूर्वींच्या मनोदयाच्या विरुद्ध हल्लींच्या

त्यांच्या वंशांतील कोणी राजांनीं जावें, हें केव्हां तरी उचित होईल काय? आमचे इंडियन राजे हे आमचे आहेत; आणि आम्ही त्यांचे आहोंत. त्यांच्या आणि आमच्यामध्यें आम्ही कोणाही परकीय लोकांना याउप्पर केव्हांही यत्किंचित् सुद्धां फाटाफूट पाडूं देणारनाहीं.

---

# चाफळचे स्वामी!

शनवारच्या वाड्यापुढील समारंभामध्यें हिंदूंनीं एक विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. मराठा वॉर मेमोरियल उघडण्याचा कार्यक्रम असा आहे कीं,-पहिल्यानें या स्मारकाचा हेतु सांगण्यांत येईल; आणि नंतर त्या स्मारकाच्या दगडावर जो लेख खोदावयाचा आहे, तो वाचून दाखविण्यांत येईल; आणि नंतर त्याचें मराठी भाषांतर करून सांगण्यांत येईल. मग मुंबईचे गव्हर्नर साहेब त्या स्मारकाच्या पायाचा दगड बसविण्याविषयीं युवराजांना विनंति करतील. व या वेळीं चाफळचे स्वामी मधेंच संस्कृतमध्यें आशीर्वाद देतील! आणि मग युवराज तो पायाचा दगड बसवितील. मराठा वॉर मेमोरियलचे हेतुपूर्वक बसविले जाणारे वरचे दगड आणि त्या मेमोरियलच्या पायाचा खालचा दगड यांच्या दरम्यान आमचे बिचारे चाफळचे स्वामी महाराज कोठें दडपून दिले जातील, ही कोणाला कल्पनाही नव्हती! पण या वरच्या व खालच्या दगडांच्या दरम्यान आपले चाफळचे स्वामी आणि त्यांचे संस्कृत आशीर्वाद अचूक रीतीनें आणि अचानकपणानें आलेले पाहून आपल्यांतील जुन्या संस्थानिकांच्या धूर्त मुत्सद्दीपणाबद्दल कोणालाही आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं! चाफळचे स्वामी हे संस्कृतांतील आशीर्वाद कोणाच्या डोक्यावर वाहणार आहेत, हें कांहीं त्या कार्यक्रमांत स्पष्ट नाहीं. ते युवराजांना हे संस्कृत आशीर्वाद देणार आहेत, किंवा लढाईंत मेलेल्या मराठे शिपायांच्या आत्म्यांकडे ते

आपले हे आशीर्वाद पाठविणार आहेत, किंवा त्या वॉर मेमोरियलचे जे दगड बसविले जाणार आहेत, त्यांच्यावर श्री स्वामी महाराज हे आपले आशीर्वाद फुकट दवडणार आहेत, याच्याबद्दल कार्यक्रमांत कांहींच उल्लेख नाहीं. परंतु एकंदरीनें पहातां या नाटकाच्या कार्यक्रमांतील चाफळच्या स्वामींनीं आपल्याकडे घेतलेलें काम लोकपक्षाच्या दृष्टीनें अत्यंत अनौचित्यानें भरलेलें आहे, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं. चाफळचे स्वामी हे त्या पूर्वींच्या रामदास स्वामींचे हल्लींचे वंशज होत. त्या स्वामींची कृति कोणीकडे आणि हल्लींच्या या स्वामींची ही कृति कोणीकडे ! यांची परस्पर तुलना केली, म्हणजे ह्यांच्या ह्या कृत्यांत अनौचित्य कसें आणि किती ओतप्रोत भरलेलें आहे, हें त्यांच्या स्वतःच्या व इतरांच्याही लक्ष्यांत येईल. रामदास स्वामींच्या चरित्रामध्यें जर कांहीं एखादा विशेष अद्वितीय गुण असेल, तर तो हा होय कीं, त्यांना गुलामगिरीची अतिशय चीड होती ! आणि म्हणूनच आपल्या देशांतील लोकांनीं स्वतंत्र आणि स्वराज्यसंपन्न झालें पाहिजे, असा त्यांचा उद्देश आणि उद्योग होता. तसेच ते अतिशय निःस्पृहीही होते. त्यांनीं कधीं कोणापुढें गोंडा घोळला नाहीं, त्यांनीं कधीं कोणापुढें लाळ घोटली नाहीं, किंवा त्यांनीं कधीं स्वाभिमान विसरून कोणापुढें लांगूलचालनही केलें नाहीं. असलें तें उदात्त चरित्र कोणीकडे आणि हल्लींची ही अधःपतनाची दुर्दशा कोणीकडे ! अशा प्रसंगीं अशी एक सबब नेहमीं पुढें करण्यांत येते कीं, काय करावें ? आम्हांला आमचीं हीं संस्थानें राखलीं पाहिजेत ना ? आणि म्हणून आम्हांला प्रसंगीं अनुचित आणि अनन्वित अशाही गोष्टी निरुपायास्तव कराव्या लागतात! पण हें म्हणणें खोटें व भ्रममूलक आहे. पहिले चाफळचे स्वामी, श्रीसमर्थ रामदास, यांची वृत्ति पाहिली, तर ती अशी नव्हती. ज्यांनीं संसारावर लाथ मारून कमरेला लंगोटी घातली, त्यांनीं ती अनुचित कर्में करण्यासाठीं केव्हांही घातली नाहीं. राज्यें आणि संस्थानें हीं आत्मतेजानें मिळत असतात, आणि राखलीं जात असतात; आणि आत्मतेजाच्या भंगानें तीं कधींही राखिलीं जाणें शक्य नाहीं; हें तत्त्व कमकुवत मनाला क्वचित्‌च कळण्यासारखें असतें. शिवाजी महाराजांनीं आपलें सगळें राज्य रामदासांच्या झोळींत घातलें असतां तें त्यांनीं लोभी वृत्तीनें आपल्या जवळ ठेवून घेतलें नाहीं, किंवा त्याला एखादा संस्कृत आशीर्वादही दिला

नाहीं ! तर उलट त्याचें राज्य त्यांनीं त्याला ताबडतोब परत दिलें. अशी ज्या घराण्याची पूर्वपरंपरा त्या घराण्यांतील लोकांची हल्लींची ही विपर्यस्त मनोवृत्ति पाहून कोणाच्याही डोळयांतून टिपें आल्यावांचून राहणार नाहींत! द्वारका मठाचे स्वामी श्रीशंकराचार्य हे कराचीस निर्भयपणानें आरोपीच्या पिंजऱ्यांतून आपल्या धर्माच्या हक्कांचें प्रतिपादन करीत असतां चाफळच्या स्वामींनीं युवराजांच्या समारंभाकरितां संस्कृत आशर्विाद घोकीत बसावें, ही श्रीसमर्थ रामदास यांच्यासारख्या स्वातंत्र्यप्रिय साधूंच्या नांवाला खरोखर कालिमा आहे ! उत्तर हिंदुस्थानांतील अनेक साधु दिल्ली, लाहोर, हृषीकेश, वगैरे ठिकाणीं जमून आपण सत्याग्रह कसा करावा याच्याबद्दल वाटाघाट करीत असतां महाराष्ट्रांतील सत्पुरुषांच्या कडकडीतपणाचे आद्य प्रवर्तक श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या घराण्यांतील एका स्वामींनीं युवराजांच्या स्वागताच्या वेळीं मला वेडेवांकडे दोन शब्द बोलण्याची कशी संधि मिळेल, याच्याबद्दल एखाद्या पोलिटिकल एजंटच्या मार्फत याचना करून यश संपादावें, हा कालमहिमा मोठा विलक्षण आहे ! श्रीसमर्थांच्या दासबोधांतील स्वातंत्र्याच्या शिकवणीला अनुसरून महाराष्ट्रांतीलच नव्हे, तर साऱ्या हिंदुस्थानांतील, लोक युवराजांच्या स्वागतावर पूर्ण बहिष्कार घालण्याकरितां सिद्ध झाले असतां त्यांचा पुढाकार घेण्याचें टाकून चाफळच्या स्वामींनीं तोंडपुजे लोकांमधील पुढारीपणाचा मान पटकावण्याविषयीं आपली जी तयारी दाखविली आहे, ती कोणत्याही बाजूनें पाहतां अतिशय अनुचित आहे ते मराठा जातीचे असते, आणि मग त्यांनीं ब्राह्मणांच्या विरुद्ध भाग घेतला असता, तर मग तें त्यांना कांहीं तरी शोभलें असतें ! पण ब्राह्मण होऊन रामदासांच्या वंशांतील लोकांना इतकें राजकारण समजूं नये, हें अगदीं अक्षम्य आहे ! सज्जनगडावर गुदस्त सालीं कित्येक सत्यशोधकांकडून अगर इतर कोणाकडून जे कांहीं अत्याचार झाले होते, त्या वेळीं चाफळच्या स्वामींबद्दल लोकांच्या मनांत उत्पन्न झालेली सहानुभूति हल्लींच्या या कृत्यानें कायम टिकणें केव्हांही शक्य नाहीं. ज्या मराठा वॉर मेमोरियलच्या प्रसंगीं तुम्ही संस्कृत आशीर्वाद देण्याला पुढें सरसावत आहांत, त्या स्मारकांतील मराठ्यांपैकीं किती मराठे आज तुमच्या संस्कृत श्लोकांना आणि धार्मिक आशीर्वादांना विचारीत आहेत ? आमच्या येथें उपाध्येपणाचीं कामें कर-

ण्याकरितां ब्राह्मण यावयाला नकोत, असें कित्येक मराठे स्पष्टपणें म्हणत असतां आणि त्या म्हणण्याची थोडीशी चुणूक पर्यायानें गुदस्त सालीं सज्जनगडावर कित्येक सज्जनांकडून दाखविण्यांत आली असतांही त्या मराठा मेमोरियलमध्यें युवराजांच्या स्वागताच्या प्रसंगीं आमचे चाफळचे स्वामी आपली शालजोडी घेऊन लुडबुडण्याला जातच आहेत, हें पाहून असल्या लोकांबद्दल कोणालाही खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. असल्या स्वामींवर सर्व हिंदु लोकांनीं बहिष्कार घातला, तर तें त्यांचें करणें अयोग्य होईल काय ? रामदासी पंथाच्या बाण्याला अत्यंत अयोग्य आणि अनुचित अशी ही गोष्ट चाफळच्या स्वामींकडून जी होत आहे, त्या गोष्टीबद्दल ठिक-ठिकाणच्या रामदासी मठांतून आणि रामदासी पंथाच्या लोकांकडून निषेध व्यक्त केला जाणें अत्यंत अवश्यक आहे. एरव्हीं आपल्यांतील असले हे दुधखुळेपणाचे प्रकार कधींही बंद व्हावयाचे नाहींत. हे स्वामी आशीर्वाद कसले देतात ! यांच्या हिंदुधर्मांतील तत्त्वांवर कोणत्या खिश्चन मनुष्याचा विश्वास आहे ! सारांश, असल्या स्वदेशहितविघातक गोष्टींना हल्लींच्या काळीं प्रोत्साहन न मिळतां त्यांचें निर्मूलनच झालें पाहिजे. खुद्द पुण्यामध्येंही कालच्या जाहीर सभेंत ह. भ. प. मुरुडकरबुवा, मोरशास्त्री, वगैरे मंडळींनीं पुढें आणिलेला या कृत्याच्या निषेधाचा ठराव पास करण्यांत आला आहे.

---

# संस्कृत आशीर्वाद.

पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें मराठा वॉर मेमोरियलच्या स्मारकाचा दगड बसविण्याच्यापूर्वी अगदीं ऐन वेळेवर शिवाजी महाराजांचे गुरु श्री-रामदास स्वामी यांच्या गादीवरील चाफळच्या स्वामींनीं युवराजांना संस्कृ-तांत आशीर्वाद दिला ! तो आशीर्वाद येणेंप्रमाणें होता, असें म्हणतातः—
" लक्ष्मीस्ते सदने सदा विहरतां चित्ते च चिंतामणिः ॥ स्वर्धेनुस्तव गोकुले सुरतरुश्चारामभूमौ तव ॥ वाणी ते वदने दया नयनयोर्दानं करे चान्वहं ॥

विष्णुश्चेतसि ते मतिश्च वसतां कीर्तिश्च लोकत्रये ॥ " असले हे जुन्या काळच्या धर्तीवरचे आशीर्वादाचे श्लोक हल्लींच्या काळच्या सुधारलेल्या युवराजांसारख्या पाश्चात्य लोकांच्या दृष्टीनें किती उपहासास्पद असतात, याची जुन्या चालीच्या बिचाऱ्या चाफळच्या स्वामींना कोठून कल्पना असणार! ह्या संस्कृत आशीर्वादाचा युवराजांना कदाचित् अर्थ कळणार नाहीं, म्हणून एका पत्रकांत मराठींत त्याचा साग्र अर्थही दिलेला आहे, असें म्हणतात! त्यांतील 'स्वर्धेनुस्तव गोकुले' याचा दिलेला अर्थ तर फारच मजेदार आहे। "आपल्या गोकुळ म्हणजे डेअरींत कामधेनूंची समृद्धि असो!" गोकुळ म्हणजे काय पदार्थ, हें युवराजांना समजण्याकरितां म्हणून मुद्दाम 'डेअरी' हा इंग्रजी शब्द घालण्यांत आलेला असला पाहिजे, असें दिसतें! बरें, एका कामधेनूपासूनही जर सर्व कांहीं प्राप्त होऊं शकतें, तर मग त्या कामधेनूंची समृद्धि कशाला पाहिजे? व शिवाय ही स्वर्गांतील देवांची कामधेनु युवराजांच्या डेअरींत नेऊन बांधण्याचा अधिकार चाफळच्या महाराजांना कधीं आला? गोठणच्या गाई आणि माभळभट दान देई, अशांतलाच हा प्रकार होत नाहीं काय? किंवा देवांनीं लक्ष्मी, चिंतामणि, कामधेनु, कल्पवृक्ष, वगैरे आपलीं समुद्रांतून काढलेलीं रत्नें अलीकडे चाफळच्या स्वामींच्याच ताब्यांत दिलेलीं आहेत कीं काय? आणि असें असेल, तर त्यांनीं हीं सारीं रत्नें युवराजांनाच कां देऊन टाकावींत? एखादी कामधेनु किंवा एखादा कल्पवृक्ष त्यांनीं आपल्या बिचाऱ्या हिंदुस्थान देशाकरितां जर ठेविला असता, तर नसतें का चाललें? पण युवराजांच्या पुढें उजव्या हातांनीं आणि डाव्या हातांनीं वेडे आणि वांकडे कसे तरी मुजरे करण्याच्या गर्दींत गुंतलेल्या लोकांपैकीं हिंदुस्थानची आठवण करण्याला सवड आहे कोणाला? निदान चाफळच्या उत्सवांत लागणाऱ्या ताकाच्या पाण्याकरितां तरी एखादी कामधेनु ठेवावयाची होती! "वाणी ते वदने" याचा अर्थ काय? युवराज कांहीं मुके नाहींत! तुमच्या तोंडाला वाणी फुटूं द्या, असें एखाद्या मुक्याला म्हटलें, तर तें शोभेल! आणि 'विष्णुश्चेतसि ते' या वाक्यांतील विष्णु युवराजांच्या चित्तांत कसा शिरणार? खिस्ती लोकांचा निराकार आणि निष्पाणिपाद असा जो देव, त्याला देखील अलीकडे कित्येक सभ्य खिस्ती लोकांच्या मनांत जागा मिळण्याला मारामार पडूं लागली आहे. मग हा

चार हातवाला आणि चार हातांत शंख, चक्र, गदा, पद्म, इत्यादिक लटांबर धारण करणारा विष्णु त्यांच्या मनांत शिरणार कसा ? व त्या बिचाऱ्याला तेथें बिऱ्हाडाला जागा तरी मिळणार कशी ? त्या असल्या अरुंद अंधारकोठडीमध्यें विष्णूला कोंडून टाकण्या इतकी विष्णूच्या हातून काय चूक झाली आहे ? भगवान् महाविष्णूला अशा रीतीनें दुसऱ्यांच्या अंतःकरणावर झुगारून देण्यापेक्षां चाफळच्या स्वामींनीं त्याला आपल्या स्वतःच्या हृदयांतच कोठें तरी थोडीशी जागा दिली असती, तर त्यानें त्यांच्या ह्या पारतंत्र्यप्रवण झालेल्या दुबळ्या हृदयांत स्वातंत्र्यप्रियतेची केवढी ऊर्मि उत्पन्न करून दिली असती ! परंतु पूर्व आणि अपूर्व अशा पुण्याईवांचून इतकी सद्‌बुद्धि कोठून सुचणार ? फर्स्ट क्लास सरदारकीचा हुद्दा आणि जहागिरीचे कांहीं भिकार गांव हे आपल्यापाशीं टिकावे म्हणून विष्णुसकट समुद्रमंथनांतील चवदाही रत्नें दुसऱ्यांच्या अंगावर फेकून देणाऱ्या लोकांना पाहिलें, म्हणजे गारगोट्यांना आपल्या पदरांत जागा करण्यासाठीं त्या पदरांतील परिसाचे तुकडे फेकून देणाऱ्या शहाण्या माणसांची कोणालाही आठवण झाल्यावांचून रहणार नाहीं !

---

# एका पहारेकऱ्याची गोष्ट.

---

एका मोठ्या शहरांत एके ठिकाणीं एक कोणाचें तरी स्मारक होतें. तें ज्यांचें होतें, त्यांच्याबद्दल लोकांच्या मनांत फारशी पूज्यबुद्धि नव्हती. कारण त्यांच्या हातून लोकपक्षावर खरा परोपकार असा कांहीं झालेलाच नव्हता. म्हणून अर्थातच लोक त्या स्मारकाच्याकडे पूज्यतेच्या ऐवजीं तुच्छतेच्या भावनेनेंच पहात असत. पण याच्या पलीकडे लोकांच्या मनांत जास्त कांहीं होतें, असें नाहीं. तरी पण ज्याचें पाप त्याला चैन पडूं देत नाहीं, या न्यायानें पहातां लोक या स्मारकाला कांहीं अपाय करतील कीं काय, अशी तें स्मारक करणारांना रात्रंदिवस भीति वाटत असे. ही भीति जरी अगदीं निराधार होती, तरीही त्या भीतीमुळें नष्टप्राय झालेल्या

विचारशक्तीनें त्या स्मारकाच्या सभोवतीं नेहमीं पहारेवाले बसविलेले होते ! ज्या स्मारकाच्या स्मरणाची लोकांना अवश्यकता नाहीं, त्या स्मारकाचें बंदुकींच्या आणि तरवारींच्या पहाऱ्यांखालीं संरक्षण करणें हा केवढा जुलुम होय ! कोणतेंही स्मारक हें प्रेमानें स्मरण करण्यासाठीं असतें. जुलुमानें आणि जबरदस्तीनें ज्याचें स्मरण लोकांच्या विसरलेल्या स्मृतीवर लादलें जातें, त्याला स्मारक हें नांव शोभत नाहीं ! तरी पण अशा एका स्मारकाच्या सभोवतीं कित्येक पहारेकरी हुकूमाप्रमाणें पहारा करण्याकरितां दिवसा आणि रात्रीं येऊन बसत असत. त्या स्मारकाच्या भोवती कोणी तरी रिकामटेकडे लोक नेहमीं जमत असत; आणि त्याच्यावरील लेख वाचून दांत ओठ खात असत, त्वेषानें हातपाय आपटीत असत, आणि अतिशय तिरस्कारानें त्याच्याकडे पाठ वळवून त्या बिचाऱ्या पहारेकऱ्यांच्या तोंडाकडे अतिशय केविलवाण्या मुद्रेनें पहात पहात निघून जात असत ! त्या स्मारका-संबंधानें कोणी थट्टा केली, कोणी हसलें, कोणी तुच्छता प्रदर्शित केली, किंवा कोणी शांतपणानें आपला तिरस्कार व्यक्त केला, म्हणजे ते पहारेवाले फार खजील होऊन जात असत ! जेव्हां त्या स्मारकावर पहारा करण्याच्या कामावर त्यांची नेमणूक झाली, तेव्हां हें एक मोठ्या मानाचें आणि महत्त्वाचें काम आपल्याकडे सोपविण्यांत आलें आहे, असें त्यांना वाटलें होतें ! परंतु ज्याचें आपण संरक्षण करण्याकारितां बसलों आहों, त्या स्मारकाकडे पाहून सगळे लोक हसतात, थुंकतात, थट्टा करितात आणि तिरस्कारवाचक शब्द उच्चारतात, असें जेव्हां जेव्हां त्यांच्या दृष्टीस पडे, तेव्हां तेव्हां त्यांचा चेहरा खरकन उतरून जाई, पाण्यांत पडलेलें ढेकूळ विरघळतें तसे ते विरघळून जात, आणि लोक त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागले म्हणजे ते आपलीं तोंडें शरमेनें खालीं घालीत ! ज्यांच्या मनाची आणि मानाची अशी दुर्दशा, त्यांच्या हातून त्या बिचाऱ्या स्मारकाचें संरक्षण काय होणार ? लोकांच्या नापसंतीनें ज्यांचा पाया पोकळ केला गेला आहे, त्या स्मारकांचें संरक्षण भाडोत्री पहारेकऱ्यांकडून काय होणार ? तरी पण अधिकारानें आग्रह, अभिमान आणि अभिनिवेश उगीच उत्पन्न होत असतो, असें थोड्याथोडक्या ठिकाणीं दिसून येतें, असें नाहीं. त्याप्रमाणें ह्या प्रस्तुतच्या पहारेकऱ्यांमध्यें जो एक मुख्य पहारेकरी होता, त्याला मोठी मगरुरी होती;

व मी ह्या स्मारकाचें इमानेंइतबारें संरक्षण करीनच करीन, असें त्याला वाटत होतें; व त्याप्रमाणें तो वल्गनाही करीत असे !

त्याची घरची स्थिति फारशी चांगली होती असें नाहीं. त्याला मुशाहिरा तो काय मिळणार, आणि त्यांत महागाईच्या दिवसांत तो आपला गुजारा तो काय करणार ? तरी पण बिचारा अर्धपोटी उपाशी राहूनही इमानेंइतबारें आणि मोठ्या अभिमानानें तो आपलें काम बजावीत असे. त्याची आई बरीच वृद्ध झालेली होती. व वृद्धापकाळच्या दुखण्यानें ती बरीच आजारी होती. तिला आपल्या स्वतःच्या डोळ्यांनीं दिसत नव्हतें, आपल्या स्वतःच्या हातानें कांहीं काम करितां येत नव्हतें किंवा आपल्या स्वतःच्या पायानें दोन पावलें चालतांही येत नव्हतें. अशा स्थितींतही तिला टाकून तो पहारेवाला आपल्या पहाऱ्यावर नेमानें जात असे. एकदां त्याची रात्रीची पहारा करण्याची पाळी आली; तेव्हां ज्या स्मारका सभोंवती रखवाली करण्याचें काम त्याच्याकडे होतें, त्या स्मारकाला कोणी लोक कांहीं अपाय करण्याकरितां टपलेले आहेत, अशी त्याला कोणी उगीच खोटी बातमी सांगितल्यामुळें दररोज रात्रीचा त्या स्मारकाच्या थडग्याजवळ तो बिनचूकपणें येऊन बसत असे. एके रात्रीं त्याची आई फारच आजारी झाली व ती दुसऱ्या दिवशींची सकाळ उजाडलेली पाहील किंवा नाहीं, याच्याबद्दलचीही वानवाच होती. तरी पण तिला तशा अवस्थेमध्यें टाकून तो पहारेवाला आपली तरवार पाजळीत त्या स्मारकाच्या इमारतीजवळ आला आणि तेथें पहारा करीत बसला. व कोणी लोक या स्मारकाच्या कोणत्याही दगडाजवळ आले, तर त्यांना मी असें करीन आणि तसें करीन, अशीं तो मोठ्या गर्वानें मनोराज्यें करूं लागला. अशा प्रकारच्या तंद्रींत मन जेथें शिरतें, त्याच्याच जवळ झोपेची नाडी असते; व त्यामुळें असल्या तंद्रींतून सुषुप्तीमध्यें जाण्याला मनुष्याला फारसा अवकाश लागत नाहीं. वरीलप्रमाणें विचार करितां करितां त्या शिपायाला मध्येंच झोंप लागली. आणि झोंप लागली असतां मध्येंच त्याला एक स्वप्न पडलें. मनीं असे तें स्वप्नीं दिसे, ही म्हण अगदीं खरी आहे. तेथें त्या भ्रमिष्ट झालेल्या पहारेवाल्याला दुसरें तिसरें कसलें स्वप्न पडावयाचें आहे ! त्याला असें स्वप्न पडलें कीं, पुष्कळ लोक आपल्या स्मारकाच्या पुतळ्याच्या दगडास-

भोंवती जमा होण्याच्या बेतांत आहेत! असें पाहून तो पहारेवाला स्वप्नांतच रागानें अगदीं खवळून गेला आणि स्वप्नांतच मोठमोठ्यानें ओरडून तो म्हणाला कीं, "तुम्ही कितीही लोक या स्मारकावर हल्ला करण्याकरितां आलां, तरी मी याचें संरक्षण केल्यावांचून कधींही रहाणार नाहीं! मी याचें संरक्षण करणारच!" त्या बिचाऱ्याचा केवढा हा वृथा अभिमान! आणि केवढ्या ह्या पोकळ वल्गना! "मी याचें संरक्षण करणारच!" हे त्याचे स्वप्नांतील शब्द उच्चारून होत आहेत न होत आहेत, इतक्यांत तो अर्धवट जागा झाला; आणि "कोठें आहेत ते हल्ला करणारे लोक?" असें म्हणून झोपेंतून अर्धवट उघडलेल्या आपल्या डोळयांनीं तो त्यांना त्या मध्यरात्रीच्या काळोखांत शोधूं लागला. पण तेथें कोणी जर नव्हतेंच, तर त्याला तेथें कोण दिसणार! पण इतक्यांत त्या रात्रीच्या काळ्याकुट्ट काळोखांतून दुरून कोठून तरी कोणी तरी खोल आणि अतिशय गंभीर स्वरानें बोलत आहेत, असें त्याला वाटलें. त्यानें अर्धवट झोपेंत आणि अर्धवट स्वप्नांतच थोडा कानोसा घेतला, तों त्याला वाटलें कीं, आपल्याला कोणी तरी उलट प्रपादित आहेत! 'तूं याचें संरक्षण करणार!' असे शब्द कोठून तरी आपल्या कानावर आल्यासारखे त्याला वाटलें. त्यानें ते शब्द ऐकले! पण ते माणसांचे शब्द असतील, असें त्याला वाटेना! माणसांशिवाय दुसरे कोणी तरी हे शब्द उच्चारित असले पाहिजेत, असें त्याला वाटूं लागलें! म्हणून तो त्या आपल्या अर्धवट स्वप्नाच्या स्थितींतच चारी बाजूंला पाहूं लागला, तों वरून कोठून तरी प्रत्येक दिशेकडून 'अरे मूर्खा, तूं याचें संरक्षण करणार!' असे शब्द एका मागून एक अशा सर्व दिशांनीं त्याला ऐकूं येत असल्याचा भास झाला! आणि हे शब्द उच्चारून मध्यें एक क्षणही गेला नसेल, तोंच अत्यंत तिरस्कारयुक्त अशा खदखदा हसण्याचा एक आवाज चारी बाजूंनीं त्याच्या कानावर आला! स्मशानांतील भुतें देखील एखाद्याच्या उपहासासाठीं एकदम हसूं लागलीं, तर तो त्यांच्या हसण्याचा ओघही इतका भयंकर असणार नाहीं! 'तूं याचें रक्षण करणार!' या तुच्छतेच्या आवाजानें उच्चारलेल्या शब्दांनींच त्याचें धैर्य आधीं खचून गेलें होतें; पण त्या शब्दांच्या पाठीमागून त्यानें जें तिरस्कारयुक्त हसणें ऐकलें, त्या योगानें तर त्याचे हातपायच मोडून गेले. व

आपल्या अधिकाराचा उद्दामपणानें असा उपमर्द आणि उपहास कोण करीत आहे, हें पहाण्याकरितां वरून आकाशांतून जिकडून तो आवाज येत होता, तिकडे अर्धवट स्वप्नांतच त्यानें आपली दृष्टि वळविली; तों त्या मध्यरात्रीच्या निबिड काळोखापेक्षांही जास्त काळीं आणि जास्त भयंकर अशीं कित्येक स्वरूपें आपले लालभडक डोळे वटारून आकाशाच्या रंगभूमिकेवरून दणादण पाय आपटीत आपल्याकडेच न्याहाळून पहात असल्याचें त्याला दिसलें! इतक्यांत त्यांच्यापैकीं एकजण जो सर्वांत फार मोठा होता व अक्राळविक्राळ दिसत होता, तो पुढें होऊन त्या पहारेकऱ्याला उद्देशून म्हणालाः—“ अरे मूर्खा, तूं याचें संरक्षण करणार! आम्ही परमेश्वराच्या सृष्टींतील इतकीं विनाशक तत्त्वें जागरूक असतां आणि मनुष्याच्या निरर्थक डौलानें वर डोकें काढल्याबरोबर तें आम्ही पदोपदीं पूर्ण ठेचून टाकीत असतां क्षुद्र आणि सरपटणाऱ्या अशा तुझ्यासारख्या मनुष्यप्राण्यांनीं असली वेडगळ बढाई मारीत असावें, याबद्दल तुला लाज कशी वाटत नाहीं! अरे मूर्खा, तूं—तूं—या स्मारकाच्या दगडाचें संरक्षण करणार! आजपर्यंत आम्ही या सगळ्यांनीं मिळून या जगांतील किती स्मारकें जगाच्या प्रारंभापासून आजपर्यंत लयाला नेलीं, याची तुला कांहीं कल्पना आहे! तूं काल जन्माला आलेला आणि उद्यां मरून जाणारा मनुष्यकीटक!——तूं आमच्या विनाशकारक परिणामांपासून याचें संरक्षण करणार! आम्ही या आकाशांतील संहारक खात्याकडील महाभूतांनीं आजपर्यंत किती राजांना आणि त्यांच्या किती स्मारकांना उलथून टाकिलें आहे, याची तुझ्यासारख्या क्षणभंगुर आयुष्याच्या मनुष्यांना कोठून माहिती असणार? आपआपलीं कांहीं तरी खुळचट स्मारकें करून तीं टिकविण्यासाठीं किती तरी राजांनीं किती तरी आटोकाट प्रयत्न केलेले होते आणि त्यांचीं संरक्षणें करण्याकरितां त्यांच्यावर त्यांनीं तुझ्यासारखे किती तरी पहारेवालेही ठेविले होते! पण ते राजे, त्यांचीं तीं स्मारकें आणि त्यांचें संरक्षण करणारे तुझ्यासारखे ते गुलामगिरींतील वाकबगार पहारेवाले आज कोठें आहेत? यांना सगळ्यांना आम्ही जर या पृथ्वीतलावर टिकूं दिलें असतें, तर येथें नवीन उत्पन्न होऊन येणाऱ्या लोकांना आजपर्यंत पाऊल ठेवण्यालाही जागा उरली नसती. म्हणून कोणत्याही मूर्ख महत्त्वाकांक्षी लो-

कांनीं आणि त्यांच्या बंदिवानांनीं आपलीं वेडगळ स्मारकें उभारण्याला सुरवात केली, म्हणजे त्या सुरवातीच्या क्षणापासूनच तीं कोसळून पाडण्याच्या आणि नामशेष करून टाकण्याच्या प्रयत्नाला आम्ही सृष्टींतील विलयोत्पादक तत्त्वें सुरवात करीत असतों! मूर्खांनों, तुम्हांला काय वाटतें? हें परमेश्वराचें जग हें काय तुमच्या एकट्यांच्या मालकीचें घर आहे, असें का तुम्हांला वाटतें? ही निवळ एक धर्मशाळा आहे! या धर्मशाळेंत तुम्ही दोन दिवस राहण्याकरितां आलां, तर मुकाट्यानें रहावें आणि जाण्याच्या वेळीं आपली जागा खालीं करून चालतें व्हावें! पण तसें न करितां या धर्मशाळेच्या ज्या एखाद्या कोनाकोपऱ्यांतील खोलींत तुम्ही राहिलां, त्या खोलीला तुम्ही मेल्यानंतरही 'ही माझी खोली' म्हणून कुलपें लावूं लागलां, आणि त्या कुलपांचें संरक्षण करण्याकरितां फिरून तुम्ही पहारेकरी नेमूं लागलां, तर या परमेश्वराच्या न्यायी विश्वामध्यें असली ही तुमची जबरदस्ती कोण चालूं देणार आहे! हें परमेश्वराचें जग म्हणजे कांहीं एखाद्या झोटिंग पादशहाचें राज्य नव्हे, कीं जेथें वाटतील तसे जुलूम चालावेत! हें जग कांहीं फक्त जुलमी राजांकरितां, त्यांच्या स्मारकांकरितां आणि त्यांच्या पहारेकऱ्यांकरितां परमेश्वरानें निर्माण केलें आहे, असें नाहीं! तुमच्या पाठीमागून अजून या जगामध्यें कोट्यावधि नवीन माणसें जन्माला यावयाचीं आहेत. त्यांना जागा पाहिजे. त्यांची जागा तुम्ही मेलेल्या माणसांनीं अडवून कसें चालेल? आणि तुमचींहीं वेडगळ स्मारकें तुमच्या पाठीमागून येणाऱ्या लोकांपैकीं पाहिजे आहेत तरी कोणाला? राजाचें स्मारक, राजाच्या बायकोचें स्मारक, राजाच्या मुलाचें स्मारक, राजाच्या एखाद्या नाटकशाळेचें स्मारक, त्याच्या हुजऱ्याचें स्मारक, त्याच्या शिपायाचें स्मारक, त्याच्या कुत्र्याचें स्मारक, त्याच्या मांजराचें स्मारक, त्याच्या पोपटाचें स्मारक, त्याच्या दांताचें स्मारक, त्याच्या केसाचें स्मारक!—अरे मूर्खांनों, तुम्ही हें मांडलें तरी आहे काय? हीं स्मारकें आहेत किंवा थट्टा आहे? ह्या तुमच्या गुलामांचीं, कुत्र्यांचीं आणि केसांचीं हीं जीं स्मारकें तुम्ही करीत असतां, त्यांच्यावांचून जगाचें काय अडलें आहे? फक्त लोकोपयोगी गोष्टी खेरीजकरून बाकी ही सगळी वेडगळपणाची अडगळ या पृथ्वीतलावरून साफ झाडून नाहींशी करून टाकावी, असा आम्हांला परमेश्वराचा सक्त हुकूम आहे.

त्यामुळें तुमचीं स्मारकें सुरू झाल्याबरोबर तीं मोडून टाकण्याच्या कामाला आम्ही सुरवात करीत असतों. आमच्यांतील वारा, पाऊस, हीं महाभूतें प्रतिक्षणीं तुमच्या त्या स्मारकांच्या दगडांतील, पुतळ्यांतील किंवा इमारतींतिल एकेक कण हळुहळु कसा नाहींसा करीत असतात आणि त्यामुळें तुमचे ते खोल खणलेले पायेही कसे पोकळ होत असतात आणि तुमच्या मजबूत इमारती क्षयरोगामुळें कशा झिजणीस लागत असतात, याची तुम्हांला कल्पनाही येणें शक्य नाहीं. हे त्यांचे व्यवहार सावकाश चाललेले असतात. पण एखादे वेळीं आमच्या वाऱ्याला राग आला, तर तो तुमच्या स्मारकांच्या इमारतींचीं छपरें उचलून घेऊन कोठें नेऊन फेकून देतो याचा पत्ताही लागत नाहीं! त्याचप्रमाणें आमच्या ह्या महाभूतांपैकीं ही जलदेवता जोंपर्यंत शांत आणि निर्मळ आहे, तों पर्यंत ठीक असतें. पण हिचें अंतरंग एकदां गढूळ झालें, तर ही कोणाला केव्हां बुडवून टाकील, याचा कांहीं नेम नाहीं! तसेंच आमच्यापैकीं ह्या विजेनें तुमच्या या स्मारकांच्या पुतळ्यांपैकीं कितीकांचीं डोकीं फोडलीं आहेत आणि किती राजांचे जयस्तंभ आणि रणस्तंभ कोसळून आणि लाथाडून टाकले आहेत, याची त्या पुराणवस्तुसंशोधनशास्त्रालाही माहिती नाहीं, ती त्या बिचाऱ्या इतिहासाला कोठून असणार? आमच्यांतील ही बिचारी पृथ्वी फार क्षमाशील आहे. तिला प्रत्येक जण लाथा मारीत असतो; आणि एखाद्या गुलामाप्रमाणें ती तें सगळें निमूटपणें सहन करीत असते. पण गुलाम देखील एखादे वेळीं बंड करतात, आणि सरपटणारे साप देखील एखादे वेळीं चावा घेतात! त्याप्रमाणें ह्या पृथ्वीच्या पोटांत एखादे वेळीं क्षोभ उत्पन्न झाला, तर तो अनावर होऊन त्वेषानें तिच्या अंगाला कंप उत्पन्न होतो व त्या आवेशांत तिच्या पाठीवर भारभूत झालेले मदोन्मत्त राजे, त्यांच्या राजधान्या, त्यांचे किल्ले, त्यांचीं स्मारकें आणि त्यांचे पहारेकरी, ह्या सगळ्यांना ती आपल्या पोटांत गडप करून टाकते! आणि शिवाय 'कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धः' या वचनांत भगवंतांनीं सांगितल्याप्रमाणें या सगळ्या विध्वंसक आणि विलयोत्पादक आदिभूतांच्याही वर सर्व संहार करण्याकरितां माझी देखरेख आहे, ती निराळीच! इतक्या आम्हां विघातक विभूतींच्या देखरेखीला न जुमानतां तूं, मूर्खा, म्हणतोस कीं, मी यांचें संरक्षण करणारच!—तूं या स्मारकाचें संरक्षण

करणार ? –हें तुला शक्य नाहीं ! अरे मूर्खा, तूं या दगडाचें संरक्षण करणार ? या स्मारकाच्या दगडाचें आणि तुझें काय नातें ? आणि तूं याचें काय म्हणून संरक्षण करणार रे ? तुझी आई घरीं मरत पडलेली आहे, तिचें संरक्षण करण्याचें तुझ्या कधीं मनांत आलें नाहीं आणि तूं या दगडाचें संरक्षण करण्याचा अभिमान बाळगतोस ! असल्या तुझ्यासारख्यांपेक्षां जास्त अविचारी मनुष्य कोण सांपडणार आहे ? ज्या आईनें तुला जन्म दिला, ती तुझी आई मृत्युपंथाला लागून अंथरुणावर पडली असतां तिची उपेक्षा करून तूं या दगडाचें संरक्षण करण्याकरितां येथें येऊन निजलास, असा हा दगड तुझा कोण होतो ? हा काय तुझा बाप, का ही तुझी आई ? ह्या दगडाच्या उशागतीं तूं येऊन बसला आहेस, त्याच्यापेक्षां ज्या तुझ्या आईचें प्राणोत्क्रमण या क्षणालाही दुसरीकडे चाललेलें आहे, तिच्या उशागतीं बसून तूं तिच्या मानेखालीं मांडी दिली असतीस, तर तें तुझ्या कर्तव्यकर्माला उचित असें झालें असतें ! जिनें तुला आपल्या मांडीवर लहानपणीं खेळविलें, त्या आईला मरतांना मांडी देण्याचें टाकून या पाषाणहृदयी पाषाणाचें संरक्षण करण्याकारितां तूं येथें आलास, याची तुला लाज कशी वाटत नाहीं? असलेच सगळे सुपुत्र अलीकडे या जगामध्यें निर्माण होत असतात काय ? धिक्कार ! धिक्कार असो असल्या तुझ्यासारख्या कुपुत्रांना आणि कुलांगारांना !"

असें म्हणून तीं आकाशांतील भयंकर दैवतें त्या रात्रीच्या काळोखांत अंतर्धान पावलीं. त्यांचे हे वर दिलेले शब्द ऐकून तो पहारेकरी आपल्या अर्धवट स्वप्नांतून जागा होत आहे न होत आहे, इतक्यांत दुरून कोणी एक मनुष्य येत असलेला दिसला. त्याच्या एका हातांत एक कंदील व दुसऱ्या हातांत एक काठी होती. ती काठी टेकीत टेकीत तो या पहारेकऱ्याच्या जवळ आला व कंदिलाच्या उजेडानें ओळखून त्यानें त्याला हांक मारली, व "तुझ्या आईचा प्राण अगदीं कासावीस झाला आहे, तेव्हां तूं तिच्याकडे चल !" असें सांगून तो त्याला त्याच्या आईकडे घेऊन गेला.

# स्वातंत्र्याच्या अटी !

वास्तविक पाहिलें असतां स्वातंत्र्य म्हणजे जें स्वतंत्र असेल तेंच स्वातंत्र्य होय ! स्वातंत्र्य आणि त्याला अटी, हा शब्दविरोध मनोग्राह्य होऊं शकत नाहीं. पण व्यवहारामध्यें कधीं कधीं परस्परविरोधी असेही कित्येक संबंध जुळून आलेले दिसतात, त्याला काय करावयाचें ? पूर्वीच्या ग्रीक लोकांच्या इतिहासाच्या वेळीं एका धूर्त यजमानापाशीं एक भोळसर गुलाम होता. तो गुलाम आपल्या गुलामगिरीला अतिशय कंटाळला होता. व त्या गुलामगिरींतून सुटून आपण स्वतंत्र व्हावें, असें त्या गुलामाला सदोदित वाटत असे. म्हणून तो आपल्या धन्यापाशीं मला स्वातंत्र्य द्या; अशी मागणी मागूं लागला. तरी त्याच्या त्या बडबडीकडे त्याच्या मालकानें कधींही लक्ष दिलें नाहीं. तेव्हां आपल्या मागणीकडे लक्ष जावें म्हणून त्या गुलामानें आपलें अन्न वर्ज केलें ! पण धन्याला आपल्या भाकऱ्या वांचतात असें पाहून आनंदच होऊं लागला ! पण पुढें तो पाळीव गुलाम जसा अन्न खाईनासा झाला, तसाच तो कांहीं कामही करीनासा झाला ! तेव्हां मात्र धन्याला वाटलें कीं, याच्या मागण्या न्यायाच्या असल्या पाहिजेत ! तेव्हां धन्यानें त्याच्याशीं तडजोडीचें बोलणें सुरू करून अखेरीस त्याच्या मागण्याप्रमाणें त्याला स्वातंत्र्य देण्याचें कबूल केलें ! तेव्हां गुलामाला आपलें स्वातंत्र्य मिळाल्याबद्दल आनंद झाला, व त्यानें सगळीकडे साखरा वांटल्या ! व पुढें कांहीं दिवसांनीं त्या दोघांच्या दरम्यान स्वातंत्र्याच्या पुढील अटी पाळल्या जाव्या, असें ठरविण्यांत आलें. त्या अटी येणेंप्रमाणें होत्या:—

( १ ) या गुलामाला याचें स्वातंत्र्य देण्याचें ठरलेलें आहे. म्हणून याला इतःपर गुलाम असें न म्हणतां ' स्वतंत्र मनुष्य ' ( Freed man ) या नवीन ठेवलेल्या नांवानें याला नेहमीं संबोधण्यांत यावें.

( २ ) परंतु याला जरी स्वातंत्र्य द्यावयाचें ठरलें आहे, तरी एक-दम स्वातंत्र्य दिल्यानें स्वातंत्र्याच्या प्रकाशानें कदाचित् याचे डोळे दिपून जातील! म्हणून याला जसें पचेल तसें थोडेंथोडेंच स्वातंत्र्य देण्यांत येईल.

( ३ ) हा जेव्हां गुलाम होता, त्या वेळीं याच्या पायांत जितक्या जड वजनाच्या बिड्या होत्या, तितक्या जड बिड्या त्याच्या पायांत आतां ठेवणें अन्यायाचें असल्यामुळें पूर्वींच्यापेक्षां फक्त निम्मे वजनाच्या बिड्या याच्या पायांत असाव्या; त्याच्यापेक्षां जास्त वजनाच्या बिड्या याच्या पायांत केव्हांही असूं नयेत; व शिवाय त्या आंतून लोखंडाच्या असलेल्या बिड्यांवर वरून रुप्याचा चांगला मुलामा देण्यांत आलेला असावा!

( ४ ) आतां हा स्वतंत्र मनुष्य झालेला असल्यामुळें याला धन्यानें आपल्या पदरचें यापुढें खावयाला दिलें, तर आपण अजूनही गुलामच आहों कीं काय, असें कदाचित् त्याला वाटेल. म्हणून त्यानें स्वकष्टार्जित अन्नावरच आपला चरितार्थ चालवावा, हें जरूर आहे.

( ५ ) तरी पण त्याला इतक्यांतच आपलें स्वतःचें घर तयार करतां येणार नाहीं, व त्यामुळें त्या बिचाऱ्याची रहाण्याची गैरसोय होईल; म्हणून अत्यंत दयार्द्र अन्तःकरणानें अशी योजना करण्यांत येत आहे कीं, ह्या गुलामाची त्याच्या गुलामगिरीच्या वेळची जी कोठडी होती, त्या कोठडीमध्यें त्याचा याच्या पुढेंही रात्रीच्या वेळीं निजण्याचा हक्क काढून घेण्यांत येणार नाहीं; फक्त कोणी हिंस्र प्राण्यांनीं त्याच्या कोठडींत जाऊन त्याला खाऊं नये किंवा कोणी चोर वगैरे लोकांनीं त्याला उपद्रव देऊं नये, म्हणून रात्रीच्या वेळीं त्याच्या कोठडीच्या दरवाजाच्या बाहेरच्या कडीला मालकाकडून कुलूप लावण्यांत येईल!

( ६ ) ह्याप्रमाणें ह्या एवढ्या अटी पाळल्या गेल्या, म्हणजे सार्वजनिक हवेंत श्वासोच्छ्वास करणें, वगैरे वगैरे बाकीच्या सर्व हक्कांच्या बाबतींमध्यें ह्या गुलामाला पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलेलें आहे!

देणेंप्रमाणें उभयपक्षांमध्यें ह्या स्वातंत्र्याच्या अटींचे करारमदार ठरून त्यावर उभय पक्षांच्या सह्या होऊन तो मसुदा मुक्रर करण्यांत आला. व त्या अन्वयें त्या गुलामाला स्वातंत्र्य देण्यांत आलें!

---

# एका पाठभेदाची चर्चा.

सखे माझे परतोनि घरां येतां ॥ तुवां सजणे हा समाचार घेतां ॥
तया शोकें घायाळ हृदय होतां ॥ कशी होशिल तें आठवितों आतां ॥

ही रघुनाथपंडितांनीं केलेल्या नलोपाख्यानांतील उत्कृष्ट दिंडी सर्वांना माहीतच आहे. या दिंडीच्या पहिल्या चरणाच्या शेवटीं "येतां" असा शब्द आहे. याच्या जागीं "जातां" असा दुसरा एक पाठभेद कित्येक ठिकाणीं आढळतो. या दोहोंपैकीं जास्त चांगला आणि जास्त बरोबर पाठभेद कोणता ? सदर दिंडीच्या दुसऱ्या चरणाच्या शेवटीं "घेतां" असा जो शब्द आहे, त्याच्याशीं जास्त चांगलें यमक जुळण्याच्या दृष्टीनें "जातां" या शब्दापेक्षां "येतां" हा शब्द जास्त आदरणीय आहे, हें उघड आहे. पण हा केवळ शब्दचमत्काराच्या दृष्टीनें विचार झाला. परंतु शब्दचमत्कारापेक्षां अर्थात् अर्थाच्या सुसंगतपणालाच केव्हांही जास्त महत्त्व देणें अत्यंत जरूरीचें आहे, आणि त्या अर्थाच्या दृष्टीनें पाहिलें असतां "येतां" हा पाठभेद बिलकुल ग्राह्य होऊं शकणार नाहीं. कारण, या एकंदर सगळ्या कवितेमध्यें काय म्हटलें आहे ? तर "मला कोणी तरी इकडे धरलें आहे, ही बातमी तुला कळल्यानंतर त्या शोकानें तुझें हृदय घायाळ होऊन तुझी कशी करुणास्पद अवस्था होईल, याची मी आठवण करीत आहें, म्हणजे त्या अवस्थेचें चित्र मी कल्पनेनें आपल्या डोळ्यांपुढें निर्माण करीत आहे !" असा या ठिकाणीं हंसाच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. हा एकंदर मुख्य अर्थ कायम राहील, अशीच या सगळ्या कवितेची शब्दयोजना असली पाहिजे. परंतु ती "येतां" या पाठभेदानें एकदम बिघडून जाते. "सखे माझे परतोनी घरा येतां" असा पाठ असेल तेव्हां "येतां ह्या शब्दानें हंस हा आपल्या घरींच आहे, असा ध्वनि उत्पन्न होतो; व तो घरीं असेल, तर त्याच्या

हंसीचें हृदय घायाळ होण्याचें कारणच मुळीं उरत नाहीं; व तिची कशी करुणास्पद अवस्था होत असेल ह्याचें चित्र कल्पनेनें निर्माण करण्याचीही अवश्यकता तो तेथें प्रत्यक्ष हजर असल्यामुळें उत्पन्न होत नाहीं. अशा रीतीनें 'येतां' ह्या पाठानें पुढील सगळ्या अर्थाचा अगदीं विरस होऊन जातो. व म्हणून तो अग्राह्य ठरतो. परंतु "जातां" हा पाठ घेतला, म्हणजे त्या पाठानें हंस आपल्या घरीं नाहीं, हें ध्वनित होतें; व त्यामुळें आपल्या बंधनाच्या बातमीनें विव्हळहृदय झालेल्या हंसीच्या करुणावस्थेची कल्पना करण्यालाही त्याला औचित्य प्राप्त होतें, म्हणून 'जातां' हाच पाठभेद जास्त चांगला होय. या कवितेंतील 'आठवितो' ह्या शब्दांतील स्मरणाची कल्पना चांगली आहे. परंतु तो शब्द स्वतः थोडा सदोष आहे. आठवण हा शब्द भूतकालीन गोष्टीच्या स्मरणाला नेहमीं लाविला जातो. परंतु येथें तो लक्षणेनें भावी गोष्टीच्या कल्पनेला लावण्यांत आलेला आहे. विव्हळहृदय होण्याच्या नंतर आठवण्याची क्रिया होण्याचें वर्णिलें असल्यामुळें पुढल्या भविष्य काळाच्या आधींच्या भविष्य काळाला भूतकालीनत्व प्राप्त होणें शक्य आहे, हें उघडच आहे.

---

# अन्नें व लब्धांबरें ही जोडी जमते काय?

अज्ञातवासकाळीं त्यांची कष्टा दशा वदावि किती ।
द्रव्यार्थ भीम अर्जुन अन्नें लब्धांबरें तदा विकिती ॥ २८ ॥
एकांतीं गुप्तपणें भेटे चोरांसि जेवि चोरसखा ।
सहदेव म्हणे 'बहु कृश दिसतां, व्हा तुष्ट, पुष्ट, गोरस खा' ॥ ३० ॥

या वर दिलेल्या दोन आर्या मोरोपंतकृत आर्याभारताच्या विराटपर्वाच्या पहिल्या अध्यायांतील आहेत. व त्यांपैकीं २८ व्या आर्येंत अज्ञातवासांतील भीम आणि अर्जुन यांच्या कृतीचें व ३० व्या

आर्येत सहदेवाच्या कृतीचें वर्णन आहे. या दोन्हींही आर्या चांगल्या आहेत, व त्यांतल्या त्यांत दुसरीपेक्षां पहिली तर जास्तच सरस आहे. तरी पण त्या प्रत्येकीमध्यें एकेक लहानसा दोष शिरून राहिलेला आहे. पहिल्या आर्येच्या दुसऱ्या चरणांत भीम आणि अर्जुन या दोघांच्या संबंधानें दोन सारखीं विधानें करण्याचा उपक्रम सुरू करण्यांत आलेला आहे; तो असा कीं, द्रव्यासाठीं भीम अन्नें विकीत असे, आणि द्रव्यासाठीं अर्जुन वस्त्रें विकीत असे. हा जो इष्ट आणि अपेक्षित क्रम, तो दोन्ही वाक्यांमध्यें सारख्या रीतीनें कायम टिकविला गेला असता, म्हणजे त्या प्रारब्ध क्रमाचा भंग झाला नसता. परंतु ' अन्नें ' आणि ' अंबरें ' हीं जीं दोन्हींही नामें सारखेपणामध्यें ठेवावयाचीं, तीं तशी न ठेवितां मोरोपंतांनीं ' अंबरें ' याला ' लब्ध ' हें एक विशेषण लाविलें आहे. सापत्नभावाच्या स्वाभाविक समानपणांत एकीच्या अंगावर एखादा जास्त दागिना घातल्याबरोबर दुसरीचें बिघडतें, तशी येथें त्यामुळें स्थिति झालेली आहे. कांहीं विशेषण लावावयाचेंच होतें, तर तें ' अन्नें ' आणि ' अंबरें ' या दोघांनाही लावावयाला पाहिजे होतें, किंवा तें कोणालाच लावावयाला नको होतें; परंतु तें फक्त ' अंबरें ' यालाच लाविलें गेल्यामुळें प्रक्रमभंगाचा दोष उत्पन्न होतो. शिवाय 'लब्धांबरें'.यांत लब्ध हें पद समासांतःप्रविष्ट झालेलें असल्यामुळें तेथून तें मोकळें करून ' अन्नें ' आणि ' अंबरें ' या दोहों-कडेही तें एकच विशेषण लावणेंही शक्य नाहीं. अशा स्थितींत तर मग मोरोपंतांनीं ' लब्धांबरें ' असा प्रयोग कां केला? त्यांनीं ' लब्ध ' हा शब्द कोठून आणिला ? ह्या प्रश्नाचा पत्ता लावण्याचें काम थोडेंसें मनो-रंजक आहे. या विषयासंबंधानें महाभारतामध्यें विराटपर्वाच्या १३ व्या अध्यायांत पुढील दोन श्लोक आढळतात.

भीमसेनोऽपि मांसानि भक्ष्याणि विविधानि च ।
अतिसृष्टानि मत्स्येन विक्रीणीते युधिष्ठिरे ॥ ७ ॥
वासांसि परिजीर्णानि लब्धान्यंतःपुरेऽर्जुनः ।
विक्रीणानश्च सर्वेभ्यः पांडवेभ्यः प्रयच्छति ॥ ८ ॥

वास्तविक पाहिलें असतां हीं अन्नें काय, किंवा अंबरें काय, दोन्हीही

विराट राजाचींच मूळचीं असून तीं तेथून कोणाकडून तरी टाकलीं किंवा दिलीं गेल्यानंतरच भीमार्जुनांकडून विकलीं जात असत. तरी पण अर्जुनाच्याबद्दलचा महाभारतांत जो वर दिलेला श्लोक आहे, त्यांत 'लब्ध' हा शब्द आढळतो; आणि तेथूनच तो मोरोपंतांनीं घेतलेला असला पाहिजे असें दिसतें. पण अन्नें आणि अंबरें हीं दोन्हीही विराटराजाच्यापासून मिळालेलींच असल्यामुळें प्रक्रमभंगाचा दोष टाळण्याकरितां 'द्रव्यार्थ भीम अर्जुन लब्धें अन्नांबरें तदा विकिती' असा पाठ केला असता, तरीही चालण्यासारखें होतें. परंतु यावर कोणी असें म्हणेल कीं, उरलेलीं अन्नें टाकूनच द्यावयाचीं असतात, तेव्हां तीं विकल्याबद्दलचा दोष नसावा, परंतु जुनीं वस्त्रें विराटाच्या अंतःपुरांतील मुलींकडून बृहन्नडेला प्रत्यक्ष मिळाल्याशिवाय अर्जुनानें तीं विकलीं, तर तीं चोरून घेऊन विकल्यासारखीं होतील, म्हणून मोरोपंतांनीं मुद्दाम 'लब्ध' हा शब्द तेथें घातला असला पाहिजे. पण या समाधानांत स्वारस्य नाहीं. कारण, तो दोष टाळण्याकरितां प्रयत्न करावा, तर प्रक्रमभंगाचा दोष पदरांत घ्यावा लागतो. आणि शिवाय वर प्रारंभींच सहदेवाबद्दल दुसरी जी आर्या दिलेली आहे, त्यांत चोरून गोरस खाण्याचाही सहदेव आपल्या भावांना आग्रह करीत असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. परंतु त्यावरूनही पांडवांसारख्या धीरोदात्त पुरुषांवर त्यांच्या आपत्कालीन वर्तनावरून कोणी चोरीचा आरोप करावा, हें मुळींच योग्य नाहीं. आणि अशा दृष्टीनें पाहतां वर दिलेल्या ३० व्या आर्येंतील 'भेटे चोरासि जेवि चोरसखा' ही हीनोपमाही फारशी चांगली नाहीं. मूळ महाभारतांत ही उपमा नाहीं. ती मोरोपंतांनीं आपल्या पदरची घातली आहे; व दुसऱ्या चरणांतील 'गोरस खा' याच्याशीं यमक जुळण्याकरितां पहिल्या चरणांत 'चोरसखा' ही शब्दयोजना करण्याला आधीं व तदनंतर तदनुकूल अशी बाकीची कल्पना योजण्याला मोरोपंत प्रवृत्त झालेले दिसत आहेत. परंतु चोरासारखा गुप्तपणा मात्र या ठिकाणीं अभिप्रेत आहे, त्यांचें चौर्यकर्म अभिप्रेत नाहीं, अशा भावार्थानें ही हीनोपमा घेतली, ह्मणजे तिच्यांतील दोष नाहींसा होण्यासारखा आहे.

# टीचभर संस्थानची शांतता

# कीं

# सगळ्या जगाची शांतता !

अद्यापि पुष्कळ नेटिवं संस्थानांतूनही दारूचा खप जारीनें चालू आहे. व त्याला आळा बसविण्यासाठीं कोणी परोपकारबुद्धीनें लोकांना दारू न पिण्याविषयीं उपदेश केला, तर अशानें शांततेचा भंग होईल, या सबबीखालीं मद्यपानप्रतिबंधाविषयीं उपदेश करणाऱ्या परोपकारी लोकांवर कित्येक संस्थानांतून खटलेही करण्यांत येतात! अशा एका वायव्य प्रांतांतील संस्थानांत कोणी मद्य पिण्याकरितां जात असला किंवा मद्य पिण्याचें पवित्र कृत्य करीत असला, तर त्याच्या त्या धर्मकृत्याला व्यत्यय येईल, किंवा तें पवित्र कार्य करीत असतां त्याच्या मनाला व्यग्रता उत्पन्न होईल, आणि त्यामुळें त्याच्या जन्मसिद्ध मद्यपानाच्या व्यक्तिस्वातंत्र्याला हरकत येईल, असें अन्यायिपणाचें कृत्य कोणी आपल्या उपदेशानें अगर अन्य तऱ्हेनें केल्यास त्या गुन्ह्याबद्दल त्याला एकदम पकडून आणावें, असा निर्बंध घालण्यांत आला होता; व त्याप्रमाणें त्याची अंमलबजावणी करण्याविषयीं सर्व शिपायांना सक्त ताकीद देण्यांत आलेली होती. आणि ते शिपाई त्याप्रमाणें तो हुकूम कायदेशीरपणानें अमलांत आणितही होते. परंतु सर्वच शिपाई एकसारख्या स्वभावाचे असतात, असें नाहीं. त्यांच्यांत सुद्धां किती तरी धर्मभीरु आणि पापभीरु असतात. अशा प्रकारच्या एका शिपायावर एकदा या बाबतींत त्याच्या इच्छेच्या विरुद्ध आचरण करण्याचा प्रसंग आला. बाकीचे पुष्कळ शिपाई दारू पीत असत; पण हा कधीं दारूला शिवलेलाही नव्हता; व दुसऱ्याही कोणी दारू पिऊं नये, असेंच त्याला वाटत असे. परंतु तो स्वतः शिपा-

याच्या नोकरींत असल्यामुळें त्याला उघडपणें असा उपदेश करतां येणें शक्य नव्हतें. आणि म्हणून दारू न पिण्याविषयीं जे कोणी उपदेशक उघड आणि सार्वजनिक रीतीनें लोकांना उपदेश करीत असतात, ते एक चांगलें काम करीत असतात, अशी त्याची समजूत असे. तरी पण अशाही एका उपदेशकाला त्यानें दारू न पिण्याविषयीं लोकांना उपदेश केल्याच्या गुन्ह्याबद्दल एके दिवशीं पकडून नेण्याचा त्याच्यावर प्रसंग आला! काय करणार बिचारा! तो पडला हुकमाचा ताबेदार! तेव्हां त्यानें आपल्या हुकमाप्रमाणें त्याला अटक केली. आणि नंतर तो त्याला कोतवालीकडे पकडून घेऊन चालला. अशा स्थितींत पकडणाराला आनंद व्हावा आणि पकडलेल्याला वाईट वाटावें, हें अगदीं स्वाभाविक आहे. पण त्या ठिकाणचा देखावा मात्र याच्या अगदीं उलट दिसत होता. पकडलेला आनंदांत होता आणि पकडणाराला वाईट वाटत होतें! गुन्हेगार हंसत होता आणि शिपायाचें तोंड रडवेलें झालें होतें. मद्यपानाच्या विरुद्ध उपदेश करणाराला अभिमान वाटत होता व त्या सद्‍गुणशाली अभिमानामुळें तो कैदी असूनही छाती वर काढून सर्व लोकांकडे पहात आणि त्यांचा दुवा घेत रस्त्यानें जणू काय मिरवतच चालला होता. परंतु ज्यानें त्याला कैद केलें होतें, त्यानें लाजेनें आपलें तोंड खालीं घातलें होतें व आजूबाजूच्या लोकांकडे वर तोंड करून पाहण्याची त्याला छाती होत नव्हती! अशा रीतीनें सत्तेच्या खोल खड्यांत पडलेला तो शिपाई आणि सद्‍गुणाच्या उंच पायावर उभा राहिलेला तो उपदेशक, या दोघांची जोडी आपल्या दोघांच्या कृत्यांमध्यें किती अंतर आहे हें लोकांना दाखवीत रस्त्यानें चालली होती! शिपायानें रस्त्यांतील आपली ही अपमानाची धिंड आणि आपल्या कैद्याची बहुमानाची मिरवणूक कशी तरी संपवून आपल्या कैद्याला कोतवालींत गुदरलें. परंतु हें कृत्य करीत असतांना सारा वेळपर्यंत त्याच्या मनाला चैन पडलें नाहीं. व आपण कांहीं तरी एक वाईट कृत्य करीत आहों, असें त्याच्या मनाला पुढेंही पुष्कळ वेळपर्यंत खात होतें. त्याला त्याच्या धर्मभीरुतेमुळें असें वाटत होतें कीं, "मी याला पकडून नेत आहें, हें उलटें होत आहे! वास्तविक आमच्या जागा बदलल्या पाहिजेत. त्याच्या जागीं मी आणि माझ्या जागीं तो, अशीच खरोखर स्थिति पाहिजे

आहे ! मी याच्या हातांत या बिड्या घालीत आहें, त्याच्याऐवजीं खरें म्हटलें तर त्यानें माझ्या हातांत त्या बिड्या घालावयाला पाहिजेत. दारू न पिण्याचा उपदेश करणें हें एक धर्माचें, न्यायाचें आणि नीतीचें कृत्य आहे. तें केल्याबद्दल मी याच्या हातांत बिड्या घालतों, आणि असलें अन्यायाचें कृत्य करणारे हे माझे हात मोकळे राहतात, हें कांहीं ठीक नव्हे ! पण काय करावयाचें ? या मद्यपानप्रतिबंधाचा उपदेश करणारांना अटक केली नाहीं, तर शांततेचा भंग होईल असें म्हणतात ! म्हणून त्या शांततेच्या धास्तीसाठीं सद्‌गुणालाही अटक केलीच पाहिजे, असें प्राप्त होतें ! पण हा सिद्धांत खात्रीनें कोठें तरी चुकत असला पाहिजे. सद्‌गुणाला अटक करून दुर्गुणांनीं आणि दुर्व्यसनांनीं भरलेली शांतता टिकली, तरी तिची काय किंमत आहे ? वास्तविक कोणत्याही सबबीसाठीं सद्‌गुणाच्या प्रसाराला या जगामध्यें प्रतिबंध असतां कामा नये. परंतु हल्लीं सद्‌गुणाला प्रतिबंध आणि मद्यपानासारख्या दुर्व्यसनाला मोकळीक, अशी स्थिति प्राप्त झालेली आहे ! असल्या ह्या अन्यायाच्या कामाला मी मदत करणें बरोबर होईल काय ? माझा देव मला याबद्दल काय म्हणेल ? पण मी तरी काय करणार ! हें माझें पोट जळत नाहीं, त्याला मी काय करूं ? ” असले अनेक विचार साऱ्या दिवसभर त्या शिपायाच्या डोक्यांत घोळत होते. व त्यामुळें त्याचें डोकें अगदीं भणभणून गेलें होतें. त्याला त्यामुळें त्यानंतर खाणेंपिणें सुद्धां कांहीं सुचलें नाहीं. तो साऱ्या दिवसभर खिन्न होता; त्याच्या डोळ्यांतून मधून मधून टिपेंही गळत होतीं; आणि त्याला कांहीं तरी, कसली तरी, कोठली तरी भीति वाटत असावी, असें त्याच्या कावऱ्याबावऱ्या झालेल्या मुद्रेवरून दिसत होतें !

अशा स्थितींत रात्रीच्या वेळीं तो अंथरुणावर तळमळत पडला असतां त्याला झोंप लागली. आणि झोंपेंत त्याला एक स्वप्न पडलें. तें स्वप्न फार भयंकर होतें. त्या स्वप्नांत त्यानें असें पाहिलें कीं, आपण मरण पावलों आहों आणि आपल्याला यमाचे दूत धरून घेऊन चाललेले आहेत ! त्यांपैकीं कोणी त्याच्या अंगाला भाल्याचीं टोकें टोचीत होते, कोणी त्याला फटके मारीत होते, आणि कोणी त्याच्या अंगाची फटके मारून मारून मोकळी झालेली कातडी सोलून काढीत होते ! लोखंडाच्या लाल तापलेल्या

बिड्यां कोणी त्याच्या हातांत घालीत होते! आणि कोणी त्याचा देवाविरुद्ध अपराध काय आहे, हें लोहमुद्रांवर लिहून आणि त्या मुद्रा लाल भडक तापवून त्याच्या सर्व अंगावर त्या मुद्रांचे डाग देत होते! या यातना त्यानें सहन करण्याच्या पलीकडच्या होत्या. त्या सहन न होऊन तो अगदीं विव्हळ झालेल्या वाणीनें त्या देवदूतांना असें म्हणाला कीं, "या यमयातना माझ्यानें सोसवत नाहींत! हें भयंकर शासन माझ्या मरणानंतर मला सोसावें लागेल, असें मला माझ्या जिवंतपणींही वाटतच होतें! जे मद्यपानाच्या प्रतिबंधासारखें पवित्र कार्य करीत होते, त्यांना मी प्रतिबंध केला, या पातकाबद्दल देव मला जाबसाल विचारील, असेंही मला वाटतच होतें! सद्गुणांचा उत्कर्ष करण्याकरितां झटणाऱ्या लोकांच्या हातांत जर मी बिड्या घालीत आहें, तर माझ्या त्या अन्यायाबद्दल यमाचे दूत माझ्या हातांत जास्त भयंकर बिड्या घातल्यावांचून रहाणार नाहींत, हेंही मला समजत होतें! आणि मी परोपकारी लोकांना धक्के मारून जसें कोतवालींत आणि कोतवालींतून कैदखान्यांत नेत होतों, त्याचप्रमाचें परोपकाराच्या आड येणाऱ्या मला, मी मेल्यानंतर, देवाचे दूत असेच धक्के मारीत आणि ओढीत नेऊन नरकामध्यें ढकलून देखील, हेंही सगळें चित्र मला माझ्या डोळ्यांपुढें दिसत होतें? पण मी काय करणार! शांततेच्या बचावासाठीं मला हें सगळें करावें लागत होतें! शांतता कीं सद्गुण! सद्गुण कीं शांतता! या दोघांच्यामध्यें माझ्या मनांत मोठें थोरलें रणझुंज चाललें होतें! आणि त्यांत जगांतील इतर कांहीं लोकांप्रमाणें मलाही क्षणभर असें वाटलें कीं, सद्गुण या जगांत एक वेळ बंद पडले तरी फिकीर नाहीं, पण शांतता मात्र केव्हांही बंद पडतां कामा नये! अशा रीतीनें सद्गुणावर शांततेनें जय मिळविला! आणि मी त्या जयाला बळी पडलों!"

हा त्याचा मानवी जगांतील युक्तिवाद ऐकून यमदूत त्याच्यावर फारच खवळले. व ते त्याला म्हणाले: "मूर्खा, तूं अन्याय केलेस तर केलेस; आणि शिवाय त्यांचें तूं समर्थन करण्याचेंही धाडस करतोस! मूर्खा, सद्गुणावांचून नुसत्या शांततेला काय किंमत आहे? स्मशानांत देखील शांतता असते! दगडधोंड्यांनीं आणि लांकूडफाट्यांनीं भरलेल्या एखाद्या जंगलामध्येंही शांतता असते! तसल्या त्या मृतप्राय शांततेचा काय उपयोग? सद्गुणांनीं सुशोभित झालेल्या शांततारूपी पतिव्रतेचें सौंदर्य कोणीकडे,

आणि दुर्व्यसनांनीं दूषित आणि दुर्गंधियुक्त झालेल्या त्याच शांततारूपी कुलटेचें तें विटाळलेलें आणि विकलेलें शरीर कोणीकडे, याची, अधमा, तुला कांहीं कल्पना आहे ? आणि, मूर्खा, ज्या शांततेची सबब तूं पुढें करीत आहेस, ती शांतता तरी तुझ्या असल्या ह्या सद्गुण दडपून टाकण्याच्या उपायांनीं कितपत साध्य होते ? तुझ्या त्या क्षुद्र राजाच्या राज्याची जी कांहीं पांचपंचवीस कोसांची क्षेत्रमर्यादा असेल, तेवढ्या मर्यादेंत फार झालें तर कांहीं वेळपर्यंत थोडीशी शांतता टिकेल; पण अशा रीतीनें या मद्यपानाला अप्रत्यक्ष रीतीनें उत्तेजन देऊन तुम्ही देवाच्या साऱ्या जगांतील शांतता बिघडवून टाकीत आहां, याची तुम्हांला कांहीं कल्पना आहे ? परमेश्वराचें जग हें सद्गुणाच्या पायावर आणि दुर्गुणांच्या प्रतिबंधावर रचलेलें आहे. व त्याच तत्त्वावर तें चालविलें गेलें तर चालेल. पण तुम्ही तर राजरोसपणें दुर्गुणाला मदत करून देवाच्या जगांतील शांततेचा भंग करण्याला प्रवृत्त होत आहां ! तुमच्या लहानशा क्षेत्रांत तुमच्या शांततेचा भंग करणारांना तुम्ही जर इतकें शासन करतां, तर देवाच्या ह्या साऱ्या सृष्टींतील शांततेचा दुर्गुणांच्या उत्तेजनानें भंग करूं पाहणाऱ्या तुम्हांला किती तरी पटीनें जास्त शासन दिलें पाहिजे ! आणि तें शासन आम्ही देवदूत तूला देत असतांना आतां तें मला सहन होत नाहीं, असें म्हणुन काय उपयोग ! ”

इतकें बोलून त्या देवदूतांनीं त्याला फिरून ताडण करण्याला सुरवात केली; व ओढीत ओढीत त्याला त्यांनीं एका मोठ्या खोल नरककुंडाच्या कांठावर आणिलें. त्या खड्ड्यांतील खोल खोल काळोख आणि असह्य अशी दुर्गंधि पाहून तो स्वप्नांत भीतीनें किंचाळून ओरडूं लागला. तेव्हां ती त्याची अतिशय भयप्रद अवस्था पाहून त्याच्या जवळच्या लोकांनीं त्याला जागें केलें; तेव्हां तो थोडासा शुद्धीवर आला. तो अर्धवट जागा झाल्यावर आपल्या हातांतील तापलेल्या लोखंडाच्या बिड्या काढून टाकण्याकरितां पहिल्यानें त्याचा उजवा हात त्याच्या डाव्या हाताकडे वळला. परंतु कोणत्याच हातांत बिड्या नाहींत, असें पाहून त्याला जरा धीर आला. तरी पण ते यमदूत कोठें तरी काळोखांत आसपास दडून बसलेले असले पाहिजेत, अशी त्याला वारंवार शंका येत होती. पण दिवा लावून त्यानें उजेडांत पाहिलें, तेव्हां त्याला तेथें कोणी दिसलें नाहीं. मग आपण पाहिलें तें खरें नसून स्वप्नच

असलें पाहिजे, असें त्याला वाटूं लागलें. नंतर त्यानें आपल्या अंगावरून हात फिरवून पाहिला, तेव्हां त्याला भाल्याच्या जखमा किंवा चाबकाचे फटके यांनीं आपल्या अंगाचें सोललेलें कातडेंही कोठें दिसलें नाहीं; व त्या कातडीवर तापलेल्या लोखंडी मुद्रांचे शिक्के मारलेलेंही त्याला कोठें आढळले नाहींत ! तरी पण आपल्या कपाळावर आपल्या अन्यायाबद्दलचा मारलेला शिक्का कायम असावा, अशी त्याला भीति वाटत होती. म्हणुन त्यानें आरशांत आपलें कपाळ तपासून पाहिलें, तों तेथेंही त्याला कांहीं तापलेल्या शिक्क्याच्या खुणा दिसल्या नाहींत. तरी पण त्या शिक्क्याचा ठसा त्याच्या मनावर इतका स्पष्ट उमटला होता कीं, पुढें पुष्कळ दिवसपर्यंत तो आपलें तोंड आणि त्याच्या वरील आपलें कपाळ हें लोकांना दाखवावयाला फार लाजत असे ! त्याला वाटे कीं, आपल्या कपाळावर आपल्या गुन्ह्याचा तापवलेला लोखंडी शिक्का देवदूतांनीं मारला आहे खास ! आणि तो सामान्य माणसांच्या साध्या दृष्टीला जरी दिसला नाहीं, तरी देवऋषि, मांत्रिक, पायाळू, योगी, बैरागी, साधुसंत, अशासारख्या अन्तर्ज्ञानी लोकांच्या दृष्टीला तो आपल्या कपाळावरील शिक्का खास दिसत असला पाहिजे ! व अशा भीतीमुळें तो अशा लोकांच्या पासून नेहमीं तोंड चुकवून रहात असे. पण अशा स्थितींत तो बिचारा किती दिवस काढणार ? त्याला दररोज पश्चात्ताप वाटूं लागला व अखेरीस एके दिवशीं तो आपल्या नोकरीवरून कोठें नाहींसा झाला त्याचा पत्ता नाहीं. गंगोत्रीच्या यात्रेंत अलकनंदेच्या कांठीं त्याच्यासारखा एक बैरागी स्नान करतांना पाहिल्याचें कोणी कोणी यात्रेकरू सांगतात. पण याच्यापेक्षां त्याचा कांहीं एक जास्त सुगावा अद्यापपर्यंत त्या संस्थानच्या गुप्त खात्यांतील संशोधकांनाही लागलेला नाहीं !

# अर्थनाशे समुत्पन्ने सर्वं त्यजति पंडितः!

एक मनुष्य स्वर्गाला जाण्यासाठीं खटपट करीत होता. परंतु त्याचा तो प्रयत्न कांहीं पातकाच्या आचरणामुळें सिद्धीस गेला नाहीं. त्याचे हे स्वर्गाला जाण्याचे प्रयत्न चालले होते, त्या वेळीं सैतानानें आडून त्याच्यावर टेहळणी ठेवलेली होती. त्याचे स्वर्गांत जाण्याचे प्रयत्न फसले, तेव्हां हळूच सैतान पुढें आला आणि म्हणाला, 'काय करणार, बाबा! तूं इतकी खटपट करून तुला त्यांत यश आलें नाहीं, याबद्दल मला मोठें वाईट वाटतें. असो. झाली गोष्ट येत नाहीं. पण आतां तुझी इच्छा असेल तर पाहिजे असल्यास मी तुला नरकांत घेऊन जातों!" त्याला ती गोष्ट पटली. व त्याप्रमाणें करण्याला तो तयार झाला!

एका गांवांत कोणी सभ्य, श्रीमंत, संभावित आणि प्रामाणिक, असे चोर रहात असत. त्यांनीं एका इसमाच्या घरावर एके दिवशीं राजरोसपणें दरवडा घालून त्याची सर्व संपत्ति लुटून घेतली; व त्या लुटींत त्यांना त्याची एक सुस्वरूप बायको सांपडली, तीही उपटून नेण्याचा त्यांनीं निश्चय केला. तेव्हां ती आपली बायको तरी निदान अशा रीतीनें नेली जाऊं नये, म्हणून त्यानें पुष्कळ विनवण्या केल्या. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेरीस ती सगळी संपत्ति आणि ती सुस्वरूप बायको घेऊन ते निघाले. त्या वेळीं ती सुंदर स्त्री आपल्या पायांनीं चालूं लागली. तेव्हां त्यांच्यापैकीं एका सात्त्विक चोराला तिची दया आली आणि ही इतकी कोमल स्त्री इतक्या लांब कशी चालत जाईल म्हणून त्याला चिंता पडली! तेव्हां त्याला एक युक्ति सुचली! आणि तो तिच्या नवऱ्याला म्हणाला कीं, 'बाबा, तूं हिच्या कल्याणासाठीं आणि हिला त्रास न पडावा म्हणून आमच्यापाशीं एवढा वेळपर्यंत रदबदली करीत होतास. त्यांत तुला जरी यश आलें नाहीं, तरी हिच्या वर जर तुझें कांहीं थोडें बहुत तरी प्रेम असेल व हिला त्रास पडूं नये अशी जर तुझी निःस्वार्थी आणि प्रामाणिक

इच्छा असेल, तर ही तुझी कोमल पत्नी या खड्या कांट्यांतून चालतांना तुझ्यानें कशी पहावते, हें मला समजत नाहीं! इतका निष्ठुर तूं कसा होऊं शकतोस? तेव्हां तूं आतां असें कर कीं, हिला तूं आपल्या खांद्यावर घे आणि आमच्या घरापर्यंत हिला आणून पोहोंचती कर!" हें म्हणणें पटून त्यानें तिला खरोखरच आपल्या खांद्यावर घेतली आणि तिला चोरांच्या घरीं पोंचती करण्याकरितां तो त्यांच्याबरोबर निघाला! त्या वेळीं त्या सर्व सभ्य शर्विलकांनीं त्याच्या समंजसपणाची तारीफ केली! व त्याच्या घरच्याच चोरलेल्या जिनसांचें बांधलेलें आणखी एक ओझें होतें, तें त्याच्या दुसऱ्या खांद्यावर ठेवण्यांत येऊन ते सर्व सभ्य गृहस्थ आपल्या गांवाकडे चालले! एवढा मोठा लुच्चा रावण! पण ही युक्ति न सुचल्यामुळें त्याला आपली चोरी स्वतःच्या खांद्यावरूनच लंकेपर्यंत दूर वाहून न्यावी लागली होती!

एका गावांत एक मद्यपाननिषेधक मंडळ होतें व त्यांत पुष्कळ स्वयंसेवक होते. त्यांनीं आपल्या हद्दींतील मद्यपानाचें व्यसन बंद करण्याकरितां आपल्या प्रयत्नांची शिकस्त करून पाहिली. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अंमलदारांच्या धूर्तपणामुळें आणि मद्यपी लोकांच्या मूर्खपणामुळें दारूचा खप अबाधितपणें कायम राहिला. तेव्हां त्या बिचाऱ्या मद्यपानप्रतिबंधक मंडळांतील स्वयंसेवकांची त्या गांवांतील गुत्तेवाल्यांना फार दया आली; व त्यांची परोपकार करण्याची हौस मद्यपानप्रतिबंधाच्या कामीं परिपूर्ण होत नाहीं, असें पाहून त्यांना फार वाइट वाटलें! व त्यांची परोपकाराची हौस या कामांत पूर्ण होत नाहीं, तर त्यांना परोपकाराकरितां दुसरें कांहीं तरी कार्यक्षेत्र काढून देणें अवश्यक आहे, असा सर्व गुत्तेवाल्यांच्या मनाचा कल झाला! आणि म्हणून त्यांनीं मद्यपानप्रतिबंधक मंडळांतिल सर्व सभासदांना आमंत्रण देऊन त्यांची एक सभा भरविली. त्या सभेंत स्वयंसेवकांच्या परोपकारबुद्धीची अतिशय तारीफ करण्यांत आली. व अखेरीस त्यांना असें सुचविण्यांत आलें कीं, 'तुम्ही दारू बंद करण्याकरितां परोपकारबुद्धीनें अतिशय शिकस्त केली; परंतु आपल्या देशाच्या दुर्दैवानें आपल्या देशांतील दारू बंद होत नाहीं. या दारूबाज लोकांच्या वर उपकार करण्याची तुमची बुद्धि अनावर आहे. परंतु ते ऐकत नाहींत. परंतु यांचें कल्याण करण्याची तुमची जर खरोखर इच्छा आहे आणि यांची दारू जर

बंद होत नाहीं, तर आतां निदान तुम्ही एवढें तरी करा कीं, हे दारू पिणारे लोक आमच्या गुत्त्यांतून एकदम इतके लोटतात कीं, त्यांचे उष्टे दारूचे पेले स्वच्छ रीतीनें धुवून दुसऱ्यांना देणें देखील अशक्य होतें! तेव्हां या कामीं जर तुमच्या स्वयंसेवकांनीं मदत केली, तर ज्या या लोकांचें कल्याण करावें, अशी तुमची पहिल्यापासून इच्छा आहे, त्यांना लोकांच्या उष्टया पेल्यांतून दारू न देतां स्वच्छ पेल्यांतून दारू प्यावयाला दिल्याचें श्रेय तुम्हांला मिळेल! तेव्हां आतां एवढा तरी परोपकार तुम्ही या लोकांवर अवश्य करा!" ही त्या गुत्तेवाल्यांची आणि दारूबाजांची परोपकारासंबंधीची विचारसरणी त्या स्वयंसेवकांपैकीं कित्येक भोळसर लोकांना फार चांगली वाटली. व लगेच त्यांनीं तेथल्या तेथें आपलें मद्यपानप्रतिबंधक मंडळ मोडून टाकून त्याच्या ऐवजीं चषक–स्वच्छतोत्पादक मंडळ या नांवाची एक नवीन संस्था उत्पन्न केली! व पूर्वीच्या मंडळांतील बहुतेक स्वयंसेवक हल्लीं या चषक–स्वच्छतोत्पादक मंडळामध्यें ऑनररी व्हॉलंटियरचें काम करीत आहेत! त्यामुळें गुत्तेवाल्यांनीं आपले सगळे पहिले पगारी नोकर काढून टाकले असून हल्लीं स्वच्छपणानें पेले विसळले जात असल्याची सदर गांवच्या गुत्तेवाल्यांची तारीफ खुद्द सरकारपर्यंत जाऊन पोहोंचली आहे! व त्याबद्दल गुत्तेवाल्यांना सिल्हर मेडल्स मिळणार आहेत!

पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीच्या वेळीं आपल्या लोकांचीं पुष्कळ राज्यें होतीं. व तीं टिकविण्यासाठीं त्या त्या राज्यांतील लोक स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन ईस्ट इंडिया कंपनीच्या शिपायांपाशीं निकरानें लढत असत. परंतु आपल्याच देशांतील कित्येक घरबुडव्या फितुरी लोकांच्या घरभेदेपणामुळें त्यांचे लढाईतून पराभव झाले, आणि कंपनीच्या लोकांना विजय मिळाले! तेव्हां कंपनीच्या लोकांनीं स्वदेशभक्तीसाठीं लढणाऱ्या या पराक्रमी लोकांची फार तारीफ केली; व तुमच्यासारखे देशभक्त वीर दुसरे कोणी नाहींत, असेंही त्यांनीं त्यांना सांगितलें. परंतु पुढें त्यांनीं त्यांना असा उपदेश केला कीं, 'तुम्ही मोठे वीर खरे! परंतु आतां काय करणार? लढाईत पराभव झाल्यानंतर तुमच्या या शौर्याचा काय उपयोग? तेव्हां आतां ज्या देशाचें कल्याण करण्याकरितां तुम्ही इतके लढलां, त्या देशाचें यापुढें खरें कल्याण करण्याचें जर तुमच्या मनांतून असेल, तर तुम्ही आतां या देशामध्यें

शांतता आणि स्वस्थता उत्पन्न करण्याला मदत करा म्हणजे झालें !' हें म्हणणें पुष्कळांना सयुक्तिक वाटलें. व त्यामुळें स्वराज्यसंस्थापकमंडळ म्हणून त्यांची जी साऱ्या देशभर पसरलेली एक संस्था होती, ती मोडून टाकण्यांत आली; आणि तिच्या जागीं सुराज्यसंरक्षक मंडळ या नांवाची एक नवीन संस्था त्यांच्याकरितां काढून देण्यांत आली. तेव्हांपासून पूर्वीचे राजे, प्रधान, सरदार, दरकदार, मानकरी, शिपायी, शिलेदार, शूर, शहाणे, मुत्सद्दी, देशभक्त, वगैरे झाडून सगळे लोक या नवीन संस्थेमध्यें आपल्या देशाचें कल्याण करण्याच्या इच्छेनें नोकऱ्या पत्करून राहिले आहेत !

मुळशी पेट्यांतील लोकांच्या जमिनी पाण्यांत बुडूं लागल्या, तेव्हां त्या बुडूं नयेत, म्हणून तेथील लोकांनीं सत्याग्रह सुरू केला. व त्यांना या सत्कार्यामध्यें मदत करण्यासाठीं सत्याग्रहसंवर्धक या नांवाचीं अनेक मंडळें अनेक ठिकाणीं स्थापन करण्यांत आलीं. त्यानंतर मुळशी पेट्यांतील मावळ्यांनीं कांहीं वेळपर्यंत नेटानें आणि दृढनिश्चयानें सत्याग्रह केला; परंतु पुढें कित्येक महिन्यांनीं टाटा कंपनी मुळशी पेट्यांतील मावळ्यांना काँपेन्सेशनकरितां म्हणून सढळ हातानें पैसे देण्याचें आमिष दाखवूं लागल्यामुळें, व इतरही कित्येक परोपकारी मंडळींच्या सल्लामसलतीमुळें थोडेसे मावळे लोक पैसे घेऊं लागले. तेव्हां कित्येक कल्पक लोकांनीं अशी एक शक्कल काढली कीं, 'आतां एवी तेवी हे मावळे पैसे घेणार ! आणि टाटा कंपनीचें मुळशीच्या डोंगरांत धरण उभें राहणार ! तेव्हां आतां कांहीं केलें तरी जर हे मावळे पैसे घेतच आहेत, तर ज्या मावळ्यांच्या कल्याणासाठीं आपण झटत आहों, त्यांना कांहीं जास्त पैसे मिळवून देऊन तरी आपण त्यांचें कल्याण करूं या !' ही युक्ति निघाल्याबरोबर ती कित्येकांना पटली. व त्यामुळें मावळे जमिनीबद्दल जे पैसे घेतील, ते ठरल्याप्रमाणें तितके आहेत किंवा नाहींत, हें मोजून पाहणारें एक मंडळ स्थापन करण्यांत येणार आहे ! व त्यांना मिळणारे रुपये खरे आहेत किंवा खोटे आहेत, हें तपासून पहाणारें दुसरें एक मंडळ त्याच्याच पाठोपाठ लगेच स्थापन व्हावयाचें आहे !

# गरिबांचे गुप्त कष्ट.

एखाद्या व्यक्तीच्या खासगी कामांत त्याला कांहीं माहिती मिळवावयाची असली, तर ती तो स्वतः अगर आपल्या नोकराच्या किंवा मित्राच्या मदतीनें मिळवितो. परंतु ही पद्धत मोठमोठाल्या राज्यांच्या बाबतीमध्यें शक्य नसते. आणि म्हणून एखाद्या संस्थानाला, प्रांताला किंवा देशाला कांहीं एखाद्या विषयासंबंधानें खरी माहिती मिळवावयाची असली, तर त्याकरितां तेथील अधिकाऱ्यांना कमिट्या आणि कमिशनें नेमावीं लागतात; आणि त्यांच्या मार्फत साक्षीदार बोलावून माहिती मिळवावी लागते. व त्या माहितीवरून नंतर मग त्या विवक्षित प्रश्नाबद्दल साग्र रिपोर्ट तयार करून तो सरकारकडे सादर करण्यांत येतो. ही सरकारी पद्धत झाली. परंतु असलेच रिपोर्ट कोणी आपल्या स्वतःच्या हौसेसाठीं खासगी रीतीनें माहिती मिळवूनही कधीं कधीं तयार करितात. अशाच एका खासगी आणि अमॅटूर, म्हणजे स्वतःच्या हौसेकरितां कित्येक गृहस्थांनीं तयार केलेल्या, रिपोर्टपैकीं पुढील हकीकत आहे.

देशांत अलीकडे इतकी अस्वस्थता कां उत्पन्न होत आहे, हा खरोखर एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हा प्रश्न कांहीं दिवसांपूर्वीं एका मोठ्या डिबेटिंग क्लबनें विचाराकरितां आपल्या पुढें घेतला. या क्लबमध्यें पुष्कळ मोठमोठे विद्वान, संभावित आणि प्रतिष्ठित असे सभासद होते. या सभासदांनीं या प्रश्नाचा ऊहापोह करण्याकरितां व सर्व बाजूंनीं चौकशी करण्याकरितां आपल्यांतील कित्येक प्रमुख मंडळींचें एक अमॅटूर कमिशन नेमलें. व त्यांनीं या प्रश्नाची सांगोपांग चौकशी करून एक अमॅटूर रिपोर्ट तयार करावा असा ठराव केला. त्या ठरावाप्रमाणें त्या अमॅटूर कमिशनचे सर्व सभासद आपापल्या परीनें चौकशी करण्याकरितां निघाले. व निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांजवळ चौकशी करून आणि जरूर त्यांच्या लेखी साक्षीही घेऊन त्यांनीं सांप्रतच्या अस्वस्थतेचीं अनेक निरनिराळीं कारणें शोधून

काढिली. असली एखादी सरकारी चौकशी असली, म्हणजे सरकारच्या अमली दहशतीमुळें कित्येक खऱ्या गोष्टि त्या चौकशींत बाहेर निघूं शकत नाहींत. परंतु या खासगी चौकशींत तशी कांहीं एक भीति नसल्यामुळें या अमॅटूर कमिनच्या अमॅटूर सभासदांना सर्व गोष्टी लोकांकडून खुल्या दिलानें सांगण्यांत येत होत्या. त्यामुळें या कमिशनरांच्या दृष्टोत्पत्तीस आलेलीं नाहींत, अशीं चालू अस्वस्थतेचीं कोणतींही कारणें गुप्त राहिलीं नव्हती. आणि त्यामुळें या अमॅटूर कमिशनचा रिपोर्ट व्यापक आणि खात्रीलायक असा झाला होता. या कमिशनच्या पुढें हल्लीं देशांत कोठें कांहीं गुप्त कट कोणी अस्तित्वांत आणिलेले आहेत कीं काय, आणि आणिले असले तर त्यांचे सभासद कोण आहेत, त्यांचो संख्या किती आहे आणि ते कोठेंकोठें पसरलेले आहेत, वगैरेबद्दल माहिती काढण्याचाही एक महत्त्वाचा प्रश्न होता. या प्रश्नासंबंधानें त्या अमॅटूर कमिशनच्या सभासदांनीं अगदीं कसून चौकशी केली. पण त्यांना कोठें एक सुद्धां गुप्त कट उपलब्ध झाला नाहीं. कोठेंही बाँब तयार करण्यांत येत असलेले आढळले नाहींत, कोठें पिस्तुलें पुरून ठेवलेलीं सांपडलीं नाहींत, किंवा कोठें क्रांति करण्याच्या शपथा घेतल्याचे प्रतिज्ञालेखही दृष्टोत्पत्तीस आले नाहींत. तरी पण अस्वस्थतेचीं कारणें शोधून काढण्याच्या दृष्टीनें सर्वत्र तपास करीत असतांना त्यांना दुसऱ्या एका जातीचे गुप्त कट मात्र ठिकठिकाणीं आढळून आले. या कटांतून देशांतले सगळे गरीब लोक सामील असलेले नजरेस आल्यावरून त्या अमॅटूर कमिशनच्या सभासदांनीं या कटांना ' गरिबांचे गुप्त कट ' असें एक सामान्य हेडिंग देऊन त्या सदराखालीं या कटांतील लोकांसंबंधीची माहिती गोळा करण्याला सुरवात केली. त्या माहितीवरून पाहतां असें दिसतें कीं, हे गरिबांचे गुप्त कट फार भयंकर आणि क्रांतिकारक स्वरूपाचे असले पाहिजेत !

पूर्वीं वेळोवेळीं निरनिराळ्या देशांतून जे अनेक गुप्त कट झालेले होते, त्यांच्यापेक्षां हिंदुस्थानांतील हल्लींच्या ह्या गरिबांच्या गुप्त कटांतील सभासदांची संख्या अतिशय मोठी आहे. पूर्वींचे कटवाले हे पांच, दहा, पन्नास, शंभर, पांचशे, हजार, अशा संख्यांनीं फार तर मोजले जात असत. परंतु गुप्त कटांच्या इतिहासांतील कोणत्याही कटाच्या सभासदांची संख्या दोन चार हजारांच्या पेक्षां वर कधींही गेलेली नव्हती. परंतु हिंदुस्थानांतील ही

लोकसंख्या कित्येक कोटींच्याही वर गेलेली आहे. पूर्वीचे गुप्त कट मुख्य राजधानीच्या ठिकाणीं व इतर कांहीं मोठमोठ्या शहरांतूनच दबून राहिलेले असत; परंतु हे हिंदुस्थानांतील गरिबांचे गुप्त कट प्रत्येक शहरांतून आणि खेड्यापाड्यांतून पसरलेले आहेत. बाकीच्या गुप्त कटांतील कटवाले ओसाड जागांतून आणि रात्रीच्या काळोखांतून आपल्या कटांचीं खलबतें करीत असतात; व आपण एखाद्या कटांत सामील आहों, ही गोष्ट ते नेहमीं छपवीत असतात; आणि कदाचित् एखादे वेळीं पोलिसांनीं त्यांना पकडलें, तरी कटाशीं असलेला आपला संबंध प्राण गेला तरी ते कबूल करीत नाहींत. पण या गरिबांच्या गुप्त कटांच्या सगळ्याच पद्धति कांहीं विचित्र आणि विलक्षण आहेत. या गरिबांच्या कटांतील कटवाले आपल्या कटांतील कोणतीही गोष्ट झांकून ठेवीत नाहींत. पोलिसांची यत्किंचित्ही भीति न बाळगतां आपण या गरिबांच्या गुप्त कटांतील सभासद आहों, ही गोष्ट अगदीं भर दिवसा आणि भररस्त्यांतून ते मोठ्यानें पुकारून जगाला जाहीर करीत असतात.

या एवढ्या सगळ्या कटवाल्यांचा मूळ संस्थापक कोण आहे, याच्याबद्दल मात्र बरोबर पत्ता अद्यापि लागलेला नाहीं. शंभर दोनशें वर्षांच्या पूर्वीं हे कट कोठें तुरळक तुरळक देशांत होते. परंतु अलीकडे यांची संख्या फारच वाढलेली आहे. परंतु या कटांचा हा इतका मोठा प्रसार कोणी केला व याबद्दलचा मान कोणत्या महात्म्याला द्यावयाचा, हें अद्यापि कोणालाही निश्चित करतां आलेलें नाहीं. या देशांतील द्रव्य परदेशांत नेणाऱ्या महात्म्यांनीं हे कट वाढविले आहेत, असें कोणी म्हणतात; तर प्रत्येक खाण्यापिण्याच्या जिनसावर जबरदस्त कर बसविणारे लोक हे ह्या कटांच्या फैलावांचे अग्रगण्य आहेत, असें दुसरें मत आहे! परंतु कर वसुल करणारांपेक्षां कर्ज वसुल करणारे सावकारच रयतेला जास्त छळतात, म्हणून सावकार हेच ह्या गुप्त कटांचे उत्पादक असले पाहिजेत, असा आपल्यावरील दोष दुसऱ्यांवर टाकणाऱ्या कित्येक तत्त्वसंशोधकांचा अभिप्राय आहे. परंतु देशांत पिकून पैदा झालेलें धान्य परदेशांतील लोकांना पोसण्याकरितां आणि त्यावर पैसा मिळविण्याकरितां परमुलुखीं पाठविण्यांत येतें, यामुळें हे गरिबांचे गुप्त कट देशांत इतके बोकाळले आहेत, असा कित्येक अर्थशा-

ज्ञानभिज्ञ लोकांचा संशय आहे. परंतु या सगळ्या गुप्त कटांची प्रस्थापना खरोखर कोणी केली असेल, तर त्या कामांत मोठेमोठे पगार घेणाऱ्या किंवा येथील पैसा परदेशीं पाठविणाऱ्या कोणाही प्रामाणिक मानवी प्राण्याचा बिलकुल गुन्हा नसून ही सगळी लबाडी त्या विश्वासघातकी पावसाची आहे, असेंच बहुतेकांनीं ठरविलें आहे. हा पाऊस अतिशय आळशी आणि अनियमित आहे ! हल्लींच्या अमदानींत सगळे नोकर टाइमशीर आपआपल्या कामावर हजर होतात; परंतु हा पाऊस एक दिवस बरोबर वेळेवर आपल्या कामाला आला असेल तर शपथ ! माणसांची गोष्ट राहो, पण आकाशांतीलही बाकीचे काय थोडे लोक नियमितपणानें वागतात! सूर्य त्याला नेमून दिलेल्या वेळेवर उगवतो आणि चंद्राचे अस्तोदय गणिताच्या भानगडीचे असतांही तो आपली वेळ कधीं सुद्धां चुकवीत नाहीं. परंतु या सगळयांच्या उलट पावसाची गोष्ट आहे. पाऊस आपली ठरवून दिलेली वेळ कधींही बरोबर राखीत नाहीं ! असल्या अनियमित आणि बिन सुधारलेल्या आणि वेळेची किंमत न जाणणाऱ्या लोकांच्या पुढें चांगल्या नीतिसंपन्न आणि धर्मभीरु राजांनीं तरी काय करावयाचें! पावसावर तोफ उडवून एखाद्या जमिनीवरील शत्रूप्रमाणें त्या आकाशांतील सुराज्याच्या शत्रूला वठणीवर आणावें आणि अतिशय दयार्द्रतेनें त्याच्या अंगाच्या चिंधड्या उडवून त्याच्या अंगांतील सर्व पाणी नाहींसें करून टाकावें, म्हणून प्रयत्न करण्यांत आले. परंतु त्या पावसाच्या पलटणींतील ढग हे इतके पळपुटे शिपायी आहेत कीं, ते तोफांच्या माऱ्याच्या जवळ येतच नाहींत ! असला हा दुष्ट आणि लबाड पाऊस या सगळ्या गरिबांच्या गुप्त कटांसारख्या संकटपरंपरांचा मुख्य उत्पादक आहे, असेंच बहुतेक श्रीमंत आणि समंजस लोकांचें निश्चयात्मक मत आहे. पाऊस पडला नाहीं, म्हणजे दुष्काळ पडतो; आणि दुष्काळ पडला, म्हणजे या गरिबांच्या गुप्त कटांतील सभासदांची संख्या हजारांनीं आणि लाखांनीं भराभर वाढूं लागते. फॅमिन कोडच्या कागदी कलमांनीं कितीही शिकस्त केली, तरी त्या कनवाळू कायद्याला सुद्धां न जुमानतां बेकायदेशीरपणानें आणि गैरसनदशीरपणानें लाखो लोक या गरिबांच्या कटांत राजरोसपणानें आपलीं नांवें नोंदवितात ! सारांश, या गरिबांच्या गुप्त कटांचा उत्पादक एक असा कोणी महात्मा पुढारी नसून हे कट उत्पन्न केल्याचा आरोप

पुष्कळांवर ठेवण्यांत येतो; पण तो आरोप सिद्ध मात्र कोणावरच होत नाहीं. कारण, प्रत्येक जण आपआपल्या वकिलांना पुढें करून आपल्यावरील खरा आरोप नाशाबित करण्याचा नेहमीं लबाडीचा प्रयत्न करीत असतो. फक्त ज्याच्या बाजूनें बोलणारा कोणी वकील नाहीं, असा आरोपी बिचारा काय तो पाऊस हा एकटाच असल्यामुळें त्याच्यावरच बहुतेक आरोपाची शाबिदी झाली आहे. मात्र त्याला शिक्षा काय द्यावयाची, एवढेंच काय तें ठरावयाचें राहिलें आहे. कारण, अनेक वेळां तोफेच्या तोंडीं देऊन देखील जो अजूनपर्यंत साऱ्या आकाशभर आपलें काळें कुट्ट तोंड घेऊन निर्लज्जपणानें गर्जना करीत फिरत असतो, त्याला आतां काय शिक्षा द्यावी, हेंच अद्यापि कोणाला समजत नाहीं. त्याला हिमालयांत पाठवावें, तर तो आधींच हिमालयामध्यें असतो ! बरें, त्याला हद्दपार करावें, तर तो नेहमींच हद्दपार असतो !

या गरिबांच्या गुप्त कटांच्या उत्पादकाबद्दल जरी अशा प्रकारचा थोडासा घोटाळा असला, तरी या कटांतील कटवाल्यांची अस्वस्थता उत्पन्न करण्याची पद्धत अगदीं ठराविक आहे. पण ती राजकीय, सामाजिक, वगैरे दृष्टींनीं पहातां अतिशय भयंकर आहे. ह्या कटांतलि लबाड कटवाले लोकांच्या मनांत अस्वस्थता उत्पन्न करण्याकरितां अनेक लोकाकर्षणाच्या युक्त्या उपयोगांत आणीत असतात. आलम दुनियेंतील सगळे बिचारे श्रीमंत लोक दिवसांतून दहा पांच वेळां तरी पोटभर खाण्याचा पौष्टिक परिपाठ ठेवीत असतां, हे गुलाम नेहमीं अर्धपोटीं उपाशी राहतात ! आणि तुम्ही असले हे गुन्हे कां करतां, म्हणून कोणी एखाद्या अंमलदारानें त्यांना दरडावून विचारलें, तर 'काय करावें? आम्हांला पैसा मिळत नाहीं !' असें कांगाव करतात ! लोकांना दहा दहा पांच पांच हजार रुपये सुद्धां पगार मिळत असतां यांना दिवसाचे दोन आणे देखील मिळत नसतील, हें कोणाला खरें तरी वाटेल काय ? हे लोक रस्त्यांतून मुद्दाम चिंध्या पांघरून हिंडत फिरत असतात. यांना धडके कपडे वापरण्याला काय झालें ? आणि ते फाटलेले असले, तर ते शिंप्याकडून यांनीं शिवून घ्यावयाला पाहिजे होते ! बिचारे धनाढ्य लोक आपले कपडे पैदा करण्याकरितां किती तरी काबाड कष्ट करीत असतात ! आपल्या देशांत चांगले कपडे मिळाले नाहींत

तर—आणि मिळाले तरीही—हजारों कोसांवरून कपडे आणवून ते वापरतात. आणि एकावर दुसरा, दुसऱ्यावर तिसरा, असे एकावर एक कपड्यांचे थरावर थर देऊन ते बिचारे आपल्या शरीराचे सर्व भाग झांकून टाकण्याबद्दल कोण जिवापाड काळजी बाळगीत असतात! आणि हे कटवाले आपल्या अंगावर एकही धड कपडा न घालतां उघडेवाघडे फिरत असतात, याला काय म्हणावें! आपलें नाक कापून दुसऱ्याला अपशकुन करणारे हे लोक भर दुपारींही एखाद्या बंगल्यांत विश्रांति न घेतां उन्हातान्हांतून घाम पुशीत कामें करीत असतात! रात्रीच्या वेळीं घरांतून न निजतां उघड्यावर गटारावर किंवा रस्त्यावर निजतात! थंडीच्या दिवसांत हे राजद्रोही लोक उबदार लोकरीचे कपडे बिलकुल वापरावयाला घेत नाहींत! आणि पावसांत चिखलांतून कामें करण्याची हे लबाड लोक कधींही किळस दाखवीत नाहींत! तसेंच एखादा सांथीचा रोग आला, तर आरोग्यशास्त्राच्या नियमाप्रमाणें न वागतां किंवा हवा बदलण्याकरितां दुसऱ्या कोठें न जातां किंवा चांगल्या डॉक्टरचें औषध न घेतां मरण्याच्या कामांत अतिशय घाई करतात! अस्वस्थता उत्पन्न करण्याच्या बाबतींतील या कटवाल्या लोकांच्या अशा ह्या अनेक युक्त्या आहेत. परंतु ह्या गैरकायदेशीर युक्त्या बंद पाडण्याकडे कायद्याचें अद्यापि लक्ष जात नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे!

पूर्वी एकदां एका बादशहाच्या वेळीं, असें सांगतात कीं, एक मोठा दुष्काळ पडून त्या योगानें हे असलेच गरिबांचे गुप्त कट त्याच्या राज्यांत पुष्कळ वाढत चालले होते. त्या वेळीं आपल्याला खावयाला पोटभर भाकरी मिळत नाहीं अशी जो जो कोणी त्याच्याकडे तक्रार नेई, त्याला, ' घीशक्कर क्यौं नहीं खाते ? ' असा तो रागावून हुकूम करीत असे. आणि या कायद्याच्या हुकमानें त्यानें आपल्या राज्यांतील हा गरिबांचा गुप्त कट थोडक्याच दिवसांत बहुतेक मोडून टाकिला; कारण, त्या गरिबांच्या कटांतील सर्व कटवाले लवकरच भुकेनें व्याकुळ होऊन मरण पावले! पण अखेरीस त्या राजाच्या बादशाही अमलामध्यें त्यामुळें त्या कटाचा कोठें गंधही राहिला नाहीं! पण तसले ते जुने आणि रानटी मोंगली कायदे हल्लींच्या ह्या सुधारलेल्या काळाला फारसे उपयोगी पडण्यासारखे नाहींत. तरी पण त्याच तत्त्वावर हल्लींही ह्या गरिबांच्या बंडाला

कांहीं तरी प्रतिबंध घालणें जरूर आहे. गरिबांनीं भीक मागूं नये आणि कोणी भीक मागतांना आढळला तर त्याला पोलिसांनीं पकडावें, असे श्रेयस्कर कायदे कित्येक मोठमोठ्या शहरांतून चालू आहेत. त्यामुळें असा फायदा झाला आहे कीं, तेथें कोणी भिकारी न उरल्यामुळें तीं शहरें श्रीमंत झालीं आहेत! पण बाकीच्या बाबतींतही कांहीं सुधारणा व्हावयाला पाहिजे आहेत. कोणीहि गरिबांनीं अर्धपोटीं राहतां कामा नये, या गरिबांच्या गुप्त कटांतील कोणाही कटवाल्याच्या पोटाला भाकाळी पडलेली असतां कामा नये, किंवा कोणाचेही गाल बसलेले दिसतां कामा नयेत, अशी दवंडी पिटवून सक्त ताकीद दिली पाहिजे. इतकेंच नव्हे, तर हल्लीं दडपशाहीच्या कायद्यांच्या विरुद्ध जरी ओरड करण्यांत येत आहे, व ते सगळे बंद करावेत अशा जरी मागण्या करण्यांत येत आहेत, तरी एखादा तरी दडपशाहीचा कायदा करून आणि तो स्टॅटयूट बुकावर कायम ठेवून त्या दडपशाही कायद्याच्या दडपशाहीनें हें गरिबांच्या गुप्त कटांचें बंड मोडून टाकणें अत्यंत अवश्यक आहे. हल्लीं आपल्याला कौन्सिलचे नवीन अलोट हक्क मिळालेले आहेत. त्यांपैकीं एखाद्या हक्काचा उपयोग करून हिंदुस्थानांत आपण कोणीहि गरीब उरू दिले नाहींत, तर त्याच्यापासून हिंदुस्थानांतील अस्वस्थतेचें एक मोठें थोरलें कारण नाहींसें होईल!

पूर्वीं सांगितलेल्या अमेंदुर कामिशन मधील सभासदांच्या रिपोर्टांतील या गरिबांच्या गुप्त कटावरील रिपोर्टांतील सारांश वर दिल्याप्रमाणें आहे. या रिपोर्टाला फक्त एकाच सभासदानें काय तें आपलें मिनिट ऑफ डिसेंट जोडलें आहे. त्याचें साधें आणि ममताळूपणाचें म्हणणें असें आहे कीं, या कटांतील लंगड्या पांगळ्या आणि बिन काम करणाऱ्या बंडवाल्यांची संख्या कांहीं तात्कालिक उपायानें एकदम कमी करतां आली, तर एखाद्या व्यस्त पंचराशिकांतल्याप्रमाणें जितकी लोकसंख्या कमी होईल, तितकें हिंदुस्थानांतलें अन्न ज्यास्त दिवस पुरेल! व अशा युक्तीनें आपला हिंदुस्थान देश आपल्याला एकदम जगाला श्रीमंत करून दाखवितां येईल! पण ही सूचना बाकीच्या कमिशनरांना बिलकुल मान्य नाहीं!

---

# पेणची परिषद.

गेल्या आठवड्यांत कुलाबा जिल्ह्यातर्फे पेण येथें महाराष्ट्र प्रांतिक परिषदेची बैठक रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. कांग्रेसच्या नवीन घटनेप्रमाणें झालेल्या परिषदांपैकीं पहिली परिषद गुदस्त सालीं वसई येथें ठाणें जिल्ह्यामार्फत भरली होती; आणि यंदाची दुसरी परिषद कुलाबा जिल्ह्यामार्फत पेण येथें भरली. व याच्या पुढील तिसऱ्या परिषदेचें आमंत्रण रत्नागिरी जिल्ह्यातर्फे देण्यांत आलें आहे. ह्या प्रांतिक परिषदांच्या बैठकींचा प्रवाह ठाणें, कुलाबा, रत्नागिरी, अशा ओघानें जो जात आहे, त्याच्या योगानें ह्या समुद्र कांठच्या मागसलेल्या प्रांतांचा पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. कर्नाटक प्रांताची परिषदही यंदा समुद्रकांठच्या मंगलोर जिल्ह्यांत भरलेली होती. अशा रीतीनें हिंदुस्थानचा समुद्रकांठचा जो पश्चिम किनारा आहे, त्या लगतच्या जिल्ह्यांतून हें राष्ट्रीय आणि राजकीय मतप्रसाराचें कार्य घडून येत आहे, ही फार अभिनंदनीय गोष्ट आहे. इतर जिल्ह्यांतून आगगाड्या वगैरे दळणवळणाचीं पुष्कळ साधनें उपलब्ध असल्यामुळें तिकडे राजकीय मतांचा जितका फैलाव झालेला आहे, तितका ह्या समुद्रकांठच्या जिल्ह्यांतून झालेला नाहीं. परंतु तो होणें अत्यंत अवश्यक आहे. आणि अशा दृष्टीनें पाहतां यंदाची परिषद कुलाबा जिल्ह्यांत झाली व पुढल्या वर्षाची रत्नागिरी जिल्ह्यांत भरणार आहे, ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे.

मागील परिषदांतून मंडप, छतें, झालरी, खुर्च्या, टेबलें, वगैरे अनवश्यक बाबतींमध्यें लोकांचा पुष्कळ पैसा विनाकारण फुकट जात असे. ती पद्धत बदलून हल्लीं या परिषदांमधून जी एक अगदीं साधेपणाची प्रवृत्ति दिसून येऊं लागली आहे, ती हितावह असल्यामुळें तिलाच उत्तरोत्तर उत्तेजन मिळणें श्रेयस्कर आहे. पेणची परिषद एका आमराईच्या

बागेमध्येंच भरविण्यांत आलेली असल्यामुळें नैसर्गिक सौंदर्य आणि जरुरीचा साधेपणा यांचा मिलाफ फारच चांगला जमून आलेला होता. पूर्वींचे ऋषि अरण्यांतील एखाद्या वृक्षाच्या छायेखालीं बसूनही आपलीं अतिशय उदात्त अशीं धार्मिक तत्त्वें प्रतिपादन करीत असत. त्याच वळणावर हल्लीं आपल्या परिषदा चाललेल्या आहेत, हें पाहून कोणालाही समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं. वसईस नारळीपोफळींची बाग होती, तर पेणेस आम्र-वृक्षांच्या वनवाटिकेनें लतापल्लवांनीं सुशोभित केलेला आपला नैसर्गिक मंडप या कार्याकरितां मोफत वापरण्याला दिला होता!

अशी पवित्र जागा प्राप्त झाली असतां तेथें पवित्र परिणामाचीं बीजेंच पेरण्यांत येणें जरूर आहे. व असा पवित्र परिणाम हल्लींच्या राजकीय परिस्थितीच्या दृष्टीनें पाहतां हिंदुस्थानची एकी हाच होय. ह्या एकीला जेणेंकरून धक्का लागेल, अशी कोणतीही गोष्ट कोणी कोणत्याही कारणा-साठीं करणें इष्ट नव्हे. त्या एकीला मदत करण्याचें धर्मकृत्य आपल्या हातून होत नसेल, तर क्षणभर स्वस्थ बसावें; पण त्या एकीचा बिघाड करण्याला कारणीभूत होण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा कोणीही धरूं नये. पेणच्या परिषदेमध्यें पास झालेले ठराव आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलेच आहेत. त्यांतील कित्येक ठराव स्थानिक महत्त्वाचे आहेत. कुलाबा जिल्ह्यापैकीं पेण तालुक्यांतील सावकार आणि कुळें यांच्या दरम्यान आज एक दोन वर्षें कांहीं वाद माजून राहिला आहे. त्या वादाचा आपसांतील पंचायतीमार्फत निकाल व्हावा, अशाबद्दलचा रा. रा. नरसोपंत केळकर यांनीं मांडलेला ठराव स्थानिक लोकहिताच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. याशिवाय सोलापुर जिल्ह्यापैकीं माळशिरस तालुक्यांतील शेतसाऱ्याच्या वाढीविरुद्ध तक्रार, स्वदेशीचा प्रसार, संस्थानांतील प्रजेचीं गाऱ्हाणीं, मद्यपानप्रसाराचा निषेध, मुळशी सत्याग्रहाला मदत, लँड आक्विझिशन कायद्याची दुरुस्ती, म. गांधींना शिक्षा झाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन, वगैरे एकंदर २१।२२ ठराव पेणच्या परिषदेमध्यें पास झाले. परंतु या सर्वांपेक्षा ज्या ठरावावर विशेष वादविवाद झाला, तो ठराव म्हटला म्हणजे कांग्रेसच्या कार्यक्रमा-संबंधींचा होय. कलकत्त्याच्या कांग्रेसमध्यें कौन्सिलांवर बहिष्कार घालून असहकारितेचा जो कार्यक्रम सुरू करण्यांत आला, त्यांत जरूरीप्रमाणें थोडे

बहुत फेरफार होत जाऊन तो कार्यक्रम नागपूरच्या व अमदाबादच्या कांग्रेसमधून हल्लीं राष्ट्राच्या पुढें मांडण्यांत आलेला आहे. त्याप्रमाणें अमदाबादच्या सभेंत असहकारितेचा जो कार्यक्रम ठरला आहे त्याला अनुसरून लोकांनीं वागावें, असें पेणच्या परिषदेनें ठरविलें आहे. व त्यांत कांहीं फेरफार सुचविणें असल्यास योग्य चौकशी करून ज्या कांहीं सूचना कर्तव्य असतील त्या ऑल इंडिया कांग्रेस कमिटीकडे सुचवाव्या, अशीही पुस्ती त्या ठरावाला जोडण्यांत आली आहे.

हा निकाल पाहिला असतां ह्यांत मतमतांतरें उत्पन्न होण्यासारखें आणि वादविवाद करण्यासारखें सकृद्दर्शनीं तरी निदान वरवर पहाणाराला कांहींच दिसत नाहीं. परन्तु या वादाचीं पाळेंमुळें फार दूरवर गेलेलीं आहेत. लोकमान्य टिळक हे निवर्तले आणि महात्मा गांधी यांचा कार्यक्रम कलकत्त्याच्या स्पेशल कांग्रेसमध्यें बहुमतानें स्वीकारण्यांत आला, तेथपर्यंत खोल याचीं पाळेंमुळें गेलेलीं आहेत. लो० टिळक यांनीं गंगापुरच्या स्टेशनवरून पाठविलेल्या एका तारेमध्यें Responsive co-operation म्हणजे प्रतियोगी सहकारिता हा शब्द वापरला होता, आणि कलकत्त्याच्या स्पेशल कांग्रेसमध्यें म. गांधी यांचें असहकारितेचें तत्त्व सर्व राष्ट्रानें बहुमतानें स्वीकारलें, या गोष्टींपर्यंत या वादाचीं पाळें मुळें खोल आणि दूरवर गेलेलीं आहेत. कै. लो. टिळक हे हयात होते तोंपर्यंत त्यांनीं देशाच्या उन्नतीकरितां आटोकाट प्रयत्न केले, याच्याबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं; व त्याबद्दल सर्व लोक त्यांचे अत्यंत ऋणीही आहेत. परंतु त्याकरितां म. गांधी यांनीं त्यानंतर केलेल्या देशसेवेची किंमत कमी करण्याचा प्रयत्न करणें हें केव्हांही श्रेयस्कर नाहीं. म. गांधींच्या मागील राजकीय वर्तणुकीमध्यें कित्येक न्यूनता असतील व हल्लींच्या त्यांनीं आंखून दिलेल्या असहकारितेच्या कार्यक्रमामध्यें अनेक दोषहीअसतील. तरी पण त्यांनीं आपल्या असहकारितेच्या कार्यक्रमानें देशामध्यें हल्लीं जो कल्पनातीत परिणाम उत्पन्न करून दिला आहे, तो त्यांच्या शत्रूंनाही नाकबूल करितां यावयाचा नाहीं. आजपर्यंतच्या कोणाच्याही आणि कोणत्याही कार्यक्रमानें जितकें कार्य घडून आलें नाहीं, तितकें प्रचंड कार्य म. गांधी यांच्या असहकारितेच्या कार्यक्रमानें फक्त वर्ष दीड वर्षाच्या अवधींत उत्पन्न करून दाखविलें आहे. इतक्या उत्कृष्ट आणि

उपयुक्त कार्यक्रमांतील छिद्रें शोधीत न बसतां त्याचा जास्त उपयोग करून घेण्यांतच जास्त शहाणपणा आहे. तरी पण कित्येकांना असें वाटत नाहीं, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. व ते आपलें सर्व बुद्धिसर्वस्व म. गांधींच्या चुका मोजून दाखविण्यामध्येंच प्रदर्शित करीत आहेत. पण अशानें राष्ट्राचें नुकसान होत आहे. व ज्या वेळीं राष्ट्रांत एकीच उत्पन्न झाली पाहिजे, त्या वेळीं राष्ट्रांत भांडणें उत्पन्न करणारे हे लोक आपल्या राष्ट्राचें हित करण्याच्या प्रामाणिक आणि प्रशंसनीय बुद्धीनें राष्ट्राचें प्रचंड आणि प्रमाणातीत नुकसान मात्र करीत आहेत!

राष्ट्रहित करण्याच्या ह्या नवीन प्रवृत्तीचें प्रदर्शन प्रकट रीतीनें अकोल्याच्या परिषदेपासून होण्याला सुरवात झालेली आहे. त्याच्या पूर्वीं ही राष्ट्रहित करण्याची इच्छा कित्येक डोक्यांतून कित्येक दिवसपर्यंत कलकत्त्यापासून कदाचित् गुप्त रीतीनें धुमसत असेल. परंतु अनेक झांकणांखालीं तयारी होतां होतां अखेरीस त्याच्या ज्वाळा अकोला येथें स्पष्ट रीतीनें बाहेर पडल्या! व तेव्हांपासून हा राष्ट्रहितसाधनाचा सपाटा सुरू झाला! यांतील पहिली मागणी अशी होती कीं, गांधी हे एक भ्रमिष्ट आणि वेडगळ साधुवृत्तीचे मनुष्य असल्यानें व त्यांच्या विचारांत अनेक ढोबळ चुका असल्यानें अशा माणसांच्या हातीं हें राजकारणाचें काम न ठेवतां राष्ट्रहित करण्याचा सगळा मक्ता अमुक अमुक आणि कंपनी, यांच्या हातीं देण्यांत यावा! परंतु वेडगळ राष्ट्राचा विश्वास म. गांधींवर जितका बसला होता, तितका दुर्दैवानें या नवीन निघालेल्या कंपनीवर बसला नाहीं. व त्यामुळें राष्ट्रानें यांच्या म्हणण्याकडे फारसें लक्ष्य दिलें नाहीं. तरी पण म. गांधी यांनीं यांच्या म्हणण्यांतील जें कांहीं सार घेण्यासारखें होतें, त्याचें ताबडतोब ग्रहण केलें. परंतु आपला चोथाही म. गांधी यांनीं अमूल्य म्हणून ठरविला नाहीं, याबद्दल या लोकांना विषाद वाटला. व त्यांनीं आपल्या चोथ्याला जास्त किंमत येण्यासाठीं फिरून जोराची चळवळ सुरू केली!

आपल्या म्हणण्याला वजन येण्याकरितां या पक्षांतील लोकांनीं लो. टिळकांच्या नांवाचाही फायदा घेण्याचा प्रयत्न केला आहे. स्वतःच्या वजनानें म. गांधी ऐकत नाहींत, तेव्हां लो. टिळक यांनाही थोडीशी तसदी देणें या लोकांना जरूरीचें झालें आहे. लो. टिळक यांनीं गंगापुरच्या स्टे-

शनवरील एका तारेंत " प्रतियोगी सहकारिता " हा शब्द वापरला होता, त्याची आठवण होऊन म. गांधींच्या असहकारितेच्या तत्त्वाविरुद्ध लढण्याकरितां या लोकांनीं लो. टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेची ढाल पुढें केली आहे. व गांधींच्या विरुद्ध टवाळी न करणें म्हणजे कै. लो. टिळकांशीं राजद्रोह करण्यासारखें आहे, असेंही नवीन एक मत प्रस्थापित करण्यांत आलें आहे. व लो. टिळकांचे पूर्व युगांतील जे अनुयायी असतील, त्यांनीं या बदललेल्या युगामध्यें देखील त्या " प्रतियोगी सहकारिते " च्या ढालीच्या खालींच दडलें पाहिजे, असा राजनिष्ठेचा एक नवीन धर्म प्रचलित करण्यांत आलेला आहे. अशा प्रकारच्या अनेक विचारांची गुंतागुंत हल्लीं कित्येक राजकारणाच्या भागांतून उत्पन्न झाली आहे. व त्यामुळें हल्लीं निरर्थक रणें माजत आहेत. आणि खरें राष्ट्रहित बाजूला राहून पोरकटपणाचीं प्रदर्शनें मात्र ठिकठिकाणीं सुरू झालेलीं आहेत. परंतु आपल्याला खरोखर करावयाचें आहे काय, इकडे लोकांनीं आपलें लक्ष लाविलें पाहिजे. लो. टिळक आणि म. गांधी हे दोघेही सर्वांना सारखेच वंदनीय आहेत. परन्तु लो० टिळक हे म. गांधींपेक्षां किती तरी जास्त मोठे होते; असें मानणें ज्यांना जरूर असेल, त्यांनीं तसेंही जरूर मानावें. त्याबद्दल कोणाचाही वाद नाहीं. गांधी मोठे कीं टिळक मोठे आणि यांच्या तुलनेपासून काय सिद्ध होतें, हा कांहीं हल्लीं राष्ट्रापुढें प्रश्न नाहीं. आपला देश स्वतंत्र आणि स्वराज्ययुक्त कसा होईल, हा लोकांपुढें मुख्य प्रश्न आहे. आणि हा प्रश्न वडिलांच्या कीर्ती गाऊन सुटण्यासारखा नाहीं. याच्याकरितां राष्ट्रामध्यें जितकी एकी उत्पन्न होईल, तितकी पाहिजे आहे. कार्यक्रम कोणताही असो, तो म. गांधींचा असहकारितेनें स्वराज्य मिळविण्याचा असो किंवा लो० टिळकांचा निग्रहानें होमरूल मिळविण्याचा असो, त्याच्यामध्यें सर्व लोकांची एकवाक्यता होईल, तर त्या वृक्षाला सहजगत्या यशस्वितेचीं फळें आल्यावांचून राहणार नाहींत. आणि म्हणूनच म. गांधी हे वारंवार असें म्हणत असत कीं, कोणताही कार्यक्रम झाला, तरी तो आपल्याला स्वराज्य देईल, असा दृढ विश्वास तुमच्या मनांत तुम्ही उत्पन्न करा ! फळ विश्वासांत आहे. कार्यक्रमाच्या पोटभेदांत नाहीं. सामर्थ्य हें मनुष्याच्या मानसिक विश्वासामध्यें आहे. कोळ्याच्या लाळेपासून निघणाऱ्या तंतुजाळाप्रमाणें

एखाद्या मनुष्याच्या कल्पनेंतून दिवसांतून तीनदां प्रसव पावणाऱ्या स्कीम्स-मध्यें नसतें. म. गांधींचा कार्यक्रम निर्दोष म्हणून नव्हे, तर त्यांच्या अध्यात्मिक बलावर लोकांचा विश्वास म्हणून, असंख्य लोक त्यांचे अनुयायी बनले आहेत. तुमच्या स्कीमध्यें तार्किक दृष्ट्या बिलकुल दोष नसतील, पण तुमच्यावर लोकांचा बिलकुल विश्वास बसत नाहीं, या दुर्दैवाला आपण काय करणार ?

शिवाय दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, ज्यांना म. गांधींच्या कार्यक्रमामध्यें लो. टिळकांच्या निर्दोषी अशा प्रतियोगी सहकारितेपेक्षां अनेक दोष दिसत आहेत, त्यांनीं हे दोष दुरुस्त करण्याचें अप्रिय काम करीत बसण्याचें काय प्रयोजन आहे ? लो. टिळकांनीं होमरूल लीग स्थापन केलेली आहे ! ती निर्दोष आहे ! ती फलदायक होणारीही आहे ! मग त्या होम रूल लीगच्या, अगर तिच्या नवीन बदललेल्या नांवाच्या, द्वारानेंच काम करून हे लोक आपल्या कार्यक्रमामध्यें यशस्विता कां उत्पन्न करून घेत नाहींत ? इंडियन लोकांना म. गांधींचें स्वराज्यच पाहिजे आहे, असें नाहीं; ज्या लीगच्या लोकांच्या अंगामध्यें इतकी मोठी कार्यक्षमता आहे, त्या लीगच्या मार्फत लोकांना होम रूल मिळाला, तर तोही लोकांना नको आहे असें नाहीं; त्याचाही सर्व लोक मोठ्या आनंदानें स्वीकार व स्वागत करतील. म. गांधींच्या कार्यक्रमांतील चुका आधीं दुरुस्त करून मग त्यांच्या ओंजळीनें स्वराज्याचें पाणी पिण्यापेक्षां आपल्या कर्तबगारीच्या जोरावर टिळक स्वराज्य संघाच्या द्वारानेंच या वीरांनीं हिंदुस्थानांत स्वराज्य घुसडून दिलें, तर तेंच जास्त चांगलें नव्हे काय ? हल्लींच्या सारखीं शुष्क भांडणें उत्पन्न करण्यापेक्षां त्यांनीं हा होमरूलचा दरवाजा उघडला, तर लोक त्यांना जास्त दुवा देतील ! गांधी काय बिचारा वेडा ! शहाण्या माणसांनीं त्याच्या पाठीस लागण्यांत काय पुरुषार्थ ? होमरूल लीगच्या द्वारानें स्वराज्य मिळविण्याला उलट आडकाठी कोठेंच नाहीं ! कार्यक्रमांत सदोषता नाहीं ! सभासदांत धर्मवेडा मनुष्य नाहीं ! सभासद होण्याला आचरट अडवणुकीची शपथ नाहीं ! वाटतील तशीं माणसें संग्रहीं आहेत ! पैशाची तर मुळींच दद्यात नाहीं ! आपल्या होमरूल लीगचें काम आपल्या अनुयायांनीं पुढें चालवून आपल्या देशाला लवकर होमरूल मिळवून द्यावा, म्हणून लो. टिळ-

कानीं लाख दीड लाखाची पुंजीही जमवून ठेविली आहे! पण इतकी सामग्री असतांना आणि विधायक कामगिरी करण्याला इतकीं साधनें हातीं असतांना लोकमान्यांच्या पाठीमागें या बृहन्महाराष्ट्रानें काय केलें? आणि होमरूल किती जवळ आणून दाखविला? म. गांधींच्या कार्यक्रमावर विघातक टीका करीत बसण्यापेक्षां जर बृहन्महाराष्ट्रानें होमरूल कांहीं थोडा बहुत तरी जवळ आणिला असता, तर लो. टिळकांना खात्रीनें जास्त आनंद झाला असता!

परंतु असो. हल्लींची वेळ अशी आहे कीं, आपल्या सर्वांना एक होतां आलें, तर शक्य त्या प्रयत्नानें आपण एक झालें पाहिजे. भांडण वाटेल तेव्हां करितां येईल. पण कांहीं एक मर्यादा उल्लंघन करून गेल्यानंतर मग एकी उत्तरोत्तर जास्त दुर्घट होत जाते. म्हणून भांडणें वाढविण्यांत अर्थ नाहीं. मागें चुका झाल्या असल्या, तर त्या पुढें न होतील एवढी खबरदारी बाळगून आपण यापुढें तरी एकीनें वागलें पाहिजे. सरकारशीं नॉन-को-ऑपरेशन करण्याचें थांबवून आपण आपसांमध्येंच नॉन-को-ऑपरेशन करूं लागलों, तर मग सरकारला याच्यापेक्षां आणखी जास्त तें काय पाहिजे? याकरितां कोणी कोणाच्या उखाळ्या पाखाळ्या न काढतां दोघांनीं मिळून तिसऱ्यांच्या उखाळ्या पाखाळ्या काढण्यारितां एक झालें पाहिजे, तरच आपल्याला स्वराज्य मिळेल. व्यक्तींच्यासाठीं देश नाहीं, देशासाठीं आपण सर्व व्यक्ति आहों, ही उच्च आणि उदात्त भावना आपण आपल्या मनांत बाळगिली, तर परमेश्वर आपल्याला अजूनही स्वराज्याच्या सुखाचे दिवस खात्रीनें लवकर दाखवील!

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# गिधाडी आनंद

पुण्याची परिषद झाल्यापासून राष्ट्रीय पक्षाच्या विचारसरणींतील कित्येक मतभेद जास्त स्पष्टतेनें लोकांच्या पुढें येऊं लागलेले आहेत. त्या मतभेदांचा जो कांहीं योग्य निर्णय लावावयाचा, तो राष्ट्रीय पक्ष आपसांत सलोख्यानें आणि तडजोडीनें लावीलच. परंतु हा मतभेद पुण्यांतील कित्येक वर्तमानपत्रांना क्षणैक अतिशय आनंद उत्पन्न करण्याला कारणीभूत झालेला आहे, याबद्दल मात्र शंका नाहीं. दुसऱ्यांच्यामधील मतभेदांच्या योगानें असला हा जो नीच, तामसी आणि आसुरी वृत्तीचा आनंद कोणाकोणाला वाटूं लागतो, त्याला गिधाडी आनंद हेंच नांव योग्य आहे. एखाद्या ठिकाणीं प्लेग किंवा कॉलरा झाला, तर त्याबद्दल मानवी प्राण्यांच्या त्या दैवी आपत्तीबद्दल प्रत्येकाला अतिशय खेद वाटतो. व परमेश्वरानें आपल्यावरील हें अरिष्ट टाळावें, अशी लोक प्रार्थना करितात! पण गिधाडांना मात्र अशा प्रसंगीं किती तरी आनंद होत असतो. आपल्याला पुष्कळ भक्ष्य खावयाला सांपडेल, ह्या आशेनें गिधाडांचा आनंद आकाशांतही मावेनासा होतो. तशी स्थिति येथील कित्येक पत्रांची झालेली आहे. ही त्यांची स्थिति पाहून वेणीसंहार नाटकाच्या तिसऱ्या अंकाच्या प्रारंभीं दिसणाऱ्या वसागंधा आणि रुधिरप्रिय या राक्षसी जोडीची कोणालाही आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं. कौरव आणि पांडव हे आपसांत लढूं लागल्याबद्दल सर्वांना वाईट वाटलें. परन्तु परमकारुणिक पंडिता वसागंधा हिचे विचार त्या कौरवपांडवांच्या युद्धाच्या संबंधानें अगदीं वेगळे होते. तिच्या शांतिसूक्तांतील पहिलें वचन असें होतें कीं, 'अनिशं च पिबामि शोणितं समरं वर्षशतं भवतु!' असलीं युद्धें शेंकडों वर्षेंपर्यंत चाललीं, म्हणजे मला नेहमीं रक्त प्राशन करण्याला मिळेल, अशी श्रीमती देवी वसागंधा हिची सदिच्छा होती! तशीच इच्छा ह्या कित्येक पत्रकारांची असल्याचें दिसून

येत आहे. भारतीय युद्धांत रक्तमांसादिकांचे हजारों कुंभ मी भरून ठेवीन आणि मग ते दररोज मधून मधून मी उपयोगांत आणीन, ही जशी कुटुंबिनी वसागंधा हिची दृष्टि होती, त्याचप्रमाणें ह्या दुसऱ्यांच्या भांडणांतील उखाळ्या पाखाळ्यांनीं आपण आपले लोणच्याचे रांजण भरून ठेविले, तर ते आपल्या पत्राचा नीरसपणा दवडण्याला पुष्कळ दिवस उपयोगी पडतील, असें या लोकांना वाटलें, तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु असली मनोवृत्ति फार वाईट होय !

ज्ञानप्रकाश हें पत्र हल्लींच्या विद्यमान वर्तमानपत्रांत—इतर कशाच्या बाबतींत नसलें तरी—निदान वयाच्या बाबतींत तरी बरेंच वृद्ध झालेलें आहे. त्या वयाच्या अधिकारानें त्यानें वास्तविक इतरांना सभ्यपणाचे आणि राष्ट्रीयत्वाचे धडे घालून द्यावयाला पाहिजे होते. परंतु हलकटपणाच्या कलागती लावण्यापलीकडे त्याच्या डोंगराळ डोक्यांत पन्नास पाऊणशें वर्षांच्या अनुभवानंतरही जास्त महत्त्वाची अशी कोणतीही राष्ट्रीय कल्पना परिपक्व झाली नाहीं, हें पाहून या इतक्या फुकट गेलेल्या आयुष्याबद्दल कोणालाही कीव आल्यावांचून राहणार नाहीं ! अमका असहकारितावादी अमक्या असहकारितावाद्याच्या विरुद्ध असें बोलतो आणि तमका दुसऱ्याच्या विरुद्ध तसें करतो, या किळसवाण्या कलागती लावून देण्यापासून ज्ञानप्रकाशाला काय फायदा आहे ? असहकारितावाद्यांत कांहीं किरकोळ मतभेद असले, तर ते आम्ही आपसांत पाहून घेऊं आणि मिटवूनही घेऊं. पण आपल्याला असहकारितेच्या एका कार्यक्रमांतील कमी दोष आणि दुसऱ्यांतील जास्त दोष दाखवून काय करावयाचें आहे ? हे असहकारितेंतील बारीक सारीक मतभेद मिटवून घेऊन शुद्ध आणि निर्मळ बनलेल्या असहकारितेमध्यें आपल्याला सामील व्हावयाचें असेल, तर ज्ञानप्रकाश असहकारितेंत मिसळल्याबद्दल कोणालाही आनंदच होईल ! परंतु अधिकाऱ्यांपुढें लाळ घोटण्याचें निंद्य कर्म टाकून असहकारितेच्या मार्गाकडे आपल्याला जर कधीं वळावयाचेंच नसेल, तर या राष्ट्रीय सौभाग्याच्या कुंकवाची उठाठेव करीत बसण्यापासून ज्ञानप्रकाशाला काय फायदा आहे ? तुमच्या असहकारितावाद्यांच्या भांडणांत आज अमुक असें म्हणत आहेत, तसेंच आम्ही म्हणत आलों आहों, असा बहुतेक मुद्यांवर ज्ञानप्रकाशानें

आपल्या शहाणपणाचा टेंभा मिरविण्याचा प्रयत्न केला आहे. पण ते असहकारितावादी आहेत, तसे आपण होतां काय ? तसें नसेल, तर ही सर्व बडबड व्यर्थ आहे ! विरुद्ध पक्षाच्या भांडणांत ज्ञानप्रकाशानें तेल ओतून कितीही जास्त प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला, तरी जे दूरदर्शी असहकारितावादी आहेत, ते ज्ञानप्रकाशच्या असल्या एकतर्फी चढविण्याला कधींही भीक घालणार नाहींत ! मतभेदाचे वादाविवाद हे ऐक्य उत्पन्न करण्याच्या इच्छेनेंच केले पाहिजेत. व तशाच दृष्टीनें ते केले जाऊन शेवटीं राष्ट्रीय पक्ष हा एक आणि दृढतर होईल. ह्या राष्ट्रीय ऐक्यामध्यें आणि ह्या राष्ट्रीय ऐक्यापासून उत्पन्न होणाऱ्या राष्ट्रीय सामर्थ्यामध्यें आपल्या ज्ञानप्रकाशानेंही वगळलें जाऊं नये, अशी आमची मनापासून इच्छा आहे. ज्ञानप्रकाशाला केलेल्या ह्या राष्ट्रीय ऐक्याच्या सूचनेचा फारसा उपयोग न होतां उलट बेचाळीस पिढ्यांच्या उखाळ्या पाखाळ्या काढण्यांत येतील, अपशब्दांचे पाऊस पडतील, कुत्सितपणा कळसाला चढेल आणि दुर्जनत्वाचा दिग्विजय होईल, याबद्दल बिलकुल शंका नाहीं. तरी पण दुधाचेंही विष बनविण्याचे असले हे कारखाने जरी जय्यत चालू असले, तरी एकी उत्पन्न करण्याविषयीं प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें एक पवित्र कर्तव्य कर्म आहे, याबद्दल मतभेद होणें शक्य नाहीं.

---

# पेणच्या परिषदेंतील दोन उपसूचना.

पेणच्या परिषदेंतील असहकारितेच्या कार्यक्रमाच्या तपशिलामध्यें फेरफार करण्यासंबंधानें जे वादविवाद झाले, त्यांचें चर्वितचर्वण अलिकडे सात आठ दिवस आपल्याकडील बहुतेक सर्व वर्तमानपत्रांतून चाललेलें आहे. तेव्हां त्याच त्याच गोष्टी फिरून फिरून लिहीत बसण्यांत

कांहीं तात्पर्य नाहीं. परंतु अद्यापिही या वादांत कांहीं नवीन मुद्दे आहेत; म्हणून त्या मुद्यांकडे आपण क्रमाक्रमानें वळूं.

अमदाबादच्या कांग्रेसच्या कार्यक्रमाला जी एक कमिटीची उपसूचना पेणच्या परिषदेमध्यें चिकटवून देण्यांत आली आहे, ती अगदीं निरुपद्रवीपणाची आहे व त्यांत विशेष असें कांहींच नाहीं, असें भोळ्या लोकांना भासत आहे. परंतु ह्या उपसूचनेचा इतिहास काय सांगतो ? ही उपसूचना उन्हाळ्यांत वाळलेल्या एखाद्या नदीच्या किरकोळ पात्राप्रमाणें हल्लीं अगदीं वाळलेली व निरुपद्रवी दिसत आहे खरी ! पण मूळचें हिचें खरें स्वरूप काय आहे, हें वर्तमानपत्रें वाचणाऱ्या लोकांच्या मनांतून अद्यापि गेलेलें नसेल. दिल्ली येथें ता. २४ फेब्रुवारी रोजीं जी ऑ. इं. कां. कमिटी भरली होती, त्या कमिटीपुढें अशाच प्रकारची एक उपसूचना मांडण्यांत आली होती. ही उपसूचना डॉ. मुंजे यांनीं तेथें पुढें मांडली होती. ती दिल्लीच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीमध्यें नापास झाली, ही गोष्ट वेगळी. परंतु अकोल्याच्या सभेमध्यें जो पक्षभेद उत्पन्न आणि प्रकट करण्यांत आला, त्याला पुढें कसकशीं वळणें मिळत गेलीं आहेत व अकोल्यापासून दिल्लीचा द्राविडी प्राणायाम करून आलेली ही पक्षभेदाची कल्पना पेणेस निरुपद्रवीपणानें फिरून कशी प्रादुर्भूत झाली आहे, हें यावरून कोणाच्याही लक्षांत येईल. डॉ. मुंजे यांच्या दिल्ली येथील उपसूचनेचा सारांश पुढीलप्रमाणें होता:—

" असहकारितेची चळवळ ज्या तत्त्वांवर चालविण्यांत आली, त्या तत्त्वांच्या व्यवहार्यपणाची छाननी करण्याची, व नवीन कार्यक्रम आंखण्याच्या दृष्टीनें असहकारितेच्या कार्यक्रमास कितपत यश आलें आहे हें पाहण्याची, आतां वेळ आली आहे, असें या कमिटीचें मत आहे. "

या दिल्ली येथील डॉ. मुंजे यांच्या उपसूचनेच्या शेजारीं आतां आपण पेणची उपसूचना मांडूं. पेणची उपसूचना येणेंप्रमाणें आहे:—

" राष्ट्रीय सभेनें ठरविलेल्या कार्यक्रमांत जरूर ते कोणते फेरफार करावे अगर करूं नये, हें ठरविण्यासाठीं व ते फेरफार ऑ. इं. कॉं. कमिटीपुढें व राष्ट्रीय सभेपुढें मांडण्यासाठीं प्रां. कॉं. कमिटीनें एक कमिटी नेमावी. सदर कमिटीनें कोणता कार्यभाग यशस्वी झाला व कोणता झाला नाहीं, हें पहावें. इ. "

या दोन उपसूचनांची तुलना करून पाहिली, तर या दोहोंमध्यें काय फरक आहे ? म. गांधी यांचा असहकारितेचा कार्यक्रम यशस्वी झाला नाहीं म्हणून तो बदलून लो. टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वाच्या नांवाखालीं आपण कौन्सिलांमधून शिरलें पाहिजे, हा जो अकोल्याच्या परिषदेंतील अट्टाहास, तोच अन्य स्वरूपामध्यें मोठ्या युक्तीनें आणि शिताफीनें दिल्लीच्या उपसूचनेमध्यें नमूद करण्यांत आलेला आहे. व त्याचेंच प्रतिबिंब पेणच्या उपसूचनेमध्यें पडलेलें आहे. म. गांधींची चळवळ यशस्वी झाली आहे किंवा अयशस्वी झाली आहे, याच्याबद्दल एक कमिशन नेमून चवकशी करावी, अशी उपसूचना सुचविणें म्हणजे पर्यायानें ह्या चळवळींवर आपला विश्वास नसून त्या चळवळीविरुद्ध एक Vote of Censure म्हणजे निंदाव्यंजक ठराव पसार करण्यासारखेंच आहे. ह्या अकोल्याच्या युक्त्या लोकांना समजत नाहींत, असें नाहीं. हा पर्यायानें Vote of Censure चा म्हणजे निंदाव्यंजक ठराव आहे, असेंच दिल्लीच्या ऑल इंडिया कांग्रेस कमिटीमध्यें बऱ्याच लोकांचें मत होतें, व असला ठराव म. गांधींच्या विरुद्ध पुढें आणण्यांत येऊं नये, असेंच पुष्कळांना वाटत होतें. आणि म्हणून ती उपसूचना दिल्लीस बहुमतानें नापास करण्यांत आली. म. गांधींची असहकारिता यशस्वी झाली किंवा अयशस्वी झाली आणि तिच्या कार्यक्रमांत फेरबदल केला पाहिजे किंवा काय, ह्या उपसूचनेंतील प्रश्न ऑ. इं. कमिटींतील सर्व ठिकाणच्या सभासदांनीं मिळून बहुमतानें सोडविल्यानंतर व अशी कमिटी नेमणें जरूर नाहीं असें ठरविल्यानंतर वास्तविकपणें हा प्रश्न तेथेंच संपावयाला पाहिजे होता परन्तु सर्व हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं मिळून एकदा नापास केलेली ही उपसूचना बहुतेक जशीच्या तशीच महाराष्ट्र प्रांतिक परिषदेमध्यें पेणेस फिरून वर डोकें काढते, याचा अर्थ काय ? पेणेस ज्यांनीं ह्या उपसूचना आणिल्या होत्या, त्यांचें सन्मान्य म्हणणें ऑल इंडिया कांग्रेस कमिटीला बहुमतानें मान्य नाहीं, असें एकदां दिल्लीस जाहीर झालें नाहीं काय ? त्यांचा तेथें बहुमतानें पराभव झालेला नाहीं काय ? मग फिरून तोच तोच लोचटपणा करण्यांतील हेतु काय ? ही म. गांधींवरील निःसीम प्रेमाची खूण तर नाहीं ना ?

उपसूचनेच्या शेवटीं असें एक शेपूट आहे कीं, सदर कमिटीचा

रिपोर्ट जूनमध्यें होणाऱ्या ऑल इंडिया कांग्रेस कमिटीच्या बैठकीच्या अगो· दर प्रसिद्ध करावा; व यांतील हेतु असा कीं, तो रिपोर्ट त्या वेळीं आ. इं. कां. कमिटीपुढें मांडतां यावा. पण ज्या कमिटीनें फेब्रुवारीच्या २४ तारखेला असला रिपोर्ट मागविण्याची जरूरी नाहीं, असा आपला ठराव जाहीर केला, त्याच आ. इं. कां. कमिटीपुढें फक्त ३ महिन्यांची अवधि गेली नाहीं तोंच तोच रिपोर्ट तयार करून सादर करणें याचा अर्थ काय ? ही काय कामाची पद्धत ? किंवा हा काय महाराष्ट्र प्रांतिक परिषदेनें ऑल इंडिया कांग्रेस कमिटीला शिस्तीच्या दृष्टीनें दाखविलेला बहुमान ? आणि ह्या पेणच्या उपसूचनेंतील कमिटीच्या खर्चाचा बोजा कोणी सोसावयाचा ? तर महाराष्ट्र प्रांतिक कमिटीनें ! पण ऑ. इं. कॉ. कमिटीला जो रिपोर्ट नको आहे, त्याच्याबद्दलचा खर्च महाराष्ट्र प्रांतिक कमिटीनें काय म्हणून सोसावा ? गोठणच्या गाई आणि मामळभट दान देई, या न्यायानें सग- ळ्या अकरा जिल्ह्यांचा महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीजवळचा पैसा पेणेंतील स्थानिक मताधिक्यानें पास झालेल्या उपसूचनेला खर्च करण्याला काय म्हणून अधिकार असावा ? महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीजवळील पैसा हा कांहीं अध्यक्षांचा, उपाध्यक्षांचा, सेक्रेटरींचा किंवा उपसूचना आणणा- ऱ्यांचा खासगी पैसा नव्हे. तो महाराष्ट्रांतील जनतेचा पैसा आहे. आणि म. गांधींच्या विरुद्ध असला हा Vote of censure सारखा निंदाव्यंजक ठराव पास करण्याच्या पूर्व तयारीचा प्रयत्न सफळ करून देण्यासाठीं महा- राष्ट्रांतील लोकांनीं आपल्या पैशाचा काय ह्मणून असा दुरुपयोग होऊं द्यावा ? म. गांधी हे हल्लीं संकटांत असतांना, ज्यांच्यापासून राष्ट्राला इतका फायदा झाला आहे, त्या महात्मा गांधींच्या संबंधानें हिंदुस्थानच्या राष्ट्रानें Vote of confidence चा, म्हणजे विश्वासाचाच, ठराव पास करावयाला पाहिजे होता. पण तें तर लांबच राहिलें ! आणि उलट फिरून फिरून दुराग्रहानें आणि हट्टवादीपणानें त्यांच्या विरुद्ध एका निंदाव्यंजक ठरावाची पर्यायानें कसून तयारी चालली आहे, हें पाहून कोणालाही वाईट वाटल्या· वांचून राहणार नाहीं. सरकार म. गांधींच्या चळवळींवर हल्लीं एका बाजूनें उलटलें आहे, अशा वेळीं आपणही त्यांच्या देशबांधवांनीं दुसऱ्या बाजूनें त्यांच्यावर उलटून पडून, त्यांचा कार्यक्रम अव्यवहार्य आणि अयशस्वी ठर·

वून, आणि त्याच्या चिंधड्या चिंधड्या उडवून देऊन, कायदे कौन्सिलमध्यें जावयाचें, हीं म. गांधींच्याबद्दलच्या कृतज्ञतेचीं लक्षणें खात्रीनें नव्हेत. यांत अप्रत्यक्ष रीतीनें तरी निदान सरकारच्या असहकारितेवरील हल्ल्याला दुजोरा मिळत आहे, हें ह्या उपसूचनावाल्यांच्या लक्ष्यांत यावयाला पाहिजे होतें! पण प्रतियोगी सहकारितेच्या पुढें व्हावयाच्या यशस्वितेपुढें आणि व्यवहार्यतेपुढें कोणाला कांहीं दिसेनासेंच झालेलें आहे, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे! लो. टिळक हे चिरोल केस भांडण्याकरितां विलायतेस गेले होते. त्यांत त्यांना दुर्दैवानें आणि सत्तेपुढें शहाणपणा चालत नसल्यानें यश आलें नाहीं. पण तो निकाल येथें कळल्यानंतर कै० लो. टिळक यांनीं ही जी फिर्याद केली होती, ती व्यवहार्य होती किंवा अव्यवहार्य होती, वगैरे ठरविण्याकरितां जर कोणी एखादें चौकशीचें कमिशन नेमण्याची सूचना पुढें आणिली असती, तर कै. लो. टिळक यांना आणि त्यांच्या मित्रमंडळींना काय बरें वाटलें असतें? त्यांचे कित्येक शत्रु म्हणुन नांवाजलेले नेमस्त लोक होते, त्यांच्याकडून सुद्धां हें असलें कृतघ्नपणाचें कृत्य झालें नाहीं. पण तेंच कृत्य म. गांधींचे कित्येक मित्र अतिशय प्रेमळ रीतीनें आणि अतिशय आदरयुक्त बुद्धीनें हल्लीं करीत आहेत, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे!

"चालू असलेल्या कार्यक्रमांत आम्ही कांहीं फेरफार देखील सुचवूं नयेत कीं काय?" असले केविलवाणे प्रश्नही कित्येकांकडून हल्लीं विचारण्यांत येतात. परिस्थितीप्रमाणें जरूर ते फेरबदल करण्याला कोण समंजस मनुष्य नाहीं म्हणणार आहे? कोणाला फेरफार सुचवावयाचें असतील, तर ते त्यांनीं जरूर सुचवावे. आज ज्या ठाम मतांपर्यंत आपण येऊन पोहोंचलों आहों, तो देखील मागील अनेक फेरफारांचाच परिणाम आहे, हें अकोल्याच्या लोकांनाच तेवढें समजतें, असें नाहीं. फेरफार हे नेहमीं व्हावयाचेच. पण ते फेरफार सुचवितांना म. गांधींची असहकारितेची चळवळ ही अव्यवहार्य होती आणि अयशस्वी झाली, असा तिच्यावर आधीं शिक्का मारणें जरूरीचेंच आहे कीं काय, हा मुख्य प्रश्न आहे. आपल्या पुढाऱ्यांची सरकारी अधिकारी हेटाळणी करीत असतां त्यांतच आपण ही कमिटी नेमून, चौकशी करून, आणि हलवून खुंटा बळकट करून, आमचे हल्लींचे पुढारी म. गांधी हे आमच्या कै. टिळकांच्या सारखे चांगले नसून त्यांची असह-

कारितेची चळवळ अगदीं अव्यवहार्य आणि अयशस्वी झाली आहे, असें ठरवून जाहीर करणें हें सरकारचें इष्ट साधण्यासारखेंच नव्हे काय? तुम्हांला ढोंग नको आहे, हें खरें आहे; पण तुम्हां सत्याच्या पुतळ्यांना आणि धर्माच्या अवतारांना राजकारण तरी कांहीं पाहिजे आहे ना? आपलीं एकमेकांचीं ढोंगें आणि लुच्चेगिऱ्या आणि लफंगेगिऱ्या बाहेर काढण्याच्या भरांत आपण दुसऱ्यांच्या ढोंगांना, लुच्चेगिऱ्यांना आणि लफंगेगिऱ्यांना न कळत कशी व किती वाव करून देत आहों, इकडे थोडेंसें तरी लक्ष्य असणें जरूर आहे! आपण एकदां कौन्सिलमध्यें घुसल्यावर मग हिंदुस्थानांत देवलोकींचा स्वर्ग आपण उतरवून दाखविणार आहां, हें खरें; पण तोंपर्यंत तरी कांहीं मागचें पुढचें धोरण ठेवणें जरूर आहे कीं नाहीं? सारांश, ही असहकारितेची चौकशी कशाला? आजपर्यंत जीं जीं मतें कॉंग्रेसमध्यें प्रतिपादिलीं गेलीं, तीं यशस्वी झालीं किंवा अयशस्वी झालीं हें कमिट्या नेमूनच आतांपर्यंत ठरविलें गेलें काय? परंतु चालत्या गाड्याला खीळ घालण्याच्या ह्या नवीन पद्धति आहेत! न्यायमूर्ति रानडे आणि सर फेरोजशहा मेथा यांचे नेमस्त अनुयायी लोकमान्य टिळकांचे पाय पाठीमागें ओढण्यांत आपली गुप्त कुशलता पूर्वीं दाखवित होते, तर हल्लीं लो. टिळकांचे अनुयायी म. गांधींची चढती कमान खालीं ओढण्यासाठीं कमिट्या नेमून चौकशी करण्याची सुधारलेली युक्ति योजीत आहेत! परन्तु ह्या दोन्हीही वेळीं सरकार मात्र एकच कायम आहे!—अकोलावाले कौन्सिलांत गेल्यावर बहुतकरून तें बदलणार आहे!

चौकशी करून फेरफार सुचविणें हीं जीं पेणच्या उपसूचनेंतील दोन अंगें, त्यांपैकीं पहिल्या भागांतील अन्तःस्थ हेतु आणि बाह्य दुष्परिणाम कोणते व कसे आहेत, हें आपण येथपर्यंत पाहिलें. आतां फेरफार म्हणून जे सुचवावयाचे आहेत, ते तरी कोणते आहेत, हें आपण पाहूं. लोकांना फेरफार नको आहेत, असें नाहीं. एखाद्याच्या अंगावर घोंगडी असली आणि त्या घोंगडीच्या जागीं जर कोणी शालजोडीचा फेरफार करूं लागेल, तर तो इष्ट आहे. परंतु कांहीं तरी फेरफार झालाच पाहिजे, आणि जगाच्या अंतापर्यंत स्तिमित बुद्धीनें, मंदगामित्वानें, व अन्यानुयायित्वानें आपण राहतां कामा नये, एवढ्याचसाठीं जर कोणी एखाद्याच्या अंगावरील शाल-

जोडी ओढून काढून आपल्या हजार ठिकाणच्या वेचून आणलेल्यां ठिगळांनीं शिवून तयार केलेली घोंगडी त्याच्या अंगावर घुसडून देऊं लागेल, तर असले वेडगळपणाचे फेरफार कोणीही लोक पतकरण्याला तयार होणार नाहींत. मागच्या कांग्रेसेसमध्यें कांहींच काम होईना, म्हणून कै. लो. टिळक यांनीं काम करण्याकरितां होमरूल लीगची संस्था स्थापन केली. हा फेरफार लोकांना इष्ट वाटून त्यांनीं तो ताबडतोब स्वीकारला. लो. टिळक यांनीं सुचविलेले फेरफार लोकांनीं स्वीकारले. म. गांधी यांनीं सुचाविलेले फेरफारही लोकांनीं स्वीकारले. पण या महात्म्यांचे फेरफार लोकांनीं स्वीकारले म्हणून एखाद्या अकोल्याच्या परिषदेचे फेरफारही स्वीकारण्याला लोक कबूल होणें शक्य नाहीं. फेरफार हे त्यांतील तार्किक निर्दोषतेवरून केवळ स्वीकारले जातात असें नसून ते सुचविणाऱ्या माणसांच्या योग्यतेवरूनही त्या फेरफारांची किंमत लोक ठरवितात. पण अकोल्याच्या परिषदेमध्यें लो. टिळक किंवा म.गांधी वगैरे सारख्या राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या योग्यतेचीं अशीं कोण माणसें होतीं! दहा सामान्य माणसें एकत्र आलीं, म्हणजे त्या दहा माणसांची बेरीज केलेली बुद्धि एखाद्या असामान्य माणसाच्या बुद्धीच्या बरोबरीची होते, असा जगांत अनुभव नाहीं. त्यामुळें अकोल्याच्या परिषदेंतील किंवा पेणच्या परिषदेंतील सुचविलेल्या फेरफारांचे ठराव कोणालाही पसंत पडले नाहींत. पेणच्या दुसऱ्या उपसूचनेंत नवीन फेरफार सुचविण्याच्या कामीं बरेच श्रम घेण्यांत आलेले होते; इतकेंच नव्हे, तर श्रीमत् शंकराचार्योंची एक चतुःसूत्री प्रसिद्ध आहे, आणि लो. टिळकांनींही १९०६–०७ सालीं एक चतुःसूत्री बनविलेली होती; तशीच एक चतुःसूत्रीही या फेरफारांच्या ठरावांत घातली होती! याहून आणखी फेरफार सुचवितांना काय पाहिजे? तरी पण लोकांना हे फेरफार पसंत पडले नाहींत. जो आपल्याला हिंदु म्हणेल तो हिंदु, इतकें मानण्याइतकी अद्यापि लोकांची उत्क्रांति कोठें झालेली आहे? सारांश, फेरफार सुचविणारांवर लोकांचा विश्वास बसावा लागतो, तेव्हांच ते त्यांचे फेरफार मान्य होतात. या उपसूचना स्वीकारल्या जाव्या म्हणून आग्रहाचीं भाषणें चाललीं असतां त्या वादाविवादांत रा.रा. नरसोपंत केळकर हे मौनवृत्ति धारण करून बसले होते, हें त्यांस फार भूषणावह आहे! कार्यक्रमांत फेरफार सुचविण्याबद्दलची जी दुसरी उपसूचना, त्या

उपसूचनेची स्कीम तयार करण्याकरितां रा. भोपटकर यांनीं बरेच परिश्रम केलेले असले पाहिजेत, यांत शंका नाहीं. व त्यांची हीच एक स्कीम नसून अशा दुसऱ्याही पुष्कळ स्कीम्स तयार झालेल्या व होणाऱ्या असतील. राष्ट्रीय वाङ्मयप्रसाराची त्यांची एक स्कीम आहे. महाराष्ट्रांत छापखाने उभारून वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकें, इत्यादि प्रसिद्ध करून राष्ट्रीय वाङ्मयाचा प्रसार व्हावयाचा आहे! फ्री लान्स या नांवाचें एक इंग्लिश साप्ताहिक लवकरच सुरू व्हावयाचें आहे! तसेंच बृहन्महाराष्ट्रांतील ठिक-ठिकाणच्या बातम्या प्रसिद्ध करण्यासाठीं बातमीदारांच्या नेमणुका करण्यांत येत आहेत व येणार आहेत! याशिवाय त्यांनीं महाराष्ट्राची राष्ट्रीय पहाणी करण्याचीही जी एक स्कीम सुमारें एक वर्षाच्या पूर्वीं लिहून काढून जिकडे तिकडे जाहीर केली आहे, त्या स्कीमचें आणि त्या राष्ट्रीय पहाणीचें काम देखील अद्यापि बरेंच व्हावयाचें-निदान प्रसिद्ध व्हावयाचें-बहुतेक राहि-लेलें आहे! याशिवाय अस्पृश्यतेच्या संबंधाच्या ज्या स्कीम्स आहेत, त्या तर निराळ्याच! अशा ह्या अनेक लिहून काढलेल्या स्कीम्सचें काय काय होतें, हें पाहून नंतर मग पेणच्या परिषदेंतील दुसऱ्या उपसूचनेंतील स्कीमला अनुमोदन द्यावें किंवा नाहीं, हें पेणच्या परिषदेंतील प्रतिनिधि ठरविणार होते! पण मतें मागण्याची अनावर घाई करण्यांत आली!

सारांश, अव्यवहार्य सूचनांच्या जागीं म्हणून ज्या उपसूचना सुच-वावयाच्या, त्यांत तरी निदान बराचसा व्यवहार्यपणा असावयाला पाहिजे होता. परंतु तसें कांहींच लोकांच्या दृष्टीला दिसून न आल्यामुळें लोकांना त्या दुसऱ्या उपसूचनेचा आदर करण्याची संधि सांपडली नाहीं, ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे.

सारांश, चांगले फेरफार असतील, तर ते फेरफार लोक अवश्य स्वीकारतील. पण आपले फेरफार चांगलेच आहेत, असें समजून ते लोकां-वर लादण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण त्यांना चांगलें म्हणून उपयोग नाहीं. लोक ज्याला चांगलें म्हणतील, तें चांगलें!

---

# कौन्सिलांवरील बहिष्काराचा पूर्व आणि पूर्ण इतिहास !

अमदाबादच्या कांग्रेसचे ठराव आणि त्यांमध्यें फेरबदल करून नवीन तयार करावयाचा कार्यक्रम, असे जे हल्लीं दोन पक्ष आपल्यापुढें आहेत, त्यांत सलोखा होऊन दोन्ही पक्षांच्या गोडीगुलाबीनें आणि एकीनें कांहीं तरी मार्ग निघणें अत्यंत अवश्यक आहे. हे जे वर दिलेले दोन पक्ष आहेत, ते वास्तविक दोन नसून तो खरा एकच पक्ष आहे. परंतु दुर्दैवानें त्यांत कांहीं मतभेद उत्पन्न झाले आहेत. पण मतभेद म्हणजे पक्षभेद नव्हे. आणि हे आपआपले मतभेद प्रामाणिकपणें प्रतिपादन करीत असतां त्याचें पर्यवसान पक्षभेदांमध्यें व्हावें, अशी कोणाही राष्ट्रीय मनुष्याची केव्हांही इच्छा असणें शक्य नाहीं. निदान आमची तरी अशी इच्छा नाहीं. उलट आपण राष्ट्रीय पक्षांतील सर्व लोकांनीं एकच राहिलें पाहिजे, आणि हल्लीं कांहीं मतभेदांमुळें एक नसलों, तरी ते मतभेद मिटवून फिरून आपण एक झालें पाहिजे, हें हल्लींच्या परिस्थितींत अत्यंत अवश्यक आहे. जे आज आपल्या राष्ट्रीय पक्षांत नाहींत, त्यांनाही आपल्या पक्षांत वळवून घेऊन आपल्या एकीचें क्षेत्र जास्त वाढविण्याचा जर आपण प्रयत्न करीत आहों, तर अशा प्रसंगीं आपल्यांत असलेली एकी बिघडवून टाकून तेथें दुही उत्पन्न करणें, हें केव्हांही श्रेयस्कर होणार नाहीं.

हा राष्ट्रीय लोकांच्या एकीचा उदात्त हेतु लक्षांत ठेवून जर अकोल्यास परिषद भरविणारे लोक पहिल्यापासून वागले असते, तर आजचा हा प्रसंग खात्रीनें आला नसता. परंतु अकोल्याचे मतभेद हे तेथें व त्यानंतर इतरत्रही इतक्या विकोपाला नेण्यांत आले कीं, त्या मतभेदांना पक्षभेदाचें घातुक स्वरूप हळूहळू येऊं लागलें. व जेथें एकी नांदत आहे, तेथें पक्षभेद उत्पन्न झाले, तरी हरकत नाहीं, पण आपल्या मतभेदाचें तट्टू आपण दाम-

टवीत पुढें न्यावयाचेंच, इतक्या बेपर्वाईनें अकोलावाल्यांनीं वागण्यास सुरवात केली. सगळें राष्ट्र म. गांधींच्या नेतृत्वाखालीं एकोप्यानें पुढें चाललें असतां या अकोलावाल्यांनीं अकोल्यास जमून आपल्या फुटीचें शिंग फुंकलें. व म. गांधींच्या कार्यक्रमांतील बहुतेक गोष्टींना विरोध करण्याला त्यांनीं सुरवात केली. कार्यक्रमांतील ज्या बाबींना स्पष्टपणें विरोध करणें शक्यच नव्हतें, त्यांना त्यांनीं विरोध केला नाहीं, हें खरें;पण त्या बाबी निर्विवादपणें चांगल्या असल्यामुळें त्यांना तरी त्यांनीं प्रामाणिकपणानें जितकें उत्तेजन द्यावयाला पाहिजे होतें, तितकें त्यांनीं दिलें नाहीं, आणि बाकीच्या गोष्टींना विरोध करण्याचें काम मात्र त्यांनीं जोरानें सुरू केलें. हा विरोध करतांना पक्षांधपणामुळें त्यांनीं अनत्याचारित्वाच्या तत्त्वाच्या विरुद्धही हात उचलण्याला कमी केलेलें नाहीं ! खरें पाहिलें असतां अकोलावाले आणि इतर राष्ट्रीय पक्षांतील लोक यांच्यामध्यें खऱ्या आणि महत्त्वाच्या मतभेदाचा एखादा मुद्दा असेल, तर तो फक्त कौन्सिलमध्यें जाण्यासंबंधीचा होय. व त्या मुद्या-बद्दल त्यांनीं प्रामाणिकपणानें आपले प्रयत्न चालू ठेविले असते,तर त्याबद्दल कोणाचें कांहीं म्हणणें नव्हतें. परंतु म. गांधींच्या बहुतेक प्रत्येक गोष्टीला विरोध करून त्याच्या जागीं आपलें दुसरें कांहीं तरी म्हणणें मांडावयाचें, ही कांहीं सलोख्याची वृत्ति नव्हे. अकोल्याच्या परिषदेंतील ठराव किंवा हल्लीं नागपूरच्या कमिटीनें प्रसिद्ध केलेला रिपोर्ट हे पाहिले असतां ही प्रवृत्ति अकोलावाल्यांच्या मनांत कशी जळत आहे, हें कोणाच्याही दृष्टोत्पत्तीस येण्यासारखें आहे. परंतु हे त्यांचे बारीकसारीक विषारी अंकुर बाजूला ठेवून पुढें आपण कौन्सिलच्या प्रश्नाचा थोडासा विचार करूं.

नवीन रिफॉर्म्स् ॲक्टाप्रमाणें मिळालेल्या कौन्सिलांमधून आपण जावें, असें एकदां सगळ्याच राष्ट्राचें मत होतें. परंतु कांहीं कारणानें तें हल्लीं बदललें आहे.व ह्या कौन्सिलांत न जातां त्यांच्यावर आपण बहिष्कारच घातला पाहिजे, अशी हल्लीं राष्ट्राची प्रवृत्ति आहे. आणि ही प्रवृत्ति बदल-ण्याला आतां कांहीं कारणें झालेलीं आहेत, असें राष्ट्राला अद्यापि वाटत नाहीं. तसें जेव्हां राष्ट्राला किंवा राष्ट्राच्या राष्ट्रीय सभेला दिसून येईल, तेव्हां ती सभा मोठ्या आनंदानें आपल्या लोकांना कौन्सिलांत जाण्याला परवानगी देईल. परंतु तोंपर्यंत अवेळीं आणि अयोग्य रीतीनें अकोलावा-

त्यांसारख्या लोकांनीं उगीच कोल्हेकुई उठवणें राष्ट्राच्या हिताला आणि एकीला पोषक नसून उलट विघातक आहे. कौन्सिलांत जावयाचें नाहीं, ही वृत्ति राष्ट्रानें कांहीं तरी एका धोरणानेंच स्वीकारलेली आहे. तें धोरण अकोल्याचे अक्कलमंद लोक अगदींच विसरतात, हें मोठें आश्चर्य आहे. ह्या अकोल्याच्या परिषदेच्या मंडळींपैकीं एक, रा. रा. भोपटकर, हे ह्या कौन्सिलांच्या संबंधानें लिहितांना एके ठिकाणीं असें म्हणतात कीं, 'कायदे मंडळावरील बहिष्कार असहकारितेच्या कार्यक्रमांत कसा व केव्हां समाविष्ट झाली, याचा थोडासा पूर्व इतिहास समजावून घेणें जरूर आहे.' पूर्व इतिहास समजावून घेणें खरोखरच फार जरूर आहे! पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, तो इतिहास या अकोल्याच्या अक्कलमंद लोकांनीं लक्षांत घेतला नाहीं ! रा. भोपटकर यांनीं असें सांगितलें आहे कीं, 'या कौन्सिलांवरील बहिष्काराची मूळ कल्पना म. गांधींची नसून लाला लजपतराय यांची आहे. परंतु लाला लजपतराय यांनीं कांहीं कारणानें ती परत घेतली. परंतु या कल्पनेंत जनतेच्या उत्तान प्रतिभेला व भावनांना त्या वेळेस उद्दीपित करण्यासारखें एक तत्त्व असल्याचें महात्माजींच्या चटकन लक्षांत आल्यावर त्यांनीं तिचा अंतर्भाव आपल्या कार्यक्रमांत केला.' असा रा. भोपटकर यांनीं या बहिष्काराचा पूर्व इतिहास दिला आहे. यांत ही कौन्सिलावरील बहिष्काराची कल्पना मूळ लाला लजपतराय यांची असून त्याचें श्रेय म. गांधी यांनाच द्यावयाला पाहिजे असें नाहीं, हा म. गांधींच्या विरुद्ध एक टोला बरोबर देण्यांत आला, यांत शंका नाहीं. आणि एवढ्या एका टोल्यासाठींच जर मागचा हा अर्धामुर्धा इतिहास धुंडाळावयाचा असला, तर गोष्ट वेगळी ! परंतु कोणत्याही गोष्टीचा इतिहास पहावयाचाच असेल, तर तो समग्र पाहिला पाहिजे. आणि मग त्यावरून काय तें योग्य अनुमान काढलें पाहिजे. एरवीं अर्धवट इतिहासावरून काढलेलीं अनुमानें मनुष्याला खड्यांत पाडण्याला कारणीभूत होण्याची फार भीति असते. सारांश, या कौन्सिलमध्यें जाण्याच्या प्रश्नाचा इतिहास रा. भोपटकर यांनीं आपल्या कामापुरता जेवढा दिला आहे, तेवढाच तो नसून त्याच्या पुढेंही आणखी बराच इतिहास आहे. त्याच्याकडे त्यांनीं आपल्या गैरसोयीसाठीं पाहिलें नाहीं, तरी आपल्या सोयीसाठीं आपण तिकडे पाहणें जरूर आहे !

लाला लजपतरायं यांची कौन्सिलांवरील बहिष्काराची मूळची कल्पना त्यांनीं स्वतः सोडली, तरी म. गांधींनीं ती उचलून धरली, व त्याप्रमाणें कलकत्याच्या स्पेशल कांग्रेसमध्यें तो बहिष्काराचा ठराव बहुमतानें पसार झाला. त्यानंतर लालाजींनीं जरी पहिल्यानें ही आपली कल्पना सोडून दिली होती. तरी कांग्रेसनें कौन्सिलावरील बहिष्काराचा ठराव पसार केल्यानंतर लाला लजपतराय यांनीं कौन्सिलावर बहिष्कार घालण्याची एकदां सोडून दिलेली आपली कल्पना फिरून जी घट्ट धरली, ती त्यांनीं अद्यापिही सोडलेली नाहीं ! कौन्सिलमध्यें जाऊं नये असेंच अद्यापिही त्यांचें मत आहे. अकोलावाल्यांच्या मतांची जरी वरच्यावर अनेक परिवर्तनें होत आहेत, आणि त्यांचीं मतें जरी मध्यंतरीच्या अवकाशामध्यें अनेक डोंबारी कोलांट्या उड्या घेऊन आपल्या उलट्या सुलट्या कसरतीनें प्रेक्षकांना थक्क करून सोडीत आहेत, तरी बिचारे लाला लजपतराय यांचें मत अद्यापि कायमच राहिलेलें आहे ! त्याला अजून प्रागतिकपणाचें वळण मुळींच मिळालेलें नाहीं ! परंतु या कौन्सिलांवरील बहिष्काराचा आम्हांला जो इतिहास दाखवून द्यावयाचा आहे तो हा नव्हे. तो याहूनही अगदीं वेगळा आहे ! कलकत्याच्या स्पेशल कॉंग्रेसमध्यें कौन्सिलावरील बहिष्काराचा ठराव चर्चेकरितां निघाला होता, तेव्हां ह्या अकोलावाल्यांपैकीं कित्येक लोक कौन्सिलांत जाण्याला अनुकूल होते, हें खरें आहे. पण कॉंग्रेसनें बहिष्काराचा ठराव पास केल्यानंतर त्यांनीं कौन्सिलमध्यें जाण्याचे आपले विचार तहकूब केले, हें त्यांना भूषणावह आहे. पण हे विचार ते स्वतः तहकुब करूनच राहिले नाहींत, तर लोकांनींही कोणी कौन्सिलमध्यें जाऊं नये व कोणी जाऊं लागल्यास मतदारांनीं त्यांना मतें देऊं नयेत, अशी उलट जोराची चळवळ करण्यालाही या लोकांनीं मनोभावानें सुरवात केली. कलकत्याच्या स्पेशल कॉंग्रेसमधून परत आल्यानंतर मुंबईस मुंबई इलाख्यांतील आणि बृहन्महाराष्ट्रांतील डेमोक्रॅटिक पार्टीच्या लोकांची म्हणून एक सभा १९ सप्टेंबर १९२० रोजीं भरविण्यांत आली होती. या सभेंतील बहुतेक लोक प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वाचे अनुयायी होते; पण असें असूनही त्यांनीं कौन्सिलच्या बाबतींत त्या वेळीं पूर्ण असहकारिता करण्याचें ठरविलें. व तो ठराव कमकुवत मताधिक्यावर झालेला नसून १

विरुद्ध ४५ मतांनीं पास झालेला आहे, ही गोष्ट कोणीही विसरतां कामां नये. आतां कौन्सिलांवर बहिष्कार घालण्याचा हा ठराव पास झाला, तेव्हां हा बहिष्कार आपण कोठपर्यंत चालवावयाचा याच्याबद्दल त्या वेळच्या त्या अकोलावाल्यांनीं त्या ठरावांत कांहीं मुदत घातलेली आहे कीं काय, हा या ठिकाणीं मुख्य प्रश्न आहे. नाहीं तर आज ठराव करावा आणि उद्यांपासून तो मोडण्याला सुरवात करावी, अशी अनवस्था प्राप्त व्हावयाची ! परंतु जवळ जवळ अशीच स्थिति ह्या अकोलावाल्या अक्कलमंद लोकांची झाली आहे. १९२० च्या सप्टेंबर महिन्यांत मुंबईच्या सरदारगृहांत यांच्यापैकीं कित्येकांनीं कौन्सिलांवर बहिष्कार घालण्याचे ठराव पास केले आणि उमेदवारांच्या यादींतून आपलीं नांवें काढून घेतल्याचें जाहीर केलें; परंतु त्यानंतर थोड्याच दिवसांनीं कित्येकांच्या सांगण्यावरून आणि सल्ल्यावरून यांच्या पोटांत दुखूं लागून १९२१ सालच्या डिसेंबर महिन्यांत यांनीं अकोला येथें फिरून आपली परिषद भरविली; व कौन्सिलांत जाण्याची मनिषारूपी कन्या तेथें उघड रीतीनें प्रसूत झाली ! परंतु सरदारगृहांतील ठरावांत पाहिलें, तर त्यांत मुदतीचा उल्लेख बिलकुल नाहीं. तेव्हां अशा स्थितींत या बहिष्काराचे दूरवर पोंचणारे परिणाम काय होतात, तें पाहिल्यावांचून कालचा ठराव आज मोडण्याची घाई करण्याचा असला उथळपणा अधीरपणा आणि अस्थिरपणा दाखविणें हें केव्हांही बरोबर नाहीं.

परंतु वरील ठरावांत जरी मुदतीचा उल्लेख नाहीं, तरी दुसऱ्या एका ठिकाणीं ज्याच्यावरून मुदतीचें अनुमान काढतां येईल असे स्पष्ट उल्लेख नमूद करण्यांत आलेले आहेत. त्या उल्लेखांकडे आतां आपण वळूं. कौन्सिलच्या शहाण्या उमेदवारांनीं कौन्सिलांत न जाण्याचें धैर्य दाखविण्याचा १९ सप्टेंबर १९२० रोजीं स्वतः तर निश्चय केलाच ! पण अडाणी मतदार काय करतील कोण जाणे, अशी भीति वाटून त्या अडाण्यांना पक्क्या करारमदारांनीं आणि आणाशपथांनीं बांधून घेतल्यावांचून सोय नाहीं, असें समजून त्या मतदारांच्या शपथेकरितां याच कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टीच्या सभेमध्यें एक मसुदा तयार करण्यांत आला ! तो मसुदा येणेंप्रमाणें:—

'कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेमध्यें संपूर्ण स्वराज्य मागण्याचा

झालेला ठराव आम्हांस मान्य आहे. व त्याप्रमाणें आमची मागणी आहे. सदर सभेमध्यें कायदे कौन्सिलांवर बहिष्कार घालण्याविषयीं झालेला ठराव आम्हांस पसंत नाहीं. तथापि कॉंग्रेसनें ठरविलें म्हणून आम्ही पंजाब व खिलाफत प्रकरणासंबंधाच्या तक्रारी दूर होईपर्यंत अथवा संपूर्ण स्वराज्य मिळेपर्यंत, अगर कॉंग्रेसकडूनच पुन्हा तशी परवानगी मिळेपर्यंत कायदे कौन्सिलच्या निवडणुकींत कोणताही भाग घेऊं इच्छित नाहीं.'

अशा प्रकारच्या मसुद्यावर मतदारांच्या सह्या घेण्यांत आलेल्या आहेत व त्यांनीं त्या दिल्याही आहेत. या मसुद्यांतील अटींचा अर्थ काय होतो ? यांत पर्यायानें मुदतीचा उल्लेख येत नाहीं काय ? अमुक अमुक गोष्टी होईपर्यंत आम्ही कौन्सिलच्या निवडणुकींत कोणताही भाग घेऊं इच्छित नाहीं, अशा ज्या करारावर बिचाऱ्या भोळसर मतदारांच्या सह्या त्यांच्याकडून आतांपर्यंत घेण्यांत आल्या, ते करार हल्लीं पुरे झाले आहेत काय ? कीं, ज्यामुळें यांनीं फिरून त्याच तोंडानें कौन्सिलांत जाण्याची चळवळ सुरू करावी ! पंजाब प्रकरणाची तक्रार दूर झाली आहे काय ? खिलाफतीच्या संबंधाच्या तक्रारी दूर झाल्या आहेत काय ? किंवा आपल्याला संपूर्ण स्वराज्य तरी मिळालें आहे काय ? ह्या अटी पूर्ण होईपर्यंत कौन्सिलच्या निवडणुकींत भाग घ्यावयाचा नाहीं, अशा लोकांकडून पूर्वी शपथा घेववून आतां पंजाब, खिलाफत, किंवा संपूर्ण स्वराज्य यांपैकीं कोणत्याही बाबीचा समाधानकारक निकाल लागला नसतांना त्या शपथा हे अकोलावाले लोक लोकांना मोडावयाला सांगणार काय ? 'अगर कांग्रेसकडूनच पुनः तशी परवानगी मिळेपर्यंत' अशी आणखीही एक चवथी अट वरील मसुद्यामध्यें आहे, हें कबुल आहे. पण कॉंग्रेस म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे. कॉंग्रेसनें आज कौन्सिलांत जाण्याला अकोलावाल्यांनीं मागितल्याबरोबर एक वर्षाच्या अवधीनंतर लगेच आपला ठराव बदलून द्यावा, हें कॉंग्रेसला केव्हांही उचित होणार नाहीं. कॉंग्रेसनें तरी या कौन्सिलांवर बहिष्कार घालण्याचा हा खटाटोप कशासाठीं केला आहे ? त्यांत देखील कांहीं तरी हेतु असलाच पाहिजे ना ? आणि तो हेतु म्हटला म्हणजे पंजाब प्रकरण, खिलाफत आणि स्वराज्य, यांच्या संबंधीचाच होय ! आणि त्यांपैकीं एकही गोष्ट जर अद्यापि साध्य झाली नाहीं, तर कांग्रेसला तरी

अशी परवानगी कशी देतां येईल ? परवानगी मागणाऱ्या अकोलावाल्यांना कदाचित् मागचें पुढचें कांहीं धोरण नसेल. पण कांग्रेसमध्यें एकवटलेल्या राष्ट्रानें अद्यापि आपली सगळीच अक्कल गमावलेली नाहीं.

असा हा कौन्सिलच्या बहिष्काराचा इतका लांबलचक इतिहास आहे. तो रा. भोपटकर यांनीं दाखविला तितका त्रोटक मुळींच नाहीं! तेव्हां आतां या पूर्व इतिहासावरून काय निष्पन्न होतें ? होमरूल लीगच्या तर्फे आपल्या डेमोक्रॅटिक पार्टीला फिरून अस्तित्वांत आणावें असें फर्मान नुकतेंच एक सोडण्यांत आलेलें आहे! ह्या डेमोक्रॅटिक पार्टीनें आपला मागील इतिहास फिरून एकदा वाचून पाहिला पाहिजे. आणि त्यानंतरही आपले ठराव आपण मोडावे असें त्यांना स्वतःला जरी वाटत असलें, तरी त्यांनीं मतदारांपासून घेतलेल्या शपथा मतदारांना मोडावयाची मेहेरबानीनें भुरळ घालूं नये! पंजाब, खिलापत व स्वराज्य या प्रश्नत्रयीचा निकाल लागाव-याच्या आधींच आपलें वचन मोडून त्यांना कौन्सिलांत जावयाचें असेल तर त्यांनीं स्वतः खुशाल जावें! पण या प्रश्नांचा निकाल लागण्यापूर्वीं आम्ही निवडणुकीच्या कामांत कोणताही भाग घेणार नाहीं म्हणून ज्या मतदारांनीं सह्या केल्या आहेत आणि शपथा घेतल्या आहेत, ते बिचारे प्रामाणिक मतदार लोक आपल्या शपथेच्या विरुद्ध जाऊन या अकोलावाल्या अक्कलमंद लोकांना आपलीं मतें कशीं देतील ? त्यांच्या मतांशिवाय त्यांना कौन्सिलमध्यें जातां येत असेल, तर त्यांनीं खुशाल जावें! पण आपल्या सोयीप्रमाणें आणि आपल्या लहरीप्रमाणें बाकीचेंही सगळें जग वाटेल तेव्हां फिरेल, अशी यांनीं आपल्या मनाची भलतीच खोटी समजूत करून घेऊं नये! कौन्सिलमध्यें जाणें हेंच चांगलें आहे, असें जर कलकत्याच्या स्पेशल कांग्रेसनंतरही तुम्हांला वाटत होतें, तर तसेंच वळण तुम्ही त्याच वेळीं लोकमताला लाविलें असतें, तर तें कदाचित् अयुक्त झालें नसतें. त्या वेळीं या बाबतींतील ही लोकमताची खांदी कोवळी होती लोकमान्य नुकतेंच गेलेले होते. तुमची घरसोडीची कृति आतांच्या इतकी विशद झालेली नव्हती! व आपल्या झांकलेल्या मुठींत चोंचल्याशिवाय दुसरें कांहीं नसलें तरी त्यांत सव्वा लाख रुपये आहेत, अशी लोकांची समजूत होती! त्या वेळीं तुम्ही ही लोकमताची खांदी जिकडे वळीवलें

असती, तिकडे ती वळली असती. पण तुम्ही ती त्या वेळीं आपल्या स्वतः-च्या हल्लींच्या मतांच्या विरुद्ध दिशेला दुर्दैवानें वळविली. आणि सृष्टिनियमाप्रमाणें ती त्या वेळची कोवळी खांदी हल्लीं तुमच्या विरुद्ध दिशेनें जून झाली आहे! ती जून खांदी आतां वळणें शक्य नाहीं. आपल्याला ती तोडावयाचीच असेल, तर मात्र गोष्ट वेगळी! लोकांनीं तुमच्याच मताप्रमाणें वागावयाला सुरवात करावी आणि मधेंच तुम्ही त्यांच्या मनामध्यें एकदम आपली दिशा बदलण्याविषयींची दिशाभूल उत्पन्न करावी, हें योग्य नाहीं व यशस्वीही होणार नाहीं! ता. १९ सप्टेंबर १९२० रोजीं सरदारगृहांत सभा भरवून घाईघाईनें आणि अविचारानें या लोकांनीं प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वाशीं आणि कैलासवासी लो. टिळकाशीं पहिला विश्वासघात केला! आणि आतां पेणच्या सारख्या सभांतून असहकारितेच्या तत्त्वाशीं आणि काराग्रहवासी म. गांधींशीं हे दुसरा विश्वासघात करीत आहेत! असल्या नाचऱ्या लोकांच्या नेतृत्वावर कोणाचा विश्वास बसणार आहे? हे आपल्याला कोठें नेतील आणि मध्येंच आपल्याला केव्हां सोडून देतील, याच्याबद्दल लोकांच्या मनामध्यें शंका उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. हे अकोलावाले लोक लोकमान्य टिळकांच्या नांवाचा फायदा घेऊं इच्छित आहेत, पण तो त्यांना मिळणें शक्य आहे काय? कै. लो. टिळक यांनीं यांची खरी किंमत ता. १९ सप्टेंबर १९२० रोजींच केली असली पाहिजे! त्या दिवशीं यांनीं जेव्हां अविचारानें आणि उतावीळपणानें प्रतियोगी सहकारितेचें निशाण खालीं उतरलें आणि आपल्या पूर्वींच्या गुरूशीं बेइमानपणा केला, तेव्हां लो. टिळकांच्या स्वर्गस्थ आत्म्याला यांच्याबद्दल काय बरें वाटलें असेल! अरेरे! माझ्या पाठीमागें एक दोन महिने देखील झाले नाहींत, तोंच हे माझीं तत्त्वें विसरले आणि यांनीं मला सोडून दिलें, असें पाहून लो. टिळकांच्या डोळ्यांतून त्या वेळीं किती तरी अश्रु वाहिले असतील! आणि तेच हे लोक आतां फिरून महात्मा गांधींशीं दुसरा बेइमानपणा करण्याकरितां लो. टिळकांचा डंका वाजवूं पहात आहेत. परंतु असल्या यांच्या या दिवसांतून तीन रंग बदलणाऱ्या वर्तनानें आणि वरचेवर जुनीं लग्नें मोडून नवीन पाट लावणाऱ्या पातिव्रत्यानें इतःपर कोण फसणार आहे? इतो भ्रष्ट आणि ततो भ्रष्टः, अशी यांची स्थिति झाली आहे. जे १९

सप्टेंबर १९२० रोजीं कै. लो. टिळकांवर उलटले, ते आज म. गांधींवर उलटले, तर कांहीं गोठेंसें आश्चर्य आहे, असें नाहीं. सजनांचा हा स्वभावच होय !

आपण जी गोष्ट करावी, असें आपले प्रतिपक्षी इच्छित असतात ती गोष्ट आपण सहसा करूं नये, असा एक सामान्य नियम आहे. इंडियन लोकांनीं कौन्सिलमध्यें यावें, ही अधिकाऱ्यांची मनापासूनची इच्छा ! व आपल्या कौन्सिलांवर लोकांनीं बहिष्कार घातल्याबद्दल अधिकाऱ्यांना मनापासून विषाद ! अशा स्थितींत चितागांग, पेण, नागपूर, वगैरे ठिकाणीं निघालेल्या कांहीं उद्गारांवरून कॉंग्रेसच्या जहालांपैकीं कित्येक लोक कौन्सिलांतून येत आहेत, असा नुसता अंधुक देखावा पाहून देखील टाइम्स ऑफ इंडिया सारख्या लोकांना किती तरी आनंद झालेला आहे, हें पाहून आपल्या प्रतिपक्षाला आनंद देणारें आणि स्वजनांच्या मनामध्यें विषाद उत्पन्न करणारें कृत्य आपण करावें किंवा न करावें, हा अकोलावाल्यांनीं एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

---

# महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी.

हिंदुस्थान देशाच्या स्वराज्यप्राप्तीसाठीं गेल्या एक दोन वर्षांत ज्या चळवळी करण्यांत आल्या, त्यांचें सिंहावलोकनानें सूक्ष्म निरीक्षण केल्यास जी एक गोष्ट न विसरण्यासारखी विशेष प्रामुख्यानें आढळून येते ती ही कीं, आपल्यांपैकीं कांहीं लोकांचा असा एक लहानसा वर्ग आहे कीं, ज्यांना म. गांधींचें अनत्याचारित्वाचें तत्त्व पसंत पडलें नव्हतें. देशाचें गेलेलें राज्य परकीयांकडून ज्या ठिकाणीं परत मिळवावयाचें आहे, त्या वेळेला आपण अनत्याचारी बनून आपली इष्टसिद्धि होणार नाहीं, अशी या वर्गाची समजूत होती व अंजूनही आहे. त्यांचें म्हणणें जशास तसें वागल्याशिवाय इंग्लिश लोक आपली राज्यसत्ता हिंदुस्थानांतील लोकांच्या स्वाधीन करणार नाहींत, हें आपण समजून असलें पाहिजे. इंग्लिश लोक

आणि इंग्रजी अधिकारी हे तामसी वृत्तीचे असल्यामुळें त्यांच्या विरुद्ध आपण हिंदुस्थानांतील लोकांनीं सात्त्विक युद्ध लढलें तर त्या योगानें आपला कार्यभाग व्हावयाचा नाहीं. जगाच्या इतिहासांतील आतांपर्यंतचीं बहुतेक सर्व राज्यक्रांत्यांचीं उदाहरणें पाहूं लागल्यास लढाई खेळल्याशिवाय राज्यप्राप्ति झाल्याचें कोठेंही आढळून येत नाहीं व रक्तपाताशिवाय झालेली लढाई दिसत नाहीं. रणांगणाच्या रस्त्याशिवाय स्वातंत्र्य संपादन होणार नसल्यामुळे जर कोणतीही चळवळ अत्याचारमूलक नसेल तर त्या चळवळीपासून यशाच्या बीजाचा अंकुर फुटणार नाहीं. अनत्याचारित्वाचें व्रत पाळून स्वराज्य प्राप्त करून घ्यावयाचें म्हणजे सुतानें स्वर्गारोहण करण्याइतकेंच हास्यास्पद आहे. वर सांगितलेल्या वर्गाच्या लोकांची अशी विचारसरणी असल्यामुळें त्यांच्याकडून अनत्याचारित्वाच्या चळवळीला जितका पाठिंबा मिळावयाला पाहिजे होता तितका स्वाभाविकपणेंच मिळाला नाहीं. उलट म. गांधींची ही अनत्याचारित्वाची चळवळ शांततामूलक आणि शांतताप्रधान असल्यामुळें या वर्गांतील लोकांना ही वीर रसाची हानि करणारी चळवळ हाणून पाडण्यासाठींच अविरत प्रयत्न करावे लागले. पण सुदैवाची गोष्ट एवढीच कीं, ही चळवळ हाणून पाडण्याचे त्यांचे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत.

इंग्रजी राज्याच्या सुरवातीची वेळ घेतली, तर त्या वेळेपासूनच आपल्याला असें दिसूं लागतें कीं, हिंदुस्थानांत आलेले इंग्लिश लोक प्रथम प्रथम व्यापाराच्या मिषानें आपल्यामध्यें वावरूं लागले. व्यापाराचें साह्य घेऊन त्याच्या जोरावर आपलें बस्तान जसजसें चांगलें बसत जाऊं लागलें तसतसें व्यापाराच्या साहाय्याला राजनीतीची जोड लावून त्या योगानें ईस्ट इंडिया कंपनीनें आपल्या लोकांच्या दुहीचा फायदा घेण्याचें सुरू केलें. एकाविरुद्ध दुसऱ्याला उठवून, एकाची पगडी दुसऱ्याच्या डोक्यावर चढवून, एखाद्या संस्थानिकाला बगलेंत मारून दुसऱ्या संस्थानिकाचें राज्य घशांत टाकून आणि जातींजातींत वैमनस्य आणि परस्परांत मत्सर वाढवून अगदीं अखेरीस छोट्या छोट्या लढाया जिंकून त्या लहानशा ईस्ट इंडिया कंपनीचें पुढें थोडक्याच वेळांत हिंदुस्थानावर राज्य करणारें अधिकारी मंडळ झालें. याप्रमाणें हा हिंदुस्थानांतील लोकांनीं आपलें स्वराज्य गमाविण्याचा आणि इंग्लिश लोकांनीं तें कमाविण्याचा इतिहास आहे. राज्यक्रां

तीला रक्तपात व्हावा लागतो, ही गोष्ट जरी खरी असली, तरी राज्यक्रांतीसाठीं रक्तपाताची तयारी प्रथमपासूनच व्हावयाला पाहिजे, ही गोष्ट खरी नाहीं. इंग्लिश लोक हिंदुस्थानांत राज्य उभारण्याचें मनांत आणूं लागले तेव्हांपासून न त्यांनीं अत्याचाराला सुरवात केली नाहीं. प्रथमपासून जवळ जवळ अगदीं शेवटपर्यंत, त्यांनीं बाहेरून अनत्याचारित्वाचेंच सोंग घेतलें होतें. किंबहुना, आपण अत्याचारी आहों, अशी वर्तणुक त्यांनीं पहिल्यांदाच दाखविली असती, तर हिंदुस्थानच्या त्या वेळच्या लोकांनीं त्यांना या देशांत थाराही दिला नसता. या राज्यक्रांतीच्या बाबतींत अत्याचाराची जितकी जरुरी आहे, तितकीच अनत्याचाराचीही आहे. प्राचीन काळच्या उदाहरणांत लढाई, रक्तपात, राज्यप्राप्ति वगैरेंचा अन्योन्यसंबंध दिसत असला, तरी हल्लींच्या या विसाव्या शतकांत जगाचें पाऊल सुधारणेच्या बाबतींत पुढें पुढें पडत असतां, तेंच तेंच तोडगे करून गुण आणण्याचा प्रयत्न सफळ करून घेणें, योग्य नाहीं.

शिवाय, म. गांधींसारख्या राजकारणांत मुरलेल्या पुढाऱ्यानें आपण सर्वांनीं अनत्याचारी व्हावें, व हिंदुस्थानचें स्वराज्य परत मिळवावें, असा उपदेश केला, तो कांहीं उगीच केला नाहीं. या उपदेशांतील तत्त्वांत जर कांहीं सजीवपणा नसता, तर म. गांधींना या तत्वाच्या प्रसारानें जितका लोकसंग्रह करता आला तितका तो त्यांना मुळींच करता आला नसता. लोकसमूह काय इतका वेडा आहे कीं, कोणी एखाद्या वेड्यानें आपलें वेडगळ तत्त्व त्याला सांगितलें तर त्याची बरहुकुम अंमलबजावणी तो सर्व वर्षभर सततपणें चालूं ठेवील ! साऊथ आफ्रिकेंतील लढाई अनत्याचारित्वाच्या तत्त्वावर एकदां जिंकून पाहून, त्याचा दुसरा प्रयोग हिंदुस्थानांत आल्यानंतर, कांहीं वर्षे येथील लोकांत मिळून मिसळून वागून, त्यांचें हृद्गत समजून घेतल्यावरच म. गांधींनीं करण्याचा घाट घातला. अत्याचाररहित चळवळ अशी ही पहिलीच होती आणि ती तशी अत्याचाररहित होती, म्हणूनच इंग्लिश अधिकाऱ्यांना त्या चळवळीविरुद्ध ताबडतोब कोणतेंही शस्त्र उपसतां आलें नाहीं. हा अनत्याचार हिंदुस्थानांत सैरावैरा सगळीकडे बोकाळूं लागला, पण त्यामुळें प्रत्यक्ष असें आपलें कांहीं एक वाकडें झालेलें दाखवितां येत नसल्यामुळें भावी अनर्थ डोळ्यांपुढें दिसत असतांही कलेक्टरापासून तो सर्वश्रेष्ठ व्हाइसरॉ-

यपर्यंत सर्व नोकरशाहीला या बाबतींत मूगच गिळून बसावे लागले. अधिकारी सर्वशक्तिमान् होते, तरी या चळवळीच्या नरड्याला हात घालण्याचा धीर एक वर्षभर कोणालाच होत नव्हता. अनत्याचारित्वाचें तत्त्व ह्मणजे एक धर्म होय. धर्मांत हात घालावयाचा नाहीं, म्हणून इंग्लिश राज्यकर्त्यांनीं हिंदुस्थानांतील लोकांना चुकून पूर्वींच वचन देऊन टाकलेलें होतें, ही एक निराळी अडचण होतीच. सबब अनत्याचाराची ही चळवळ विशेष जोरानें थोड्याच अवधींत फैलावली व पुढें मागें केव्हां पेट घेईल याचा भरंवसा राहिला नाहीं. आणि म्हणूनच अनत्याचार दाबून टाकण्यासाठीं अत्याचाराचीं भुतें सरकारला निर्माण करावीं लागलीं आणि आपण हिंदुस्थानांतील सर्व लोकं त्या कृत्रिम भुतांच्या खोट्या भुताटकीला बळी पडलों !

रक्तपाताशिवाय स्वराज्य कोणालाही मिळालें नाहीं, ही गोष्ट म. गांधींनीं इतिहासांत वाचली नव्हती, असें नाहीं. पण हे अत्याचाराचे दाखले दाखविणारे त्यांतले तज्ञ म. गांधींना त्यांच्या अनत्याचारित्वाच्या तत्त्वासाठीं नांवें ठेवीत असत ! महाराष्ट्राची परंपरा धाडसाची, शौर्याची, धडाडीची आणि ठोशास ठोसा देण्याची आहे, ही गोष्ट हे लोक म. गांधींना बजावीत होते ! टक्कर देण्यासाठीं यांचे बाहू स्फुरण पावत होते ! शठाबरोबर शठ झाले पाहिजे, असे या लोकांना वाटे ! एका गालावर चापट मारली तर दुसरा गाल क्षणभर भावी कार्यभाग साधून घेण्यासाठीं सहनशीलतेचा आविर्भाव आणून पुढें करावा, हें तत्त्व न पटून या लोकांच्या हातांचीं बोटें उलट थोबाड फोडण्यासाठीं वळवळत होतीं ! लहान लहान पण शाळेंतून आणि कॉलेजांतून जाणाऱ्या मुलांना हें निगरगट्टपणाचें तत्त्व बालपणींच शिकविलें, तर त्यांच्या भावना कधींही उद्दीपित होणार नाहींत, त्यांच्या हातून कोणतीही क्षोभकारक कृत्यें घडून येणार नाहींत, व ते मोठेपणीं नेभळे व हतवीर्य बनतील, अशी या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांना भीति वाटूं लागली. या सुप्रजानिर्माणशास्त्रासाठींच त्यांनीं म. गांधींच्या चळवळींत अंगचुकारपणा केला, आंतून धूसफूस चालविली आणि वरून मुग्धता स्वीकारिली. म. गांधी हे लांब राहून ह्या सर्व गोष्टी पहात होते व मधून मधून या आपल्यामध्येंच उपस्थित झालेल्या अरिष्टाच्या निवारणार्थ त्या अत्याचाऱ्यांना गोड बोलून दुखवीत नव्हते, चुचकारित होते, व स्तुतीच्या

बहाण्याखालीं प्रत्यक्ष निंदा न करितां आपल्याकडे शस्त्र तिकडे ओढून घेत होते. पण हा महाराष्ट्रांतील वर्ग पडला प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांचा ! तो काय असल्या गोंजारण्यानें थोडाच फसणार आहे ?

या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांना हें समजावयाला पाहिजे होतें कीं, साधनांच्या दृष्टीनें अत्याचार आणि अनत्याचार हीं दोन्हींही तत्वें परस्परविरोधी आहेत, असें नाहीं. अनत्याचाराचें रूपांतर अत्याचारांत पुढें-मागें केव्हां होणारच नाहीं, असें नाहीं. अनत्याचार फक्त कांहीं ठराविक मुदतीपर्यंतच पाळावयाचा होता. मुदतीनंतरचा कार्यक्रम पुढें ठरणार होता. शिवाय, अत्याचारांत जितकें साहस आहे, तितकीच शक्ति अनत्याचारांतही आहे. अत्याचारानें मनुष्याचा देह जिंकतां येतो, परंतु अनत्याचारानें मनुष्याचें मन जिंकतां येईल. आणि मन जिंकल्यानंतर त्या मनाचा देह जिंकण्याला कितीसा अवकाश लागणार आहे ? अत्याचार हा धर्मबाह्य आहे. अनत्याचार हा धर्मसंमत आहे. अत्याचाराला इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थानांत चालू केलेल्या कायद्यांच्या कलमांची बंदी आहे. अनत्याचार ज्याप्रमाणें इतर दुसऱ्या कोणत्याही कायद्याच्या आड येत नाहीं, त्याप्रमाणें तो इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील कायद्यांच्याही आड येत नाहीं. अनत्याचारी माणसाबद्दल शत्रूला जितका आदर वाटेल त्याच्या एक शंभरांश देखील अत्याचाऱ्याबद्दल वाटणार नाहीं. ज्या ठिकाणीं बिलकुल गवत नाहीं, त्या ठिकाणीं पडलेली ठिणगी जशी आपोआप विझून जाते, किंवा एखाद्या शांत माणसाच्या शांत वृत्तीनें जसा दुसऱ्याचा राग विरून जातो, तसा अनत्याचारानें एखाद्या आततायी इसमाचा अत्याचारी स्वभाव निकामी होतो ! शिवाय अनत्याचार हा ईश्वरांश आहे आणि अत्याचार राक्षसांनीं करावयाचा असतो. अत्याचार जसा कोणालाही सहज संपादन करून घेण्यासारखा आहे, तशी अनत्याचाराची गोष्ट नाहीं; आणि म्हणूनच अनत्याचारित्वाचें तत्त्व जसें अंगीकारण्यास कठीण, तसेंच परिणामीं सर्वतोपरी अधिक हितकारक आहे. शिवाय अनत्याचारी माणसाला मनांत आणल्यास व मनाला वाटल्यास केव्हांही अत्याचारी होऊं शकतां येईल. पण अत्याचारी मनुष्याला मात्र अनत्याचारी होणें दुर्घट आहे. म. गांधी हे सेनानायक असतांना आपली स्वतःची व्यक्ति हिंदुस्थानच्या जनतेंत ते विसरून गेले होते. हिंदी

जनतेनें आपण एका वर्षांत स्वराज्याची तयारी करूं, असा संदेश परिस्थितीच्या रूपानें म० गांधींना कळविला आणि म्हणून म. गांधींनीं स्वराज्याचा डाव मांडला. जनता जसें सांगेल तसें म. गांधी हे वागणार होते. अनत्याचाराची पूर्वतयारी दाखविल्यानंतर जनतेनें अत्याचाराकडे बोट वळविलें असतें, तर म. गांधींनींहि आपलें अनत्याचारित्वाचें तत्त्व अगदीं राज्यप्राप्ती होण्याच्या वेळीं देखील सोडलें नसतें असें नाहीं. जनतेची तयारी आणि एकंदर वातावरण पाहून म. गांधींनीं आपले कार्यक्रम मधून मधून बदलले नाहींत काय ? पण एक वेळ या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांच्या समाधानासाठीं असें गृहीत धरून चाललें कीं, म. गांधींनींहि आपला अनत्याचारित्वाचा आग्रह सोडला नसता व अगदीं शेवटीं त्यांनीं आपली एकटी व्यक्ती सबंध जनतेंतून काढून घेतली असती, तर मग अर्थात त्या वेळीं जनतेनें म. गांधींना टाकूनच दिलें असतें. म. गांधींनींहि त्या वेळीं आपल्या डिक्टेटरच्या जागेचा राजीनामा दिला असता ! आणि अनत्याचारित्वाच्या तत्त्वानें संपादन केलेल्या शक्तिवर थोड्याशा अत्याचारानें म. गांधींच्या मदतीशिवाय जनतेनें यशप्राप्ति करून घेतली असती. पण इतका दूरवर विचार या राष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी लोकांच्या तरतरीत डोक्यांत कसा यावा ?

अत्याचार आणि अनत्याचार या दोन्ही तत्त्वांच्या मुळाशीं एक प्रचंड शक्ति आहे, ही गोष्ट म. गांधींनीं ओळखली होती. ही शक्ति निर्माण करण्याचें काम एक वर्षांत केलें म्हणजे पुढील मार्ग मुळींच दुर्घट गेला नसता. धरणानें पावसाचें पाणी अडवून ठेवलें म्हणजे त्या पाण्याच्या जोरावर उत्पन्न होणारी वीज पाहिजे तिकडे पाहिजे तशी उपयोगांत आणतां येते, त्याप्रमाणेंच ही एक राष्ट्रीय शक्ति हिंदुस्थानांतील सर्व लोकांच्या अंगांत म. गांधींना उत्पन्न करावयाची होती. शक्तीचा सांठा आपल्या जवळ भरपूर असला, म्हणजे आपल्याला वाटेल तेवढा आणि वाटेल तसा त्याचा उपयोग करून घेतां येतो. वाफ तयार झाली म्हणजे तिचा उपयोग आगगाडी चालविण्यापर्यंत करतां येण्यासारखा आहे. ही शक्तीची वाफ स्वराज्याची आगगाडी चालूं करण्यासाठीं म. गांधींना पाहिजे होती. या अनत्याचारित्वाच्या चळवळीनें म. गांधी हे आपणां हिंदुस्थानांतील लोकांच्या हातांत

एक सामर्थ्य आणून देत होते. त्या सामर्थ्याचा उपयोग मग आपणास वाटेल तसा करतां आला असता. या शक्तीच्या तेजानें आपण कोणालाही दिपविलें असतें. सुदैवानें. सुधारलेल्या इंग्लिश अधिकाऱ्यांच्याच बरोबर स्वराज्याचे हक्क प्राप्त करून घेण्यासाठीं आपणांला भांडावयाचें असल्यामुळें, बहुतेक अशा या अनत्याचारानें एकवटविलेल्या शक्तीच्या बळामुळें शेवटच्या अत्याचाराचा प्रसंग देखील आपल्यावर आला नसता. इतकें प्रचंड सामर्थ्य केंद्रीभूत झालेलें पाहून इंग्लिश लोकांनीं आपण होऊनच हिंदुस्थानांतील लोकांच्या हातांत स्वराज्य दिलें असतें. अशा संकलित शक्तीकडे कोणाला दुर्लक्ष करतां येणार आहे ? दुर्लक्ष करून प्रकरण हातघाईवर आणलें, तरी देखील या धार्मिक द्वंद्वयुद्धांत अखेरीस आपणास हारच खावी लागेल, हें न जाणण्याइतके राजकारणांतील धुरीण इंग्लिश लोक दुधखुळे खास नाहींत;

पण हा शेवटचा प्रसंग टाळण्यासाठीं इंग्लिश अधिकाऱ्यांनीं आपल्यामध्यें दुही पाडली. अनत्याचारी लोकांपुढें अत्याचारी लोक आडवे उभे केले, व अत्याचाऱ्यांनीं अनत्याचाऱ्यांना मदत करूं नये, अशी योजना घडवून आणली; आणि म्हणूनच महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी उघड उघड म. गांधींचे अनुयायी बनले होते, तरी आंतून व्यक्तिविषयक मत्सराची बियाणीं पेरण्याचीं दुष्कृत्यें ते करूं लागले आणि मनाशीं धन्यता मानून घेऊं लागले. ही द्विदल पद्धति पुष्कळ दिवस टिकली. या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांनीं म. गांधींच्या देशकार्याला पूर्ण पाठिंबा देण्याच्या ऐवजीं आंतून फक्त खास विरोध मात्र सुरू ठेविला. स्वतः अत्याचाराचें तत्त्व प्रसंगविशेषीं देखील अमलांत आणण्याच्या नांवानें पूज्य. जणुं काय या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांच्या हातांतील हे सोटे आणि सोडगे अत्याचारासाठीं नसून लटपटणाऱ्या त्यांच्या शुष्क शरीरयष्टीला टेकूं देण्यासाठींच आहेत ! यांना म. गांधींचें तत्त्व पसंत नव्हतें, पण यांना जें तत्त्व पसंत होतें त्या तत्त्वाच्या फैलावासाठीं यांनीं गेल्या दीड दोन वर्षांत काय कामगिरी बजाविली आहे ? कोणता दिग्विजय गाजविला आहे ? हें अत्याचाराचें तत्त्व त्यांच्यावर दुसऱ्यांनीं कोणी लादिलेलें नाहीं; आणि दुसरा कोणी शहाणा आणि शांतताप्रिय मनुष्य या प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांवर ते अनाठायीं लादण्याचा मूर्खपणा करणार ही नाहींत. मग हीं आपण होऊन

पसंत केलेली रूपरेषा या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांनीं आपल्या कार्यक्रमांत मुळींच कशी आणली नाहीं ? नुसत्या म. गांधींना शिव्या देऊनच हे आपल्या आयुष्याची किंमत करून घेणार आहेत काय ? या सर्वसंमत अनत्याचारित्वाच्या दिवसांत अत्याचाराची हौस वाटणाऱ्या इसमाला पुष्कळ उत्तम उत्तम संध्या आहेत. त्यांकडे या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांची अजूनपर्यंत डोळेझांक कां होत आहे, कोण जाणे ! लांब लांबची हिंदुस्थानांतील शेकडों आणि हजारों उदाहरणें दृष्टीच्या आड करून ठेविलीं तरी महाराष्ट्राच्या अगदीं जवळ, नव्हे अगदीं मध्यभागीं, मुळशीसारख्या ठिकाणीं राजरोस टाटा कंपनीचे मजूर गरीब मावळ्यांवर जबरीनें जुलूम करीत आहेत आणि त्यांच्या बायकांची अब्रू बेशरमपणानें घेत आहेत, या गोष्टी या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांच्या कानांवर गेल्या नसतील, असें नाहीं. किंवा, या महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचाऱ्यांचे दिसावयाचे दांत वेगळे आहेत आणि खरोखरीचे दांत वेगळे आहेत ? स्वतः कांहीं एक देखील न करतां नुसते प्रतिष्ठित अत्याचारी म्हणून मिरवून कालमानाप्रमाणें स्वीकारिलेल्या अनत्याचारित्वाच्या योग्य व न्याय्य मार्गांत म. गांधींना शिव्या देण्यासाठींच काय यांचा पुरुषार्थ ? हाच यांचा अत्याचार ? सत्याग्रहासारखी साधी गोष्ट करून फुकट हालअपेष्टा सहन करणें महाराष्ट्राच्या परंपरेच्या दृष्टीनें चुकीचें ठरतें, म्हणून ती गोष्ट करावयाची नाहीं ! दुसऱ्या उरलेल्या गोष्टींबद्दल हे महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी गेल्या एक दोन वर्षांप्रमाणें हल्लीं देखील उदासीनच आहेत. काय करतात बिचारे ! मनांतल्या मनांत जळत आहेत. या वीरशिरोमणींच्या धीरोदात्त कृतीला महात्माजींची शिकवणूक आडवी येते ! हे धैर्यमणी आपापल्या पाचपंचवीसांच्या टोळ्या कोणत्या सेनानायकाच्या हुकमासाठीं थपकवून ठेवीत आहेत कोणास ठाऊक ! त्यांचे ते कमाविलेले बाहु, भरलेली छाती, घष्टपुष्ट शरीरें, या अनत्याचारित्वाच्या प्रसारामुळें कशीं अगदीं कुचकामी झालीं आहेत ! फक्त आंतून आणि थोडी थोडी बाहेरून, दुसऱ्यांच्या कुचेष्टेनें आपली प्रतिष्ठा माजविण्यासाठीं, निंदेची कृतिशून्य तोंडपाटिलकी मात्र यांची अहोरात्र सुरू आहे ! बाकी इंग्लिश अधिकाऱ्यासारखे धूर्त, चाणाक्ष आणि अतिप्रसंग न करणारे राज्यकर्ते प्रतिस्पर्धी असल्यावर, हिंदुस्थानच्या लोकवस्तीच्या दृष्टीनें योग्य

आणि कायदेशीर अशा अनत्याचारित्वाच्याच मार्गानें म. गांधींच्या म्हणण्याप्रमाणें स्वराज्यप्राप्ती पुढें मार्ग खास होणार असली, तरी हे महाराष्ट्राच्या परंपरेला चिकटलेले प्रतिष्ठित अत्याचारी, आपला म. गांधींच्या चळवळीला विरोध करण्याचा हट्ट सोडून देऊन, अत्याचाराचा आविर्भाव आणि अभिनय दाखवितां त्रिशंकूप्रमाणें हल्लीसारखे पुढें ही असेच लोंबकळत राहतील, हें संभवनीय आहे, असें तूर्त तरी निदान कोणी समजतां कामा नये आणि म्हणतां कामा नये ! हल्लींची त्यांची दिनचर्या म. गांधींच्या तत्त्वांना विरोध करणारी असली म्हणून काय झालें ?

हे महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी गेल्या वर्ष दीड वर्षांत अनत्याचाराचा उघड आणि गुप्त उपहास करण्याचें सोडून देऊन म. गांधींच्या मदतीला आले असते, तर म. गांधींचा आणि हिंदुस्थान देशाचा बराच कार्यभाग सुलभ झाला असता. पण आपसांतील दुहीचें नष्टचर्य जें हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या पाठीमागें लागलें आहे, तें कोणाच्यातरी कम नशिबाच्या जोरावर, अजून संपून जात नाहीं, ही एकच गोष्ट निर्विवाद आहे, असें म्हणणें भाग पडतें.

---

# हृदयाविष्करण !

---

दे. भ. भाऊसाहेब लवाटे यांचें गेल्या महिन्याच्या दहाव्या तारखेस मुळशी येथील सत्याग्रहांत प्रो. परांजपे, डॉ. फाटक, रा. सी. के. दामले, वगैरे ज्या लोकांनीं तुरुंगवास पतकरला या सर्वांचें अभिनंदन करण्याकरितां रे मार्केटच्या भव्य पटांगणांत भरलेल्या जाहीरसभेंत अध्यक्ष या नात्यानें एक भाषण झालें होतें. त्या वेळीं रा. लवाटे हे आपल्या प्रास्तविक भाषणांत असें म्हणालें असल्याचें मुंबईच्या 'सत्याग्रही' वर्तमान पत्रांत प्रसिद्ध झालें आहे कीं, "प्रो. परांजपे व मी यांच्यांतील एक थोडी गोष्ट सांगितलें म्हणजे आजच्या प्रसंगी मी आपलें कर्तव्य केलें, असें होईल.

पेण प्रांतिक परिषदेच्या वेळेस महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीत मुळशी सत्याग्रहाबद्दलची सूचना आली होती, पण आजपर्यंत पुढारी मंडळी लोकांना हाका मारतात; पण स्वतःवर पाळी आली कीं माघार घेतात, ही कुत्सित बुद्धि माझ्या मनांत आल्यामुळें प्रांतिक कांग्रेस कमिटीच्या सर्व सभासदांनीं सत्याग्रहांत नांवें दाखल करावीं, अशी मी उपसूचना आणली. ही आगळीक त्यावेळीं माझ्या हातून झाली. ती आपल्या समोर सांगाव वयाला मी शरम ठेवीत नाहीं. त्यानीं आपल्या कृतसंकल्पाप्रमाणें सत्याग्रह केला व ते तुरुंगात गेले. आतां ज्यांना कोणाला स्वतःच्या स्फुर्तीनें पुढील परिणाम व हाल ओढवून सत्याग्रहांत सामील व्हावेसें वाटेल ते खरोखर धन्य होत. मग तो एखादा घोंगड्या असो किंवा साहेबांच्या पोषाखांतला असो." हेंही एक हृदयविष्णरणच आहे. पण तें इतर कांहीं हृदयाविष्क-रणांसारखें घाणेरडें नाहीं. पेणच्या परिषदेंत या हृदयाविष्कणाची मूळ जन्मभूमि असली, तरी तेथील स्पर्शजन्य वातावरणातून पुण्याच्या स्वच्छ हवेंत आल्यानंतर हें हृदयाविष्करण अनुतापानें पुनित झालेलें आहे. कृत-कर्मानुसार एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाण्याच्या वेळचे अन्तकालचे प्रसंग हृदयाविष्करणाचे असतात. पण हें अविष्करण जिवंतपणाच्या अक्कल-हुशारीनें झालेलें आहे. घमेंडीच्या फूत्कारानीं हें हृदयाविष्करण भरलेलें नसून, पश्चात्तापाच्या ओलाव्यानें पवित्र झालेलें हें दिसत आहे. वाद करून तत्त्वबोध काढावयाचा, अशा वेळीं व्यक्तिदोषदिग्दर्शन अप्रस्तुत असतें. किंबहुना तसें विवेचन केल्यास तत्त्वाच्या खरेखोटेपणाला कांहींच मदत होत नाहीं. उलट मनुष्य मात्र स्वतः हास्यास्पद होऊन जातो. शिवाय एखादी व्यक्ति विशिष्ट कारणासाठीं अशी वागली काय किंवा तशी वागली काय, ती खरुज खाजवून म. गांधींची सर्वराष्ट्रीय असहकारितची चळवळ चुकीची आहे, असें सिद्ध करून दाखविण्यांत शहाण-पणापेक्षां मूर्खपणाचाच जास्त अंश आहे. असला प्रकार या हृदयाविष्कर-णांत आढळून येत नाहीं. साधक बाधक प्रमाणें पुढें आणून आपला अन्तिम हेतु प्रस्थापित न करितां इतर वटवट करण्याचा उद्व्याप या हृदयाविष्करणांत दिसून येय नाहीं. हें आविष्करण तामसी नसून, सात्त्विक आहे. हें आविष्कृत हृदय प्रेममय असून द्वेषदग्ध नाहीं. अशा आविष्कर

णाबद्दल कोणाला केव्हांही सहानुभूतीच वाटेल. नाहीं तर, इतर हृदयाविष्करणाप्रमाणें ह्याही हृदयाविष्करणाची थुंकी या बोटावरची त्या बोटावर नेण्याला रा. लवाटे यांना गनिमी डाव करतां आला नसता असें नाहीं. ह्याच रा. लवाटे यांच्या मनांत उत्पन्न झालेल्या कुत्सित बुद्धीला 'प्रामाणिक मतभेद' म्हणून म्हटलें असतें, म्हणजे भागलें असतें. रा. लवाटे म्हणतात, ही 'आगळीक' त्या वेळीं माझ्या हातून झाली. पण यांत आगळीक कसली ? ही मित्रद्रोहात्मक देशभक्तीच आहे. तसेंच 'ही आगळीक आपल्या हातून झाल्याचें आपल्या समोर सांगावयाला मी शरम ठेवीत नाहीं,' असें म्हणण्याऐवजीं असें करण्याला मला मुळींच फिकीर वाटत नाहीं, उलट अभिमान वाटत आहे, असें ते म्हणाले असते तरी चाललें असतें. परंतु हा डावपेंच हृदयाविष्करणाच्या वेळीं तरी निदान रा. लवाटे यानीं उपयोगांत आणला नाहीं, याबद्दल नेहमींच्या सरळ परंतु त्या वेळीं आपद्ग्रस्त झालेल्या रा. लवाटे यांच्या मनाचें कोणीही कौतुकच करील. आतां ही कुत्सित बुद्धि कां उत्पन्न झाली आणि ही आगळीक कशासाठीं केली, वगैरे बरेच प्रश्न अजून संदिग्धच राहिले आहेत. अशा अपूर्ण हृदयाविष्करणांतून त्यांचा उहापोह पूर्णपणें करतां येणें तूर्त शक्य नाहीं. तरी पण या हृदयाविष्करणानें पाप परिमार्जन मुळींच होणार नाहीं, असें नाहीं. असल्या हृदयाविष्करणानें स्वतःचा व इतरांचा फायदा असतो. हृदयें हृदयांशीं खरें बोलूं लागलीं म्हणजे विकारवशता नष्ट होते आणि विचार जागृति प्रसूति पावते. सबब अनिष्ट गोष्ट चुकून हातून घडून गेलेल्या माणसानें खरें, दिखाऊ नव्हे, हृदयाविष्करण करून घेऊन आपला मार्ग कमी कंटकमय करून घेणेंच, जास्त उचित आहे.

# महात्मा गांधी, तुम्ही चुकलांत!

हिंदुस्थानानें आपलें स्वराज्य गमावल्याला उणी पुरीं दीडशें वर्षें झालीं. उत्क्रांतीच्या मार्गाला लागलेल्या राष्ट्राला दीडशें वर्षांचा काल कांहीं फार नाहीं. पुरातन कालापासून हिंदुस्थानांतील राजे आपलें स्वराज्य चालवीत होते, तरी राजकारणांत जितके वाकबगार आणि धूर्त असावयाला त्यांनीं पाहिजे होते, तितकें पटुत्व त्यांनीं अंगीकृत केलें नव्हतें असें ह्मणतात. एकराष्ट्रियत्वाची कल्पना जितकी पराक्रमी असावयाला पाहिजे, तितकी ती विकास पावलेली नव्हती. परचक्राच्या अरिष्टनिवारणा साठीं अंतःस्थितीची दुर्भेद्यता विशेष चाणाक्षपणानें संपादन करण्यांत आली नाहीं आणि जतन करून ठेविली गेली नाहीं. आपल्यासारखेंच बाहेरचें जग भोळसर आहे, ही मनाची सोवळी स्थिति प्रतिकूल परिस्थितींत देखील बदलून टाकण्याचे प्रयत्न झाले नाहींत. धर्माची किंमत राजाश्रया-शिवाय फुकट आहे, हें न ओळखून गतकालीन मोठेपणावरच अवजड भिस्त ठेवण्यांत आली. युक्ति प्रयुक्तीला पारखे झालेले त्यावेळचे हिंदुस्था-नांतील लोक बाह्य फसवणुकींनीं गरीब बिचारे तत्काल फसून गेले. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानचें स्वराज्य हिंदुस्थानच्या लो-कांच्या हातांतून इंग्लिश व्यापाऱ्यांच्या हातांत कळे न कळे तों जाऊन पडलें!

इतिहासाच्या पुरुषार्थाची येवढी उलटापालट झाली, तरी हिंदु-स्थानांतील लोकांपैकीं, कांहीं थोडे अपवाद सोडून दिले तर, बाकीच्या सर्वांच्या मनांत पहिल्या शंभर वर्षांत प्रकाशाचा एक किरण देखील पडला नाहीं. धनधान्यसंपन्न हिंदुस्थान देश कामधेनुसारखा आपल्या मुलांलेकरांना वर्षानुवर्ष इमानेंइतबारें पोशीत राहिल्यामुळें, पहिल्या एक दोन पिढींत दारिद्र्याच्या विटंबना पुष्कळांना विशेष भासल्या नाहींत. जळूच्या रक्तशो-षणपद्धतीनें हळू हळू स्वत्व आणि स्वाभिमान नष्टप्राय होत जाऊन कुटुंब-

परिपालनापेक्षां दुसरे कोणतेही मनोविकार हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत येईनासे झाले. क्षात्रवृत्तीचे लोक आपलें क्षत्रिय तेज विसरून गेलें. ब्राम्हणांनीं आपलें परतंत्र झालेलें ब्रम्हज्ञान उराशीं विनाकारण बाळगून ठेविलें. वैश्य जातीची आकलन शक्ति स्वतःच्या धंद्याच्या फायद्याच्या टप्प्या पलीकडे मुळींच गेली नाहीं. शूद्रांनीं मात्र योगी लोकांना देखील अगम्य असा आपला परमगहन सेवाधर्म एक केंसभर देखील सोडला नाहीं. येवढें करूनच हे शूद्र थांबले नाहींत; तर त्यांनीं योगायोगाच्या बळावर आपल्याहून वरिष्ठ असलेल्या तिन्हीही जातींना तत्काल आपल्यासारखें करून टाकिलें. पण किड्यांना देखील कधीं कधीं पुढें घाण सहन होईनाशी होते, तसा प्रकार होऊन हिंदुस्थानांतील लोकांची मनोवृत्ति हळू हळू पालटूं लागली. नानाप्रकारचे आणि नाना तऱ्हेचे प्रयत्न स्वराज्यप्राप्तीसाठीं सुरू झाले. सर्व राष्ट्राची मिळून एक राष्ट्रीय सभा स्थापन झाली. सदरच्या सभेच्या पोटांत, आंतील व बाहेरील लोकांनीं आपआपली राष्ट्रसेवा करून आपलें मन व शरीर पवित्र करून घेतलें. पण अमावास्येच्या रात्रीच्या अंधकारांत प्रकाशाचा कण जसा दृग्गोचर होत नाहीं, त्याप्रमाणेंच परकीय राज्यपद्धतींत स्वराज्यप्राप्तीचें प्रत्यक्ष बीज गेल्या तीस चाळीस वर्षांत रुजलेलें मुळींच दिसून आलें नाहीं.

तरी पण, पावसाची सोसाट्याची सर येण्यापूर्वीं निसर्गाची स्थिति भावी इतिहासाला दाखवीत असते, तद्वतच हिंदुस्थानांतील तीस बत्तीस कोटि लोक आपल्या मनाशीं एकाच वेळीं कसला विचार करीत राहिले आहेत, याचें वातावरण पसरलेलें लवकरच दिसून आलें. हिंदुस्थानासारखा निरनिराळया जातींनीं भरलेला देश स्वराज्याच्या एकाच भावनेनें उद्दीपित झालेला दिसून आला. परस्परविरोधी अनेक धर्मतत्त्वें एकाच राष्ट्रांत प्रचलित असलीं, तरी तीं सर्व विसरून, देशप्रीतीचा एकच धर्म सर्व लोक पाळूं लागले. आपापसांतील व्यक्तिविषयक हरएक भेद एकाच जात्याखालीं सर्वचजण एकसारखे भरडले जात असल्यामुळें, नाहींसे झाले. व सर्व लोकांच्यापुढें उदरंभरणाशिवाय दुसरें गत्यंतरच नाहीं, याची निदर्शक स्पष्ट लक्षणें दिसून आल्यामुळें, सहकारितेचा एकच दुवा निखळला, तर स्वराज्याचा अमृतमय कुंभ आपल्या हातीं लागेल असा आत्मगत दृढ विश्वास

हिंदुस्थानांतील सर्व लोकांच्या मनांत सामान्यत्वानें वाढीस लागलेला उघड दिसून येऊं लागला.

महात्मा गांधी, आपण ही सर्व परिस्थिति एक दोन वर्षांपूर्वी प्रत्यक्ष पाहिली. साऊथ आफ्रिकेंत आपल्या प्रयत्नानें आलेलें पूर्ण यश आपल्या उत्तेजनासाठीं तयारच होतें. हिंदुस्थानांतील मोठमोठे लोक एकत्र करून आपण स्वराज्याची मोहीम पुकारली. लढाई सुव्यवस्थित चालावी ह्मणून द्रव्यनिधि जमविला. अस्पृश्यनिवारणाच्या प्रसारानें नागरिकांच्या मनांतील आपपरभाव नाहींसा करून टाकला. खादीच्या पोषाखानें हिंदुस्थानांतील सर्व लोकांना राष्ट्रीय शिपाई बनविलें. सरकारी नोकरांनीं आपली गुलामगिरीचीं बंधनें तोडून टाकिलीं. कोर्टांतील कज्जेदलाल कोर्टाच्या बाहेरील महत्वाच्या कामगिरीवर रुजू झाले. शाळांतील आणि कॉलेजांतील प्रौढ विद्यार्थी दास्यत्वाच्या शिक्षणाऐवजीं राष्ट्रीय शिक्षण घेऊं लागले. मद्यपानाला प्रतिबंध घालण्यांत आला. व्यक्तिविषयक कायदेभंगाला सुरवात करून सार्वत्रिक कायदेभंगाच्या तयारीला प्रारंभ करण्यांत आला. अखेरीस सरकारला कर न देण्याबद्दल इशारतही सांगण्यांत आली. इतकें सर्व झालें, पण रणसंग्रामाला तोंड लागण्याचा काळ समीप येतांच, परमेश्वराच्या कृपादृष्टीचा रोष होवूं लागला. एक वर्षांत स्वराज्य मिळविण्यासाठीं अधीर झालेली मनोवृत्ति वक्रगति पावूं लागली. आणि अखेरीस या सर्व चळवळींचा परिणाम ३१ डिसेंबर १९२१ ला हिंदुस्थानाला स्वराज्यप्राप्ति न मिळण्यांतच झाला. अशा प्रकारें, म. गांधी, आपली असहकारितेची चळवळ सरकारनें अयशस्वीच ठरविली. आणि तुमच्या देशबांधवांनीं देखील ती अव्यवहार्य म्हणून बाजूला काढली.

स्वराज्यप्राप्तीच्या आतांपर्यंतच्या सर्व प्रयत्नांना सरकार नेहमीं आडवें आलेलें दिसून येत होतें. हिंदुस्थानदेशाला स्वराज्य होतां होईलतों लवकर मिळूं नये, म्हणून सरकार पक्षाचें नेहमीं पाहणें असे. स्वराज्य संशोधनासाठीं आतांपर्यंत झालेली कोणतीही चळवळ घेतली, तर तिची पाळें मुळें खणून टाकण्याचा उद्योग सरकारनेंच केलेला आढळून येतो. सरकारच्या अवकृपेची दडपशाही स्वराज्यप्राप्तीच्या मार्गांत विघ्न आणण्यासाठीं दत्त म्हणून उभी केली जाते. हें सर्व अवलोकन करून, तसा आघात सरकार-

करून उजळ माथ्यानें केला जाऊं नये, व त्या योगानें ही चळवळ शक्य तितक्या लवकर व जोरांत फैलावली जावी, असाच हेतु असहकारितेच्या कार्यक्रमाच्या योजनेंत मुख्यतः होता. आणि तो शेवटपर्यंत सर्वांशानें फलद्रुप झाला, असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. अगदीं अखेरपर्यंत या चळवळीला प्रत्यक्ष विरोध असा सरकारकडून मुळींच करण्यांत आला नाहीं. म. गांधींना तर या चळवळीचे पुरस्कर्ते म्हणुन, चळवळीच्या सबंध वर्षांत, सरकार मनांतून पुष्कळ घाबरलें होतें तरी, पाहिजे तसा आणि पाहिजे तितका हिंदुस्थानांतील लोकांत धुमाकूळ माजविण्याला मुभा होती. कांहीं विशेष प्रसंगीं सरकारकडून या चळवळीला प्रतिबंध करण्यांत आला, तो अप्रत्यक्ष रीतीचा होता. आणि तसा प्रतिबंध करण्याचे वेळीं देखील, सरकार नाखुष व लाजलेलें दिसत असे. इतकी अलभ्य लाभाची सवलत सरकारमार्फत या स्वराज्याच्या चळवळीला मिळाली होती, तरी देखील शेवट असाच झाला कीं, संपणाऱ्या वर्षाचें अखेरचें हिंदुस्थान नव्या वर्षाच्या सुरवातीचें दिवशीं पहिल्याप्रमाणेंच परतंत्र राहिलें ! म्हणून, म. गांधी, तुह्मी चुकलात, असेंच म्हणणें प्राप्त होतें. एका वर्षांत स्वराज्य मिळवून देण्याची भीष्म प्रतिज्ञा खोटी ठरली. हिंदुस्थानांतील लोक स्वराज्यदानाला अजून पात्र झाले नाहींत, हेंच म्हणणें खरें ठरलें. इंग्रज सरकारला तुम्ही मित्रभावानें वागून शत्रूसमान लेखित होतां. पण सरकारनें तुमची मोहीम, स्वतः दोषास्पद न करून घेतां, अयशस्वी म्हणून शाबित केली, आणि ज्यांना तुह्मी स्वराज्य मिळवून देणार होता, त्याच तुमच्या मित्र म्हणून समजल्या गेलेल्या लोकांनीं, या तुमच्या चळवळीला अव्यवहार्यतेच्या सदरांत ढकलले. मग त्यांत तुम्ही काय मिळविलें ? प्रयत्नवादी सांगतात कीं, कोणताच प्रयत्न अगदीं फुकट असा जात नाहीं. एवढ्या पुरतीच आपल्या प्रयत्नांची कार्यक्षमता समजावयाची असेल, तर त्याला कोणाची मनाई नाहीं. पण मग फलाच्या दृष्टीनें ह्या असहकारितेच्या चळवळींत विशेष असे काय राहतें ? पूर्वींच्या सर्व प्रयत्नाप्रमाणें या प्रयत्नाचीही तीच गति झाली. सर्व देशांत संचार करून, परिस्थिति अजमावून, हिंदुस्थानांतील लोक एका वर्षाच्या अवधींत स्वराज्य संपादन करूं शकतील, म्हणून तुम्ही ज्योतिष वर्तविलें, तें असत्य ठरलें नाहीं काय ? स्वराज्याच्या मार्गांत

पुढें पुढें जाण्याला उत्सुक झालेली मानसिक शक्ति लोकसमूहाला मार्ग सोडीत होती, हें तुमच्या लक्षांत आलें नाहीं, असला पुढारीपणा काय कामाला आला ? तुम्ही मात्र एकटेच तुमच्या कांहीं इमानी अनुयायांप्रमाणेंच कारागृहवास पतकरून बसलां, यांत हिंदुस्थान देशाला स्वराज्य कसें मिळालें ? लोकांची आपल्याबरोबर येण्याला छाती नाहीं, अशा स्थितींत एकटे दुकटे पुढाऱ्यांनीं आपल्या स्वतःला नाहक नामोहरम करून घ्यावें, यांत काय मुत्सद्दीपणा आहे ? ' वॉर मेझर ' म्हणून आंखून दिलेला कार्यक्रम अंगीकृत करण्यास लोकांच्या मनाची तयारी नाहीं, तर एखाद दुसऱ्या पुढाऱ्यानें आपला एकट्याचाच तेवढा बळी देण्यांत कोणतें राजकारण संपादलें जाणार ? थोर विभूतींचे आयुष्यक्रम तदितर लोकांस आदर्शभूत असतात. येवढाच उपयोग असें करण्यांत असेल, तर ती कृति क्षणभर इष्ट म्हणून समजली जाईल. पण म्हणून थोड्याशा व्यक्तींनीं राष्ट्रकार्यासाठीं संकटांत पटापट उड्या न टाकतां लोकप्रवाहाबरोबर स्वतःला वाहवून घेण्यासाठीं थोडासा अगर पुष्कळसा दम धरला तर त्यांत अधिक धूर्तपणा नाहीं काय ? तुरुगाच्या बाहेर राहून देखील हिंदुस्थानांतील लोकांच्या मनावर उपदेशाचीं पुटेंच्या पुटें चढवून तुम्हांला तुमची देशभक्ति उपयोगांत आणतां आली नसती काय ? स्वराज्यासाठीं तुम्ही इतकी घाई कशाला केली ? त्या स्वराज्यावांचून कोणाचें काय आडलें होतें ? दिवसाच्या नोकरीच्या परिश्रमानें लोकांना रात्रीची झोंप सुखानें येत होती. शिवाय इतके कष्ट सोसून आणि स्वार्थत्याग करून, तुम्ही गेल्या वर्षीं ज्या लोकांसाठीं रात्रींचे दिवस आणि दिवसांची रात्र केलीत, तेच लोक तुम्हांला धर्मवेड्यात काढण्याला आतां उद्युक्त झालेले आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे काय ? अमेरिकेसारख्या बाहेरच्या देशांतून तुमचा पुष्कळ स्तुतिपाठ चाललेला आढळून येतो. पण तुमच्याच देशांतील तुमचेच लोक तुमच्या चळवळीला नांवें ठेवण्यांत आपल्या जीविताची इतिकर्तव्यता समजून घेतात, यांत तुम्ही तुमचा कोणता फायदा पाहिलांत ? हिंदुस्थान देशाला स्वराज्य मिळालें नसतें, तर त्यांत तुमचें स्वतःचें काय बिघडलें असतें ? कोणतें नुकसान झालें असतें ? कौन्सिलच्या धोपट राजमार्गावरून धीटपणानें आपलीं गंभीर पावलें टाकीत टाकीत, स्वराज्याच्या उंबरठ्यापर्यंतची प्रतियोगी सहकारितेची मजल

लोकांनीं आपल्या नातवापणतवांकडून गांठून घेतली असती तर त्यांत तुमचा स्वतःचा थोडाच हिरमोड होणार होता ? आपला स्वतःचा संसार नीट नेटका ठाकण्याचें सोडून देऊन, या राष्ट्रीय संसाराचें ओझें आपल्या माने-वर तुम्ही लादून घेतलें, हा अव्यापारेषु व्यापार कशाला केला ? तुमचा प्रथम दोष असा समजला जातो कीं, तुमचा जन्म गुजराथमध्यें झाला आहे. महाराष्ट्राला जसें क्षात्रतेजाचें वरदान आहे, त्याचप्रमाणें गुजराथ प्रांताला नेभळेपणाचा शाप आहे, हें तुम्ही विसरलां होतां वाटतें ? ऋषीचें कुळ आणि नदीचें मूळ कोणी विचारूं नये आणि कोणाला सांगूं नये, तद्वतच राज्य मिळविण्याला लागणाऱ्या वीरवृत्तीच्या बाण्याचे बाबतींत गुजराथी लोकांची ख्याति आहे, असें कांहीं लोक समजतात. मग त्या बाबतींत तुम्ही आपल्या स्वतःला एक अपवाद म्हणून घमेंडीनें मानीत होता कीं काय ? तुरुंगाच्या आवारांत प्रवेश करतांना संदेश म्हणून हिंदुस्थानांतील लोकांना तुम्ही असें सांगितलें कीं, माझी बंधमुक्तता करावयाची असेल, तर ती हिंदुस्थानांतील सर्व लोकांनां स्वराज्य मिळवून करावी. पण तुम्ही हें पक्कें समजून असा कीं, हिंदुस्थानांतील अवशिष्ट राहिलेल्या बाहेरील लोकांना जशी स्वराज्य मिळविण्याची घाई लागलेली गेल्या वर्षीं दिसून आली नाहीं, त्याचप्रमाणें हल्लीं देखील तुम्ही तुरुंगांत गेल्यानंतर, त्यांना तुम्हांला कैदेंतून मुक्त करण्याची घाई झालेली मुळींच नाहीं. लांबेना तेवढयानें स्वराज्य प्राप्तीचा काल ! लांबला तर लांबला. तुमचा तरी वर्तनक्रम असा काय सुसं-गत होता कीं, तुमच्याच इतक्या लांबी रुंदीच्या इतर डोक्यांनीं, त्यांतील शहाणपणा टाकून देऊन, तुमचें अंधभक्तीनें अनुकरण करावें ? तुम्ही आग-गाडींत बसत होता. घड्याळें वापरीत होता. इंग्रजी मोटारींतून प्रवास केलात. परकीय भाषेंत वर्तमानपत्रें चालविलींत. तारायंत्रांचा उपयोग केलांत. केवढी विसंगत कृति ही ! त्याचप्रमाणें, राजकारणी आणि राजधोरणी मुत्सद्याला न शोभण्यासारखें तुमचें जीवनचरित्र झालें. ख्राइस्टसारख्या धर्मपुरुषाप्रमाणें, वीर रसाची हानि करणारी सहनशीलतेचीं तत्त्वें तुम्ही प्रतिपादिलीं. खादीच्या दुर्बिणीनें नोकरशाहीच्या राज्यांतील स्वराज्याचा चांदोबा दाखविलांत. दंगेधोपे, मारहाण सुरू झाली कीं, तुम्ही मूकवृत्ति स्वीकारीत होता. दिव-सांचे दिवस आणि आठवड्यांचे आठवडे उपवास करून; अन्न पाणी वर्ज

करीत होता. आणि तसें करून, तुम्ही उपोषणें चालविलीं होतीं. तुमच्या काय हें लक्षांत आलें नाहीं कीं हल्लीं हें विसावें शतक चालू आहे. असें करून, असहकारितेच्या कार्यक्रमाच्या जोरावर इंग्रजी अधिकाऱ्यांकडून कोठें स्वराज्य मिळतें काय? तुम्हांला किंवा तुमच्या सारख्या कांहींना तसें वाटत असलें तर खुशाल वाटो. इतरांची परंपरा वेगळी आहे. निंदकाचें घर शेजारीं असावें, त्यांत फायदा असतो, असें संतवचन आहे. तशा दृष्टीनें ही भाषा वापरली जाते, अशी तुम्ही आपल्या मनाची समजूत करून घेतली, तर तें अनुदारपणाचें होईल. तुम्ही आडमार्गानें गाडी हांकून नेत चालला होता, तर तशानें स्वराज्य न मिळेल तर काय होईल? ठरीव मुदतींत हिंदुस्थानांतील लोकांना ज्या अर्थी तुम्ही स्वराज्य मिळवून दिलें नाहीं, त्या अर्थी तुमचीच चळवळ चुकीची होती, असें कोण म्हणणार नाहीं? असहकारितेच्या सुलभ उपायांनीं स्वराज्यप्राप्तीसारखीं प्रकरणें इतक्या तातडीनें हातघाईवर आणणें चांगलें नाहीं. आपण आपल्याला डिक्टेटर करून घेऊन बाकीच्या इतर सर्वांना मनाच्या गुलामगिरींत दाबून ठेवणें हें कसलें स्वराज्य? असलें तुमचें स्वराज्य जर हिंदुस्थानांतील लोकांना मिळवून द्यावयाचें होतें, तर तें तूर्त न मिळालेलेंच बरें! इंग्रजी राज्य तरी तशा स्वराज्यापेक्षां कोठें जास्त वाईट आहे? हिंदुमुसलमानांची एकी व्हावी, म्हणून तुम्ही केवढी धडपड चालविली होती? त्यासाठीं तुम्ही खिलाफत प्रकरण उपटून काढलें म्हणून थोडीच अशी दिखाऊ एकी कायम टिकणार आहे? पंजाबच्या जालियनवाला बागेची पुनरावृत्ति होऊं नये, म्हणून तुम्ही पुष्कळ खटपट चालविली. पण त्याचा काय उपयोग झाला? तोंडानें चूक झाल्याचें इंग्रजी अधिकारी कबूल करीत आहेत; पण स्वतःच्या हातानें आपला लौकिक गमावला जाऊं नये, म्हणून तें फेरफार चौकशीच्या कमिटीचें काम करीत नाहींत. मग तुमची स्वराज्याची चळवळ यशस्वी झाली म्हणून कसें म्हणावयाचें? वास्तविक उक्तीप्रमाणें कृति करून दाखविण्याचें आपलें ब्रीद असल्याबद्दल तुम्ही वारंवार म्हणत होता. त्याप्रमाणें वर्षाअखेर स्वराज्य प्राप्त झालेलें दिसून आलें नाहीं. तेव्हां तुम्ही हिमालय पर्वताच्या गुहेंत, केलेल्या चुकांची जपमाळ मोजीत मोजीत, समाधिस्थच व्हावयाला पाहिजे होतें. पण पूर्वीप्रमाणें हेंही विसंगतच झालें. फक्त एक कंबरेला

लंगोटी घालून जर अशीं स्वराज्यें मिळतीं, तर आजपर्यंत कित्येकांनीं कित्येक स्वराज्यें घरांत घालून घेतलीं असतीं. म. गांधी, तुह्मांला तुरुंगांतील अन्न आवडलें म्हणून तुम्ही तेथें गेला असें नाहीं. घरांतील मंडळींचा कंटाळा आला होता, किंवा तुरुंगांतील दिवसांच्या सक्त मेहनतीचा अभिलाष तुम्हांला उत्पन्न झाला होता असेंही नाहीं. आपल्या तुरुंगवासानें स्वराज्य हिंदुस्थानच्या जास्त जवळ येईल आणि आपल्या उपदेशाप्रमाणें लोक असहकारितेचें व्रत चालू ठेवून कायदेभंगाच्या रस्त्यानें आपल्या पाठोपाठ तुरुंगांत येतील, अशी तुमची अपेक्षा होती काय? तसें असेल, तर तोही तुमचा अंदाज चुकला आहे. तुम्ही तुरुंगांत गेल्यानंतर तुमचेच लोक तुमच्या कार्यक्रमाची टीका आणि टवाळी करून फेरतपासणी करीत आहेत. तुमच्या स्वार्थत्यागाला एवढें पारितोषिक बस्स आहे कीं नाहीं? सारांश, यशाच्या दृष्टीनें दोष कोणाचा हा प्रश्न बाजूला ठेवला, तर तुमच्या चळवळीनें एक वर्षाच्या आंत स्वराज्य प्राप्त झालें नाहीं, तेव्हां, तुम्ही चुकलांत असेंच इहलोक म्हणणार. स्वर्गलोकांत अशा परिश्रमांना आणि अशा स्वार्थत्यागांना निःसंशय पुष्कळ जास्त किंमत असेल. पण त्याचा काय उपयोग? अशी चळवळ करून तुम्ही स्वतःचें अगर लोकांचें कांहीं एक साधलें नाहीं. लोकांना तर स्वराज्य तुम्ही मिळवून दिलें नाहींच. पण स्वतःचें स्वराज्य घालवून बसलांत. अनुयायी अनुकरण करण्याला तयार नाहींत, अशा ठिकाणीं पुढाऱ्यांच्या अमोलिक आणि अलौकिक पण वैयक्तिक कृतीला, असलींच फळें यावयाचीं, हा दैवदुर्विलास आहे!

---

# एक देशभक्त विद्यार्थी.

तीर्थस्वरूप रा. रा. बाबा, यांस.—

कृतानेक शि. सा. न. वि. वि. आपलेकडून नुकतेंच आलेलें पत्र पोंचलें. मजकूर समजला. मी आपलेकडून निघून आल्याला जवळ जवळ वर्ष दीडवर्ष होत आलें. इतक्या दिवसांत नियमितपणें वारंवार

आपल्याला मी पत्र पाठवून आपली खुशाली कळवीत नव्हतों, म्हणून माझ्यावर आपला रोष आहे, हें माझ्या ध्यानांत आहे. पण तसें वागण्याला मला अनेक कारणें होतीं. परंतु, अलिकडे आपलीं एक दोन आलेलीं पत्रें वाचून, माझें हृदय अत्यंत गहिंवरून गेलेलें आहे; आणि म्हणूनच अशा प्रसंगीं, माझ्या मनाची कादंबरी मी आपल्यापुढें वाचून दाखविली, तर तें मुळींच गैर होणार नाहीं. त्या योगानें माझ्या मनाला पुष्कळ समाधान वाटेल. शिवाय माझ्याबद्दल आपण मनांत धरलेला रागही कदाचित् पुष्कळ कमी होईल.

गेल्या वर्षी म. गांधींनीं असहकारितेची चळवळ पुकारली. त्या वेळीं माझें मन एकदम वेडावून गेलें. एक वर्षाच्या मुदतींत हिंदुस्थान देशाला स्वराज्य खास मिळणार, असें माझ्या मनानें ठाम घेतलें. माझें लक्ष अभ्यासाकडे मुळींच लागेना. आपण स्वतः सरकारी शाळा सोडावी, राष्ट्रीय शाळेंत शिक्षण घेण्याकरितां आपलें नांव नोंदवून घ्यावें आणि आपल्याप्रमाणेंच इतरांनाही तसा उपदेश करून कृति करण्याला सांगावी, अशी उचल त्या वेळीं माझ्या मनानें फार खाल्ली. माझ्याप्रमाणें इतर विद्यार्थी आपापल्या शाळा आणि कॉलेजें सोडतात किंवा नाहीं, या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं माझें मन तेव्हां वाट पाहीनासें झालें. कदाचित् इतरांनीं सरकारी शाळा सोडल्या नाहींत, तरी पण आपण आपल्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणें आपलें कर्तव्यकर्म केलें, एवढें मनाचें साधें समाधान देखील मला त्या वेळीं पुरेसें वाटलें. स्वतःच्या आयुष्यक्रमांत मनुष्यानें फक्त सुशिक्षित व्हावें, एवढी एकच जीवितसाफल्याची बाब आहे, असा विचार माझ्या मनांत आला नाहीं. शिक्षण हें एक साधन आहे. त्या साधनानें साध्य करून घ्यावयाची गोष्ट जगांत नेहमीं वेगळीच असते. स्वतःची उपजीविका करणें, एवढाच उपयोग प्रामुख्यानें हल्लीं शिक्षणसंपादनाच्या बाबतींत समजला जातो; पण शिक्षणाशिवाय ज्यांची उपजीविका यथेच्छ चालली आहे, असे लोक थोडेथोडके दिसून येत नाहींत. अविरत प्रयत्न करून उच्च प्रतीचें शिक्षण घेतल्यानंतर, मोठमोठ्या पदव्यांचीं ओझीं आपल्या नांवाच्या पाठीमागें आणि पुढें लावून झालीं, म्हणजे परावलंबनाच्या मार्गानें दुसऱ्यांची अपमानास्पद नोकरी करण्यांतच त्या शिक्षणाचा

परिणाम फुकट जावयाचा असेल, तर तें तसलें शिक्षण घेऊन काय फायदा ? शिक्षणानें मन सुसंस्कृत होतें, असें म्हणतात. पण मनाच्या सुसंस्कृतीला बाहेर मोकळेपणाची वाव मिळणार नाहीं, तर नुसतें सुसंस्कृत मन असून काय उपयोग ? नोकरीच करून आपला चरितार्थ चालवायाचा, तर ती दुसऱ्याची करण्यापेक्षां आपली स्वतःचीच केलेली काय वाईट. एक वेळ, सुसंस्कृत पण परतंत्र मनापेक्षां, अशिक्षित मनाच्या स्वतंत्रपणाचीच मला जास्त किंमत वाटते. निदान त्या मनाला ज्ञानाच्या टोंचणीचें दुःख तरी झालेलें दिसत नाहीं. स्वराजप्राप्तीसारखें अत्युत्तम साध्य प्राप्त करून घेण्याला शिक्षणाची अवश्यकता आहेच, असें मागील इतिहासावरून म्हणतां येणार नाहीं. पूर्वींच्या कालांत अशिक्षित लोकांनीं देखील मोठमोठीं पराक्रमाचीं कृत्यें केलेलीं दिसत नाहींत काय ? मनुष्याला शिक्षण चांगलें करतें, आणि वाईटही करतें. हा शिक्षणाचा दोष नाहीं. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा हा दोष आहे.

शिवाय, म. गांधी हे फक्त एक वर्षभरपर्यंतच आपल्या युद्धासाठीं सरकारी शाळा सोडाव्या म्हणून सांगत होते. या एक वर्षाच्या मुदतीनंतर हिंदुस्थान देशाला स्वराज्य मिळेल, अशी त्यांची बळकट अपेक्षा होती. स्वराज्यप्राप्तीनंतर पुढील वर्षांत कोणत्याही विद्यार्थ्याला वाटेल तेवढा आणि पाहिजे तसा शिक्षणक्रम संपादन करून घेतां आला असता. मग, स्वराज्याच्या दृष्टीनें कमी किंमतीच्या शिक्षणाची, तात्पुरती एक वर्षापुरती स्वार्थत्यागाची तहकुबी आम्ही विद्यार्थ्यांनीं दाखविली नाहीं, तर तें कसें बरें दिसेल ? तुमच्या दृष्टीनें माझें व माझ्यासारख्या इतरांचें हें वर्ष वायां गेलें असें तुम्हांला वाटतें. पण संसारांत हरएक कारणासाठीं, कोणाचें दारिद्र्यामुळें तर कोणाचें आजारीपणामुळें, अशीं विद्यार्थ्यांचीं एक दोन वर्षें बहुधा नेहमीं फुकट नाहीं कां गेलेलीं दिसत ? निसर्गाच्या आपत्तीपुढें जर आपण आपली मान मुकाट्यानें वाकवितों, तर राष्ट्राच्या आपद्धर्मासाठीं आपण कांहीं काळ पावेतों तसेंच वागलों, तर त्यांत गैरवाजवी काय आहे ? असहकारितेच्या चळवळीमुळें एक वर्षांत स्वराज्य हिंदुस्थानाला मिळालें नाहीं, तर विशेष नुकसान न होतां, पुन्हां आम्हां विद्यार्थ्यांना आमचा विद्याभ्यास सुरू करतां येणें, अगदीं शक्य होतें. माझी अशी समजूत केव्हांहीं नव्हती कीं,

हिंदुस्थानांतील सर्व विद्यार्थी आपली विद्यागृहें या वर्षी एकदम सोडतील. तशीं तीं त्यांनीं सोडलीं असतीं, तर खरोखरच इंग्रजी अधिकाऱ्यांना हिंदुस्थान देशाला स्वराज्य द्यावें लागलें असतें. विद्यार्थी वर्ग ही राष्ट्राची छाती आहे. लहान मुलांना शरीराच्या अशक्ततेमुळें आणि मनाच्या दुर्बलतेमुळें कोणतीच धडाडीची गोष्ट करतां येण्याचा संभव नाहीं. वृद्ध नागरिकांचीही थोडीशी तशीच अवस्था आहे. तरुण मनुष्य जसजसा त्याच्या वयोमानाप्रमाणें शहाणा होत असतो, तसतशी त्याची कर्तव्यजागृतीची कल्पना संभावित बनून जाते. तो संसाराच्या चक्रव्यूहांत अस्थिरपणें फिरून दमून भागून जातो. मनोविकारांचे परिणाम त्याच्या मनावर अकल्पित रीतीनें होऊन, तें मन फाजील विचारी होतें. शेक्सपीयरच्या हॅम्लेटप्रमाणें तो संशयात्मा होऊन कृतीच्या बाबतींत निरुपयोगी होतो. पण आम्हां विद्यार्थ्यांची स्थिति तशी नाहीं. आम्हांला काळजीचा गंधही नसतो. निराशेच्या प्रसंगांनीं आमच्या मनोभूमिका करपून गेलेल्या नसतात. शक्ति क्षीण झालेली नसते. महत्वाकांक्षेचा जोर आणि जोम आमच्या हातांतून या वयांत वहात असतो. भीतीचा संपर्कही आमच्या मनाला शिवलेला दिसंत नाहीं. संसाराच्या नानाविध पाशांनीं आमचीं शरीरें छिन्नविछिन्न झालेलीं नसतात. म्हणून आम्हां विद्यार्थ्यांच्या तारुण्याकडे भावी इतिहास नेहमीं उत्सुकतेनें टक लावून पहात असतो. सबब, हिंदुस्थानांतील सर्व तरुण विद्यार्थ्यांनीं एखादी गोष्ट जुटीनें करावयाची मनांत आणिलें, तर त्यानें काय होणार नाहीं?

म. गांधींना सरकारी शाळा आणि कॉलेजें गेल्या वर्षी ओस पडायला पाहिजे होतीं. तीं तशीं खरोखरच पडलीं असतीं, तर इंग्रजी सत्ता ताबडतोब संपुष्टांत आली असती, असें समजाण्याइतका मी मूर्ख खास नाहीं. पण एवढ्या एकाच गोष्टीनें इंग्रजी राज्याच्या नांवालौकिकाला भयंकर काळोखी लागली असती, असें मात्र मी अजून समजतों. आणि त्याचा उपयोग स्वराज्यदानाच्या बाबतींत मुळींच झाला नसता, असें नाहीं. सरकारी शिक्षणसंस्थांप्रमाणेंच न्यायगृहें, पदव्या आणि कौन्सिलें यांच्यावर ठराविक मुदतीपर्यंत बहिष्कार घालण्याला म. गांधी हे सांगत होते. स्वराज्यप्राप्तीच्या साध्याच्या दृष्टीनें साधनें म्हणून, असहकारितेच्या कार्यक्रमांत, शाळा, कॉलेजें, कोर्टें व पदव्या, ह्या सर्व बाबती, कौन्सिलच्या बहिष्का-

रापेक्षां, पुष्कळच कमी महत्वाच्या आहेत. सरकारी कौन्सिल्सनीं सरकारचा प्रत्यक्ष राज्यकारभारच चालत असतो. राज्यकारभार सुव्यवस्थित चालावा आणि टिकावा म्हणून शाळा, कॉलेजें, कोर्टें, पदव्या, वगैरे उपांगें आहेत. कौन्सिलसशिवाय राज्यसत्ता चालणार नाहीं. पण शाळा, कॉलेजें, कोर्टें व पदव्या या जरी अस्तित्वांत नसल्या, तरी राज्यशकट चालू शकेल. आणि म्हणूनच शिक्षणसंस्था, न्यायमंदिरें आणि पदव्या यांवरील बहिष्काराची चळवळ म. गांधींनीं सबंद एक वर्षांत, फक्त कांहीं विवक्षित कालपर्यंतच, चालविली. हा बहिष्काराचा उपदेश जितका फलद्रूप होणें शक्य होतें, तेवढ्या पुरताच तो करून घेतल्यानंतर, म. गांधी हे बाकीच्या उरलेल्या विद्यार्थ्यांच्या पालथ्या घागरींवर पाणी ओतीत बसले नाहींत. ते आपला मार्ग कायदेभंगासाठीं पुढें पुढें आक्रमूं लागले. विद्यार्थ्यांच्या बहिष्काराच्या चळवळीला कोर्टें व पदव्या यांची मदत तितक्याच तत्परतेनें झाली असती, तर पुढील कायदेभंगाची चळवळ तावडतोब हातीं घेण्यास म. गांधींना संदेह वाटला नसता. पण शाळांमधील आणि कॉलेजांमधील विद्यार्थी यांनीं जितकें याबाबतींत यश मिळवावयाला पाहिजे होतें, तितकें तें, इतर बहिष्कारांच्या चळवळींप्रमाणें, मिळविलें नाहीं. आणि म्हणूनच हिंदुस्थान देशाला स्वराज्यप्राप्ति झाली नाहीं.

पण म्हणून मी निराश मुळींच झालेलों नाहीं; किंवा, माझें एक दीड वर्ष निष्फळ गेलें, असेंही मला वाटत नाहीं. गेल्या वर्षी स्वराज्य मिळालें, नाहीं, तरी पुढल्या वर्षापर्यंत तें जरूर मिळालें पाहिजे, असेंच माझें मन मला सांगत आहे. म. गांधींचा कार्यक्रम चुकीचा होता, अशी मला कल्पना देखील करवत नाहीं लोक त्याप्रमाणें वागले नाहींत. हा लोकांचा अपराध आहे. किरकोळ बाबतींत कांहीं कार्यक्रमांत चुका असल्या, तर त्या आपण पुढील मार्गांत सुधारून घेतल्या पाहिजेत. कोणता कार्यक्रम आज असा आहे कीं, जो लवमात्र चुकीचा नाहीं, असें म्हणतां येईल? चुका करीत करीतच आणि ठेंचा खात खातच मनुष्य शहाणा होत असतो. खबरदारी आतां एवढीच घ्यावयाला पाहिजे कीं, आक्रमिलेल्या मार्गांत मागें पाऊल घेतां कामा नये. उद्दिष्ट दिशेकडे निश्चित लक्ष ठेविलें पाहिजे; मग पुढें पाऊल टाकतांना, मागच्या शिधासामुग्रींत कांहीं थोडीशी नवीन भर टाकिली किंवा छाटाछाटीची

काटकसर केली तरी त्याला हरकत नाहीं. शिवाय अशा स्वराज्यप्राप्तीच्या प्रयोगांत कोणत्याही प्रयत्नाला हटकून यश येईलच, असें खात्रीलायक धरून चालणें हेंही बरोबर नाहीं. हे स्वराज्यप्राप्तीचे प्रसंग अश्रुतपूर्व आणि अभूतपूर्व प्रकारचे असतात. सर्व राष्ट्राच्या नाशिबाची या खेळांत घडामोड व्हावयाची असते. म्हणून अशा वेळीं साधनसामुग्री अशीच होता होईल तो जमविली जांवी कीं, जिच्यायोगानें, यदाकदाचित् अपयश आलें, तरी तें संपादन केलेलें सामर्थ्य व्यर्थ न जातां त्याच दृष्टीच्या पुढील प्रयत्नाला उपयोगी पडावें. तसेंच कोणत्याही इष्ट सिद्धीसाठीं, नवीन प्रयत्न सुरू करण्याचें वेळेला आपल्याला प्रत्यक्ष दिसत असलेल्या तयारीचा होता होईल तितका फायदा करून घेण्याकडे आपण दृष्टी ठेविली पाहिजे. नाहीं तर प्रत्येक गोष्ट पुन्हां पुन्हां सुरवातीपासूनच करावी लागेल. व तसें करण्यांत विनाकारण वेळ आणि शक्ति फुकट जाईल. अशा दृष्टीनें जरुर ते फेरफार म. गांधींच्या कार्यक्रमांत सुचविले गेले, तर ते अवश्य आहेत. म. गांधींच्या मानसिक शक्तीला आपला कार्यक्रम एका वर्षांत सुसाध्य होणार नाहीं, असें तेव्हां संशययुक्त वाटलें असतें, तर त्यांनीं देखील आपल्या त्या गेल्या वर्षाच्या विशिष्ट कार्यक्रमांत तसा फेरफार केला असता. म्हणून तसे योग्य फेरफार आपण हल्लींच्या परिस्थितींत म. गांधींच्या पश्चात् करून घेतले, तर त्यामुळें त्यांना देखील त्यांत आदरयुक्त आनंदच वाटेल.

मी शाळा सोडली किंवा मी कॉलेज सोडलें म्हणून मीच एक देशभक्त आहें, असें मी समजत नाहीं. तसेंच, माझ्यासारखें दुसरे सहाध्यायी आज सरकारी शाळांतून आणि कॉलेजांतून शिक्षण घेतांना दिसत आहेत, म्हणून ते देशद्रोही आहेत असें मानणारांपैकींही मी एक नाहीं. राष्ट्रीय संस्थांमधून मी शिकत असलों आणि माझे इतर व्यवसायी सरकारी विद्यागृहांत शिकत असले तरी आम्हां दोघांचेंही शिक्षण स्वराज्यप्राप्तीसाठींच होत आहे, असें माझें मत आहे. सरकारी शाळा आणि कॉलेजें त्यांनीं सोडलीं नाहींत, म्हणून मी त्यांची चेष्टा करीत नाहीं, त्यांची थट्टा उडवीत नाहीं, त्यांचा हेवा करीत नाहीं किंवा त्यांच्या निंदेनें, मी आपलें तोंड विटाळून घेत नाहीं. मात्र, त्यांची त्यांनाच या बाबतींत लाज वाटत असल्याचें, मला कधीं कधीं स्पष्ट दिसतें. मी ती चव्हाट्यावर आणण्यांत माझा त्यांत काय फायदा? त्यांचें

दुःख मी उघड करून वेशीवर बांधणार, हेंच कीं नाहीं ? शिवाय तसें करून माझ्या देशकार्याला तरी काय मदत होणार आहे ? माझी अशी पक्की खात्री आहे कीं, ते अखेरीस मलाच येऊन मिळणार. शिवाय, तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यास माझ्या सारख्यांच्यापेक्षां त्यांच्या सारख्यांचीच संख्या हल्लीं हिंदुस्थानांत दुर्दैवानें अजून पुष्कळ अधिक आहे.

सरकारी शाळा आणि कॉलेजें म्हणजे तरी हीं कोणाचीं ? तीं सर्व आपल्याच पैशांनीं चाललेलीं आहेत. त्यांतील शिक्षकवर्गही आपल्यांपैकींच आहे. सरकार थोडेंच येथें स्वतः येऊन शिक्षण देत असतें ? राष्ट्रीय आणि सरकारी शिक्षण संस्थांमधून, शिक्षणक्रमही बहुधा एकच पद्धतीचा आहे. क्रामिक पुस्तकें जवळ जवळ तींच असतात. फक्त विचाराची दिशा मात्र दोन्ही ठिकाणीं वेगवेगळी दिसून येते. सरकारी शाळेंत शिवाजी ज्या सालीं जन्माला आला म्हणून शिकविलें जातें, त्यापेक्षां निराळें साल शिवाजीच्या जन्माला राष्ट्रिय शाळेंत देण्यांत येतें, अशांतला भाग नाहीं. सरकारी कॉले- जांतील भूगोलांत हिंदुस्थान परतंत्र दिसतो, आणि राष्ट्रिय विद्यापीठांच्या भूगोलांत तो स्वतंत्र दिसतो, असेंही नाहीं. सारांश, राष्ट्रिय काय किंवा सरकारी काय, कोणत्याही शिक्षण संस्थांमध्यें स्थूलमानानें पाहतां, सर्व विषयांच्या शिक्षणाचे बाबतींत कमी अधिक प्रमाणांत एकवाक्यताच आहे. म्हणजे स्वतंत्र स्वरूपाच्या आदर्शभूत रा ्ीय संस्था व आदर्शभूत राष्ट्रीय विद्यार्थी मुळींच नसावेत असें मला वाटतें, असें नाहीं. पण त्याबरोबरच आपल्याच पैशानें आपल्याच अध्यापकांच्या देखरेखीखालीं चाललेल्या फक्त नांवाच्या सरकारी शिक्षणसंस्था, एकवाक्यतेच्या कार्यक्रमापुरत्या देखील अगदीं निरु- पयोगी, अतएव त्याज्य आहेत, असें मात्र मला म्हणवत नाहीं. सबब, राष्ट्रीय संस्थांमधून देखील जें अवश्यक शिक्षण संपादन करून घेणें जरूर आहे, तेवढें शिक्षण, सरकारी शाळा आणि कॉलेजें यांच्या मार्फत आपण प्राप्त करून घेतलें, तर तें फारसें वावगें होणार नाहीं. तेच तेच दुबार प्रयत्न आपण कशासाठीं करावे ? विशेष स्वरूपाच्या कार्यासाठीं राष्ट्रीय संस्थांमधील शिक्षण अवश्य पाहिजे. पण सामान्य जनसमूह साध्या व्यवहाराच्या गोष्टी सरकारी शाळांतून आणि कॉलेजांतून समजावून घेऊं शकला, तर तें आपल्याला पाहिजेच आहे. तेवढेच आपले श्रम वाचतील,

आणि त्या श्रमांकरितां खर्च करावा लागणारा आपला वेळ आपण दुसऱ्या कामीं उपयोगी आणूं. पण म्हणून, सरकारी शाळांतून आणि कॉलेजांतून उत्तीर्ण दशेला प्राप्त झालेली शिक्षणसंपत्ति जर आपण तशीच तेथें सोडून दिली, तर मात्र त्यापासून धोका आहे. त्यांत शिकविलें जाणारें मनाचें दौर्बल्य आपण बळकट करून ठेविलें पाहिजे. खऱ्या तत्वज्ञानाचीं पुटें वर लिंपिलीं पाहिजेत. सत्य इतिहासाचा आरसा डोळ्यापुढें धरला पाहिजे. मनाला आणि शरीराला येणारा पंगूपणा नाहींसा करून त्या ठिकाणीं सदृढता आपण संचरित केली पाहिजे. राजसेवेप्रमाणेंच देशसेवेचें महत्व बिंबविलें पाहिजे. परावलंबनाऐवजीं स्वावलंबनाची चटक लाविली पाहिजे. राजनिष्ठेप्रमाणें देशभक्ति हाही एक गुण आहे, हें समजून घेतलें पाहिजे. भूतकालीन स्थिति बरोबर ठाऊक केली पाहिजे, वर्तमान स्थितीबद्दल यथार्थ कल्पना करून दिली पाहिजे, आणि भविष्यकालीन इष्टस्थितीबद्दल अचुक दिशा स्पष्ट करून दाखविली पाहिजे. पण या सर्व गोष्टी सरकारी शाळांतून आणि कॉलेजांतून शिक्षण संपादन करून घेतल्यानंतरही साध्य करून घेणें दुर्गम नाहीं. विद्यार्थ्यांच्या पंधरा वर्षांपासून पंचवीस वर्षांपर्यंतच्या वयोमर्यादेंत थोडीशी जरूर ती मनाची सुशिक्षित सुसंस्कृति सरकारी शाळांतून आणि कॉलेजांतून घडून आलेली असली, तरी देखील त्या वेळच्या व त्या नंतरच्या थोड्याशा वेळांत, राष्ट्रीय शिक्षणाच्या मुख्य व अत्यावश्यक चर्चेनीं विद्यार्थ्यांच्या मनाला विचारक्रांतीचें, देशभक्तीचें चलन दिलें, तर त्यायोगें पुष्कळसा कार्यभाग सहज होण्यासारखा आहे. शाळांतील आणि कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं प्रचलित राजकारणाला शिवूं देखील नये, असें एक तत्त्व पूर्वीं प्रचलित होतें. पण हल्लीं त्या मताची मजल निर्विवादपणें येथपर्यंत येऊन ठेपली आहे कीं, प्रौढ विद्यार्थ्यांनीं चालू राजकारण मननपूर्वक वाचावें व आपल्या मनाची तयारी करून ठेवावी. परंतु, कृति मात्र विद्यार्जनाचे कालांत करण्याचें करूं नये. ह्या मताचा ग्राह्यांश पूर्णपणें क्षणभर कबूल केला तरी, सरकारी शिक्षणाबरोबर राष्ट्रीय शिक्षण घेण्याला कांहीं प्रत्यवाय येत नाहीं. व तसें करण्याला सरकारी शाळेंतील व कॉलेजांतील अधिकाऱ्यांना कायदेशीर आडकाठीही करितां येणार नाहीं. अशी पद्धति सुरू झाली म्हणजे राजकारणाला विशेष जोर येईल. आपसामध्यें दिसून येणारी

दुही नाहींशी होईल. राष्ट्रीय संस्थांतील विद्यार्थी आणि सरकारी शाळेंतील विद्यार्थी, आपापला शिक्षणक्रम घेऊन, पुन्हां फावल्या वेळांत एके ठिकाणीं जमून राजकीय शिक्षणाची चर्चा करूं लागले, तर त्या योगानें हिंदुस्थान देशाचा भविष्य काळचा लगाम, तरुण विद्यार्थ्यांना आपल्या हातांत भक्कम धरतां येईल. याप्रमाणें सरकारी शिक्षण संस्थांतून दिल्या जाणाऱ्या अभ्यासाचा फायदा करून न घेण्याचा वेडेपणा न करितां तेथील विद्यार्थी बाहेरील राष्ट्रीय शिक्षणानें आपल्यांत सामील करून घेतले, तर तशानें आपला उद्दिष्ट कार्यभाग सहजगत्या साधून घेतां येईल. इतर राष्ट्रीय व्यवसायांत गुंतलेले मोठे मोठे पुढारी लोक आज आपल्याला आपण स्वतः नवीन सुरू केलेल्या शिक्षणसंस्थांमधून काम करतांना दिसून येतात. पण शिक्षणदानाचें कर्तव्य याच कारणासाठीं सर्व आयुष्य वाहून घेतलेल्या लोकांकडून जितकें उत्तम प्रकारें होणें शक्य आहे, तितकें तें आपल्या सर्वश्रेष्ठ कुलगुरूंकडून आणि कुलपतींकडूनही होण्यासारखें नाहीं. राष्ट्राची प्रत्येक खातीं लोकांनीं सोयीप्रमाणें आणि आवडीप्रमाणें वांटून घेतलीं पाहिजेत. एकच मनुष्याला अनेक ठिकाणीं व्यापार करावयाला सांगण्यानें कितीही सद्बुद्धि असली, तरी अपेक्षित कार्यनिष्पत्ति तेवढ्यानें विशेष चांगली होणार नाहीं. हेंच काम, हे पुढारी लोक आठवड्यांतून एकदां दोनदां, आपल्या विद्वत्ताप्रचूर व्याख्यानांनीं, सरकारी, निमसरकारी आणि बिनसरकारी शाळांतील, कॉलेजांतील आणि युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांकडून तात्बडतोब करून घेऊं शकतील. राजकीय लढा लढण्याचे बाबतींत विद्यार्थी वर्गानें शिस्त अवश्य पाळली पाहिजे. शिस्त कायम राखली गेली नाहीं, तर कोणताच कार्यक्रम पार पाडणें दुर्घट आहे. सारांश, राष्ट्रीय संस्थांमधून विद्यार्थ्यांनीं शिक्षण घेणें, हा उत्तम मार्ग. सरकारी शिक्षणसंस्थांतून जरूर तेवढें शिक्षण घ्यावयाचें व राष्ट्रीय शिक्षणासाठीं ठराविक अवांतर वेळीं राष्ट्रीय पुढाऱ्यांचा शिक्षणक्रम घेऊन शिस्त न बिघडवितां व वैमनस्य न वाढवितां राष्ट्रहिताची एकच दृष्टि प्राधान्यानें पुढें ठेवून पुढें एखाद्या विशिष्ट कालीं सांगितल्या जाणाऱ्या राष्ट्रकार्यासाठीं आपल्या मनाची तयारी असूं द्यावयाची, हा दुसरा पण गौण पक्ष. हे दोन्ही पक्ष एकत्र संमीलित झाले व इतकें संयुक्त शिस्तीचें शिक्षण आपल्या सर्व विद्यार्थ्यांमध्यें पूर्णत्वानें नांदत आहे, अशी पुढाऱ्यांची

एकदां खात्री झाली कीं, मग प्रगतीच्या पुढील मार्गांत कायदेभंगासारखें आणखी एखादें पाऊल तयार केलेला शिपाईवर्ग अशा वेळीं कोणत्याही सबबींवर माघार घेणार नाहीं, असा भरंवसा वाटूं लागल्यामुळें पुढें टाकण्यास पुढाऱ्यांना मुळींच कच वाटणार नाहीं. आणि म्हणूनच गुजराथ राष्ट्रीय विद्या ठाचें प्रिन्सिपाल मि. गिडवानी यांच्या तोंडून सरकारी शिक्षणक्रमांत व राष्ट्रीय शिक्षणक्रमांत मूलतः बिलकुल फरक नाहीं, असे उद्गार नुकतेच निघालेले आहेत. राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना प्रथमतः वंगभंगाच्या वेळीं उत्कटता पावली. त्या प्रसंगीं महाराष्ट्र, बंगाल वगैरे ठिकाणीं कांहीं राष्ट्रीय संस्था निघाल्या. मध्यंतरी बेझंट बाईंच्या राजकीय कर्तबगारीचा उदयकाल होऊन त्यांनाही राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याची तात्पुरती हुक्की आली. अखेरीस, म गांधींनीं या शिक्षणाच्या चळवळीला एक स्वतंत्र स्वरूप दिलें. आतां या शिक्षणसंस्थांच्या चळवळीला यत्किंचित्ही अपाय होऊं न देतां, वरीलप्रमाणें त्या चळवळींत असा कांहीं फेरफार केला, तर ती अधिक व्यापक जोराची आणि सुलभतेची होण्यासारखी आहे.

पं. मदन मोहन मालवीय यांनीं याच उद्देशानें नुकतेंच आसाममधील विश्वनाथ येथें एक व्याख्यान दिलेलें आहे. ते म्हणतात, आपल्या राष्ट्रीय देशभक्तांना तुरुंगांत कोंडून ठेवून सरकारनें भयंकर अन्याय केला आहे. कॉंग्रेसची राष्ट्रीय चळवळ धाब्यावर बसविण्याचा सरकारचा विचार आहे. दडपशाहीचा परिणाम सरकारला पाहिजे तसा न होता, उलट दिशेनेंच होत आहे. सबब अठरा वर्षेपेक्षां अधिक वयाच्या प्रत्येकानें राष्ट्रीय सभेचे मेंबर होण्याचा जरूर विचार करावा. दर रविवारीं सभा भरवाव्या आणि त्या ठिकाणीं सार्वजनिक प्रश्नांबद्दल वादविवाद करावा. कोणाचीही भीति बाळगण्याचें कारण नाहीं भ्यावयाचेंच असेल, तर फक्त एकट्या परमेश्वराचीच भीति बाळगा. आणि मनांत असा विश्वास असूं द्या कीं, कोणत्याही इंग्लिश मनुष्यापेक्षां आपण कोणत्याही प्रकारें कमी योग्यतेचे मुळींच नाहीं.

माझ्या दृष्टीनें असे विचार सरकारी आणि राष्ट्रीय विद्यार्थ्यांनीं आठवड्यांतून कांहीं दिवस सर्वजण एके ठिकाणीं जमून श्रवण केले, तर त्याचा उपयोग विशेष फायदायक होईल, असें हल्लीं माझें मत होऊं लागलें

आहे. व तशा दृष्टीनें प्रयत्न करण्याचा माझा विचार आहे. त्यांत कितपत यश येईल, तें एक परमेश्वरासच माहीत. संबब असले फेरफार कार्यक्रमांत घडवून आणले, तर त्यास कोणीही नांवें ठेवणार नाहीं. पण म्हणून मूलें कुठारः करणारे दुसरे इतर फेरफार राष्ट्रहितविघातक ठरत नाहींत, असें नाहीं.

तूर्त इतकेंच पुरें. लहाना तोंडीं मोठा घांस घेऊन, मी आपलें पांडित्य आपल्यासारख्यांपुढें या पत्रांत आपली पायरी सोडून प्रदर्शित केलें आहे, याबद्दल माफी असावी. याच बाबतींत पुढें मागें फिरकोळ हकीगतीचें जास्त सविस्तर पत्र मी आपल्याला लवकरच लिहिणार आहें. माझ्याबद्दल आपण यत्किंचित्‌ही काळजी करूं नये. मी सुखांत आणि समाधानांत आहे. कारणपरत्वें, अत्याचाररहित असहकारितेची चळवळ थोडीशी मंदावलेली दिसत असली, तरी केलेल्या गोष्टीबद्दल मला मुळींच पश्चात्ताप होत नाहीं. उलट माझें मन अधिक संघटित कार्य करण्याकरितां, जास्तच उत्सुक आणि कार्यक्षम झालेलें आहे. असो. माझी प्रकृति बरी आहे. आपलेकडून सर्वांच्या खुशालीबद्दल मधून मधून वरचेवर पत्र येत असावें. कळावें, सेवेशीं श्रुत होय, हे विज्ञापना.

आपला

नम्र, गरीब, आणि आज्ञाधारक,

पुत्र.

पोस्टमन पत्रें नेहमीं पत्ता लिहिलेल्या ठिकाणींच टाकतात, असें नाहीं. भलत्याचें पत्र केव्हां केव्हां भलत्यालाच पोंचतें. तसें करण्यांत पोस्टमनकडून कामाच्या गडबडींत कधीं कधीं चूक होते. असें करण्यांत त्यांचा कांहीं एकहेतु नसतो. केवळ नजरचुकीनें अशा गोष्टी घडून येतात. तशांतलाच प्रकार वर लिहिलेल्या पत्रासंबंधानें झालेला आहे. एकाचें पत्र दुसऱ्याच्या हातांत पोस्टमनच्या हयगयीमुळें चुकून पडलें व तें त्यानें तितक्याच निर्हेतुक बुद्धीनें सहजगत्या फोडलें. त्यांतील मजकूर हिंदुस्थानांतील सर्व लोकांना आणि विद्यार्थ्यांना विशेष मननीय आणि विचारणीय होण्यासारखा आहे म्हणून, तें पत्र जसेंच्या तसेंच वर लिहिल्याप्रमाणें या ठिकाणीं दिलेलें आहे.

# एका चिनी बाईची गोष्ट.

चीन देशांतील एक प्रसिद्ध तत्त्ववेत्ता गांवोगांवीं हिंडून, तेथील सृष्टिनिरीक्षण करण्याचा उद्योग करीत होता. एके दिवशीं तो एका खेडेगांवांत फिरत फिरत आला असतां, एक तरुण स्त्री शोकविव्हल झालेली आणि एका नवीन रचलेल्या थडग्याजवळ वारा घालीत एकटीच बसलेली त्याच्या नजरेस पडली. तिनें विरहावस्थाप्रदर्शक शुभ्र वस्त्र सर्व अंगभर परिधान केलें होतें. असा देखावा पाहून आश्चर्यचकित झालेला तो चिनी तत्त्ववेत्ता त्या बाईला म्हणाला, "तुला येथें थडग्यावर वारा घालीत बसलेली पाहून माझें मन साशंक होत आहे. तूं हें वेड्यासारखें काय करीत आहेस ?" हा अनपेक्षित प्रश्न ऐकून ती क्रोधवत झालेली दिसली. तिनें आपले डोळे रागानें वटारले. पण तिनें उत्तर मात्र मुळींच दिलें नाहीं. मनुष्यस्वभावचिकित्सा एवढ्याच दृष्टीनें, ती अनोळखी आहे, तरी मी चौकशी करीत आहे, असाही त्या तत्त्ववेत्त्यानें तिच्याजवळ खुलासा केला, तरी देखील ती कांहीं एक बोलली नाहीं. तिचें थडग्याला वारा घालण्याचें काम एकसारखें जारीनें सुरू होतें. इतक्यांत तिचा एक नोकर तेथें येऊन त्या तत्त्ववेत्त्याला म्हणाला, तुमच्या प्रश्नाचें उत्तर देण्याचें माझ्या मालकिणीच्या मनांत नसलें, तरी तें काम आपल्यासाठीं मी करतों. माझा धनी नुकताच एका पंधरवड्यापूर्वी कैलासवासी झाला. त्याची ही बायको आहे. या उभयतां नवराबायकोचें एकमेकांवर अतिशय प्रेम होतें. माझा मालक आसन्नमरण स्थितींत असतां ही माझी मालकीण रडत रडत त्याला म्हणाली, 'परमेश्वराच्या अवकृपेनें या दुखण्यांत आपला अंत झाला, तर मी माझें पुढील सर्व आयुष्य जोगीण होऊन कंठीन.' माझ्या मालकानें त्यावर उत्तर केलें, 'तूं अशी शपथ घेऊं नकोस. तुझ्यासारख्या सुंदर स्त्रीला जोगीण होऊन पुढील जीवितयात्रा पार पाडणें फार कठिण गोष्ट आहे.' मग माझी धनीण म्हणाली 'तसें असेल तर शपथेवर निदान एवढें तरी खास सांगू शकतें

कीं, तशा स्थितींत मी पुनर्विवाह केव्हांही करणार नाहीं.' माझा धनी म्हणाला 'तशी सुद्धां शपथ घेणें तुला बरें नाहीं. तूं सुंदर असून तरुण आहेस, म्हणून असल्या वचनाचें परिपालन देखील तुझ्या हातून होणें मुष्किलीचें आहे. फार झालें, तर तुला एवढी मात्र शपथ घेण्यास मुळींच हरकत नाहीं कीं, मी मेल्यानंतर माझ्या शवावर उभारल्या जाणाऱ्या थडग्यावरील गवतमिश्रित मातीचीं लहान लहान जलयुक्त ढेकळें जोंपर्यंत वाळून कोरडी होणार नाहींत, तोंपर्यंत दुसऱ्या लग्नाचा खटाटोप माझ्याकडून व्हावयाचा नाहीं.' माझ्या मालकिणीनें ही वचनाची शपथ मात्र अद्यापपर्यंत पाळली आहे. आपल्या मृत पतीवर त्याच्या जिवंतपणीं तिचें अत्युत्कट आणि निस्सिम प्रेम होतें. पण तो मेल्यानंतर तीं थडग्यावरील मातीचीं ढेकळें दिवसाच्या उन्हानें लवकर कोरडीं कां पडत नाहींत, याची काळजी गेल्या आठवड्याभर माझ्या मालकिणीला एकसारखी लागून राहिली आहे. आणि ह्मणूनच, थडग्यावरील मातीचीं ढेकळें, निसर्गाच्या उन्हाबरोबर, आपल्या वारा घालण्याच्या सतत उद्योगानें लवकर कोरडीं पाडून, पुनर्विवाहासाठीं वचनमुक्त होण्याची खटपट, या चिनी स्त्रीनें सध्या अहर्निश चालू ठेवली आहे." ही हकीकत ऐकून, चिनी तत्त्ववेत्ता आपल्या शंकेचें समाधान पावता झाला. म. गांधींच्या या चळवळीच्या दिवसांत, म. गांधी हे कारागृहवासांत अडकून पडलेले आहेत अशा वेळीं बाहेरील वातावरण कसें अन्यथा प्रक्षुब्ध केलें जात आहे, हें पाहून, या वरील चीनमधील स्त्रीच्या गोष्टीपासून आपल्याला काय तत्त्वबोध घेतां येईल, हें वेगळें सांगावयास नको.

---

# राष्ट्रीय कामगिरी.

एक गांव होतें. त्याच्या एका टोंकाला एक महारवाडा होता. त्याच्या शेजारींच एक पडकें मारुतीचें देवालय होतें. त्या देवळांतलि देवाची पूजा करण्यासाठीं एक पुजारी होता. या पुजाऱ्याच्या अंगांत विशेष असा गुण कोणताच नव्हता. तरी गांवांतील लोक त्याला थोडा फार मान देतच असत. जगाची कुटाळी करणें हा ह्या पुजाऱ्याचा धंदा होता. अहंमन्यता याच्या अंगीं पूर्णपणें बाणली होती. दुसऱ्यावर टीका करण्यासाठीं याचे अहोरात्र प्रयत्न सुरू असत. हाच याचा नेहमींचा उद्योग होता. गांवांतील दोन चार प्रतिष्ठित व्यक्ति आपल्या सहवासाला ठेवून त्या जोरावर प्रतिष्ठेनें कुचेष्टा करून हा पुजारी आपलें वजन चार लोकांत कायम राखीत असे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत प्रचलित विषयांची दोषमूलक व टीकात्मक चर्चा करून आपली कृतिशून्य राष्ट्रीय कामगिरी घडवून आणावी, असा यानें आपल्या डोळ्यांपुढें स्तुत्य उद्देश ठेवला होता. कोणत्याही गोष्टींतील सगळी घाण यानें आपल्या मनांत, उपदेशासाठीं, मुद्दाम सांठवून ठेवली होती. कोणत्याही कमिशनपुढें साक्ष देण्याचा प्रसंग आला तर नांवनिशीवार तपशीलाची यादी पुरविण्यासाठीं याच्याजवळ जय्यत तयार होती. हिंदुस्थानांतील कोणत्याही लहानमोठ्या आणि बऱ्यावाईट व्यक्तिबद्दल यांनीं आपलीं मतें ठाम ठरवून ठेवलीं नव्हतीं, असें नाहीं. चळवळींचा प्रश्न निघाला कीं, कोणत्या बाजूला हात वर करावयाचा आणि कोणावर दुसरा हात उगारावयाचा, याचे नियम यांनीं बांधून ठेवलेले होते. पुष्कळ दिवस राजकारणांच्या साहचर्यांत लुडबुड करण्याला मिळाल्यामुळें कोणाचीही बरोबरी करण्याला घमेंडीचें सामर्थ्य आपल्या अंगीं साहाजिकच उत्पन्न झालें आहे, असें त्याला वाटूं लागलें होतें. कशावरही एकदम तोंड टाकण्याच्या बाबतींत याचा हात कोणालाही धरता येण्यासारखा

नव्हता. यानें सारासारविचाराची फारकत करून घेतली होती आणि लांगूल चालनाचें सात्य याच्या क्षुद्र मोठेपणाला उपयोगी पडूं लागलें होतें. लोकांच्या चुकींच्या याद्या याच्याजवळ भरपूर असल्यामुळें, त्या पुंजीची भीति हा गांवकऱ्यांना नेहमीं घालीत असे व आपल्या जिवंतपणाची साक्ष विधायक कामगिरीपेक्षां विघातक कारागिरीच अधिक देईल,अशी यानें आपली समजूत करून घेतली होती.या पुजाऱ्याची पहिली स्वदेशसेवा सोडून दिली, तरी गेल्या दीड दोन वर्षांत हिंदुस्थानांतील सर्व चळवळींच्या दोषदिग्दर्शनाचा गठ्ठा याच्या जवळ बिनचुकपणानें व विशेष दक्षतेनें तयार केलेला होता. त्याचा परिस्फोट तो मधून मधून करीत असला तरी, त्यामुळें आपलें वीर्य क्षिणता पावलें आहे, अशी शंका याच्या मनाला कधींच शिवत नसे. उलट आपल्याजवळ परोपदेशपांडित्यासाठीं अजून पुष्कळ दारूगोळ्याची सामग्री शिल्लक आहे, अशी त्याची पक्की खात्री होती. आपली योग्यता आपणच मानून घेऊन लोकांच्या उपदेशार्थी पुराणें दोषदृक्पद्धतीनें हा आपल्या दुपारच्या फावल्या वेळीं त्या मारुतीच्या देवळांत जमलेल्या ठराविक श्रोत्यांपुढें रोजच्या रोज न चुकता सांगत असे. निंदेशिवाय याच्या जिभेला दुसरा शब्द ठाऊक नव्हता. कोणत्याच बाबतींत कृतीच्या राष्ट्रीय सेवेचा विटाळ याच्या हाताला झालेला नव्हता. असहकारितेची चळवळ कशी दोषमूलक आहे, म. गांधींनीं आपल्या राजकारणांत कोठ कोठें घोडचुका केल्या, आंत एक आणि बाहेर एक असें कोण कोण वागले, याची खडान्खडा माहिती या पुजाऱ्याला होती. शाळा किती ओस पडल्या नाहींत, राष्ट्रीय शिक्षणसंस्थांमधून गेलेल्या विद्यार्थ्यांनीं पुनः आपलीं नांवें सरकारी शाळांत कशीं नोंदवून घेतलीं, असहकारितावाद्यांनीं आपले खाजगी मुकद्दमे सरकारी कोर्टांतून केव्हां केव्हां निकालीं काढले, वगैरे मुद्दे याच्याजवळ भरपूर सांठवून ठेवलेले होते. हिंदुस्थानच्या स्वराज्यासाठीं परराष्ट्रांत कोण गेले, लोकसेवा करण्याचा आविर्भाव दाखवून सरकारी नोकऱ्या किती जणांनीं सोडल्या नाहींत, व हिंदी दिवाणांनीं मोठ्या पगारानें मिंधे होऊन व सरकारच्या दडपशाहीच्या धोरणाला नाखुषी दर्शवून आंतून कशी संमति दिली, याची मुद्देसूद व कलमवार चर्चा हा आपल्या सकाळच्या पूजेच्या वेळीं नित्यशः करून आपला वेळ बिलकुल फुकट दवडीत नसे. कौन्सिलांमधील

आपल्या सभासदबांधवांच्या अडवणुकीच्या आवेशयुक्त रडगाण्याबरोबर, तुलनेनें, स्वयंसेवकांच्या भिक्षांदेहीचा उपहास करून, हा पुजारी आपली पाठ मोठ्या अभिमानानें नेहमीं थोपटून घेत असे. गाभाऱ्यांतील देवतेची मूर्ति जशी स्वयंभू आहे, त्याप्रमाणेंच बाहेरील आपली निंद्य विघातक राष्ट्रीय कामगिरीची स्थूलाकृतिहि स्वयंप्रकाशित आहे, असा याला अभिमान वाटत असे. असा या गांवप्रसिद्ध पुजाऱ्याच्या आधुनिक राष्ट्रीय कामगिरीचा त्रोटक इतिहास आहे.

---

# सशाचें शिंग.

मॉंटेग्यू चेम्सफर्ड साहेबांनीं हिंदुस्थान देशावर फिदा होऊन १९१९सालीं इंडियन रिफॉर्म ॲक्ट निर्माण केला.या ॲक्टामधील सुधारणांमुळें हिंदुस्थानांतील पुष्कळ अक्कलवंत आंकडेशास्त्र्यांचे उघडे डोळे दिपून गेलेले आहेत.व नवीन कौन्सिलसमध्यें शिरून व त्यांत प्रतियोगी सहकारिता करून, हिंदुस्थानाला स्वराज्य संपादन करून देण्यासाठीं हे शशशृंगधनुर्धर उत्सुक झालेले आहेत. आणि त्यासाठीं लोकांनीं असहकारितेचा मार्ग सोडून या नव्या कौन्सिलसमध्यें डेढलॉक करण्यासाठीं खटाटोप करावा व आपल्याला त्या कामीं मदत करावी म्हणून,हे कौन्सिलवाले लोक आपला घसा एकसारखे ओरडून कोरडा करून घेत आहेत.

पण या नव्या कौन्सिलच्या नियमांतच घटना अशी योजून ठेवलेली आहे कीं, या वेड घेऊन पेडगांवाला जाणाऱ्या राष्ट्रीय कौन्सिलर्सनीं नवीं कौन्सिलें पूर्णपणें काबीज केलीं तरी, त्यांत यांचें मताधिक्य होणें जवळ जवळ अशक्य आहे. अशी वस्तुस्थिति असतांना देखील, यांना हें कौन्सिलचें कुटिल वातावरण निर्मळ दिसावें, हा दैवदुर्विपाकच म्हटला पाहिजे. डोळ्यांत अंजन घातलें म्हणजे डोळा जसा सुधारतो, त्याप्रमाणेंच आकडे मनानें मोजले, तर मन सुधारण्याचा एक संभव आहे. त्या दृष्टीनेंही या प्रश्नाचा विचार करून पाहिला तर वावगा नाहीं. रिफॉर्म ॲक्टनें हल्लींचीं कौन्सिल्स खालील प्रमाणें बनलेलीं आहेत.

| प्रांत, | मत. सं. | लोकनियुक्त. | सरकारनियुक्त. |
|---|---|---|---|
| बंगाल | १३९ | ११३ | २६ |
| मद्रास | १२७ | ९८ | २९ |
| संयुक्त | १२३ | १०० | २३ |
| मुंबई | १११ | ८६ | २५ |
| बिहार ओरिसा | १०१ | ७६ | २७ |
| पंजाब | ९३ | ७१ | २२ |
| मध्यप्रांत | ६८ | ५३ | १५ |
| आसाम | ५३ | ३९ | १४ |

या वरील आंकड्यांवरून कौन्सिलसमध्यें लोकनियुक्तांचें कमींत कमी प्रमाण शेंकडा ७० प्रमाणें ठेवण्यांत आलें असल्याचें दिसून येतें. लोकांचें पूर्ण मताधिक्य या कौन्सिलसमधून पाहिजे असेल तर, या लोकनियुक्त जागांपैकीं शेंकडा ७५ जागा लोकांच्या तर्फेच्या सभासदांनीं काबीज करावयाला पाहिजेत. पण हें शक्य आहे काय ? शक्यतेचें प्रमाण अधिक वाढविण्यासाठीं, लोकनियुक्तांच्या जागा तदनुरूप तशा वाढत्या ठेवावयाला पाहिजे होत्या. परंतु या ॲक्टाच्या घटनेंत, परस्पर जातींचें मत्सर आणि विविधहिताची चढाओढ, इतकी निगडित करून ठेविली आहे कीं, त्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांनीं आपल्या प्रयत्नांची परमावधि केली तरी, त्यांत त्यांना यशप्राप्ति होऊं नये. वर दिलेल्या कोष्टकांत लोकनियुक्तांची जी संख्या आहे, त्यांत विशिष्ट वर्गासाठीं राखून ठेवलेल्या जागांचाही अन्तर्भाव

होतो. युरोपियन, अँग्लोइंडियन, जमीनदार, व्यापारी आणि उद्योगधंदेवाले, इंडियन ख्रिश्चन, युनिव्हर्सिटी पदवीधर, मळेवाले, वगैरे अल्पसंख्यांक व विवक्षित हितांच्या लोकांसाठीं कांहीं जागा मुद्दाम राखून ठेवलेल्या आहेत. कांहीं कांहीं कौन्सिल्समधून तर या राखून ठेवलेल्या जागा लोकनियुक्त जागांशीं विषम प्रमाणांत आहेत. उदाहरणार्थ, बंगाल प्रांतांत लोकनियुक्तांच्या ११३ जागांपैकीं २८ जागा राखून ठेवलेल्या आहेत, व मद्रासमध्यें ९८ लोकनियुक्त जागांपैकीं राखीव जागा १९ आहेत. म्हणजे, बंगालमध्यें ८५ (११३–२८) जागा लोकांनीं निवडून भरावयाच्या आहेत. व मद्रासमध्यें ही संख्या ७९ (९८–१९) आहे. सबब, बंगालच्या आणि मद्रासच्या कौन्सिल्समध्यें लोकपक्षीय मताधिक्य एकच मतानें होण्यास, लोकांनीं अनुक्रमें ७० आणि ६४ जागा पटकाविल्या पाहिजेत. याचा अर्थ, बंगालमध्यें ८५ पैकीं ७० व मद्रासमध्यें ७९ पैकीं ६४ जागा लोकांनीं आपल्यातर्फें हस्तगत करून घेतल्या पाहिजेत. हें कौन्सिल्स काबीज करण्याचें प्रमाण, या दोन प्रांतांत, शेंकडा ८० असें पडतें. बंगाल मद्रासप्रमाणेंच इतर प्रांतांतही अशीच स्थिति आहे, हें वरीलप्रमाणेंच हिशेब केला असतां कोणाच्याही सहज लक्षांत येईल. याप्रमाणें, नव्या कौन्सिल्समध्यें डेडलॉक उत्पन्न करण्याचा प्रयत्न सिद्ध होण्यासाठीं, शेंकडा ८० आणि ९० जागा लोकांनीं संपादिल्या पाहिजेत, असें प्राप्त होतें, हें कसें शक्य व्हावें? क्वचित प्रसंगीं कौन्सिल्समध्यें इतक्या प्रमाणांत देखील मताधिक्य प्राप्त झालें, तरी डेडलॉक करण्यासाठीं हरएक प्रश्नांत सरकारचे पराभव, एका पाठीमागून एक, असे अगणित व्हावयाला पाहिजेत. असें होणें अजून संभवनीय आहे, असें वाटतें कां कोणाला? हीच स्थिति कौन्सिल ऑफ स्टेटची आहे. कौन्सिल ऑफ स्टेटची रचना, उपयोगाच्या हेतूपेक्षां, राज्यकारभाराला शोभा आणण्यासाठींच करण्यांत आलेली आहे. चेंबर ऑफ कॉमर्सचे मतदार सभासद वगळले तर या कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें लोकनियुक्तांच्या जागा सरकारनियुक्तांच्या जागांपेक्षां फक्त चारांनींच जास्त आहे. तसेंच, प्रांतांच्या कौन्सिल्सप्रमाणेंच, लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीमध्येंही मताधिक्याचा डेडलॉक अशक्यप्रायच आहे. तेथील १४३ सभासदांपैकीं ४१ सरकारनियोजित आहेत, २० जागा राखून ठेवलेल्या लोकांसाठीं

आहेत आणि ८२ लोकांनीं निवडणुकीनें भरावयाच्या आहेत. लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीमध्यें डेडलॉकचें घोडे दामटावयाचे असेल तर, या ८२ जागांपैकीं ७२ जागा लोकपक्षाच्या असल्या पाहिजेत. याप्रमाणें, प्रांतांचीं कौन्सिल्स, कौन्सिल ऑफ स्टेट, लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली, या तीन तोंडांच्या दत्तात्रयाचा राज्यकारभार लोकांच्या मताधिक्यानें कौन्सिलवाल्या शहाण्यांच्या मनांतून डेडलॉक करून बंद पाडावयाचा आहे. आणि असें झालें म्हणजे हिंदुस्थान देशाला स्वराज्य मिळेल, अशी या आपल्यांमधील राष्ट्रीय लोकांना भ्रांति आहे. अशा या दिखाऊ कौन्सिल्सच्या भिंतीवर नवे कौन्सिलर्स आपलें मजबुत डोकें फोडून पहाणार आहेत. आकाशांतील पुष्प तोडून त्याच्या वासानें गुंग होणारे आणि मृगजळ पिऊन ढेकर आणणारे हे नव्या कौन्सिल्समध्यें स्वराज्यासाठीं जाणारे राष्ट्रीय कौन्सिलर्स, वाळूचे कण रगडून, तेल गाळण्याचा घाणा घालण्याच्या कामांत हल्लीं अगदीं चूर होऊन बसलेले दिसत आहेत. अशांच्या चित्तांची आराधना कोणाला करतां येईल ? हे शशशृंगधनुर्धर कौन्सिल्सच्या सशाच्या शिंगानें हिंदुस्थानचें स्वराज्य फुंकणार आहेत! हा मार्ग अव्यवहार्य नाहीं, केवळ चमत्कारमय मात्र आहे. कशानें का होईना, कोणाच्यानें का होईना, पण एकदां हिंदुस्थान देशाला स्वराज्य मिळो म्हणजे झालें. असहकारितेच्या शस्त्रानें हिंदुस्थानांतील लोक जेथें स्वराज्य मिळवूं पहात आहेत, तेथें हे निःस्वार्थी कौन्सिलर्स आपल्या हातांच्या नखांनीं तो कारभार उरकून घेणार आहेत, हें आपण हिंदुस्थानच्या बाकीच्या सर्व लोकांनीं आपलें महद्भाग्यच समजलें पाहिजे.

# भयंकर स्वप्न.

वामनरावांना स्वराज्याचें वेड लहानपणापासून फार होतें. हिंदुस्थानांतील लोकांची राजकीय उन्नति व्हावी, असा निदिध्यास त्यांना सदासर्वदा लागलेला होता. राष्ट्रीय चळवळींत पुढारी म्हणून ते मिरवून घेत नसले, तरी राजकारणाची कळकळ त्यांचें मन नेहमीं चिंताक्रांत करून टाकीत असे. हिंदुस्थानचें भूतकालचें वैभव त्यांच्या डोळयापुढें नेहमीं दत्त म्हणून उभें असे. जगाच्या इतिहासाचें वाचन हा त्यांचा नित्य परिपाठ होता. सर्वसंपन्न असलेल्या हिंदुस्थानची हल्लींची निकृष्ट स्थिति त्यांच्या स्वभावाला कोणत्याही विषयांत त्यांना सुख सांपडूं देत नसे. हरप्रकारें मनाची करमणूक करून घेण्यासाठीं ते पुष्कळ जबरीचे प्रयत्न करून पहात. परंतु स्वराज्याची आठवण त्यांचा काल एकदम दुःखमय करून टाकी. अशा स्थितींत एका पाठीमागून एक वर्ष संपून गेलें, म्हणजे त्यांचें मन अधिकच उद्विग्न होऊन जाई. परमेश्वराच्या सामर्थ्यावर त्यांची निष्ठा होती. दैव म्हणजे कृतकर्म आहे, हेंही त्यांनीं लक्षांत बाळगलें होतें. तरी पण, उच्चनीच स्थिति कालवशानें पालटत असते, अशा आशेवर ते आपले उदासीन वाटत असलेले दिवस कसेबसे कष्टानें कंठीत होते. स्वतःच्या परिस्थितीला धरून, चाणाक्षपणानें ते आपली वर लिहिलेल्या प्रकारची कष्टतम जीवितयात्रा चालवीत असतां, एके दिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास त्यांना एक भयंकर स्वप्न पडलें.

हिंदुस्थानांतील सर्व लोक असहकारितावादी झालेले आहेत. ऐक्याचें तत्त्व प्रत्येकाच्या ठिकाणीं पूर्णपणें बिंबलेलें दिसत होतें. परस्परांमधील क्षुल्लक मतभेद एकमेकांना दिसत नव्हते, असें नाहीं. परन्तु, त्यांची मजल कार्यहानि न व्हावी, इतकीच सर्वांनीं ठेवली होती. इंग्लिश राज्यकर्त्यांनीं आपल्यावर राज्यशासनाचें बाबतींत अनंत उपकार केले आहेत, हें कोणीच विसरलेले दिसत नव्हते. ही गोष्ट कितीही खरी असली तरी, स्वराज्याचे

हक्क आपण केव्हां तरी प्राप्त करून घेतलेच पाहिजेत, अशी भावना बहुतेक सर्वांच्याच अन्तःकरणांत जागृत झालेली होती. इंग्लिश लोक परदेशांतून हिंदुस्थानाला स्वराज्य शिकविण्यासाठीं येथपर्यंत आले, ती त्यांची मनीषा परिपूर्ण झाली, तर त्यांत त्यांना देखील अभिमानच वाटेल, अशी कल्पना सर्व हिंदुस्थानानें आपल्या मनाशीं करून घेतली होती. हिंदुमुसलमानांचें ऐक्य, ज्याच्या अभावीं हिंदुस्थाननें आजपर्यंत आपलें सर्वस्वीं नुकसान करून घेतलें होतें, त्याची परिपूर्तता झालेली स्पष्ट दिसत होती. खादीचा प्रसार घरोघर झाला होता. परदेशी कापड बाजारांतून फुकट वाटण्यांत आलें, तरी देखील कोणी त्याकडे ढुंकून सुद्धां पहात नसे. कपडा हातानें विणलेल्या सुताचा आहे किंवा गिरणींतील यंत्रांनीं बनलेला आहे, ती गिरणी हिंदी भांडवलवाल्यांनीं काढली होती किंवा परकीय पैशावेर तिचा कारभार चालविला जात होता, वगैरे शहाणपणाचे गौण प्रश्न कोणी कोणाला विचारीत नसे. खादी कारणामुळें न वापरणारा, परन्तु मनानें स्वराज्यासाठीं तितकाच उत्सुक असलेला, खादीभक्तांकडून फजित केला जाण्याचें बंद झाले होतें. खादी ही राष्ट्रीयत्वाची खूण आहे, इतकाच अर्थ सर्वजण समजत असत. चरक्याच्या मंजुळ ध्वनीचा मंत्र रोजचा थोडा वेळ तरी जपला पाहिजे, यांतील हेतु स्वराज्याच्या लालसेची आठवण विसरून जाऊं नये, असाच मानला जात असे. कोणतीही मोठी गोष्ट करावयाची असेल, तर शिस्त बिघडवून चालतां येणार नाहीं, हें तत्त्व हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं मनांत बाळगलें होतें. तर्ककुतर्क काढण्याची बुद्धीची संवय नष्ट झाली होती. प्रत्येक कामांत चिकित्सक पद्धति ठेवली तर,तें वर्तन कधीं कधीं राष्ट्रविघातक होण्याचा संभव आहे, हें कोणीही विसरलें नव्हतें. साधकबाधक प्रमाणें व मनाची समतोल बुद्धि, यांचा उपयोग अवांतर कामीं करण्याचें सर्वांनीं ठरविलें होतें. सारांश, हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं आपल्या नष्टचर्याचें निदर्शक असलेले पक्षभेद स्वराज्यध्येयासाठीं क्षणभर ऐक्यानें नाहींसे केले होते, अशी स्थिति वामनरावांच्या डोळ्यापुढें दिसूं लागली.

विद्यार्थी वर्गामध्यें देखील असाच एकदिल उत्पन्न झाला होता. राष्ट्रीय शाळेंत विद्यार्थी या वर्षीं किती गेले, पुढच्या सालीं त्यांतून कमी किती झाले, वगैरे मुद्यांच्या प्रश्नांची गुंतागुंत सोडविण्याचा खटाटोप कोणीच

करीत नव्हता. तरी पण, सरकारी शिक्षणसंस्था, शाळा व कॉलेजें, ओस पडलेलीं दिसत होतीं. विद्यादेवी अन्तर्धान पावली होती. शेकडो, लाखो आणि हजारो विद्यार्थी सकाळपासून संध्याकाळपर्यंत निसर्गाच्या शाळेंत स्वराज्याचा विद्याभ्यास करीत होते. लढाई चालू होती तोंपर्यंत इंग्लंड, जर्मनी, वगैरे राष्ट्रांमधून ज्याप्रमाणें विद्यार्थ्यांनीं क्षणिक सुट्टी घेतली होती, त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील सर्व विद्यार्थी आपला शिक्षणक्रम कांहीं दिवस तहकूब ठेवून बसले होते. शिक्षक आणि प्रोफेसर्स विद्यार्थ्यांच्याच बरोबर स्वराज्यविषयावरील वादविवादाची चर्चा करूं लागले होते. थोडा वेळपर्यंत विद्यार्जन थांबवून धरलें तर, आपल्या सर्व भावि आयुष्याची इमारत पायाशिवाय ढांसळून पडेल, ही भीति नाहींशी झाली होती. स्वराज्य मिळाल्या-नंतर आपण, प्रथम, सहजच उत्तम नागरिक होऊं, नानाप्रकारचे उद्योग-धंदे शिकूं, विविध विषयांत दुप्पट मेहनत करून पारंगतता संपादन करूं, ही आशा बहुतेक सर्व विद्यार्थ्यांच्या अंतःकरणांना प्रोत्साहन देत असलेली दिसत होती.

वकील वर्गांनीं आपल्या वकिल्या सोडल्या होत्या. बॅरिस्टर्सनीं आपलीं ब्रीफें लांकडी कपाटांत बाजूला सारलीं होतीं. कांहीं काळ, मनाची धनलोभी वृत्ति त्यांनीं तहकूब केली होती. पक्षकार लोकांच्या कोर्टांतील भांडणांना रजा देण्यांत आली होती. पंचायतीचीं कोर्टें स्थापन कशीं करावीं, आपला कब्जा तोडून घेण्याला तेथें पक्षकार आपल्या फिर्यादी गुदरतील किंवा नाहीं, पंचमुखी पंचांनीं खटल्यांचे निकाल केले तरी, त्यांची अंमल-बजावणी कशाच्या जोरावर बिनतक्रार होईल, अशा संकटांची विवंचना वकील वर्गांची गांजणुक करीनाशी झाली. वकील वर्गाची उद्योगी दिनचर्या स्वराज्याच्या निरुद्योगाच्या उद्योगांत उपयोगी पडूं लागली. ब्रिटिश न्यायगृहें कामासाठीं आ वांसून बसलीं असल्याचा भीषण देखावा दृष्टीला दिसूं लागला. राजकीय खटल्यांत थोडेबहूत कारणपरत्वें अन्याय झालेले दिसत असले तरी, खाजगी भांडणांमध्यें ब्रिटिश न्यायदेवता सदोदित जागरूक असते, सबब तेवढ्यापुरता त्या कोर्टांचा फायदा घेण्यास हरकत नाहीं, अशीं एकदृष्टीचीं मतें स्वराज्याच्या ध्येयासाठीं आणि ऐक्याच्या अवश्यकतेसाठीं लयाला गेलीं. एकानें केलें म्हणजे दुसरा करील, करणारांनें आणि न कर-

णारांचें प्रमाण कसें काय पडतें, वगैरे प्रश्न, सर्वजण एकच रस्ता चालूं लागल्यामुळें, आपोआप नाहींसे झाले. फिर्यादीतर्फे खोटा पुरावा करण्यांत आला तर, आरोपीतर्फे खरा पुरावा करून दाखवावा, खालच्या कोर्टांत आपल्या सारखा न्याय झाला नाहीं तर, वरच्या कोर्टांत तो फिरवून घ्यावा, स्वतः कज्जा चालविण्यापेक्षां वकीलाच्या विद्वत्तेची त्यांत भर घालावी, फक्त स्वसमर्थनाचा सत्यतापूर्वक जबाब दिल्यानंतर वकीलाच्या उलटसुलट तपासणीचा फायदा घ्यावा किंवा घेऊं नये, हे, सरळ साधे व सोपे, नेहमींच्या परिस्थितींतील प्रश्न बरोबर सोडविण्याचा अट्टाहास न धरतां, या बाबतींत आपद्धर्म म्हणून कांहीं तरी एक विवक्षित पद्धति, सर्वत्र परिणाम होण्यासाठीं, स्वीकारली जावी, असा सर्वजणांनींच आग्रह धरलेला होता. या वकीलवर्गाच्या स्वार्थत्यागानें देशभक्तांच्या ज्ञानदानाला फार मदत झाली होती. त्यामुळें, लोकसंग्रह पुष्कळ वाढला होता. वकीलांचें हें समयोचित व स्तुत्य वर्तन पाहून, डॉक्टर्स, इंजिनियर्स, वगैरे मंडळींनींहि, तसेंच अनुकरण करून, लोक सेवेला आपलेंही साहाय्य अर्पण केलें होतें.

यक्षिणीची कांडी जशी फिरावी, तशासारखा प्रकार होऊन सरकारी नोकरांनींही आपल्या सरकारी नोकऱ्या सोडल्या होत्या. सरकारी नोकरी करणें म्हणजे पाप आहे, असें ते कधींच समजत नव्हते. परंतु, देशकाल वर्तमान पाहून, आपणही या घरीं वाहून आलेल्या स्वराज्याच्या गंगेंत, आपले हात धुऊन घेतले पाहिजेत, अशी एक उत्कट इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली होती. कांहींनीं, सरकारी नोकरी सुटली तर, आपला भिकार संसार नीटसा साजरा होणार नाहीं, म्हणून केवळ निरुपायानें सरकारी नोकरीचा त्याग केला नव्हता. पण म्हणून, हें लक्षांत आणून, सरकारी नोकरी सोडलेले नोकर त्यांचा हेवादेवा करीत नव्हते. स्वराज्य प्राप्त झालें नाहीं तर, पुढें आपल्या सोडलेल्या नोकरीची वाट काय होईल, आपण आपली भाकरी मग कोणाची नोकरी करून मिळविणार, म्हातारपणीं घरीं बसून सुखानें पेन्शन मिळावें म्हणून पंचवीस तीस वर्षांची सेवाधर्माची तपश्चर्या आपण मध्येंच कशी सोडावी याचा विचार करण्याची संवय लागलेले सरकारी नोकर देखील, हा स्वार्थ दृष्टिआड करूं लागले होते. सरकारचीं निरनिराळीं खातीं नोकरांच्यां अभावीं ओसाड आणि कृतिशून्य दिसूं लागलीं. वर्तमा-

नपत्रांतून जाहिराती देऊनं सुद्धां नवीन रिक्रूटस् सरकारी नोकरीसाठीं मिळेनासे झाले. कावाडकष्टाचें काम हिंदी नोकरांच्या गैरहजेरींत अर्धवट पडून राहिलें. यामुळें, सरकारी कामांत इतका बखेडा माजला कीं, त्याची निरवानिरव होणें, जवळ जवळ दुरापास्तच झालें.

पदव्यांच्या बाबतींत देखील हीच करुणास्पद स्थिति होती. ज्यांच्यासाठीं, लोक एका काळीं साहेबांच्या घरांत खेटे घालीत असत, उंबरठे झिजवीत असत, फलपुष्पादिक भेट म्हणून पाठवीत असत, त्यांना काडीचीही किंमत राहिली नाहीं, असें दिवस येऊन पोंचले. पदव्यांचें खोटें नाणें हिंदुस्थानच्या बाजारांत चालेनासें झालें. सरकारकडून मिळणाऱ्या पदवीपेक्षां लोकांकडून मिळणारी पदवी अधिक महत्वाची आणि कमी मानहानीची समजली जाई. नांवाच्या, पाठीमागें आणि पुढें, डोक्याच्या शिरोभूषणावर आणि छातीच्या वक्षःस्थलावर, लोंबणारीं पदकांचीं भूषणें पदवीधर लोक झिडकारूं लागलेले दिसूं लागले.

स्वराज्याची भव्य इमारत उभारण्यासाठीं द्रव्यनिधीची जरूर अपेक्षा आहे, अशा भावनेनें प्रत्येकजण स्वराज्यफंड मागूं लागला व त्याला यथाशक्ति मदत करूं लागला. फंड भिक्षा मागून जमवावा किंवा शेअर्स काढून जमवावा, तसेंच फंडगुंडांनीं त्यांतला किती पैसा कोणत्या कामासाठीं कां खर्च केला, वगैरे प्रश्नांची चर्चा तूर्त विघातक म्हणून सर्वांनीं सोडून दिली होती. पैशाच्या स्वाधीन सर्व कांहीं आहे, पैशाच्या बलावर इकडचें जग तिकडे करतां येईल, पैसा नसेल तर बाकीचें सर्व असून देखील नसल्यासारखेंच आहे, असा जगाचा अनुभव प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें, जो तो या स्वराज्यफंडाचा निधि कसा बलवत्तर होईल, याचीच काळजी करीत होता. अमक्यानें मुळींच मदत केली नाहीं, तर तमक्यानें त्याच्या ऐपतीप्रमाणें द्रव्यदान करून ग्रहण सोडविलें नाहीं, अशी खरी पण कुत्सित टीका, या सार्वत्रिक संकटाच्या वेळीं, कोणीही करण्याच्या भानगडींत पडले नाहींत.

सारांश, सर्व हिंदुस्थान स्वराज्यमय झालें होतें. स्वराज्यासाठीं उत्सुकता हा एकच विषय लोकामध्यें झाला होता. लोकसेवा ही एकच नोकरी राहिली होती. स्वराज्याचे हक्क एवढाच विद्याभ्यास उरला होता. स्वराज्य संपादन करून घेणें, ही एकच वकीली चालली होती. हिंदुस्थान देशाला

स्वराज्याच्या पांघरुणानें पांघरावें, एवढ्याचसाठीं जिकडे तिकडे खादीचा एकच उद्योग आरंभिलेला होता. पुरुषवर्गाला करता येण्यासारखीं कामें पुरुष करीत असत. त्यांना हातभार लावण्यासाठीं, बाकीचीं इतर किरकोळ कर्तव्यें, त्याच भावनेनें स्त्रियांनीं आपल्या हातांत घेतलीं होतीं. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व लोकांच्या डोळ्यांना फक्त स्वराज्यच दिसत होतें. त्यांचे कानीं तोच शब्द येत होता. त्यांचे हात त्याच्याचसाठीं हलत होते, आणि त्यांचे पाय स्वराज्यासाठींच चालत होते. इतकीं भिन्नभिन्न शरीरें हिंदुस्थानांत वावरतांना दिसत होतीं तरी, या सर्व शरीरांना मन एकच होतें. आणि त्या एका मनाला फक्त स्वराज्याचीच आशा लागून राहिली होती. अशा प्रकारें, या हिंदुस्थान देशाच्या पृष्ठभागावर हा स्वराज्याचा सूर्य फक्त दिवसाचाच प्रकाशित होत असे, असें नाहीं. तर रात्रींच्या काळोखांतही, याचीं प्रखर किरणें आपल्या ओजस्वी तेजानें दिव्य प्रकाश पाडीत होतीं.

हें सर्व असें चक्र फिरलें होतें, तरी त्याला कांहीं अपवादही होतेच. पण, मताधिक्यानें हे अल्पसंख्यांक इतके मरून गेलेले दिसत होते कीं, त्यांच्या अस्तित्वाची कल्पना करणें देखील अनवश्यकच ठरेल. अशा अपवादांना, चिथवून, त्यांची चेष्टा करून, त्यांचा उपहास करून, किंवा त्यांच्यांशीं वैरभाव वाढवून, कोणीही देशभक्त आपल्या कार्याच्या बळकटीला कमीपणा आणीत नव्हते. स्वतःची स्वतःलाच लाज वाटेल, आज नाहीं उद्यां, हेच अपवाद आपल्या नियमाला येऊन मिळतील, अशी भिस्त बाळगून, आपल्या मनाच्या मोठेपणानें, हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व लोक त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असत. द्वेषानें जसा द्वेष वाढतो, त्याप्रमाणेंच, प्रीतीनें प्रीति वाढते. याचा परिणाम, खरोखरच अपेक्षेप्रमाणें असा झाला कीं, हे उरलेले अपवाद हिंदुस्थानच्या असहकारितेंत पुढें मागें थोडक्याच वेळांत येऊन समतेनें मिसळले.

ईश्वरी सृष्टि निरंतर चालावी, म्हणून व्यसनांची योजना आहे. व्यसनानें सुख जसें वाढल्यासारखें वाटतें, त्याचप्रमाणें व्यसनानें दुःखही विसरतां येतें. व्यसनांपासून नेहमीं पुष्कळ तोटेच होत असलेले दिसले तरी, कांहीं कांहीं वेळीं त्यांच्यापासून मुळींच फायदे झालेले आढळून येत नाहींत, असें नाहीं. व्यसनाधिनता ही जन्म सिद्ध आहे. व्यसनापासून अलित राहणें,

हें फार दुर्घट आहे. वैराग्य जसें क्षणभंगूर असतें, तद्वतच व्यसनपराङ्मुखताही स्वाभाविकपणेंच अल्पायुषी राहतें. दारू, अफू, वगैरे व्यसनें जन्मभर सोडून द्यावींत, म्हणून कोणी महात्म्यानें उपदेश केला, तरी त्याची घाण या नरकांतील किड्यांना जन्मभरपर्यंत थोडीच येणार आहे! फार झालें तर, कांहीं थोड्या कालपर्यंत, ते ती जीवन्मुक्ति स्वीकारण्यास राजी होतील. याच भावनेनें, हिंदुस्थानांतील सर्व दारूबाज लोक दारूच्या व्यसनावर बहिष्कार घालून राहिले होते. खादींतच जसें केवळ स्वराज्य नाहीं, तसेंच दारूच्या निषेधांतही स्वराज्याचें बीज नाहीं, असें ते मानीत असत. पण, थोड्या वेळेपुरता, हा दारूचा उपवास त्यांनीं अवलंबिला होता. इतर व्यसनांचीही हकीगत अशीच झाली होती. सबब, अशा या स्वराज्याच्या चळवळींत, व्यसनांना ज्यांनीं अजीबात फांटा दिला होता, त्यांच्याचप्रमाणें, त्या व्यसनांशीं ज्यांनीं तात्पुरती फारकत करून घेतली होती, त्यांचीही पुष्कळशी मदत उपयुक्त झाली.

तसेंच, या स्वराज्याच्या देवळांत प्रवेश करण्यासाठीं स्पृश्यास्पृश्यतेचा धर्मबाह्य विचार प्रत्येकानें अंगाबाहेर टाकला. सर्वच अधोगतीला पोंचलेले, त्यांत उत्तम कोण आणि अधम कोण? ब्राह्मणाचे शूद्र आणि क्षत्रियाचे वैश्य, असा उलटा प्रकार झालेला आढळून येत असतां, सगळेच स्वराज्याच्या दृष्टीनें अस्पृश्य आणि ऐक्याच्या दृष्टीनें स्पृश्य होऊन बसले. स्वराज्याच्या झऱ्याचें पाणी हिंदुस्थानांतील सर्व जातींचे सर्व लोक एकाच ओंजळीनें पिऊं लागले व एकमेकांना पाजूं लागले. रोटीव्यवहार आणि बेटीव्यवहार, या जातिभेदाच्या बाबी नष्ट करून टाकण्याचा दिखाऊ मार्ग सोडून, मनाचा खरा मोकळेपणा आणि निर्भीडपणा, त्यासाठीं, स्वराज्याच्या दृष्टीनें निदर्शक म्हणून समजला गेला.

हें सर्व यथास्थित झालें तरी सदसद्विवेकाचे पोर्येदे अवशिष्ट राहिलेच होते. ऐक्य कांहींही सांगत असले तरी, वैशिष्ट्याचे अभिमानी मूठभर लोक होतेच. स्वराज्य आपल्याच मार्गानें प्राप्त होणार, अशा मताचे खंबीर प्रतियोगी सहकारितावाले आपली किंमत या चळवळींत कमी करून घेण्याचा दुराग्रह सोडीत नव्हते. सरकारनें खेळण्याच्या भांडणासाठीं दिलेलीं आयुधें आपण आपल्या हातांनीं पेलून दाखवून, त्याच्याच सामर्थ्यावर विजय संपादन करून घेतला पाहिजे, अशी राजकारणाची घमेंड आपल्या

बगलेंत आंवरून धरणारे मोठे मोठे राष्ट्रीय जुहाल, वीर, अस्सल मुंईकोट किल्ला शाबुत ठेवण्यासाठीं विरोधाचा सुरखी प्रयत्न करीत होते. कौन्सिलवाले दुधखुळे कौन्सिलसमधील लाळ घोटण्यासाठीं हापापलेल्यासारखे चिंताग्रस्त झाले होते. वास्तविक, ऐश्वर्यवृद्धीसाठीं, या शहाण्यांनींच, त्यांचीं मतें क्षणभर बरोबर आहेत असें मानिलें तरी, माघार घ्यावयाला पाहिजे होती. अशा करण्याला कोणीही लोकच्छंदानुवर्तित्व खास म्हटलें नसतें. परिस्थिति पाहून कार्य कसें करून घ्यावें, हा इतिहासांतील मतलब हाच धडा शिकवितो. परिस्थिति मनुष्याला उत्पन्न करिते, तितकीच हीही गोष्ट खरी कीं मनुष्यही कधीं कधीं परिस्थितीला उत्पन्न करतो.

पण, आश्चर्याची आणि सुदैवाची अशी गोष्ट घडून आली कीं, हे वरील लोकही आपला हट्ट सोडून देऊन बाकीच्या लोकांमध्यें येऊन सामील झाले. असहकारिता पूर्ण स्वरुपांत दिसूं लागली. अत्याचार प्रथमपासून शेवटपर्यंत कोठेंच घडून आला नाहीं. लोकांत आत्मिक बल वाढलें. ऐक्य सर्वशक्तिमान झालें. सरकारचा राज्यकारभार सहकाराच्या अभावीं लुला पडला; परमेश्वराचा स्वराज्याचा एकच कायदा सर्व लोकांना समजूं लागला; बाकीच्या मनुष्यकृत कायद्यांची भीति नाहींशी झाली; तुरुंगाची धास्ती अस्ताला गेली. सहनशीलता पराकाष्ठेला पावली. द्वेषबुद्धि नष्टप्राय होऊं लागली. प्रीतीचा अंमल अधिक वाढला. आत्मविश्वास जागृत झाला. आपल्याला यत्किंचितही अपाय न करतां, कोणत्याही प्रकारें हरकतीला जागा न ठेवून, हिंदुस्थान एकमुखानें स्वराज्य मागत आहे व तें प्राप्त करून घेतल्याशिवाय हिंदुस्थानांतील लोक थांबत नाहींत, अशी स्थिति, वर्ष सहा महिन्याच्या अवधींत, एकसमयावच्छेदेकरून दैवयोगानें घडवून आणली, अशी खात्री इंग्रज सरकारची पटली. त्यांनींही वेळप्रसंग पाहून, तितक्याच मनाच्या मोठेपणानें, हिंदुस्थानांतील लोकांच्या हातांत, बिनबोभाट व न बोलतां, चमत्कारपूर्वक, अनत्याचारी असहकारितेच्या तत्वाचा साश्चर्य धन्यवाद गात गात, स्वराज्याचे हक्क देऊन टाकले.

इतक्यांत वामनराव या वेळीं एकदम जागे झाले. आपण स्वप्नांत काय पाहिलें, याचें त्यांना क्षणभर भान देखील राहिलें नाहीं. स्वप्नसृष्टींत आपण नाहीं, असेंही एक वेळ त्यांचें मनानें घेतलें. पण पुन्हां थोडासा

विचार केल्यानंतर, वस्तुस्थिति खरोखर काय आहे, हें त्यांच्या लवकरच लक्षांत आलें. मग त्यांचे डोळे अश्रुपूर्ण भरून आलेले दिसूं लागले, तर त्यांत नवल तें काय? दुसऱ्या दिवशीं सकाळीं ही रात्रीची घडलेली हकीगत त्यांनीं आपल्या त्यांच्या जीवश्चकंठश्च मित्राला सांगितली. तेव्हां, तो मित्र त्यांना म्हणाला, " तुम्ही आजपर्यंत वेडे होतां, ते आज या स्वप्नानें शहाणे झाला आहांत, हें तुम्ही विसरूं नका. असहकारितेच्या कार्यक्रमांत अशक्य आणि अव्यवहार्य गोष्टी, दिसण्यांत वरवर सहजसाध्य दिसत असल्या तरी, कशा एकत्रित असंभाव्य रीतीनें केल्या गेल्या आहेत, याची कल्पना विचारानें तुम्ही आजपर्यंत करून घेतली नसली तर आतां तरी निदान ती या स्वप्नाच्या साक्षात्कारानें तुम्ही करून घ्या, म्हणजे या स्वप्नाचें सार्थक झालें असें मी म्हणेन. तुम्हांला काय वाटत असेल, तें वाटो. " हें भाषण ऐकून, वामनरावांच्या चेहऱ्यावर, हास्य, क्रो[illegible], विस्मय, खेद वगैरे विकारांचें काहुर माजलेलें स्पष्ठ दिसूं लागलें.

REFBK-0002041

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २९